मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ



प्रा. गं. बा. सरदार

अध्यक्ष

अ. भा. मराठी साहित्य संमेलन

चोपन्नावे अधिवेशन

बार्शी

युगवाणी

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, १९८०.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

'युगवाणी' विषयीचे मान्यवरांचे अभिप्राय

१. डॉ. प्रभुदेसाई यांस,

स. न. आपले पत्र अगदीच अनपेक्षितपणे आले. 'युगवाणी' पूर्वग्रहरहित व निरहंग‌ऽ राखण्यात विदर्भाची पूर्वपरम्परा कारण आहेच. पण कारभारी मण्डळी अशीच लाभणे हाही महत्त्वाचा घटक आहे. असा मनमोकळेपणा व ज्ञानाचे आकर्षण (अन्यत्र) दिसून येत नाही. जुन्या भाषासंस्कृतीच्या अभ्यासातून मराठी भाषेचे ऐतिहासिक धागेदोरे मिळाले तर ते हाती घेण्याचे काम मी यथाशक्ती करतो. परंतु माझ्या वाटयाला भवभूतीचा अनुभव येतो. मराठीची पूर्व संस्कृती कोणी पाहात नाही. म्हणून आपल्या पत्राने मला कोलम्बसाला झालेल्या आनंदाची आठवण होते. आपण लेख पाहून अभिप्राय कळवावा. मला चर्चेला बोलावले तरी मी नागपुरासही यासाठी येईन. त्यात मला आनंद वाटेल.

—श्री. देवीसिंग व्यंकटसिंग चौहान,
सदस्य, महाराष्ट्र राज्य साहित्य व
संस्कृति मंडळ.

२. 'युगवाणी'चा 'राजभाषा मराठी विशेषांक' हा भरदार नि सर्वांगसुंदर अंक प्रसिद्ध केल्याबद्दल आपले, आपल्या सहकाऱ्यांचे तसेच विदर्भ साहित्य संघाचे मनःपूर्वक अभिनंदन. हा अंक येथील मंडळींना खूपच आवडला. नवीन अंक केव्हा प्रसिद्ध होणार?

—डॉ. र. वि. हेरवाडकर, मुंबई.

३. 'युगवाणी'च्या 'राजभाषा मराठी विशेषांका'बद्दल धन्यवाद. आपला अंक अनेक शंकाकुशंकांना परस्पर छेद देणारा व विचारांना चालना देणारा झाला आहे, त्याबद्दल आपले अभिनंदन. अनेक कोश-विषयक आणि भाषाविषयक दृष्टिकोण समोर असले म्हणजे विचक्षण वाचकाला आणि अभ्यासू संशोधकाला भरपूर खाद्य मिळते. काही लेख मननीय आहेत ह्यात शंकाच नाही.

—डॉ. ग. मो. पाटील, कन्याकुमारी.

४. 'राजभाषा मराठी विशेषांका'तील लेखांचे संकलन व संपादन उत्तम झाले आहे. त्याबद्दल हार्दिक अभिनंदन. त्रिभाषासूत्राविरूद्ध टीकावजा कोठे काही कोणी लिहिले असल्यास मला अवश्य कळवावे कारण जमल्यास या विषयावर विस्तृत विवेचन करून लिहिण्याचा विचार आहे.

—प्रा. प्रभाकर वा. ऊर्ध्वरेषे, पुणे.

५. 'युगवाणी'च्या अंकाचे स्वरूप अतिशय दर्जेदार झाले आहे. समतोलही चांगला साधला गेला आहे यामागे तुमचे संपादनकौशल्य व परिश्रमांची जाणीव होते. हळूहळू युगवाणी पुनः नावारूपाला येत आहे याचा आनंद वाटतो म्हणून लिहिले.

—प्रा. डॉ. उषा मा. देशमुख,
मराठी विभाग, मुंबई विश्वविद्यालय.

६. 'युगवाणी'चे आपण संपादक असेपर्यंत आपण कथालेखक या नात्यानं मला युगवाणीत विशिष्ट स्थान दिलंत त्याबद्दल मी आपला आभारी आहे. माझी एक कथा तर ज्येष्ठ कथाकार प्रा. वामन चोरघड्यांनादेखील आवडली होती. त्याचं मला तसं 'युगवाणी' तर्फे पत्र आलेलं होतं. युगवाणीत आलेल्या माझ्या इतर कथांच्या बाबतीतही अशी आवडल्याची पत्रे युगवाणीकडं आल्याचा आपण उल्लेख केल्याचं स्मरतं. आपलं माझं जे भावनात्मक नातं निर्माण झालेलं आहे ते कायम टिको अशी प्रार्थना.

—प्रा. मुरलीधर कुलकर्णी, पणजी, गोवा.

७. 'युगवाणी'च्या आपल्या संपादनाची कारकीर्द फार चांगली झाली. 'युगवाणी'ला एक विशिष्ट दर्जा तुम्ही तुमच्या कुशल संपादनाने प्राप्त करून दिला होता. धन्यवाद.

—प्रा. म. ना. अदवंत, पुणे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ' पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, १९८०
पौष-माघ-फाल्गुन, १९०१

संपादक :
वि. बा. प्रभुदेसाई

मूल्य तीन रुपये)   (वर्ष ३५, अंक १०-११ व १२

संपादक-मंडळ :
सुरेश डोळके, श्रीधर शनवारे, सुनील सुभेदार, वजरंग सरोदे, यशवंत मनोहर, म. म. कुंडले

संपादकीय

'युगवाणी'चा हा जानेवारी–फेब्रुवारी–मार्च, १९८० चा जोड अंक म्हणजे पस्तीसाव्या वर्षातील अखेरचा अंक होय. या अंकाच्या प्रसिद्धीनंतर प्रस्तुत संपादक-मंडळाच्या कार्यकालाचीही सांगता होत आहे.

वार्शी येथे फेब्रुवारी, १९८० मध्ये भरलेल्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या चोपन्नाव्या अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा. गं. बा. सरदार यांचे व्यक्तित्व आणि वाङमय यांचा पयिचय करून देणारे प्रा. श्री. के. क्षीरसागर, डॉ. र. वि. हेरवाडकर आणि डॉ. हेमन्त इनामदार यांचे लेख प्रस्तुत अंकात मुद्दाम दिलेले असून प्रा. यशवंत मनोहर यांचा 'प्रा. गं. बा. सरदार यांच्या अध्यक्षीय भाषणाच्या निमित्ताने' हा लेख वदललेल्या सामाजिक संदर्भांची परखड जाणीव करून देणारा आहे.

प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोध हे सर्व प्रकारच्या मान सन्मानांपासून व सभासंमेलनांपासून सर्वस्वी अलिप्त राहून काव्य, कादंबरी आणि समीक्षा या वाङमयीन क्षेत्रांत मोलाची भर घालणारे एक प्रथितयश साहित्यिक आहेत. त्यांच्या 'सृष्टी, सौंदर्य आणि साहित्यमूल्य' या ग्रंथाला साहित्य अकादमीचा मराठीचा पुरस्कार आणि 'प्रा. रा. श्री. जोग पारितोपिक' ही प्राप्त झाल्या-बद्दल प्रा. मुक्तिबोध यांचे मी हार्दिक अभिनंदन करतो. माझ्या विनंतीला मान देऊन प्रा. मुक्तिबोध यांनी खास 'युगवाणी'साठी म्हणून लिहिलेला 'मी आणि माझे लेखन' हा चिंतनशील लेख वाचकांचे लक्ष वेधून घेतल्याशिवाय राहणार नाही. याव्यतिरिक्त आणखी काही अभ्यासपूर्ण लेख, ग्रंथपरीक्षणे, कथा व कविताही प्रस्तुत अंकात सादर केल्या आहेत.

१९३७ साली अमरावती येथे भरलेल्या विदर्भ साहित्य संमेलनाच्या सातव्या अधिवेशनाचे अध्यक्ष, तसेच हैदरावाद येथे १९४७ साली भरलेल्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संत वाङ्मयाचे एक चिकित्सक, अभ्यासक, थोर संशोधक व मर्मग्राही समीक्षक प्रा. न. र. फाटक यांचे त्यांच्या वयाच्या ८६ व्या वर्षी मुंबईला दि. २१–१२–१९७९ रोजी देहावसान झाले. वि. सा. संघाची कै. प्रा. फाटक यांच्या आत्म्याला विनम्र आदरांजली.

माझ्या संपादनाखाली प्रसिद्ध होणारा हा शेवटचा अंक असल्यामुळे गेल्या तीन वर्षातील माझ्या मुख्य संपादक या नात्याने केलेल्या कामगिरीचा ओझरता आढावा घेणे आवश्यक वाटते. १९७७ ते १९८० च्या त्रैवार्षिक निवडणुकीनंतर दि. २–५–१९७७ रोजी झालेल्या तत्कालीन कार्यकारी मंडळाच्या पहिल्या सभेत 'युगवाणी'चे संपादक आणि संपादक-मंडळ यांची रीतसर निवड करण्यात आली. प्रा. शिरीष गो. देशपांडे यांना अध्यक्षांनी स्वतःच्या अधिकारात पुढील आदेशापर्यंत 'सह–संपादक' म्हणून नामनिर्दिष्ट केले होते. या सह-संपादकांचे उत्साहपूर्ण सहकार्य मला प्रारंभी वर्षभर लाभले. संपादक मंडळातील अन्य सदस्यांनी 'युगवाणी'साठी लेखनासह सर्व प्रकारच्या सहकार्यासाठी आपुलकीने हात पुढे केल्यामुळेच माझे काम खूपच सुकर झाले. प्रा. श्रीधर शनवारे, डॉ. सुनील सुभेदार आणि प्रा. बजरंग सरोदे हे सदस्य संपादक–मंडळाच्या सभांना नियमितपणे उपस्थित राहून तत्परतेने सल्लामसलत करीत असत आणि प्रा. शनवारे यांनी कवितांची निवड करण्याचे जबाबदारीचे काम शेवटपर्यंत चोखपणे सांभाळले. या सर्व सन्मित्रांचा मी मनःपूर्वक आभारी आहे.

माझ्या आधी 'युगवाणी'चे संपादक डॉ. आष्टीकर हे असताना 'कार्यकारी संपादक' म्हणून काम करण्याचा अनुभव माझ्या पाठीशी होताच. या पूर्वानुभवामुळे, संपादनकार्याची सूत्रे माझ्या हाती आल्यावर 'युगवाणी'च्या स्वरूपात माझ्या स्वतःच्या कल्पनेप्रमाणे आमूलाग्र परिवर्तन घडवून आणता येईल अशा भलत्या भ्रमात मी कधीच राहिलो नाही ! सर्वसामान्य वाचकांचे हलके फुलके मनोरंजन आणि अभिरुची ध्यानात घेऊन प्रसिद्ध होणारी काही साप्ताहिके व मासिके यांतील लिखाण आणि 'युगवाणी' सारख्या एका साहित्य संस्थेच्या मुखपत्रातील साहित्य यात मूलतःच फरक असतो या गोष्टीचे भान नेहमीच ठेवायला हवे. अपुरे आर्थिक अनुदान, कागदाचे व मुद्रणाचे भरमसाट वाढलेले दर इत्यादी अडचणींमुळे 'युगवाणी'ची पृष्ठसंख्या बरीच मर्यादीत ठेवावी लागली आणि तिला आपल्या लेखकांना मानधन देणे शक्य झाले नाही ही गोष्ट स्पष्टच आहे.

'युगवाणी'कडे अनाहूतपणे येणारे सगळेच साहित्य दर्जेदार असण्याची अपेक्षा करणे कसे बरे शक्य आहे ? काही नामवंत लेखक तर संपादक-मंडळाचे स्वरूप कसे आहे हे जाणून घेऊन स्वतःची खात्री पटल्यावरच लेखनसहकार्य देतात असा अनुभव आहे. प्रस्तुत संदर्भात एक ज्येष्ठ टीकाकार प्रा. श्री. के. क्षीरसागर हे दि. २५ ऑगस्ट, १९७७ च्या पत्रात लिहितात, "आपण युगवाणीचे संपादक आहात हे ऐकले होते, पण अंक पाहिलेले नसल्याने संपादक मंडळ आणि त्यातील विविध स्थाने नीट माहीत नव्हती. आपल्या कारकीर्दीत युगवाणी अधिक व्यवस्थितपणे निघेल अशी आशा आहे. मोबदल्याची अपेक्षा बाजाराकरिता प्रकाशित होणाऱ्या मासिकांकडून केली जाते. युगवाणीचा वर्ग वेगळा आहे. आपल्या कारकीर्दीत मी एखादा लेख जरूर धाडीन. युगवाणीचे स्मरण ठेवीन, विस्मरण झाल्यास स्मरण देण्यास हरकत नाही." या आश्वासनाप्रमाणे प्रा. क्षीरसागरांनी माझ्या कारकीर्दीत एकच नव्हे तर मुद्दाम सवड काढून दोन अभ्यासपूर्ण लेख पाठवले आणि वेळोवेळी पत्रद्वारा संपादनाचे कौतुकही केले याचा येथे कृतज्ञतापूर्वक निर्देश करायला हवा.

प्रा. क्षीरसागरांप्रमाणेच सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. आनंद साधले यांनी 'युगवाणी' विषयीच्या रास्त अपेक्षा व्यक्त करताना आपल्या दि. ५–१०–७७ च्या पत्रात लिहिले होते, **"ललित साहित्याचा**

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

व्यवसाय करणारी जी मासिके आहेत त्यांशी चढाओढ करणारे स्वरूप युगवाणीसारख्या मुखपत्राचे असावे हे मला संमत नाही. महाराष्ट्र साहित्य पत्रिकेसारखे स्वरूप तुमच्या पत्राचे असावे. खास अभ्यासू व्यक्तींकडून काही खास अभ्यास करवून तो प्रकाशित करण्यासाठी तुमच्या जवळील मर्यादित द्रव्यबळ खर्चिणे अधिक श्रेयस्कर होय. तुम्ही ललित साहित्य प्रकाशित करुन अनावश्यक चढाओढीत उतरता. तेही मानधन देणे तुम्हांस शक्य नसल्याने ही चढाओढही लंगडी ठरते. तुमच्याकडून वेगळ्या मानधनाची अपेक्षा नाही." या दोन्ही पत्रांतील आशय पुरेसा बोलका असल्याने त्यावर निराळ्या भाष्याची आवश्यकता नाही.

महाराष्ट्रातील अन्य साहित्यसंस्थांच्या 'महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका', 'मराठी-संशोधन-पत्रिका' व 'प्रतिष्ठान' या नियतकालिकांप्रमाणेच 'युगवाणी'चा मुख्य निर्वाह हा 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळा'कडून मिळणाऱ्या आर्थिक अनुदानावरच होत असतो. या अनुदानासाठीच्या काही महत्त्वाच्या अपेक्षा अशा आहेत :—"मंडळाच्या अनुदान योजनेखाली येणाऱ्या नियतकालिकास सर्वसाधारणपणे विषयाचे बंधन नाही. परंतु, **त्यात येणारे साहित्य हे मौलिक व संशोधनपूर्ण पाहिजे** व साहित्य, विज्ञान आदी क्षेत्रांतील नवविचार, साहित्यसमीक्षा व अत्याधुनिक माहिती देणारे असे असले पाहिजे. **केवळ काव्य, कथा आदी ललित साहित्यास वाहिलेल्या नियतकालिकांचा त्या नियमांनुसार अनुदानार्थ विचार केला जाणार नाही.** नियतकालिकात येणाऱ्या साहित्य समीक्षात्मक वाङ्मयामध्ये पूर्वग्रहदूषित व वैयक्तिक टीकेस स्थान दिले जाऊ नये." वरील अटींचे काटेकोरपणे पालन न करता स्वतःच्या वैयक्तिक प्रतिमेसाठी म्हणून हट्टाग्रहाने बंधनांच्या पलीकडे जाण्याचा प्रयत्न करणे हे एका सार्वजनिक साहित्य संस्थेला तरी परवडण्यासारखा नाही एवढे खास ! संपादक बदलले तरी संपादकीय धोरणात स्वमर्जीनुसार बदल करणे अहिताचे ठरते ते याच कारणासाठी होय.

माझ्या संपादकीय कारकीर्दीत पहिल्या व दुसऱ्या वर्षात प्रत्येकी ६ अंक व प्रत्येक वर्षी २७४ पृष्ठांचा मजकूर वाचकांना सादर करता आला. तिसऱ्या वर्षी मात्र एकंदर पाच अंक प्रसिद्ध झाले. तीन वर्षांमध्ये प्रसिद्ध झालेल्या या साहित्यात १७५ कविता, ३ एकांकिका, ३१ कथा आणि १५० लेख (संशोधन समीक्षा व ग्रंथपरीक्षणे) यांचा समावेश होतो. संपादकाच्या विनंतीला मान देऊन लेखन-सहकार्य देणाऱ्यांमध्ये पुढील काही जुन्या व नव्या साहित्यिकांचा आवर्जून निर्देश करावा लागेल :—

म. म. डॉ. वा. वि. मिराशी, डॉ. वि. भि. कोलते, देवीसिंग व्यं. चौहान, प्रा. श्री. के. क्षीरसागर, प्रा. बालकृष्ण दाभाडे, डॉ. हेरवाडकर, डॉ. हेमन्त इनामदार, डॉ. सुरेश डोळके, स. शं. देसाई, डॉ. प्रल्हाद वडेर, डॉ. पंडित आवळीकर, प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोध, डॉ. उषा मा. देशमुख, डॉ. भाऊ मांडवकर, डॉ. अग्निहोत्री, डॉ. द. भि. कुळकर्णी, डॉ. म. रा. जोशी, ज. शा. देशपांडे, प्रा. भा. श्री. परांजपे, ले. कर्नल भा. त्र्यं. परांजपे, डॉ. सुहासिनी लद्दू, डॉ. सु. बा. कुलकर्णी, डॉ. विश्वास कानडे, प्रा. श्रीधर शनवारे, डॉ. सुनील सुभेदार, प्रा. अशोक कामत, प्रा. यशवंत मनोहर, वबन चहांदे, वसंत वरखेडकर, प्रा. राम तोंडारे, धर्मराज निमसरकर, सुभाष सोनवणे, योगेन्द्र मेश्राम, प्रा. मधु जामकर, मनोहर तल्हार, माधुरी पारसनीस, मधुकर पारळकर, प्रा. बजरंग सरोदे, सुनीती आफळे, मालती निमखेडकर, अनुराधा वेन्ने, म. ल. वऱ्हाडपांडे, डॉ. सुशीला पाटील, डॉ .ग. मो. पाटील, श्रीकृष्ण खडपेकर, निरंजन घाटे इत्यादी. याशिवाय प्रा. मुरलीधर कुळकर्णी यांच्या अनेक कथा, सुमंत दिनकर राहाटे यांची 'सुरुवात' आणि चित्रा पांढरकरांची 'पान्हा' या वैशिष्ट्यपूर्ण कथांनी अनेक वाचकांचे लक्ष वेधून घेतले आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संत वाङमयाचे एक चिकित्सक, अभ्यासक, थोर संशोधक व मर्मग्राही समीक्षक प्रा. न. र फाटक यांचे त्यांच्या वयाच्या ८६ व्या वर्षी मुंबईला दि. २१–१२–१९७९ रोजी देहावसान झाले. वि. सा. संघाची कै. प्रा. फाटक यांच्या आत्म्याला विनम्र आदरांजली.

माझ्या संपादनाखाली प्रसिद्ध होणारा हा शेवटचा अंक असल्यामुळे गेल्या तीन वर्षातील माझ्या मुख्य संपादक या नात्याने केलेल्या कामगिरीचा ओझरता आढावा घेणे आवश्यक वाटते. १९७७ ते १९८० च्या त्रैवार्षिक निवडणुकीनंतर दि. २–५–१९७७ रोजी झालेल्या तत्कालीन कार्यकारी मंडळाच्या पहिल्या सभेत 'युगवाणी'चे संपादक आणि संपादक-मंडळ यांची रीतसर निवड करण्यात आली. प्रा. शिरीष गो. देशपांडे यांना अध्यक्षांनी स्वतःच्या अधिकारात पुढील आदेशापर्यंत 'सह–संपादक' म्हणून नामनिर्दिष्ट केले होते. या सह-संपादकांचे उत्साहपूर्ण सहकार्य मला प्रारंभी वर्षभर लाभले. संपादक मंडळातील अन्य सदस्यांनी 'युगवाणी'साठी लेखनासह सर्व प्रकारच्या सहकार्यासाठी आपुलकीने हात पुढे केल्यामुळेच माझे काम खूपच सुकर झाले. प्रा. श्रीधर शनवारे, डॉ. सुनील सुभेदार आणि प्रा. बजरंग सरोदे हे सदस्य संपादक–मंडळाच्या सभांना नियमितपणे उपस्थित राहून तत्परतेने सल्लामसलत करीत असत आणि प्रा. शनवारे यांनी कवितांची निवड करण्याचे जबाबदारीचे काम शेवटपर्यंत चोखपणे सांभाळले. या सर्व सन्मित्रांचा मी मनःपूर्वक आभारी आहे.

माझ्या आधी 'युगवाणी'चे संपादक डॉ. आष्टीकर हे असताना 'कार्यकारी संपादक' म्हणून काम करण्याचा अनुभव माझ्या पाठीशी होताच. या पूर्वानुभवामुळे, संपादनकार्याची सूत्रे माझ्या हाती आल्यावर 'युगवाणी'च्या स्वरूपात माझ्या स्वतःच्या कल्पनेप्रमाणे आमूलाग्र परिवर्तन घडवून आणता येईल अशा भलत्या भ्रमात मी कधीच राहिलो नाही ! सर्वसामान्य वाचकांचे हलके फुलके मनोरंजन आणि अभिरुची ध्यानात घेऊन प्रसिद्ध होणारी काही साप्ताहिके व मासिके यांतील लिखाण आणि 'युगवाणी' सारख्या एका साहित्य संस्थेच्या मुखपत्रातील साहित्य यात मूलतःच फरक असतो या गोष्टीचे भान नेहमीच ठेवायला हवे. अपुरे आर्थिक अनुदान, कागदाचे व मुद्रणाचे भरमसाट वाढलेले दर इत्यादी अडचणींमुळे 'युगवाणी'ची पृष्ठसंख्या बरीच मर्यादीत ठेवावी लागली आणि तिला आपल्या लेखकांना मानधन देणे शक्य झाले नाही ही गोष्ट स्पष्टच आहे.

'युगवाणी'कडे अनाहूतपणे येणारे सगळेच साहित्य दर्जेदार असण्याची अपेक्षा करणे कसे बरे शक्य आहे ? काही नामवंत लेखक तर संपादक-मंडळाचे स्वरूप कसे आहे हे जाणून घेऊन स्वतःची खात्री पटल्यावरच लेखनसहकार्य देतात असा अनुभव आहे. प्रस्तुत संदर्भात एक ज्येष्ठ टीकाकार प्रा. श्री. के. क्षीरसागर हे दि. २५ ऑगस्ट, १९७७ च्या पत्रात लिहितात, "आपण युगवाणीचे संपादक आहात हे ऐकले होते, पण अंक पाहिलेले नसल्याने संपादक मंडळ आणि त्यातील विविध स्थाने नीट माहीत नव्हती. आपल्या कारकीर्दीत युगवाणी अधिक व्यवस्थितपणे निघेल अशी आशा आहे. मोबदल्याची अपेक्षा बाजाराकरिता प्रकाशित होणाऱ्या मासिकांकडून केली जाते. युगवाणीचा वर्ग वेगळा आहे. आपल्या कारकीर्दीत मी एखादा लेख जरूर धाडीन. युगवाणीचे स्मरण ठेवीन, विस्मरण झाल्यास स्मरण देण्यास हरकत नाही." या आश्वासनाप्रमाणे प्रा. क्षीरसागरांनी माझ्या कारकीर्दीत एकच नव्हे तर मुद्दाम सवड काढून दोन अभ्यासपूर्ण लेख पाठवले आणि वेळोवेळी पत्रद्वारा संपादनाचे कौतुकही केले याचा येथे कृतज्ञतापूर्वक निर्देश करायला हवा.

प्रा. क्षीरसागरांप्रमाणेच सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. आनंद साधले यांनी 'युगवाणी' विषयीच्या रास्त अपेक्षा व्यक्त करताना आपल्या दि. ५–१०–७७ च्या पत्रात लिहिले होते, **"ललित साहित्याचा**

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

व्यवसाय करणारी जी मासिके आहेत त्यांशी चढाओढ करणारे स्वरूप युगवाणीसारख्या मुखपत्राचे असावे हे मला संमत नाही. महाराष्ट्र साहित्य पत्रिकेसारखे स्वरूप तुमच्या पत्राचे असावे. खास अभ्यास व्यक्तीं-कडून काही खास अभ्यास करवून तो प्रकाशित करण्यासाठी तुमच्या जवळील मर्यादित द्रव्यबळ खर्चिणे अधिक श्रेयस्कर होय. तुम्ही ललित साहित्य प्रकाशित करून अनावश्यक चढाओढीत उतरता. तेही मानधन देणे तुम्हांस शक्य नसल्याने ही चढाओढही लंगडी ठरते. तुमच्याकडून वेगळ्या मानधनाची अपेक्षा नाही." या दोन्ही पत्रांतील आशय पुरेसा बोलका असल्याने त्यावर निराळ्या भाष्याची आवश्यकता नाही.

महाराष्ट्रातील अन्य साहित्यसंस्थांच्या 'महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका', 'मराठी-संशोधन-पत्रिका' व 'प्रतिष्ठान' या नियतकालिकांप्रमाणेच 'युगवाणी'चा मुख्य निर्वाह हा 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळा'कडून मिळणाऱ्या आर्थिक अनुदानावरच होत असतो. या अनुदानासाठीच्या काही महत्त्वाच्या अपेक्षा अशा आहेत :—"मंडळाच्या अनुदान योजनेखाली येणाऱ्या नियतकालिकास सर्वसाधारणपणे विषयाचे बंधन नाही. परंतु, **त्यात येणारे साहित्य हे मौलिक व संशोधनपूर्ण पाहिजे** व साहित्य, विज्ञान आदी क्षेत्रांतील नवविचार, साहित्यसमीक्षा व अत्याधुनिक माहिती देणारे असे असले पाहिजे. **केवळ काव्य, कथा आदी ललित साहित्यास वाहिलेल्या नियतकालिकांचा त्या नियमांनुसार अनुदानार्थ विचार केला जाणार नाही.** नियतकालिकात येणाऱ्या साहित्य समीक्षणात्मक वाङ्मयामध्ये पूर्वग्रहदूषित व वैयक्तिक टीकेस स्थान दिले जाऊ नये." वरील अटींचे काटेकोरपणे पालन न करता स्वतःच्या वैयक्तिक प्रतिमेसाठी म्हणून हट्टाग्रहाने बंधनांच्या पलीकडे जाण्याचा प्रयत्न करणे हे एका सार्वजनिक साहित्य संस्थेला तरी परवडण्यासारखा नाही एवढे खास ! संपादक बदलले तरी संपादकीय धोरणात स्वमर्जीनुसार बदल करणे अहिताचे ठरते ते याच कारणासाठी होय.

माझ्या संपादकीय कारकीर्दीत पहिल्या व दुसऱ्या वर्षात प्रत्येकी ६ अंक व प्रत्येक वर्षी २७४ पृष्ठांचा मजकूर वाचकांना सादर करता आला. तिसऱ्या वर्षी मात्र एकंदर पाच अंक प्रसिद्ध झाले. तीन वर्षांमध्ये प्रसिद्ध झालेल्या या साहित्यात १७५ कविता, ३ एकांकिका, ३१ कथा आणि १५० लेख (संशोधन समीक्षा व ग्रंथपरीक्षणे) यांचा समावेश होतो. संपादकाच्या विनंतीला मान देऊन लेखन-सहकार्य देणाऱ्यांमध्ये पुढील काही जुन्या व नव्या साहित्यिकांचा आवर्जून निर्देश करावा लागेल :—

म. म. डॉ. वा. वि. मिराशी, डॉ. वि. भि. कोलते, देवीसिंग व्यं. चौहान, प्रा. श्री. के. क्षीरसागर, प्रा. बालकृष्ण दाभाडे, डॉ. हेरवाडकर, डॉ. हेमन्त इनामदार, डॉ. सुरेश डोळके, स. शं. देसाई, डॉ. प्रल्हाद वडेर, डॉ. पंडित आवळीकर, प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोध, डॉ. उषा मा. देशमुख, डॉ. भाऊ मांडवकर, डॉ. अग्निहोत्री, डॉ. द. भि. कुळकर्णी, डॉ. म. रा. जोशी, ज. शा. देशपांडे, प्रा. भा. श्री. परांजपे, ले. कर्नल भा. त्र्यं. परांजपे, डॉ. सुहासिनी लददू, डॉ. सु. वा. कुलकर्णी, डॉ. विश्वास कानडे, प्रा. श्रीधर शनवारे, डॉ. सुनील सुभेदार, प्रा. अशोक कामत, प्रा. यशवंत मनोहर, बबन चहांदे, वसंत वरखेडकर, प्रा. राम तोंडारे, धर्मराज निमसरकर, सुभाष सोनवणे, योगेन्द्र मेश्राम, प्रा. मधु जामकर, मनोहर तल्हार, माधुरी पारसनीस, मधुकर पारळकर, प्रा. बजरंग सरोदे, सुनीती आफळे, मालती निमखेडकर, अनुराधा केने, म. ल. वऱ्हाडपांडे, डॉ. सुशीला पाटील, डॉ .ग. मो. पाटील, श्रीकृष्ण खडपेकर, निरंजन घाटे इत्यादी. याशिवाय प्रा. मुरलीधर कुळकर्णी यांच्या अनेक कथा, सुमंत दिनकर राहाटे यांची 'सुरुवात' आणि चित्रा पांढरकरांची 'पान्हा' या वैशिष्ट्यपूर्ण कथांनी अनेक वाचकांचे लक्ष वेधून घेतले आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नागपूर विद्यापीठात मराठी विषयात पीएच्. डी. साठी संशोधन करणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना 'युगवाणी'साठी लिहायला मी प्रवृत्त केले ही वस्तुस्थिती आहे. श्रीनिवास रा. सिरास, अक्षयकुमार काळे, रमेश कांबळे, द. प. इंगोले, प्रदीप विटाळकर, दिलीप देशपांडे, विमल भालेराव, ज्योती कस्तुरे, श्रीकांत तिडके, आशा सावदेकर ही त्यांपैकी काही नावे होत. विद्यार्थी-मित्रांच्या या सहकार्यामुळे 'युगवाणी'चा निराळा असा विद्यार्थी विशेषांक काढण्याची आवश्यकताच राहिली नाही.

तीन वर्षांच्या या कालावधीत तीन दिवाळी अंक निघाले व एक 'राजभाषा मराठी विशेषांक' प्रसिद्ध झाला. या विशेषांकासाठी एक पूर्व योजना तयार करून सुमारे शंभर विद्वानांशी पत्रव्यवहार केला तेव्हा कुठे अपेक्षित प्रतिसाद लाभू शकला. राज्यभाषा मराठीचा विविध अंगांनी परामर्ष घेणाऱ्या अधिकारी व्यक्तींच्या अभ्यासपूर्ण लेखांमुळे या विशेषांकाविषयी अत्यंत अनुकूल अभिप्राय व्यक्त करणारी पत्रे अनेक जाणकार वाचकांनी पाठविली आहेत. साहित्य अकादमीचे अध्यक्ष श्री. उमाशंकर जोशी यांना तर हा उपक्रम इतका आवडला की त्यांनी आपल्या नागपुरातील वास्तव्यात मुद्दाम निरोप पाठवून संपादकांशी विशेषांकाविषयी मनमोकळी चर्चा केली.

सुप्रसिद्ध साहित्यिक कै. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या वाङ्मयाचा आणि कार्याचा परामर्ष घेणारा 'युगवाणी'चा एक खास अंक काढण्याचा आमच्या संपादकमंडळाचा संकल्प होता. तो संकल्प प्रयत्नपूर्वक सिद्धीचा नेण्याची जबाबदारी आता नवीन संपादकांची आहे.

गेल्या तीन वर्षांतील 'युगवाणी'च्या कामगिरीचे स्वरूप हे असे आहे. प्रा. डॉ. प्रल्हाद वडेर यांनी संपादकाला पाठविलेल्या एका पत्रात लिहिले आहे, "तुमच्या कारकीर्दीतील अंक वाङ्मयीन टीकेच्या दृष्टीने संग्राह्य झाले आहेत. राज्यभाषा विशेषांक तर फारच छान होता" अर्थात डॉ. वडेर यांच्याप्रमाणेच प्रा. वामनराव चोरघडे, प्रा. म. ना. अदवंत, डॉ. उषा मा. देशमुख यांसारख्या अनेक जाणकार वाचकांच्या पसंतीला जे काही साहित्य उतरले असेल त्याचे मुख्य श्रेय त्या त्या लेखकांनाच द्यायला हवे, याची मला जाणीव आहेच.

वि. सा. संघाने ही संपादनाची संधी दिली याबद्दल तत्कालीन कार्यकारी मंडळाचा आणि लेखकांनी व वाचकांनी सहकार्य दिले याबद्दल त्यांचाही मी मनःपूर्वक ऋणी आहे.

—वि. बा. प्रभुदेसाई

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अंतरंग

याशिवाय साभार पोच, कार्यवृत्त वगैरे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मी आणि माझे लेखन / प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोध

माझ्या लेखनाविषयी मी पूर्वी थोडेफार लिहिले आहे. त्या संदर्भात स्वतःच्या बाबतीतही काही लिहिणे झाले आहे. आपली जाणीव कशी घडत गेली हे सांगणे नेहमीच सोपे नसते; नव्हे, फार कठीण असते. आपला 'स्व' व भोवतालचे जीवन ह्यांच्या स्व-स्वरूपाची व परस्परसंबंधांची जाण जितकी प्रगल्भ असेलं, तितकेच नेमके या बाबतीत बोलता येऊ शकते. ती जाण काही अंशी माझ्या ठायी आज आहे असे गृहीत धरल्या-शिवाय या विषयावर लिहिणे कठीण.

मध्यभारतातील ग्वाल्हेर संस्थानातल्या हिंदी भाषिक प्रदेशात राहणारे महाराष्ट्रीय ब्राह्मण कुटुंब. तशी तेथे महाराष्ट्रीयांची वस्तीसुद्धा बरीच. पण वडिलांच्या पोलीस खात्यातील नोकरीमुळे ते स्व-समाजापासून नेहमीच दूर असणारे. हे कुटुंब जुन्या वाळवोधी वळणाचे व समान पांढर-पेशा संस्कृतीशी कोणताच संबंध न जोडू शकणारे. अशा घरात मी जन्मलो, वाढलो. तेव्हा, जुन्या सरंजामी परंपरेपेक्षा वेगळ्या अशा पांढरपेशा मराठी समाजाकडे दुरून पाहायची मला सवय लागली. शाळेत काही जुन्या संस्कृतीची मुले असत, तर पुष्कळशी तल्लख, स्वच्छ पोषाख केलेली व हुषार वाटणारी अशी मुले असत. मास्तरांवर त्यांचीच छाप पडे. मी मात्र त्यांच्यापासून दूर व गवाळ मुलांच्या बाजूने आपोआपच राही. आरंभा-पासून मी मराठी शाळेत शिकलो व शेवटपर्यंत मराठीचाच विद्यार्थी राहिलो. वरच्या वर्गातील म्हणजे; इंटर-बी. ए. च्या वर्गातील मुले सामान्यपणे फडक्यांच्या भाषाशैलीविषयी बोलत व खांडेकरांच्या कोटयांविषयी. असे करताना ती आपल्या पुणे-मुंबईटाइप पोषाखाचीही विशेष जपणूक करीत. हिन्दी भाषा ही 'रांगड्यांची' भाषा आहे, असे म्हणत. मी त्या काळात वडील बंधूंमुळे पंत-प्रसाद-निराला- महादेवी इत्यादी कवींच्या व प्रेमचंदांच्या कादंबरीवाङ्मयाच्या संपर्कात आलो होतो. हे वाङ्मय कितपत समजत होते, हा प्रश्न वेगळा. पण एक गोष्ट स्पष्ट होती की ते उच्च दर्जाचे वाटत होते हे निश्चित. त्यामुळे या पोषाखनिष्ठ रसिकांविषयी व ते ज्या पांढरपेशा संस्कृतीचे प्रतिनिधित्व करीत होते तिच्याविषयी माझ्या मनात एक प्रकारचा दुरावा निर्माण झाला. मध्यभारतात विविध क्षेत्रातील जागृतीच्या चळवळींमध्ये महाराष्ट्रीयच अग्रेसर होते. मग ती राष्ट्रीय चळवळ असो वा सामाजिक, वा साम्यवादी क्षेत्रातील असो. पण ती माणसे-भोवतालच्या संस्कृतीशी फटकून वागणारी नसत, व त्यांचे पोषाख मराठीच पण साधे असत. राहाणीप्राधान्य त्यात मुळीच नसे. राहाणी-प्रधान पांढरपेशा वर्ग अशाप्रकारे माझ्या निरीक्षणाचा विषय आरंभापासूनच होऊन बसला. त्या वर्गा-कडे मी नेहमी बाहेरूनच पाहिले. व हा वर्ग मला नेहमीच आत्मसंतुष्ट व इतरांपासून फटकून वागणारा वाटला. ही झाली बाह्य परिस्थिती. पण ह्या पांढरपेशा मराठी वर्गाकडे चिकित्सक दृष्टीने मी पाहत होतो तो कोणत्या निकषांच्या बळावर, ते सांगितले पाहिजे. हे निकष मी काही बाहेरून आणलेले नव्हते. तर ते मला संस्कारा-तूनच प्राप्त झाले होते. ह्या ठिकाणी मला माझ्या वडिलांचा उल्लेख करणे प्राप्त आहे. संस्थानी पोलीस खात्यातील अधिकारपदावर असूनही त्यांनी निष्कांचन राहण्यात यश मिळविले होते. लहान मोठा, हिंदू मुसलमान, इ. भेद त्यांच्या-समोर मुळीच नसत. एक कडक व निस्पृह अधिकारी म्हणून जनसामान्यात त्यांचा फार लौकिक होता. परमेश्वरनिष्ठा व सद्सद्विवेकबुद्धी ह्या दोन गोष्टींनाच फक्त त्यांच्या लेखी निरपेक्ष महत्त्व होते. त्यामुळे पोलीस खात्यातील लोकांचा त्यांना

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विरोध होता व त्यांना अनेक हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. घरचे वातावरण बाह्यतः श्रीमंती डौलाचे असूनही नेहमीच (अल्प पगारामुळे) संकट-ग्रस्त, एकाकी व नैतिक निकराचे असे. वडिलांचे असे मूल्यघटित व्यक्तिमत्त्व नेहमी समोर असल्यामुळे त्याचा माझ्यावर, व माझ्या वडील बंधूंवर विलक्षण परिणाम झाला. समोर दिसणारे पांढरपेशा जीवन हे व्यवहारोपयोगी बाह्य गुणांना मध्यवर्ती महत्त्व देणारे वाटे. ती माणसे माणूस म्हणून खुजी वाटत. म्हणून पांढरपेशा मराठी समाजाकडे नैतिक चिकित्सक वृत्तीने पाहणे हा माझा स्वभाव-विशेषच होऊन बसला.

वडिलांच्या न्यायनिष्ठुरतेच्या अनेक आख्यायिका लोकांमध्ये ऐकावयास मिळत. स्वतःच्या बाबतीत तर ते पूर्णांशाने निर्भय होते. चोर, खुनी, गुंड सुद्धा त्यांना पुण्यात्मा मानून भजत असत. प्रत्यक्ष पाहिलेली दोन उदाहरणे देतो. ते सेवानिवृत्त झाल्यावर मिळालेले पैसे त्यांनी बँकेत ठेवले. त्या अत्यल्प रकमेतून ते कधीकधी नाइलाजाने पाचपंचवीस रुपये काढीत तेव्हा त्या पैशाला फार जपत असत. एकदा मी त्यांच्याबरोबर होतो. एका फटिंग दिसणाऱ्या तरुणाने भररस्त्यात त्यांच्या पायावर डोके टेकले व पाय घट्ट धरून ठेवले. वडिलांनी लगेच खिशातले पैशाचे पाकीट काढून मजजवळ दिले. तसे का केले म्हणून चौकशी केल्यावर ते म्हणाले : "आत्ताच जेलातून सुटला आहे. खिसे-कापू आहे." . . . वाक्य हे नव्हे. पण अर्थ हाच होता. दुसरी घटनाही महत्त्वाची. वरच्या मजल्यावर घरात अनन्य भावाने वडील पूजामग्न असे बसले होते. खाली पोलीस स्टेशनच्या चौकात एक गोरासाहेब–संस्थानचा इन्स्पेक्टर जनरल पोलीस–घोड्यावर ताटकळत उभा होता. मला वरून त्याचे हॅटखाली अर्धवट लपलेले लालभडक तोंड व जागच्याजागी अस्वस्थपणे फिरणारा घोडा दिसत होता. शिपाई हवालदारांच्या तोंडचे पाणी पळाले होते. धावत जिना चढून येऊन आर्डर्लीज वर्दी देत होते. आई देवाला नवस करीत होती. वडिलांनी सावकाश पूजा आटपली. धोतर, कुडता व टोपीतच खाली जाऊन साहेबाला सेल्यूट केला. मी वरून एवढेच पाहिले. साहेबाला — सर्वात वरिष्ठ अधिकाऱ्याला — ताटकळत ठेवण्याचा अपराध मोठा होता. आता नोकरी गेली, अशी आईची खात्री झाली व उद्याच्या विपन्नतेची भेसूर चित्रे तिला दिसू लागली. पण तसे काहीच घडले नाही. कदाचित् त्या इंग्रज साहेबाला असा एखादाच माणूस दिसला म्हणून असेल, त्या आकस्मिक भेटीमुळे नोकरी काही गेली नाही. मला व माझ्या बंधूंना वडिलांच्या या नैतिक धैर्याचा हा आदर्श नेहमीच पटत व घडवीत राहिला. जग व स्वकीय काहीही समजोत, आपल्या भूमिकेवरून रतिमात्र न ढळणे ही त्यांची भूमिका आमच्या मनावर खोल परिणाम करीत राहिली व आम्हाला घडवीत राहिली.

ह्या ठिकाणी माझ्या आईचाही उल्लेख करण योग्य ठरेल. अत्यंत भावनाप्रधान, अत्यंत संवेदनशील, कोंड्याचा मांडा करून संसार करणारी, मुलांना उच्च शिक्षण दिल्यास बरे दिवस येतील ह्या कल्पनेने मारलेली; ग्वाल्हेर संस्था-नातील अत्यंत मागासलेल्या व हिन्दीमय झालेल्या एका श्रीमंत शेतकऱ्याची ती मुलगी होती. पण, जाणून घेण्याची व शिकून घेण्याची वृत्ती तिच्या-ठायी तीव्र स्वरूपात वसत होती. तिने लहान-पणीच 'पण लक्षात कोण घेतो' ही कादंबरी वाचली होती, व पुढे आम्हां मुलांमुळे मराठी व हिन्दी कादंबऱ्या ती वाचीत असे. शिवलीलामृत वाचताना ती तन्मय होई, पण हरिभाऊ व प्रेम-चंदही तिला आवडत. वडिलांचे वेदांती अलिप्त व नोकरी उत्कृष्ट कर्तव्य म्हणून करू शकणारे व्यक्तिमत्त्व एकीकडे, तर आईचे अतिसंवेदनशील, विकास करू पाहणारे व्यक्तिमत्त्व दुसरीकडे. आई-वडिलांचा दोघांचा प्रभाव आम्हा दोघां बंधूंवर खोलवर झाला यात शंका नाही. परंतु आईच्या अतिसंवेदनशीलतेचा प्रभाव कदाचित् वडील-बंधूंवर अधिक असेल, तर वडिलांच्या अलिप्त वृत्तीचा प्रभाव कदाचित माझ्यावर अधिक.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अशा प्रकारे आपल्या मूल्यनिष्ठ भूमिकेवर दृढ राहण्याची प्रेरणा व त्या दृष्टीतून जग पारखण्याची वृत्ती वडिलांकडून व विकासाची प्रेरणा आईकडून आम्हा दोघां बंधूनी सारखीच घेतली असावी. आईची व्यावहारिक यशाची प्रेरणा मात्र आमच्या दोघांच्याही ठायी दुर्दैवाने वा सुदैवाने येऊ शकली नाही. स्वार्थनिष्ठ व्यावहारिक यश हेच सर्वस्व असे मानणाऱ्या वर्गाचे आम्ही दोघेही कठोर टीकाकार होतो.

काही तरी ट–ला–ट अशी रचना मी लहानपणापासूनच करीत आलो असलो पाहिजे. अगदी पहिल्या दुसऱ्या इयत्तेत असताना घरी मराठी पुस्तकांचा एक गळाठा येऊन पडला होता. ती पुस्तके न समजता वाचून काढली होती. सुरस-ग्रंथ मालेचे भागवत घरी होते, तेही वाचले होते. येथे वाङ्मयनिर्मितीच्या संदर्भात माझ्या वडील बंधूंचा उल्लेख केलाच पाहिजे. घरी धार्मिक वातावरण होते. वाङ्मयीन वातावरण निर्मिण्याचे कार्य वडील बंधूंनी केले. ते माझ्यापेक्षा चार-साडेचार वर्षे मोठे होते. त्यांच्या लहानपणी वडिलांच्या बदल्या गावोगाव होत. व तेथे हिन्दी शाळा असल्यामुळे ते हिन्दीचेच विद्यार्थी राहिले व हिन्दीमय झालेले होते. अगदी पहिल्या दुसरीच्या क्रमिक पुस्तकातील कविता ते पहाटे (आम्हांला पाच वाजता उठावेच लागे) डोलडोलून म्हणत. ते अत्यंत आत्ममग्न, हळवे व अत्यंत हट्टी असत. एखादी कविता वाचताना त्यांचा गळा दाटून येई. डोळे पाझरू लागत. मी त्यांच्या भावना-प्रधानतेकडे आश्चर्यवत् दृष्टीने पाहत राही. त्यांच्या माझ्यातला वेगळेपणा मला तीव्रतेने जाणवे. तेव्हा वडील बंधूंची प्रत्यक्ष जाणीव तर आई-वडील ह्यांच्या पुरतीच मर्यादित असे. ह्या कक्षेबाहेरची आम्ही भावंडे म्हणजे त्यांना अडथळ्यासारखी वाटत असू. त्यांच्या अत्यंत आत्मकेन्द्री वृत्तीमुळे त्या विरोधात माझ्या वेगळेपणाचे अनेक पैलू मला स्पष्ट दिसत असत. त्यांचे स्फटिकवत प्रांजळ व्यक्तिमत्त्व, त्यांची जणू स्वभावगत झालेली आदर्शनिष्ठा व प्रेमळ वृत्ती हे सर्व असूनही त्यांच्या माझ्यातला हा ताण अगदी अखेरपर्यंत कायम राहिला होता. ते कसेही असले तरी, त्यांच्या कवितालेखनाकडे पाहून मीही लिहीत असलो पाहिजे. 'तू कविता लिहू शकत नाहीस' किंवा 'अमक्यासारखी लिहून दाखव तेव्हा पाहू,' असे त्यांनी कितीही म्हटले तरी, माझे लेखन चालूच राहिले ते त्यांनी वेळोवेळी केलेल्या विरोधामुळेही असेल. परंतु वाङ्मयीन वातावरण निर्माण केले ते माझ्या वडील बंधूंनीच. त्यांच्या वाचनाचा झपाटा मोठा होता. घरी हिन्दी कथा-काव्यादींची पुस्तके येऊन पडत व मी ती सर्वच वाचून काढी. मराठी विद्यार्थी असल्यामुळे बी. ए. पर्यंत समकालीन मराठीतील कथा-काव्य कादंबऱ्या इ. सर्व वाचून झाले होतेच. मराठी विषयनिष्ठ कवितांच्या ऐवजी पंत-प्रसाद-निराला-महादेवींची सूचक व प्रतीतिधर्मी कविता आवडे. खांडेकर फार आवडत. त्यांचा प्रभावही मनावर होई. परंतु प्रेमचंदांच्या कादंबऱ्यांमुळे जीवनाच्या वास्तव संघर्षाचा प्रत्यय अधिक येत आहे, असे वाटे. मराठी वाङ्मयापेक्षा उदात्ततेचा प्रभाव उमटविणारे व भावसमृद्ध करणारे असे हिन्दी वाङ्मयच मला अधिक प्रिय असे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे अव्वल इंग्रजी नंतरच्या महाराष्ट्रातील आगरकरादींची चरित्रे मात्र– 'मराठीपण खरे येथे आहे'– असे मला वाटायला लावीत व त्याचा मी अभिमान बाळगीत असे. वडील सेवानिवृत्त झाल्या-बरोबर जेव्हा प्रत्यक्ष दोन्ही वेळची भ्रांत पडू लागली, तेव्हा इंदुरास जाऊन बी. ए. चे शिक्षण शिकवण्या करून मिळवायचे हा निर्णय मी विरोध पत्करून, आपोआप कोणाच्या मार्गदर्शना-विनाच घेतला, तो आगरकरादींची उदाहरणे डोळ्यांसमोर असल्यामुळेच. इंदूर येथील मालवामिल फाटकाच्या अगदी समोर एक अगदी मामुली किराण्याचे दुकान असे. तेथे असलेल्या फळकटावर बसून मुलाला शिकवायचे असे. तेथे बसून शिकविण्यात उच्चवर्णीय मध्यमवर्गीय असल्यामुळे कमीपणा वाटायच्या ऐवजी उलट आपल्या स्वावलंबी वृत्तीची ऐट वाटे. तेथूनच जवळ नॉर्थ तुकोगंज रस्त्यावर उद्योगपतींच्या विशाल प्रासादतुल्य इमारती असत. तेथे माझे मित्र सहाध्यायी सेठी बंधू राहत असत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(श्री. राजेंद्रकुमार सेठी व श्री. वीरेंन्द्रकुमार सेठी) मी त्यांच्याकडे जाई, वाङमय चर्चा करी, कदाचित् उत्तमोत्तम पुस्तकेही वाचायला आणी. परंतु त्यांच्यापेक्षा आपण कमी आहोत, किंवा त्यांच्या-सारखे व्हावे, असे मला कधीच वाटले नाही. तर, दारिद्रयात धडपडत राहणे व विकासाच्या मार्गावर पावले टाकणे ही वृत्ती आदर्श आहे असे मनोमन बिंबले ते आगरकरादींच्या उदाहरणावरूनच-यालाच मी मराठी बाणा समजत असे. हिन्दी रोमेंटिक कवितेच्या उत्कर्षाचा तो काळ होता, माझे वडील-बंधू ह्या वातावरणाशी पूर्ण समरस झालेले होते. त्यांचे मित्रही प्रतिभावंत, सहृदय व निष्ठावंत असत. मी हिन्दी परंपरेपासून दूर होतो; हिन्दी रोमेंटिक कवितेचा भक्त असूनही मी मराठीमध्ये कविता व कथा लिही. हे लेखन उज्जयिनी येथे मी असतांना मॅट्रीक व इंटरपर्यंत विशेष चालू होते. त्याचे प्रकाशन तेव्हा इंदूर येथील आदरणीय कवी व साहित्यिक श्री. वि. ह. आपटे हे करीत. माझ्या पुढच्या मराठी कवितेच्या खुणा येथे सापडणे कठीण. कारण, ही कविता सामान्यपणे रविकिरणपरंपरेतील होती. माझे वैशिष्ट्य ह्या काळात माझ्या हिन्दी कथा व काव्यात प्रकट झाले, असे मला वाटते. ह्या कवितेचा व वडील बंधूंच्या सहृदय मार्मिक रोमेंटिक हिन्दी कवितेचा मात्र संबंध जोडता येणे कठीण. नवव्या इयत्तेत असताना माझी पहिली कथा खांडवा येथील 'स्वराज्य' ह्या हिन्दी दैनिकात छापून आली होती. न दाखविता कथा छापल्यामुळे वडील बंधूंनी केलेले अकांडतांडव अजून आठवते. त्या कथेचा फक्त एक तुकडा आता माझ्याजवळ शिल्लक आज आहे. हिन्दी कथालेखन मी बराच काळ करीत राहिलो होतो. त्या काळातील माझी हिन्दी कविता, माझे त्या अवस्थे-तील वैशिष्ट्य प्रकट करणारी होती असे म्हटले पाहिजे. ती अमूर्त भावावस्था रेखाटणारी कविता नव्हती. सूचकता अशी तिच्यात नव्हती. तर निसर्गसमक्षतेमुळे रूपरसगंधात्मक आनंदोल्हासयुक्त अनुभवांचा तो थेट हिन्दीतून झालेला आविष्कार होता. त्या कविता छापून येत, परंतु त्यांची कात्रणे मजजवळ नाहीत. आज फक्त काही ओळी मुखोद्‌गत आहेत, इतकेच. उज्जयिनी येथे मॅट्रिक ते इंटरचा विद्यार्थी असताना व नंतर पुढे ४३–४४ सालची माझी हिन्दी कविता जो कोणी तौलनिक दृष्टया बंधूंच्या कवितांशी ताडून पाहील त्याला त्यांमध्ये कोणतेच साम्य दिसणार नाही. वडील बंधूंची तेव्हांची कविता सुद्धा हृद्य व उत्तम आहेच, पण काही झाले तरी ते तेव्हा हिन्दी परंपरेत लिहीत होते व माझी कविता निसर्गश्रीच्या प्रत्यक्ष अनुभवातून निर्माण झालेली होती. अशा प्रकारे प्रत्यक्ष नव्हे पण अप्रत्यक्षपणे माझ्या व्यक्तित्वाचे अनेक पैलू धारदारपणे उजेडात आणीत जाण्याचे कार्य वडील-बंधूंच्या वाङमयाने व व्यक्तिमत्त्वाने अखेरपर्यंत निरंतर केले. स्वतःचे व्यक्तिमत्त्व कळत जाणे ही गोष्ट लेखकाच्या दृष्टीने मोठी भाग्याची समजली पाहिजे.

इंदूर येथे मी बी. ए. चा व नंतर एल.एल. बी. चा विद्यार्थी म्हणून चार वर्षे व वाया घालवलेले एक वर्ष, अशी पाच वर्षे ३८ ते ४४ सालापर्यंत साधारणपणे होतो. लॉ चे पहिले वर्ष 'क्षिप्रेकाठील हिरवळ' ह्या पुस्तकाच्या संकलन, संपादन, प्रकाशन कार्यात भाग घेऊन वाया घालविले. काही स्थानिक मोठ्यांचे साहित्य त्यातून अनवधानाने गळल्यामुळे ह्या पुस्तकाच्या धिःकारासाठी एक सभा आयोजित करण्यांत आली होती. त्या समारंभास संपादकांपैकी मीच एकटा उपस्थित होतो. याच काळात माझ्या महद्‌भाग्याने श्री. भालचंद्र लोवलेकर ह्या (सरकारी कचेरीत काम करणाऱ्या) एका प्रगल्भ व स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची ओळख झाली. त्यांची उमदी कलंदर वृत्ती विख्यात होती. वाचन विविध विषयावरील व दांडगे होते. नोकरी एक अपरिहार्य वस्तुस्थिती म्हणून त्यांनी स्वीकारली होती. वाङमयीन क्षेत्रात त्याची प्रत्यक्ष उपस्थिती कधीच नसे. मात्र त्यांच्या कवितांच्या प्रभावातून इंदूरचे कित्येक कवी सुटले नव्हते. त्याचे अनन्य मित्र सुप्रसिद्ध चित्रकार बेंद्रे व सोलेगावकर हे होते. त्या तिघांनी उत्तर भारतात पायीच यथेच्छ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भ्रमंती केली होती. कसदार अनुभवासाठी वास्तवसमक्ष होणे – अशी त्यांच्या मनाची बैठक होती. व्यक्तित्वाची प्रगल्भता (Maturity) हा अगदी दुर्मिळ गुण त्यांच्याठायी असल्यामुळे कुठल्याही उथळ व दिखाऊ वृत्तीचा त्यांच्याठायी लेशही नव्हता. त्यांनीच रोमेंटिक बंगाली—हिन्दी वाङमयातील रूढ सांतअनंत-वादाची पटले माझ्या मनावरून दूर केली. बी. ए. च्या पहिल्या वर्गात असताना ज्यांनी माझ्या कथावाङमयाला काही मोल आहे असा आत्मविश्वास माझ्याठायी निर्माण केला असे दुसरे व्यक्तिमत्त्व म्हणजे श्री. वीरेंद्रकुमार जैन यांचे. मुन्शी प्रेमचंद यांनी पुढच्या पिढीतील तीन थोर लेखकांपैकी एक, असा त्यांचा गौरव केला होता. त्यामुळे त्या नावाभोवती एक झगझगीत वलय असे. त्यांच्या साध्या, व नव्या लेखकांबाबतच्या आस्थापूर्ण वर्तनाने इतरत्र तितकासा विनम्र नसलेला (त्या काळात आपल्यालाच सर्व समजते, इतरांना नाही, अशा अडाणी असमंजस वृत्तीने कदाचित मी ग्रस्त झालेलो होतो.) मी त्यांच्यासमोर विनम्र वनत असे. त्यांनी माझी एक कथा– हंस मासिकाचे भावंड– 'कहानी' या मासिकाकडे पाठवून दिली व ती छापूनही आली. माझ्या कथेत मानसशास्त्रीय निरीक्षणे दिसतात असे त्यांना वाटले. श्री. वीरेंद्रकुमार यांच्यामुळेच एक लेखक म्हणून माझ्या मनात आत्मविश्वास निर्माण झाला. चिद्वादी आकलनातून आंतरप्रतीतिधर्मी सूक्ष्म रोमेंटिक प्रतीती व साधकाची धगधगीत वृत्ती श्री. वीरेंद्रकुमार ह्यांच्या ठायी होती. त्यांच्या वाङमयाला नव्याने पुढे येणाऱ्या मार्क्सवादी पुरोगामी वाङमयीन आंदोलनाने नंतर पूर्णपणे ग्रासून टाकले. तरीही त्यांनी आपल्या मार्गावर एकाकी वाटचाल करण्याचे सोडले नाही. व आजही ते ह्याच मार्गावर चालत आहेत. ते कसेही असले तरी, श्री. वीरेंद्रकुमार हे युगप्रवृत्तीच्या विरुद्ध उभे ठाकले आहेत असे माझ्या वास्तवनिष्ठ मनाला तेव्हा वाटू लागले होते व त्यामुळे त्यांचा संपर्क पुढे कमी कमी होत गेला.

ह्या काळात मी फक्त कॉलेजात जात होतो. अखेरच्या महिन्यात अभ्यास करायचा एवढेच मला माहीत होते. उरलेल्या वेळात मी निरंतर वाचीत होतो. ह्यूगो, रोमांरोलां, सर्व इंग्रजी रोमेंटिक कवी, रवीन्द्रनाथ, शरच्चंद्र, इत्यादी मी घटाघटा पिऊन गेलो होतो. त्यामुळे परस्पर विरुद्ध प्रवृत्तींचे माझ्यावर संस्कार होत होते व माझे मन आतून घडविले जात होते. जेव्हां मी मार्क्सवादी झालो तेव्हा, एक मजकूर पाटीवरून पुसला जावा व त्या जागी दुसरा लिहिला जावा, असे घडले नाही. उलट जे प्राप्त झाले त्याशी संवाद साधीतच व श्रेष्ठ मानवी अनुभव सत्ये स्वीकारीतच नवी वैचारिक व्यवस्था मनात उदयाला येत गेली. विचारसरणीचा एखादा साचा बाहेरून उचलून घ्यावा व त्यासारखे काही घडले नाही म्हणून तितक्याच सहजतेने तो फेकून द्यावा, असे माझ्या बाबतींत घडू शकले नाही. ह्या काळात–'आपण कोण होणार? डॉक्टर की इंजीनियर' अशा स्वरूपाचे प्रश्न किंवा 'माझ्या-पेक्षा अमुक तुच्छ आहे, वा अमुक लेखकापेक्षा मी श्रेष्ठ आहे' असे विचार माझ्या मनाला स्पर्श करू शकले नाहीत. मी वेगळ्याच प्रवाहात वाहत होतो. पुढे कोणती तरी नोकरी करावी लागेल एवढाच मनात हिशोब होता.

सुमारे १९४० पर्यंत राजकारण हा माझा विषयच नव्हता. गांधीजींवर श्रद्धा होती. गांधीवाद बरोबरच असणार हे गृहीत होते. याच काळात बहुतेक समवयस्क असे श्री. लागू व श्री. राजू हे दोन कम्युनिस्ट विचारसरणीचे तरुण भेटले. ते माझ्याकडे लेखक म्हणून पाहात, व मार्क्सवादाकडे ओढण्याचा प्रयत्न करीत. एकूण जीवनविषयक जाणीवदृष्ट्या मी त्यांच्यापेक्षा कदाचित् प्रगल्भ होतो. त्यांचा बुद्धीला पटणारा युक्तिवाद मी स्वीकारीत नसे, व मोठेपणाचा आव आणून कसल्या तरी दिव्य भव्य गोष्टी करी. परंतु, त्यांच्याच व काही दिवसांनी भेटलेले ज्येष्ठ मार्क्सवादी साहित्यरसिक ग. रा. खंडकर यांच्यामुळे मी हळुहळू मार्क्सवाद

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाचू लागलो. मार्क्सवाद समजायचा म्हणजे मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राजकारण, तत्त्वज्ञान इत्यादी क्षेत्रे आलीच. जितक्यापुरते तितके वाचणे हे स्वभावात नसल्यामुळे, मी ह्या क्षेत्रातील पुस्तके वाचू लागलो. जिज्ञासेला ही सर्व मैदाने खुली झाली व मनस्वी आनंद होऊ लागला. मार्क्स, लेनिन, स्टालिन इ. चे वाचन तर खरेच, पण रजनी पामेदत्तचे India Today अशी सर्व पुस्तके वाचण्यात आली. मार्क्सवादी झाले की कामगारात जाऊन विचार व कृती यांमध्ये एकरूपता सिद्ध करणे आवश्यक असते. श्री. लागू व श्री. राजू आपापल्यापरी त्या मार्गात होतेच. परंतु सरतेशेवटी मी कवी लेखकच होतो. घरच्या विपन्न, व कर्जात बुडालेल्या परिस्थितीच्या दलदलीत सारखा गिळला जात होतो व माझ्याकडे आशेने पाहणारांना तसेच सोडून देण्याची कठोरता अंगी नव्हती. म्हणून प्रत्यक्ष कार्यात भाग घेऊ शकलो नाही. एकदा मनातील तीव्र संघर्ष संपविण्यासाठी निकराचा प्रयत्न केला, तो साधू शकला नाही. ही परिस्थिती १९६४-६५ पर्यंत टिकून होती. साम्यवादी व साम्यवाद विरोधी वाङ्मयाचे माझे वाचन चालू होते. आता जीवनाचा कप्प्या-कप्प्याने विचार करण्याची पद्धत मागे राहिली होती. जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रातील परिवर्तन हे सम्यक् समाजपरिवर्तनाशिवाय होणे अशक्य, हे लक्ष्यात येऊ लागले होते. माणसाच्या ऱ्हासाची कारणे, तो ज्या व्यवस्थेत जगतो त्यात असतात हे कळू लागले. मनुष्य जातीच्या स्थिती गति नियतीचे चित्र व त्याच्या परमोज्ज्वल भवितव्याचे दर्शन झाल्यामुळे मूल्यनिष्ठ असलेल्या माझ्या मनात श्रेष्ठ नैतिक प्रेरणांचा; अपूर्व आशावादाचा उदय झाला. साम्यवादी व त्याला विरोधी वाङ्मय तेव्हा वाचले व आजही वाचतोच आहे. कालचे व आजचे भारतीय व युरोपीय वाङ्मय माझ्या आकलनात सतत येतच आहे. एक गोष्ट खरी की ह्या काळातील तीव्र आत्मसंघर्षातील आत्म-वस्तु ज्ञानामधून माझ्या व्यक्तित्त्वाची व्यवस्था ठरून गेली आहे. तिच्यात सखोलपणा कदाचित् अधिक येत असेल परंतु तिच्यात बदल झालेला नाही.

मूल्यनिष्ठ वृत्तीतून जगाकडे पाहण्याची वृत्ती स्वभावरूप बनल्याने, प्रत्यक्ष व्यवहारात वर्तनही तसेच होऊ लागले. व्यक्ती कितीही श्रेष्ठ पदावर असो, त्या गोष्टीचा माझ्या मनावर परिणाम होण्याची शक्यता फार कमी झाली व व्यक्ती कितीही तथाकथित कनिष्ठ पदावरील वा वर्गातील असो, तेवढ्यावरून ती हीन मानण्याची शक्यताही कमी झाली. व्यक्तिगत, वर्गगत, जातिगत, वा राष्ट्रगत खोटा अहम् मला कमीतकमी ग्रासीत जाण्याची शक्यता निर्माण झाली व इतरांच्या ठायी तिची विविध स्वरूपे ओळखता येऊ लागली. निखळ मनुष्यतेच्या दृष्टीने जगाकडे पाहण्याची ही वृत्ती मुळात होतीच, मार्क्सीय दृष्टीमुळे व विरोधी मुद्द्यांचा व वर्तनांचा व्यवस्थासापेक्ष अर्थ कळू लागला. मार्क्सवादाने माझ्या वृत्तिव्यवस्थितीची मोडतोड न करता तिलाच अधिक डोळस व म्हणून अधिक व्यापक केले. त्यामुळेच माझ्या दृष्टिकोणात, भाववृत्तीत व वर्तनात किमान एकात्मता राहू शकली असावी असे वाटते.

ललित वाङमयाची निर्मिती ज्या आंतरिक प्रत्ययातून होते ती प्रेरणा माझ्याठायी निश्चितच आहे; निदान आजपर्यंत होती. मार्क्सवादी झाल्यावर माझ्या मनात एक तीव्र कलह निर्माण झाला. एकीकडे माझे पाय घरच्या ढासळलेल्या परिस्थितीत खोलवर रूतत होते, तर दुसरीकडे माझ्या ह्या अगतिकतेशी-परिस्थितीनिष्ठ अगतिकतेशी-झगडत माझे मन मानवाच्या खऱ्याखुऱ्या ऐतिहासिक संग्रामाकडे मनस्वी ओढ घेत होते. वाङमयावर प्रेम असल्यामुळे नव्हे, रचना सौंदर्यात वृत्ती रमत असल्यामुळे नव्हे, तर अंतरीच्या तीव्र अस्वस्थतेमुळे मी लिहीत होतो. विज्ञान व ललित वाङमय यांचे सतत संस्कार होत गेल्यामुळे माझ्या व्यक्तित्त्वाला जी काही थोडी बहुत प्रगल्भता आली असेल, त्याचप्रमाणे मूल्यघटित व्यक्ति-मत्त्वातून निर्माण झालेल्या नैतिक दृष्टीमुळे जे आत्म-वस्तूचे प्रत्यय माझ्यात निर्माण झाले असतील त्यातून, माझ्या वाङमयाची निर्मिती झालेली आहे असे मी म्हणू शकतो. माझ्या आंतरिक नैतिक स्थितिगतीच्या संघर्षातून व त्यातून

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुक्त होण्याच्या स्वप्नातून, मी सर्व स्तरांवरील-विशेषत: राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील-संघर्ष आकळले आहेत व त्यांची दर्शने सगुण करण्याचा प्रयत्न केला आहे. माझ्या प्रदीर्घ कवितांचे रहस्य यातच आहे. समीक्षकांना त्याचे संपूर्ण आकलन अजून होऊ शकलेले नाही. ऐतिहासिक सम्यक् दृष्टीमुळे जीवनाचे प्रवाह-रूपत्व मला स्पष्ट जाणवते. व्यक्तीव्यक्तीच्या अनन्य-साधारण वृत्तिसंघर्षामागे समाजातील वर्ग संघर्ष व वर्गांतर्गत संघर्ष दिसत असतात, व त्याही मागे मनुष्य-पणाची निरनिराळी व्याकुळ रूपे, व माणसाची अपूर्णता, तद्‌गर्भ परिपूर्णतेचा संकेत माझ्या कादंबरी वाङमयात रेखाटण्याचा प्रयत्न दिसतो. कादंबऱ्यांचे असे रूप परिचित नसल्यामुळे कदाचित्, त्यांचेही परिपूर्ण आकलन होऊ शकले आहे असे म्हणवत नाही.

वैचारिकेतून (ideology) कलानिर्मिती होत नसते, हे खरेच आहे. परंतु अनुभव व्यवस्थिती-मध्ये वैचारिकता गर्भित असते हे ही खरे आहे. निखळ मूल्यनिष्ठ राहून जगाशी मानसिक पातळीवर संवादी विरोधी संबंध स्थापित करीत त्याचे मानुष स्वरूप ओळखण्याची जी वृत्ती कदाचित माझ्या-ठायी आहे तिच्याशी संवादी अशीच मार्क्स-वादी तत्त्वदृष्टी होय. त्यामुळे ह्या दोहोंमध्ये विरोध असल्याचे मला कधीच जाणवले नाही. माझ्या मूल्यनिष्ठ दृष्टीमुळे मार्क्सवाद समजण्यास व मार्क्सवादामुळे माझ्या मूल्यनिष्ठ अनुभवाचे वास्तव स्वरूप समजण्यास मला मदत झाली. ही प्रक्रिया विचाराच्या क्षेत्रात आज अधिक तीव्र झालेली आहे. माझ्यावर झालेल्या विविध संस्कारांबाबत व ललित वाङमयामागील माझ्या अनुभव व्यवस्थितींच्या स्वरूपाबद्दल मी आतापर्यंत बोललो आहे. मनुष्य-जीवन हेच मध्यवर्ती महत्त्वाचे असल्यामुळे, ललित-वाङ्‌मयाचा व त्याचा नेमका संबंध कोणता व ललित वाङ्‌मयीन कृतीचे व्यवच्छेदक लक्षण कोणते, या विचारातून माझे-'सृष्टी', 'सौंदर्य' व साहित्यमूल्य हे पुस्तक लिहिले गेले आहे. परंतु माझी खरी भूमिका नवनिर्मितिशील लेखकाचीच आहे. मात्र, वर जे लिहिले तेवढ्यावरूनच माझी कला श्रेष्ठ दर्जाची आहे असे मला सुचवावयाचे नाही. कारण माझी जाणीव 'मानुष' एकार्थासह रसिका-पर्यंत पोचते की नाही ते रसिकांनीच ठरवावयाचे आहे.

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

संशोधनात्मक, समीक्षणात्मक, तत्त्वज्ञान, कथा व आदी ललित लेखनाने बहरलेले

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जुन्या पिढीतील नवे सरदार / डॉ. र. वि. हेरवाडकर

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या बार्शी येथील अधिवेशनाच्या अध्यक्षपदी प्रा. गंगाधर बाळकृष्ण सरदार यांची योजना झाली ही अनेक दृष्टींनी स्वागतार्ह घटना होय. केवळ ज्येष्ठ साहित्यिक म्हणूनच नव्हे, तर बदलत्या समाज-जीवनाच्या आंतरिक गाभ्याचा शोध घेऊन त्याच्या परिवर्तनासाठी बद्धपरिकर असलेले एक ऋजू प्रकृतीचे समर्थ विचारवंत म्हणून प्रा. सरदार यांची विशेष योग्यता आहे. म्हणूनच या योजनेचे महत्त्व वाटते.

विचारवंत कर्मयोगी

स्वातंत्र्यपूर्व काळातील सुमारे दोन तपे नि स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय आणि सामाजिक जीवनाच्या आंदोलनाचे अण्णासाहेब हे डोळस साक्षीदार आहेत. परंपराप्रिय असूनही सुधारणा-वादी विचारांचे आव्हान स्वीकारण्याचा त्यांचा दांडगा उत्साह आहे. शिवाय लोकमानसातील विवेकबुद्धीला जागृत करणारे ते कर्मयोगीही आहेत. सरंजामशाही वातावरणाच्या जव्हार संस्थानात त्यांचा जन्म झाला असला, तरी अणुयुगातील पुण्या-मुंबईचे बौद्धिक संस्कार त्यांच्यावर झाले असल्याने त्यांचा पिंड हा विचारवंताचा आहे. भारतीय परंपरेतील महाराष्ट्राच्या तेजस्वी संत साहित्याने तो पोसला आहे. त्यामुळे त्यांचे पांडित्य हे पोथी-निष्ठ नाही. राष्ट्रीय जीवनाच्या पलीकडे असलेल्या व संतांनी वेध घेतलेल्या मानवजातीच्या कल्याणाचा शोध आणि वोध घेणारे ते आहे.

लोकाभिमुख दृष्टिकोण

वाङ्‌मय हे सामाजिक जीवनाचे एक प्रमुख अंग आहे अशी अण्णांची श्रद्धा आहे. सामाजिक जीवनाचा संदर्भ नसलेला कोणताही वाङ्‌मयीन विचार असू शकत नाही असा त्यांचा आग्रह असतो. त्यामुळे कोणत्याही साहित्याची चिकित्सा सामाजिक दृष्टीने व्हावी हे ओघानेच आले. संतसाहित्य हे महाराष्ट्रीय संस्कृतीचे प्रधान स्वरूप आहे. नव्या समाजरचनेत त्याला डावलून चालणार नाही, कारण त्यात धर्मनिरपेक्ष असे सामाजिक संदर्भ निश्चित आहेत. त्यातील काही भाग कालबाह्य असला, तरी त्यातील चैतन्यतत्त्व आजही प्रेरणादायी ठरेल असे त्यांना वाटते. विज्ञान व साहित्य ही भिन्न प्रकृतींची असूनही त्यांना वास्तवाचे समान अधिष्ठान आहे. जीवनाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी विज्ञानाला साहित्याची जोड अवश्य हवी. साहित्यि-काचे व्यक्तित्व हे सामाजिकतेने बेमालूम व्यापलेले असते. मराठी भाषेची वाङ्‌मयीन परंपरा ही संकुचित नाही. ती व्यापक नि जीवनस्पर्शी आहे. तिला ज्ञानेश्वरादी संतांचा, लोकहितवादी, रानडे, आगरकर, फुले व डॉ. आंबेडकर यांचा तेजस्वी वारसा आहे. म्हणूनच साहित्याला लोकाभिमुख करणे आणि लोकांना साहित्याभिमुख करणे हेच एकमेव कार्य करण्याची आज नितांत गरज आहे असे ते आवर्जून सांगतात.

वैशिष्टयपूर्ण लेखन

प्रा. सरदारांचे लेखन हे मोजके पण वैशिष्टय-पूर्ण आहे. त्यांचा उपरिनिर्दिष्ट साहित्य नि समाज-विषयक दृष्टिकोण त्यांच्या लेखनात ठामपणे व्यक्त होतो. साहित्य मग ते प्राचीन अगर अर्वाचीन असो त्यामागील त्यांची ही भूमिका आहे. वारकरी, रामदासी इत्यादी भिन्नभिन्न पंथीयांच्या साहित्यांतील अंतर्मुखता, उदारता, सहिष्णुता व क्षमाशीलता या गुणांच्या प्रयोजनावर त्यांनी आपल्या लेखनात नेमके बोट ठेविले आहे. (संतवाङ्‌मयाची सामाजिक फलश्रुती), गेल्या शतकातील विष्णुबुवा ब्रह्मचारी, भाऊ महाजन यांसारख्या समाजसुधारकांच्या थोर कार्याचा ते अचूक आलेख काढतात (महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी) तसेच समाजहितैषी आगरकर नि न्यायमूर्ती रानडे यांचा तात्त्विक विचार समाजाच्या पुनरुत्थानाला कसा उपयुक्त आहे याची ते मार्मिक चिकित्सा करतात. (आगरकरांचा सामाजिक तत्त्व-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विचार व रानडेप्रणीत सामाजिक सुधारणेची तत्त्व-मीमांसा) शिवाय विविध स्फुट लेखांत 'राजकारणातील तंत्र आणि तत्त्वज्ञान', 'नवसमाजरचनेच्या समस्या', 'बुद्धिवादाच्या मर्यादा', 'सत्याग्रहाचा सामाजिक आशय', 'मराठी माणूस', 'नवमहाराष्ट्रा पुढील यक्षप्रश्न' इत्यादी जिव्हाळ्याच्या विषयांची ते सूक्ष्म चर्चा करतात. त्यांच्या विचारांत नि लेखनांत गांधीवाद नि मार्क्सवाद यांचा सुरेख संगम झाल्यामुळेच की काय ते सर्वपक्षीय दिसावेत, यात नवल नाही.

चारित्र्यवान साहित्यिक

अण्णा व्यक्ती म्हणूनही सर्वांना जवळचे वाटतात. गोड वाणी, स्वच्छ मन, नम्र स्वभाव, साधी राहाणी, निर्मल चारित्र्य नि प्रगत आचार-विचार हे संतत्वाचे गुण त्यांच्या ठिकाणी आहेत. अबोलपणा हा एका दृष्टीने सामाजिक कार्यकर्त्याचा दोष मानिला जातो. पण अण्णांनी परमतसहिष्णुतेच्या पातळीवर त्याला गुणांची योग्यता आणून दिली आहे. His silence is more eloquent than words हे कार्लाईलचे डान्टेविषयी काढलेले उद्गार त्यांच्या शांत स्वभावाला पूर्णपणे लागू पडतात. विद्वत्तेचे अवमूल्यन होणाऱ्या आजच्या काळात त्यांच्यासारख्या संयमी, निस्पृह, समंजस नि चारित्र्यवान व्यक्तीची आवश्यकता आहे. लोकशिक्षणाच्या कार्यात 'आनंदाचे आवारु। मांडू जगा' हा ज्ञानेश्वरप्रणीत त्यांचा ईप्सित संकल्प सिद्धीस जावो ही सदिच्छा

संमेलनाच्या या शुभप्रसंगी साहित्य-सरदारांना हा मानाचा मुजरा.

⊕ ⊕ ⊕

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

प्रसिद्ध झाला -- प्रसिद्ध झाला

विदर्भातील नवोदित लेखक/लेखिकांचा कथालेखन स्पर्धेतील निवड यशस्वी १९ कथांचा संग्रह

"प्रातिभ"

किंमत रु. २०/-

आजच मागणी करा व्यापाऱ्यांना खास सवलत

जास्त माहितीसाठी विदर्भ साहित्य संघ, झांशी राणी चौक, नागपूर-१२.

ह्यांचे कडे चौकशी करावी.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रा. गं. बा. सरदार : एक समाजमनस्क साहित्यिक / डॉ. हेमंत वि. इनामदार

चौपन्न सालचा जून महिना. वीस तारीख म्हणजे, नव्या शैक्षणिक वर्षाचा पहिला दिवस. पुण्यातलं एस्. एन्. डी. टी. कॉलेज. तासाभरापूर्वीच इथं मी सेवेसाठी रुजू झालो होतो. कॉमन रूम-कडे निघालो होतो. तेवढ्यात एका वर्गातून धीरगंभीर सुरात उच्चारलेले केशवसुतांच्या 'तुतारी'तले सूर ऐकू आले.

पडली छाया मनुजाची जर–
विटाळ होतो तर मनुजाला,
व्हावे स्नानचि सचैल त्याला;
काय म्हणावे या मूर्खाला ?
नरेंचि केला हीन किती नर !

आणि या ओळींच्या पाठोपाठ त्या संदर्भा-तलं जीवनभाष्यही मला ऐकू आलं: "माणसं माणसांशी माणसासारखं वागत नाहीत, हे पाहून केशवसुतांच्या मनानं बंड पुकारलं आहे. पण अस्पृश्यांच्या सावलीचा विटाळ मानण्याचे दिवस आता संपले आहेत. पिढ्यान्‌पिढ्या अंधाराच्या विळख्यात जगणाऱ्या अस्पृश्यांना आता प्रकाशाची ओढ लागली आहे. परिस्थिती झपाट्यानं बदलत आहे. व्यथा-वेदनांची ही गाणी संपली पाहिजेत. अस्पृश्यांच्या आकांक्षांची नवी चैतन्यगीतां आता घुमायला हवीत. त्यांच्यातल्याचं कवींनी बंडाचं निशाण उभारायला हवं !"

बी. ए. चा वर्ग होता तो. प्राध्यापक गं. बा. सरदार यांचा तास चालला होता. नेमलेल्या कवितेचा अन्वयार्थ, फार तर सुलभ भावार्थ सांगणारे शिक्षक बरेच भेटतात, पण इथं काही वेगळं चाललं होतं. 'कविता म्हणजे संसृतिटीका', 'साहित्य हे जीवनाचं भाष्य असतं' याचा सुखद प्रत्यय त्या वर्गातून येत होता. केशवसुतांच्या 'तुतारी'तून उमटणाऱ्या निनादांची कोडी सरदार उलगडून दाखवीत होते. कवीच्या अनुभवापलीकडचं आणि विचाराला चालना देणारं असं विवेचन ते मांडत होते.

सरदारांच्या या क्रांतदर्शी प्रज्ञेचा आविष्कार वर्गात केवळ विद्यार्थिनींपुढेच होत होता असं नव्हे, त्यांच्याशी बोलताना आम्हां प्राध्यापकांनाही त्यांच्या चिंतनातून प्रगट होणारी नवी विचार-क्षितिजं पालवीत असत. मी स्वतः तर त्यांच्या विभागातच, त्यांचा एक कनिष्ठ सहकारी म्हणून काम करीत होतो. अधूनमधून प्रसिद्ध होणाऱ्या त्यांच्या प्रत्येक निबंधाचा आणि पुस्तकाचा पहिला वाचक होण्याचं भाग्य मला लाभत होतं. शिकवणी लावून जे समजणार नाही, असं काही नित्य नवं जीवनदर्शन त्यांच्या बोलण्यातून घडत होतं. 'सरदार' आणि 'इनामदार' ही सरंजाम-शाहीतली दोन्ही नावं आम्हां दोघांना चिकटली होती; पण दोघांच्याही वृत्तीत सरंजामशाही 'नाममात्रच' होती. सरदार हे तर जनजागृती आणि समाजप्रबोधन हेच आपलं उद्दिष्ट मानून वाणी आणि लेखणी झिजवीत होते.

कॉलेजच्या चार भिंतींच्या आत सरदार कधीच थबकले नाहीत. या चार भिंतींच्या आतलं आपलं कर्तव्य त्यांनी चोखपणानं बजावलं. पण "मळचास माझ्या कुंपण पडणे अगदी न मला साहे" याच वृत्तीनं ते समाजोन्मुख होऊन त्या दृष्टीनं विचारप्रगटन करीत होते. 'अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका' हा सरदारांचा पहिला ग्रंथ १९३७ त प्रसिद्ध झाला. अव्वल इंग्रजीतल्या गद्य सारस्वताचा परामर्श त्यांनी इथं घेतला आहे. या ग्रंथांची व्याप्ती आणि मांडणी तर्कसंगत, सुसूत्र आणि साधार आहे. प्रत्येक प्रकरणाच्या अखेरीला त्या त्या वाङ्मयप्रकारातील ग्रंथांची विस्तृत सूची सरदारांनी दिली आहे, अव्वल इंग्रजीतलं मराठी वाङ्मय परभृत वृत्तीचं होतं, असा सर्रास शेरा मारला जातो. या गद्याला स्वतःचा आशय नाही, शैलीचा डौल नाही, ते पाल्हाळिक आणि ढिसाळ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहे, अशा समजुतीनं त्याची बरीच उपेक्षा झाली. केवळ शालोपयोगी आणि बालोपयोगी पुस्तकं या अंधारयुगात लिहिली गेली अशी अवहेलनाही झाली. प्रा. सरदारांनी इथं एक नवं प्रमेय मांडलं. अर्वाचीन काळातील वाङमयीन क्रांतीची पूर्व-तयारी अव्वल इंग्रजीत झाली. पुढच्या क्रांतीची प्रसादचिन्हं या वाङमयात दिसतात, असं सरदारांना वाटतं.

यानंतरचा सरदारांचा ग्रंथ १९४१ त प्रसिद्ध झाला. 'महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी' हे त्याचं नाव. भाऊ महाजन, लोकहितवादी, म. फुले, विष्णुबावा ब्रह्मचारी आणि विष्णुशास्त्री पंडित यांच्या कामगिरीची मीमांसा करणारे निबंध सरदारांनी 'महाराष्ट्र साहित्य पत्रिकेत' प्रथम प्रसिद्ध केले. त्यातूनच हा निबंधसंग्रह सिद्ध झाला. वस्तुनिष्ठ ऐतिहासिक पद्धतीने या मान-कऱ्यांची दखल त्यांनी घेतली. महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास लिहिताना चिपळूणकर व रानडे यांना अतिरिक्त श्रेय देण्याची सुशि-क्षितांची एकांगी वृत्ती सरदारांना मंजूर नाही. शुद्ध ऐतिहासिक व वस्तुनिष्ठ भमिकेतून महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास लिहिला जावा, असं सरदारांचं चिरवांच्छित आहे. ज्या निष्ठावंतांनी आपल्या प्रतिष्ठेची बाजी लावून समाजसुधारणेला वाहून घेतलं, त्यांच्याविषयीच्या उपेक्षेची धूळ सरदारांनी झटकून टाकली आणि त्यांच्या व्यक्तित्वातल्या तेजाचं दर्शन घडवलं.

'संतवाङमयाची सामाजिक फलश्रुती' या सरदारांच्या पुस्तकांच्या १९५० ते १९७० या दोन दशकांत तीन आवृत्ती निघाल्या. प्रत्येक आवृत्तीत नव्या निबंधांची भर पडत गेली. आज-वर संतांच्या कामगिरीचं मूल्यमापन पारमार्थिक किंवा वाङमयेतिहासविषयक भूमिकेतून अनेकांनी केलं होतं. गुरुदेव रानडे, पं. धुंडामहाराज, सोनोपंत दांडेकर प्रभृतींनी संत साहित्यातील परमार्थ-प्रीतीचे पोवाडे गाइले होते. तसेच सारस्वतकार भावे, ह. भ. प. पांगारकर, महाराष्ट्रभाषाभूषण आजगावकर अशा पंडितांनी संतांचे वाङमयेति-हासातील स्थान सांगितले होते. मात्र न्या. रानडे यांनी संतांच्या चळवळीचे सामाजिक मर्म सर्वप्रथम विशद केले. प्रा. सरदारांनी तीच ज्योत पुढेही तेवत ठेवली. भयग्रस्त झालेल्या, स्वत्व हरवून बसलेल्या आणि दुबळ्या दैववादाकडे झुकलेल्या जनसामान्यांच्या अंतःकरणात आत्म-विश्वासाची नवी ऊर्मी संतांनी उत्पन्न केली. सामाजिक व्यवहारात माणसाचं स्थान कसंही असलं तरी देवाच्या दरबारात सारे समान आहेत, 'सकळांसि येथ आहे अधिकार' असं संतांनी सांगितलं. त्यामुळे सामान्य माणसाच्या जीवनाची पदवी उंचावली. संत कार्याची ही सामाजिक फलश्रुती सरदारांनी आपल्या ग्रंथात मार्मिकपणे विशद केली आहे.

'एकनाथदर्शन', 'तुकारामदर्शन' व 'रामदास-दर्शन' ही सरदारांची तीन वाङमयीन संपादनं सरस-सुंदर उतरली आहेत. त्यांच्या प्रस्तावना सर्वकष आहेत. संतांच्या समग्र वाङमय-संभारातून सरदारांनी निवडलेले वेचे त्या संतांच्या व्यक्तित्वाचा विकास-पट चित्रित करणारे आहेत. महाविद्यालयीन अभ्यासकाला संतवाङमयात अभिरुची उत्पन्न करून देणाऱ्या या प्रवेशिका सरदारांनी साक्षेपाने सादर केल्या आहेत.

या वाङमयीन संपादनांबरोबरच सरदारांची सामाजिक संपादनांदेखील विशेष लक्षणीय आहेत. 'महाराष्ट्र जीवन' चे दोन खंड आणि 'संक्रमणकाळाचे आव्हान' या ग्रंथांतून त्यांनी महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील संक्रमणकाळ आणि त्या काळाचे आव्हान या विषयांचा प्रपंच मांडला आहे. जुनी आणि नवी जीवनमूल्ये, कालच्या आणि आजच्या समाजजीवनातील विचारप्रणाली पूर्वजांची प्रेये आणि आपली श्रेये, स्वातंत्र्यपूर्व-काळातील मर्यादित जीवनध्येये आणि स्वातंत्र्योत्तर काळातील कालोचित जीवन उद्दिष्टे या सर्वातील तरतमभाव उलगडून दाखविणारे विचारवंतांचे निबंध सरदारांनी येथे संपादित केले आहेत. "ज्ञानोपासना हा केवळ बौद्धिक व्यापार नसून समग्र मानवी जीवन

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उजळून टाकणारी ती एक दुर्दम्य प्रेरणा आहे" हे सरदारांना जाणवले. भारतीय विचारधारेत समाजधारणेची आस्था आहे, पण समाजपरिवर्तनाची दृष्टी नाही. नैष्कर्म्य आणि निष्क्रियता, आत्मतुष्टी आणि औदासीन्य यामधील गल्लत संपली पाहिजे. प्रयोगाधिष्ठित संशोधनाची परंपरा निर्माण झाली पाहिजे. सृष्टिविज्ञान आणि समाजविज्ञान यांची आव्हाने स्वीकारली पाहिजेत, अशी सरदारांची जीवननिष्ठा आहे. त्या निष्ठेतूनच हे समाजदर्शन त्यांनी घडविलं आहे.

'आगरकरांचा सामाजिक तत्वविचार' आणि 'न्या. रानडेप्रणीत सामाजिक सुधारणेची तत्त्वमीमांसा' हे दोन ग्रंथ प्रा. सरदारांच्या दोन व्याख्यानमालांमधून सिद्ध झाले आहेत. या दोन महापुरुषांच्या विचारदर्शनातील बलस्थाने आणि शबलस्थाने सरदारांनी निर्भयपणे पण समतोल वृत्तीने येथे स्पष्ट केली आहेत. निर्मळ ऐतिहासिक दृष्टी आणि समाजोन्मुख वृत्ती यांच्या संगमातून त्यांनी हे विचारदर्शन घडविले आहे. रानडे यांच्या तत्त्वमीमांसेचे मर्म ते सांगतात. पण विवेकाचा तराजू वापरून ग्राह्याग्राह्यविवेकही ठरवितात. आगरकरांचे ऋण व्यक्त करताना सरदार आगरकरकालीन प्रबोधनाची पार्श्वभूमी विशद करतात. समाजाच्या प्रगतीविषयीची आगरकरांची कल्पना समाजातील सर्व घटकांना न्याय देणारी होती हे खरे, पण आगरकरांनी मध्यमवर्गाच्या समस्यांचीच चर्चा अधिक केली ही त्यांची मर्यादाही सरदार मान्य करतात.

पुण्यातील कौशिक व्याख्यानमालेत दिलेल्या तीन व्याख्यानांतून 'ज्ञानेश्वरांची जीवननिष्ठा' हा सरदारांचा ग्रंथ तयार झाला आहे. ज्ञानेश्वरांचे व्यक्तिमत्व, त्यांची काव्यसंपदा, त्यांचे तत्त्वज्ञान आणि त्यांच्या परमार्थसाधनेतील सामाजिक आशय हे विषय सरदारांनी येथे मांडले आहेत; आणि ज्ञानेश्वर हे अध्यात्मनिष्ठ मानवतावादाचे प्रणेते होत, असा दावाही ते करतात.

सरदारांनी स्वतंत्र आणि संपादित मिळून थोडीच पुस्तके लिहिलीत. पण ग्रंथसंपदेच्या संदर्भात थोडी की अधिक, यापेक्षाही सकस की निकस हाच प्रश्न महत्त्वाचा ठरेल. या संदर्भात कविवर्य अनिलांची एक कविता आठवते. 'मी थोडयाच कविता लिहिल्या म्हणून काय झाले?' असा त्यांचा सवाल आहे. एवढ्या तरी लिहून झाल्या हे काय थोडे झाले! असे त्यांचे समाधान आहे; आणि 'तुम्ही दाद दिलीत हे तर खूपच झाले!' अशी प्रसन्नतेची पावती अनिलांनी दिली आहे.

प्रा. सरदार हेही स्वतःच्या आटोपशीर लेखनसंभाराच्या बाबतीत संतुष्ट असावेत. अल्पाक्षर पण आशयबहुल असं लेखन त्यांनी केले. त्यांचं साहित्य मोजकंच पण मार्मिक आहे. सरदारांचा कोणताही निबंध वाचून हातावेगळा केला की त्यातील विचारांनी वाचक अस्वस्थ होतो, अंतर्मुख होतो. सरदारांचं समाजचिंतन त्याच्या मनात वादळ उभं करतं. विचारसौंदर्य किंवा विवेकमंडन हेच सरदारांच्या समग्र साहित्याचं व्यवच्छेदक लक्षण आहे. मराठी साहित्य आणि महाराष्ट्रातील समाजविचार या क्षेत्रांतील आजच्या अभ्यासकांमधील ते सरदारच आहेत!

⊕ ⊕ ⊕

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बार्शीचे साहित्य-संमेलन आणि प्रा. सरदार / प्रा. श्रीकृष्ण के. क्षीरसागर

काही वर्षांपूर्वी,—मी महाराष्ट्र साहित्य परिषदेचा कार्याध्यक्ष असता माझे मित्र प्रा. सरदार यांचे नाव संमेलनाचे अध्यक्ष म्हणून सुचवले होते. पण परिषदेतीलच के. नारायण काळे यांच्या मार्फत मुंबई गटाने सरदारांनी नाव मागे घ्यावे असे सुचवले. त्यावेळीही सरदार अध्यक्षपदाकरिता 'ओव्हरडच्' होते. सरदार स्वतः तर याबाबतीत काही हालचाल करणे शक्यच नव्हते पण काही विरोधी हालचाल झालेली पाहताच संकोचाने व सौजन्याने मागे सरणारे होते. मला त्यांचा स्वभाव माहीत असल्याने मी त्यांना प्रेमाची विनंती केली—"मुंबईच्या लोकांच्या इच्छेवरुन काळे कितीही आग्रह करोत आपण नाव मागे घेऊ नका. लोकशाहीच्या युगात एखाद्या कंपूच्या कारस्थानाला लोकमताचे महत्त्व देणे हे लोकशाही विरोधी आहे".

पण माझ्या सल्ल्याचा उपयोग झाला नाही. सरदारांच्या संकोचाचाच विजय झाला. त्या काळात 'लोकसत्ते'त माझे स्तंभ नियमितपणे येत असत. मी एकदा सरदारांचा उल्लेख "सरदारांच्या सारखे कम्युनिस्ट साहित्यिक" किंवा असाच काही केला होता. सरदारांना तो उल्लेख नुसता अप्रियच नव्हे, तर धोक्याचाही वाटला. मित्र म्हणून ते माझ्या घरी आले आणि आपल्या नेहमीच्या सद्‌गदित आवाजात म्हणाले, "तुम्ही माझ्यावर अन्याय केला आहे." मी विचारले, "तो कसा आणि कुठे?" सरदार म्हणाले, "लोकसत्ते'त माझा उल्लेख तुम्ही 'कम्युनिस्ट' म्हणून केला आहे. क्षीरसागर, मी तुम्हांला सांगतो मी कम्युनिस्ट नाही."

त्या काळात मी पुरोगामी वाङ्मयाच्या विरोधाखातर मार्क्सिझम्‌विरोधी लिहीत असे. आणि माझ्या दृष्टीने व माझ्या उद्दिष्टापुरता मार्क्सवाद व साम्यवाद यात मी फरक करीत नसे. कारण दोन्हींमुळे वाङ्मयाच्या आणि संस्कृतीच्या क्षेत्रात सारखाच उपद्रव होण्यासारखा आहे असे माझे मत होते व आहे. हाच विचार मी त्यावेळी सरदारांना त्या खाजगी बैठकीत सांगितला. सरदार म्हणाले, पण माझ्या व्यवसायाच्या क्षेत्रात तुमच्या या उल्लेखाने कोणता उपद्रव होण्याचा संभव आहे, याची तुम्हांला कल्पना नाही. सरदारांचा अध्यक्षपदाला नकार आणि कम्युनिस्ट या शब्दाला (त्यांच्या संदर्भात) विरोध, या दोन्हीही गोष्टीत त्यांचा संकोची स्वभावच दिसून येईल.

सरदार आजकाल एक यशस्वी वक्ते म्हणून प्रसिद्ध आहेत. पुण्यातील अनेक सभांना अध्यक्ष म्हणून सरदारांना निमंत्रित केले जाते. त्यांच्या भाषणात इंग्रजीत ज्याला ('persuasiveness") म्हणतात, म्हणजे 'मन वळण्याची शक्ती' ती विशेष प्रमाणात दिसून येते. त्यांच्या कळकळीचाच परिणाम श्रोत्यांच्या मनावर विशेष होतो. त्यांचे लेखन मुख्यत्वेकरुन समाजविश्लेषणात्मक असते. "संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुती" या त्यांच्या प्रसिद्ध प्रबंधात वाङ्मयाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी दिसून येईल. 'सामाजिक फलश्रुती'व्यतिरिक्त ते वाङ्मयाकडे फारसे वळलेले नाहीत. मग ते वाङ्मय जुन्या संतांचे असो, की आधुनिक सांसारिकांचे असो. त्यांचा सार्वजनिक 'रोल' प्रायः राजकीय आहे. पण व्यावसायिक आयुष्याच्या प्रारंभी सत्याग्रह करून तुरुंगात जाण्याव्यतिरिक्त आणि पुढे समाजवादी अभ्यास-मंडळे चालविण्याव्यतिरिक्त त्यांचे जीवन, अध्यापन आणि लेखन यातच गेलेले आहे.

अनेक वर्षे अध्यक्षपदाच्या योग्य सन्मानापासून वंचित झालेला एक सत्तरीतील विद्वान म्हणूनही त्यांची बार्शी येथील निवड सर्वमान्य आहे आणि आणखीही एका कारणाने बार्शीच्या संमेलनाकरता साहित्यिकांना त्यांचे नाव आठवणे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सहाजिक होते. आज संमेलनाला ज हुल्लडीचे आणि दंगामस्तीचे स्वरूप आले आहे, त्यात सरदारांच्या सारख्या धर्मराजाच्या व्यक्तिमत्त्वाचा तरी काही उपयोग होतो का पहावे, हाही त्यांना निवडणारांचा दृष्टिकोण असावा. त्यांची निवड झाल्यावर पुण्यात जो सत्कार-समारंभ झाला, त्यात त्यांनी अध्यक्षपद स्वीकारण्यामागील आपला हाच उद्देश सांगितला होता. दलित आणि दलितेतर यांच्यात पडलेली फट भरून काढावी. या उद्देशानेच आपण या वयात अध्यक्षपद स्वीकारले आहे, अशा अर्थाचे त्यांचे उद्गार होते. गेल्या दोनतीन वर्षांतील हुल्लडीच्या वातावरणात अध्यक्षपदाचा राहावा तेवढा मान राहात नाही; असे मी काही आठवड्यांपूर्वी पुण्यामुंबईच्या दैनिकांतील माझ्या पत्रात म्हटले होते. त्यावर माझा गैरसमज दूर करण्याकरता म्हणून सरदारांनी फोनवरून मला अध्यक्षपद स्वीकारण्यामागची हीच भूमिका समजावून दिली होती. या समंजस-पणाच्या भूमिकेत सरदार यशस्वी होतील काय ? मला वाटते साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर अलीकडे गाजलेले रण हे 'वाङमयीन' नसून 'राजकीय' आहे. कारण साहित्य संमेलनात कधीच कोणास जन्मजातीवरून मज्जाव नव्हता. तसा मज्जाव नसताही संमेलनाच्या व्यासपीठावर जे रणकंदन दिसत आहे, ते एखाद्या समाजाच्या वाङमयीन मान्यतेकरता नसून त्याच्या इतर कित्येक मागण्यां-करता आहे. म्हणजे दलित वर्गाचा मानवी हक्काकरता जो व्यापक लढा चालू आहे, त्याचाच एक भाग म्हणून संमेलनाच्या व्यासपीठावर पुणे व चंद्रपूर येथे आक्रमण झाले. त्या मागण्यांतील एक मागणी म्हणजे विद्यापीठाच्या नामांतराची मागणी होय. या प्रश्नात सरदारांचे सौजन्य जर एखादा मार्ग काढू शकेल, तर सर्वांना आनंदच होईल. पण साहित्य संमेलनामध्ये आज जे व्यासपीठाच्या अवमानाचे दृश्य दिसते, त्यावर इलाज कोणताही सज्जन वा खाष्ट अध्यक्ष काढू शकेल असे वाटत नाही ! एखादा मुळातच चुकीचा प्रश्न विचारावा आणि उत्तर देणाराला अडचणीत पाडावे; अथवा एखाद्या बेकायदा, कृतीत एखाद्या सज्जनाला सहाय्याला बोलवावे-त्यातला हा प्रकार आहे ! संमेलनाच्या व्यास-पीठाची आणि अध्यक्षाची प्रतिष्ठा राखणे हे 'साहित्य महामंडळा'चे कर्तव्य आहे. कारण अलीकडे ते महामंडळच संमेलन भरवीत असते. एखाद्याला भोजनाचे निमंत्रण द्यावयाचे, आणि त्याच्यावर मारामारीचा अथवा दंडेलीचा प्रसंग ओढवावयाचा, त्यातला प्रकार हल्लीच्या संमे-लनात होत आहे. अध्यक्षांचा आणि व्यासपीठाचा अवमान होणार नाही, अशी तरतूद करणे हे संमेलन भरविणारांचे कर्तव्य आहे. वेळप्रसंगी त्यांनी कायदा, सरकार, आणि पोलिस यांचीही मदत घेणे समर्थनीय होईल. तसे करणे अनेक सामाजिक कारणांनी अवघड असेल, तर काही दिवस संमेलन स्थगित करण्यासही हरकत नाही. पण संमेलनाच्या आधी महिना-दीडमहिना नियोजित अध्यक्षांना हार-तुरे घातल्यावर प्रत्यक्ष संमेलनात मात्र आरडा-ओरड व अवमान सहन करण्याची त्यांच्या-वर पाळी यावी यात संमेलन भरवणारांची नामुष्कीच सिद्ध होते.

चांद्याच्या संमेलनाला मी हजर नव्हतो, पण पुण्याच्या गाजलेल्या संमेलनात पूर्वाध्यक्ष म्हणून मी व्यासपीठावरच होतो. संमेलन—चालकांची, व प्रत्यक्ष अध्यक्ष व स्वागताध्यक्ष यांची त्यावेळची हतबलता पाहून उपस्थित स्त्रियांनादेखील त्यांची कीव आली ! अशा प्रकारचा प्रसंग बार्शी येथे केवळ सरदारांच्या सौजन्याने टळेल, हे संभवनीय आहे काय ? मला वाटते केवळ अध्यक्ष आणि स्वागताध्यक्ष यांच्या सौजन्यावर वा दांडपणावर संमेलनाची प्रतिष्ठा सोपवून देणे हे बेजबाबदार-पणाचे आहे. चांदा व पुणे दोन्हीही ठिकाणी संमेलनाची प्रतिष्ठा राखण्याकरिता महामंडळाने व स्थानिक संमेलन—चालकांनी अधिक खबरदारी घ्यावयाला हवी होती.

बार्शी हे सोलापूर जिल्ह्यातील शहर, लहानसेच, पण सधन उद्योगपतींचे ठिकाण आहे. सुमारे अठरा एकोणीस वर्षांपूर्वी एका समारंभाचा अध्यक्ष म्हणून मी गेलो असता, मला तेथील उद्योगपतींचे अगत्य, सौजन्य आणि ज्ञानलालसा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पाहून ते केवळ व्यापाराचे केन्द्र नसून सरकृतीचेही वाढते केन्द्र आहे, असे जाणवले. आणि ते नंतरच्या घटनांनी समर्थितही झाले. नंतर तेथे कॉलेजेही उभी राहिली, व अनेक सांस्कृतिक चळवळीही वाढीला लागल्या. लहान गावी संमेलने भरवावीत अशी अनेक वर्षांची मागणी आहे. अगदी लहान गावी इतके पाहुणे ठेवून घेण्याचे पुरेसे सामर्थ्य नसते हे खरे असले, तरी मिरज, अमळनेर, इचलकरंजी, कऱ्हाड यांसारख्या मध्यम शहरांना साहित्य संमेलन म्हणजे एक बौद्धिक आणि वाङ्मयीन मेजवानीच असते. या शहरांच्या मानानेही वार्शी हे शहर थोडे बाजूला पडते. म्हणजे त्याला ज्ञानाच्या पाणपोईची व साहित्याच्या रसाची अधिकच गरज आहे. त्या शहराची यंदा निवड केली आहे हे सर्वतोपरी योग्यच आहे. अशा शहरातील साहित्य संमेलनाला प्रो. सरदारांच्या सारखा राजकीय---सामाजिक बहुश्रुतता आणि कळकळ असलेला सज्जन अध्यक्ष म्हणून निवडला जावा, हेही सर्वतोपरी योग्य आहे. पण गेली दोन वर्षे संमेलनाच्या व्यासपीठावर जे दृश्य दिसले, ते जर दुर्दैवाने वार्शीच्या व्यासपीठावरही दिसले, तर वार्शीकरांच्या मनात साहित्यप्रेमाऐवजी साहित्य---विद्वेषच वाढण्याचा संभव आहे! गेली पन्नासाहून अधिक वर्षे मराठी साहित्यिकांनी व रसिकांनी साहित्य संमेलनाची एक अद्वितीय परंपरा विकसित केली आहे. तिला एखाद्या राजकीय प्रश्नामुळे वा मागण्यांमुळे अचानक तडा जाऊ नये, याची काळजी घेणे ही साहित्य महामंडळाची जबाबदारी आहे. या जबाबदारीची जाणीव अद्यापतरी महामंडळाला व त्याची जननी जी 'महाराष्ट्र साहित्य परिषद' तिला झालेली दिसत नाही. नाट्यगृहाला पुढच्या बाजूने आग लागली आहे, व मागच्या बाजूला नटनटी नेपथ्यगृहात नीरोला रंग लावीत आहेत, असे हे विपरीत दृश्य आहे! या विपरीत प्रसंगी प्रा. सरदारांसारख्या एका थोर सज्जनाची अध्यक्षस्थानी निवड झाली आहे. ही गोष्ट त्यातल्यात्यात चांगली आहे. "आपल्याला केवळ नामांतराचा प्रश्न सोडवायचा आहे", अशी जर सरदारांची कल्पना असेल, तर मात्र त्यांचा भ्रमनिरास होईल. त्यांना साहित्य संमेलनाच्या घटनेचा; तसेच राजकारण व साहित्य यांच्या परस्परसंबंधाचा प्रश्न सोडवण्याची जबाबदारी महामंडळास समजावून द्यावी लागेल. त्यांच्या सौजन्यातून आणि मुत्सद्देगिरीतून, संमेलनाचे विपरीत वळण बंद होऊन, संमेलन पुन्हा आपल्या सन्मान्य मार्गावर येईल, अशी आशा करू या. या कार्याला योग्य असा दुसरा, सरदारांव्यतिरिक्त अध्यक्ष कोणीच दिसत नाही, हे कोणीही मान्य करील.

अध्यक्ष सरदार आणि साहित्य महामंडळ या दोघांनाही सद्बुद्धी सुचो आणि सुयश येवो, अशीच कोणीही प्रार्थना करील.

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रा. गं. बा. सरदार यांच्या अध्यक्षीय भाषणाच्या निमित्ताने / प्रा. यशवंत मनोहर

यावर्षी चौपन्नावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन बार्शी मुक्कामी यशस्वीपणे पार पडले. मागील काही संमेलनांचे जखमी संदर्भ ध्यानात घेता बार्शीलाही चंद्रपूर–पुणेच होणार ही बहुतेकांची खात्रीच होऊन बसली होती. पण प्रा. सरदार यांच्या समतोल नेतृत्वामुळे तसे काहीच झाले नाही. ते सुखरूप पार पडले. म्हणजे संमेलनात गोंधळ माजू नये, ते उधळले जाऊ नये असे वाटत असेल तर हेकड असलेले विषमतेचे पुजारी असलेले, भेदभावाची अधिष्ठान-मूल्ये वंदनीय असलेले पुराणपुत्र यापुढे साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होणार नाहीत याची खबरदारी घेतली पाहिजे. यापुढे प्रतिगामी अध्यक्ष असला की प्रश्न नामांतराचा नाही कोणत्याही निमित्ताने संमेलन उधळले जाईल असे जागृत वातावरण फुले, शाहू आणि आंबेडकर यांच्या प्रेरणांमुळे आज समाजात आणि साहित्यात निर्माण झाले आहे. ही गोष्ट महाराष्ट्रीय प्रबोधनाचा एक लक्षणीय टप्पा अधोरेखित करणारी ठरावी.

चंद्रपूर–पुणे येथील संमेलने उधळली गेल्याने जी मने दुःखी झाली होती त्यांना या संमेलनाचे यश सुखावह वाटणे कठिण आहे. बार्शी संमेलन यशस्वितेची वैभवी वाटचाल करीत आहे हे लक्षात येताच अशा काही महापुरुषांनी वेगवेगळ्या पद्धतीने असंतोषाच्या आघाड्या उभारण्यांचा प्रयत्न केला. पण त्यांच्या प्रयत्नांचे दिवे तग धरू शकले नाहीत. या संमेलनाच्या यशात प्रा. सरदारांच्या विचारांचा, त्यांच्या विचार करण्याच्या पद्धतीचा आणि विचाराशी फटकून न वागणाऱ्या आयुष्याचा सर्वात महनीय वाटा आहे.

अखिल महाराष्ट्राला प्रा. सरदार यांचा आता एक समतोल मनाचा विचारवंत म्हणून परिचय झालेलाच आहे. प्रा. सरदार हे मूलतः जीवनचिंतक आहेत. आणि याही प्रांतात ते इहजीवनवादी विचारवंत आहेत. ते लोकवादी आहेत; परलोकवादी विचारवंत नाहीत. जीवन सुंदर व्हावे, अर्थपूर्ण व्हावे असे त्यांना वाटते. आहे ते अनर्थपूर्ण जीवन आणि त्यांची जाहिरात मारणारे साहित्य पुढेही चालावे असे त्यांना वाटत नाही. आणि याच अत्यंत रास्त संदर्भातच ते साहित्याचा विचार करतात.

प्रा. गं. बा. सरदार यांच्या अध्यक्षीय भाषणाकडे महाराष्ट्रातील विवेकनिष्ठांचे त्यामुळेच लक्ष लागले होते. आणि आजच्या साहित्यातील आणि जीवनातील खऱ्याच प्रश्नांचा अत्यंत डोळस वास्तविकपणे सांगोपांग विचार प्रा. सरदार यांनी या भाषणात मांडलेला आहे. या भाषणात पुस्तकी पांडित्य नाही. वाङ्मयातील आणि जीवनातील दुर्बोध प्रश्नांची, दुर्बोध हेतूने आणि दुर्बोध पद्धतीने केलेली चर्चा नाही. जीवनात प्रत्यही घडणाऱ्या घडामोडींचे समतोल बुद्धीने परिशीलन करणाऱ्या, अनेक समतावादी चळवळींशी जिव्हाळ्याचे आणि सक्रिय संबंध असलेल्या जिवंत मनाच्या एका जिवंत माणसाचे हे जिवंत भाषण आहे. साहित्य संमेलनामागील प्रेरणा साहित्यमागील प्रेरणा, मराठी साहित्याचा काळाच्या गरजा न ओळखण्यामधील थिटेपणा, नव्याने समाजात उदयाला येणारा लेखक–वाचक वर्ग, साहित्यातील आशय आणि अभिव्यक्ती, साहित्य व्यक्तिनिष्ठ की समाजसापेक्ष, लेखकाचे स्वातंत्र्य आणि बांधिलकी मराठीतील विचारप्रवर्तक वाङ्मयाचा थिटेपणा, नवी विज्ञानदृष्टी आणि वाङ्मय यांचे संबंध, ग्रामीण साहित्य, दलित साहित्य आणि लोकशाही जीवनपद्धतीच्या जोपासनेचा व सामाजिक समतेच्या तत्त्वांची बूज राखण्याचा झालेला नामांतराचा प्रश्न अशा आजच्या साहित्यातील आणि वाङ्मयातील सर्वच जिवंत प्रश्नांचा आणि निकडीच्या प्रवाहांचा अत्यंत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अभ्यासपूर्ण पद्धतीने विचार त्यांनी या भाषणात केलेला आहे. या भाषणाचे हे एक अनन्य-साधारण वैशिष्टय होय असेच म्हणावे लागेल.

कालपर्यंतची साहित्यिक, विचारवंत यांची सामाजिक बांधिलकीची कल्पना आज उपयोगाची नाही. ती समाजाच्या कनिष्ठ जातीतील व खालच्या थरातील लोकांच्या जीवनाशी तादात्म्य पावलेली नव्हती. त्यामुळे साहित्यव्यवहार हा पांढरपेशा मध्यमवर्गीय मनोवृत्तीच्या कक्षेतच कैवल्य शोधीत होता. त्या कैवल्यामुळेच त्याला वैकल्य आलेले आहे. त्यामुळेच "देशातील एकंदर परिस्थिती आज खूपच बदलली आहे; आणि निरनिराळ्या थरांतील लोकात सर्वांगीण विकासाची आकांक्षा निर्माण झाली आहे. तेव्हा आता सामाजिक बांधिलकीच्या किंवा लोकाभिमुखतेच्या कल्पनेत आमूलाग्र बदल घडवून आणण्याची वेळ आलेली आहे." असा अनेक तथाकथित मराठी साहित्यिकांच्या सांप्रदायिक वर्मावर बोट ठेवणारा बंडखोर विचार त्यांनी शांतपणे मांडून टाकलेला आहे.

प्रा. सरदारांच्या शैलीचा हा एक खास विशेष आहे. ते अत्यंत गरम विचार थंड शब्दांतून मांडत असतात. त्यांचे निष्कर्ष इतके दाहक असतात, त्यांनी संशोधिलेली सत्ये इतकी जहाल असतात, त्यांची भूमिका इतकी प्रखरतम असते की कुठे तडजोडीला जागाच नसते. पण त्यांनी मांडलेली विश्लेषणे आणि भाषेच्या मोडणीतील सामंजस्य यांमुळे ही दाहकताही मोहकता होऊन जाते. ही साच आणि मवाळ यांची भौतिक पातळीवरची क्रांतिकारी युती आहे. अशी वैचारिक आग अशा अनुराग शैलीतून मांडणारा विचारवंत त्यांच्याशिवाय, आज मराठीत दुसरा नाही. "पहिले संमेलन झाल्याला आता शंभर वर्षे होऊन गेली. या प्रदीर्घ कालावधीतील आपल्या साहित्यसाधनेची परिणती कशात झाली आहे ? आज आपण नेमके कुठे येऊन ठेपलो आहोत ? यापुढची वाटचाल कोणत्या दिशेने करणे श्रेयस्कर होईल ?" हे प्रश्न संमेलनाची कालवरची चारित्र्यसिद्धी आणि तिच्यासंबंधी तीव्र असमाधान असणाऱ्या गतिवादी मनालाच पडू शकतील असे आहेत. या प्रश्नांची खरोखरच निकडीने उत्तरे शोधली पाहिजेत आणि या संदर्भात सुचणारे विचारच मी आपल्यापुढे ठेवणार आहे असे प्रा. सरदार यांनी भाषणाच्या प्रारंभीच म्हटले आहे. या प्रश्नांनी साकार होणारा विद्रोह मागील अध्यक्षांच्या 'ठेविले अनंते' भाषणांचा विचार केल्यासच लक्षात येईल असा आहे.

तळागाळून नवी संवेदनशीलता घेऊन येणाऱ्या लेखकाची सांस्कृतिक भूक प्रचलित मराठी साहित्य भागवू शकत नाही. ह्या साहित्याने जीवनाच्या गतिशील प्रवाहाशी फारकत घेतली आहे. ते येणाऱ्या क्षणांशी संवाद साधण्याची शक्ती हरवून बसले आहे. या प्रचलित मराठी साहित्यात नव्या वाचक-लेखकाला पुरेसा वाव मिळू शकत नाही. सामाजिक एकात्मतेच्या कार्याला आणि जाति-धर्मनिरपेक्ष अशा व्यापक साहित्यनिर्मितीला पोषक असे वातावरण आज साकार होत आहे. दलित, ग्रामीण अशा साहित्यप्रवाहांचा वेगळेपणा हा प्रतिष्ठित समाजातील वाङ्मयोपासकांच्या जाणिवांतील कोतेपणाचा, कालबाह्यतेचा द्योतक आहे. १९३० पासूनच्या मराठी वाङ्मयाची स्थिति-शीलता त्याच्या सर्वांगीण प्रगतीला विघातक ठरलेली आहे. काळाची गरज ओळखण्याच्या बाबतीत मराठी साहित्य थिटे पडलेले आहे. खालच्या थरातील वाचकाला या वाङ्मयात आपले असे काही दिसत नाही. जातिव्यवस्थेतील बंदिस्तपणात या प्रतिकूल परिस्थितीचे मूळ आहे. आपल्याकडे सामाजिक अभिसरणाचा अभाव आहे. म्हणून प्रतिभाशाली लेखकाला अनुभूतीही संस्कारजड व नेमस्त स्वरूपाची असते. आपल्या अनुभवांचे क्षेत्र सामान्यतः अगदी संकुचित आहे. मध्यमवर्गीय विचारवंत साहित्यिक, अध्यापक व तंत्रविद्याविशारद उदासीन व असामाजिक वृत्तीचे बनत आहेत कारण समाजपरिवर्तनाच्या आंदोलनाचे नेतृत्व आता त्यांच्याकडे राहिलेले नाही. या प्रक्रियेत त्याला दुय्यम स्थान प्राप्त झालेले आहे. ही सरदारांची मराठी साहित्याकडे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणि हे पारंपारिक साहित्य निर्माण करणाऱ्या साहित्यिकाकडे पाहणारी भेदक दृष्टी आहे. ही सर्व विश्लेषणाची पद्धती इहवादी विचारवंताची आहे. आणि या परखड विश्लेषणामागे मराठी जीवनाला आणि साहित्याला खरे जीवनस्वरूप कळावे आणि त्याला शक्तिसौंदर्य प्राप्त व्हावे अशी आकांक्षा असलेले एक प्रबोधननिष्ठ मन उभे आहे.

समाज आणि कला यांचा संबंध स्पष्ट करताना त्यांनी म्हटले आहे की कोणतीच् कला पूर्णतया समाजनिरपेक्ष असत नाही. तरीदेखील साहित्यकलेची समाजसापेक्षना कितीतरी पटीने जास्त असते. साहित्यात लेखकाच्या सौंदर्यदृष्टीबरोबर त्याच्या संस्कारित जीवनदृष्टीचा ठसा उमटतोच. आणि साहित्यात लेखकाच्या दृष्टिकोनामुळेच जिवंतपणा येतो. ललित साहित्यापासून होणारा आनंद केवळ आकृतिसौंदर्याचा असत नाही. त्याच्या आशयाची अपूर्वता, मौलिकता व अंतःसंगती यांचाही या आल्हादात प्रमुख वाटा असतो. केवळ निरामय आनंद देणे एवढेच जगातील श्रेष्ठ कलाकृतींचे कार्य नव्हते. मानवी जीवनाचा अर्थ शोधणे व त्याला अर्थपूर्णता आणणे ही प्रेरणाही त्यांच्यात होतीच. सामाजिकता आशयात ओतप्रोत भरलेली असते. रसिकाचे ती लक्ष वेधून घेत असते पुन्हापुन्हा वाचावेसे वाटते अशा अक्षरवाङमयाचा रसिकाच्या मनावर उमटणारा ठसा बहुतांशी आशयनिष्ठ असतो. हे सांगत असतानाच प्रा. सरदारांनी ललितकृतीच्या निर्मितिप्रक्रियेवर प्रकाश टाकलेला आहे. आणि 'स्वतःचे अनुभव, चिंतन आणि विद्याव्यासंग यांच्या साहाय्याने आपल्या भोवतालच्या सामाजिक वास्तवाची दृढ पकड घेता आल्याखेरीज केवळ कल्पकता व अंतःस्फूर्ती यांच्यावर विसंबून राहून कुणालाही उच्च प्रतीचे कलात्मक साहित्य निर्माण करता येणार नाही' असा स्पष्ट अभिप्राय मांडलेला आहे.

ललित साहित्य व्यक्तिनिष्ठ की समाजसापेक्ष या प्रश्नाची उकलही प्रा. सरदारांनी नव्या पद्धतीने केलेली आहे. व्यक्ती स्वतंत्र असली तरी एकाकी असत नाही. व्यक्ती आणि समाज यांचा अतूट संबंध असतो. व्यक्ती समाजातच घडते. व्यक्ती हेच समाजातील निर्मितीचे केन्द्र असते. प्रतिभावंताला आपल्या सर्जनशीलतेचा समाजातच साक्षात्कार होतो. आपले आगळेपण व्यक्तीला समाजाशी संपर्क साधूनच घडविता येते. त्यातून व्यक्तित्व सिद्ध होते. व्यक्ती आणि समाज यांचा संबंध द्वंद्वात्मक स्वरूपाचा असतो. परंपरागत रूढिपूजकांना व्यक्तीच्या प्रतिष्ठेची मातब्बरी वाटत नसते. आणि स्वयंकेन्द्रित व्यक्तिवादी लोकांना सामाजिक बांधिलकीचे तत्त्व अनिष्ट वाटत असते. या संदर्भात एक समतोल, व्यापक व वास्तवलक्षी दृष्टिकोण स्वीकारण्याची गरज त्यांनी प्रतिपादिली आहे. व्यक्तीच्या आणि समाजाच्या विकासाचे काही नियम असतात. ते जाणून घेऊन तत्परतेने आत्मसात केल्याखेरीज विकास होत नाही. कितीतरी लोक प्रवाहपतितच असतात. पण स्वतंत्र असल्याच्या भ्रमात वावरत असतात. पूर्वसंस्कार, रूढी, जुनेनवे संकेत यांच्या पाशात ते गुंतलेले असतात. पारंपारिक संस्काराच्या तुरुंगात हे लोक बंदिवान असतात. परंतु प्रगतीला खीळ घालणारे संस्कार आणि विकास शक्य करणारे संस्कार यांतील फरक उमजून घेण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादिली आहे. ती मराठी लेखकांनी, कडू वाटली तरी लक्षात घेऊन आचरणात आणावी अशीच आहे. त्याशिवाय मराठी लेखकांना समाजाच्या गतितत्त्वाचा बोध होणार नाही. त्यांना सम्यक जीवनदृष्टी लाभणार नाही. आणि समाजपरिवर्तनाची निकडही तीव्रतेने जाणवणार नाही. प्रा. सरदार यांनी मराठी लेखकांच्या एका लाडक्या आजाराचे परखड निदान केले आहे. पण आजार जोपासायचे वागवायचे नसतात. मराठी लेखक आजार सोडायला तयार नाहीत. तो आजारांचा आजारी पूजकच असू इच्छितो.

मराठीतील वैचारिक साहित्याचा जुजबीपणा प्रा. सरदार यांनी दाखवून दिलेला आहे. आपला विचारवंत परभृत आहे. आपल्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

देशात अनंत धडामोडी चालू आहेत. त्यांतून गुंतागुंतीचे प्रश्न उभे राहत आहेत. त्यांचे सत्य स्वरूप विशद करण्याची त्यांची उकल करण्याचे मार्ग शोधण्याची जबाबदारी आपल्या बुद्धिमंतांनी पार पाडली नाही. आपल्या ज्ञानोपासकांना महाराष्ट्रापेक्षा युरोपची अधिक तपशीलवार माहिती असते. येथील वास्तवाला भिडणारे विचारवंत अगदीच थोडे आहेत. पूर्वीचा विचारवंत शब्दप्रामाण्यवादी होता. आता नवी पोथीनिष्ठा रूढ होते आहे. जनजीवनाशी विचारवंतांचा साक्षात संपर्क नाही. त्यामुळे ज्ञानाच्या वेगवेगळ्या प्रांतांत उच्च पातळीवर मूलभूत तात्त्विक वा औपत्तिक विचार पुढे गेला असे दिसत नाही. प्रबोधनाचे कार्य जवळ जवळ थांबले आहे. आज देशात नवा इतिहास घडतो आहे. समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेतील मोक्याच्या वळणावर ज्ञानप्रसाराला आणि विचारजागृतीला अत्यंत खालचे स्थान आहे यावद्दल प्रा. सरदारांनी मनापासून खेद व्यक्त केलेला आहे.

आपल्या समाजात विज्ञानदृष्टीची प्रतिष्ठा वाढली पाहिजे. अंधश्रद्धा, धर्मभोळेपणा, रूढिदास्य, चमत्कारांची ओढ, बुवाबाजी इ. गोष्टींचा प्रचार आणि प्रभाव वाढतो आहे. विज्ञानाचे अभ्यासक आणि अध्यापक हेच मुळी विज्ञानदृष्टीला पारखे झालेले आहेत. तेव्हा विज्ञानप्रसाराला विघातक ठरणाऱ्या अंधश्रद्धांविरुद्ध वेळप्रसंगी झगडण्याची तयारी ठेवली पाहिजे. आइन्स्टाईन, एडिंगटन, जेम्स जीन्स इ. लोक विज्ञानदृष्टी जनसामान्यापर्यंत पोचवण्याचा प्रयत्न करतात. आमच्या विज्ञानोपासकांना हे करता यायला हवे. ही प्रा. सरदारांची अपेक्षा रास्तच आहे. महाराष्ट्रातील तथाकथित बुद्धिजीवी विज्ञानोपासक यांच्या श्रद्धांची लीलाचरित्रे बघितली म्हणजे अभिजात विनोदाला महाराष्ट्रात बिलकूल तोटा नाही हे सत्य मनावर बिंबत जाते.

प्रा. सरदार यांचे ग्रामीण साहित्यासंबंधीचे विवेचनही मूलगामी आहे. "ग्रामीण ही संज्ञा केवळ स्थलवाचक न घेता तिच्यात शहरात राहूनही अत्यंत विपन्नावस्थेत दिवस कंठणाऱ्या कष्टकरी वर्गाचाही समावेश करावयास हवा. कारण खेड्यातील तसाच शहरातील समाजही दुभंगलेला आहे. खेड्यातील नवोदित सधन वर्गाचे शहरातील प्रस्थापित वर्गाशी जवळचे नाते आहे. तसेच शहरात झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांची अवस्था मोलमजुरी करणाऱ्या ग्रामीण लोकांप्रमाणेच हलाखीची आहे." प्रा. सरदारांनी केलेली ही जोडणूक निश्चितच लक्षणीय आहे. ग्रामीण साहित्याच्या कक्षा रुंदावणारी ही जोडणूक आहे. नव्या ग्रामीण लेखकाला, तो तळगाळातून आलेला असल्याने मध्यमवर्गीय लेखकाच्या ग्रामीण जीवनाच्या चित्रणातील अतिरंजितता व निर्जीवता खटकते. ही ग्रामीण साहित्याच्या विकासाच्या दृष्टीने शुभ गोष्ट होय. पण स्थितिप्रिय समाजाचे संस्कार, भाषा आणि विशिष्ट विचारसरणी या लेखकाने नाकारायला हवी. त्याचे पांढरपेशीकरण होऊ नये; त्याने प्रलोभनांना बळी पडू नये. ग्रामीण भागातील लेखकाला त्याच्याच जगातील नवा सहृदय व डोळस वाचकवर्ग लाभल्याशिवाय त्याचे वाङमय कसदार व समृद्ध होणार नाही. ग्रामीण साहित्याच्या विकासाची ही दिशा प्रा. सरदारांनी सुचविलेली आहे ती ग्रामीण लेखकांना निश्चितच वळदायक ठरेल यात शंका नाही. दलित साहित्यासंबंधीची प्रा. सरदारांची भूमिका सर्वश्रुत आहेच. पुन्हा या भूमिकेचा जोरकस उच्चार या भाषणात प्रा. सरदारांनी केलेला आहे त्यांची या 'सर्वांचे लक्ष वेधून घेणाऱ्या जोरदार लाटेकडे' पाहण्याची दृष्टी स्वागतकाराची आणि समर्थकाची आहे. पु. ल. देशपांडे यांच्या भाषणाचा काही प्रमाणात अपवाद वगळता दलित साहित्याचा असा खुल्या दिलाचा अधिकारी उच्चार प्रथमच मराठी संमेलनाच्या पीठावरून या भाषणातून झालेला आहे हे स्पष्ट केले पाहिजे. 'अस्पृश्यता आणि सामाजिक विषमता ही ईश्वरदत्त किंवा निसर्गनिर्मित नाही. ती मनुष्यकृत आहे, हे दलितांना कळले आहे. समाजाच्या हरेक क्षेत्रातील परिवर्तनाची गरज दलितांना आहे. सर्वंकष क्रांतीची निकड त्यांनाच आहे. मनुष्यत्वाची

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विटंबना करणाऱ्या परंपरेविरुद्ध त्यांच्या मनात उद्भवलेली भावना स्वाभाविकच आहे. असा दलित साहित्यातील विद्रोहाचा त्यांनी गौरवच केला आहे. व जुन्या कालबाह्य परंपरेवर प्रहार केल्याखेरीज तिच्यातील जीर्णांश निपटून काढल्याखेरीज परिवर्तन होत नाही पण क्रांतीचे विधायक अंग असतेच. वास्तवाच्या आधारेच त्याची उभारणी करावी लागते. अशी विधायकतेची बाजू प्रा. सरदारांनी महत्त्वाची मानली आहे. दलित साहित्य ही एका सामाजिक चळवळीची आघाडी आहे हे दलित साहित्यिकांनी लक्षात ठेवले पाहिजे असा मोलाचा सल्लाही त्यांनी दिलेला आहे.

याच संदर्भातच नामांतराच्या संदर्भातील आपले निर्भीड मत त्यांनी मांडले. मराठवाडा विद्यापीठाला 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे नाव द्यावे' असा ठराव महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी एकमताने मंजूर केला. महाराष्ट्रातील अनेक राजकीय सामाजिक, श्रमिक आणि युवक संघटना यांनी या ठरावाला पाठिंबा दिला. मराठवाड्यातील जनतेनेही ही मागणी उचलून धरली. शासनाचे प्रतिनिधीही आम्ही या निर्णयाला बांधलेले आहो असे सांगत आहेत. तेव्हा या निर्णयाची त्वरित अंमलबजावणी करणे शासनाचे कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले. कारण हा प्रश्न आता केवळ नामांतराचा राहिला नाही. तर लोकशाही जीवन-पद्धतीच्या जोपासनेचा व सामाजिक समतेच्या तत्त्वांची बूज राखण्याचा बनला आहे. असे स्पष्ट मत प्रा. सरदारांनी या अत्यंत नाजुक प्रश्नाविषयी बोलून दाखविले आणि हा प्रश्न साहित्यक्षेत्राच्या बाहेरचा नाही, असेही त्यांनी सांगितले. डॉ. आंबेडकरांच्यापासूनच स्फूर्ती घेऊन दलित साहित्याचा लक्षवेधी प्रवाह निर्माण झाला आहे. तेव्हा महाराष्ट्रातील सामाजिक एकात्मतेच्या दृष्टीने हा प्रश्न लवकरात लवकर सोडविला गेला पाहिजे. त्यामुळे मराठवाड्याच्या अस्मितेचा गौरवच होणार आहे. अशी अत्यंत सामंजस्याची, कटुता थांबवणारी आणि विरोधकांनाही मान्य होऊ शकणारी भूमिका प्रा. सरदारांनी मांडली आहे. मराठी सा. संमेलनाच्या व्यासपीठावरून प्रथमच ही भूमिका इतक्या निर्भीड पद्धतीने मांडली गेली आहे. प्रा. सरदार या ऐतिहासिक गौरवाचे पहिले धनी आहेत.

शेवटी त्यांनी म्हटले आहे की आपल्या मराठी साहित्याचे क्षेत्र नेहमीच जातिधर्मनिरपेक्ष राहिले पाहिजे. साहित्यिकांनी धर्मनिरपेक्ष इहवादी दृष्टीचाच अवलंब केला पाहिजे. बौद्ध विचार-सरणीचा पुरस्कार करणाऱ्या तरुणांचा दृष्टिकोन निःसंशय स्वागतार्ह आहे. ते बुद्धाची थोरवी वर्णन करतात. पण साहित्यातून ते सामाजिक प्रश्नांनाच वाचा फोडतात. त्यामागची त्यांची दृष्टी ऐहिकनिष्ठ असते. सर्व धर्मांच्या लेखकांनी ही भूमिका स्वीकारावी. त्यामुळे साहित्यप्रसाराचे कार्य सुकर होईल. सामाजिक जीवनात तणाव आहेत तोवर साहित्यात सुसंवाद निर्माण होणार नाही. म्हणून सामाजिक एकात्मतेच्या आड येणाऱ्या शक्तींशी झगडण्याची साहित्यिकांनी तयारी ठेवली पाहिजे. हीच साहित्यिकाची आज बांधिलकी ठरते. काळाचा प्रवाह कोणत्या दिशेने पुढे जात आहे, कोणत्या नव्या शक्ती बंधमुक्त होण्यासाठी धडपडत आहेत याचा विचार मराठी साहित्यिकांनी करायलाच हवा. या प्रकारच्या राष्ट्रोन्नतीचा, समाजविकासाचा, ऐक्याचा, सामंजस्यांचा ऐहिक सुखवर्धनाचा भव्य संदेश पोट-तिडिकेने त्यांनी दिलेला आहे.

प्रा. सरदारांच्या भाषणातील सामंजस्यामुळे दलित-दलितेरांत एक आत्मीयता निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा आकार वार्शी संमेलनाला होता. तळागाळाच्या जीवनात उभे राहून साहित्याची मीमांसा मांडणारे हे म. सा. संमेलनातले पहिलेच अध्यक्षीय भाषण होय. तोडायचे नाही जोडायचे ही या भाषणाची भूमिका तर गौरवास्पद अशीच आहे. आपल्या समाजातील डाव्या जगाच्या शूद्रातिशूद्रांच्या आणि सर्व पुरोगाम्यांच्या प्रतिनिधींचे हे भाषण होते. वार्शी संमेलनाने, त्यातील अध्यक्षीय भाषणाने हा एक नवा पायंडा पाडलेला आहे. पुढली संमेलने आता पुन्हा कोणीकडे जातात ते पाहावे.

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

टाळीत कावळा / प्रा. मुरलीधर कुलकर्णी

बारमध्ये दिव्यांचा अस्पष्ट पिवळा प्रकाश पडलेला. पिवळ्या दिव्यांना पिवळट काचेचीच आवरणं. त्यामुळं सगळ्या बारमध्ये एकप्रकारची धूसरता. एकेका टवलाभोवती चार चार खुर्च्या. प्रत्येक टेबलाला हार्डबोर्डचं उंच पार्टिशन. त्यामुळे प्रत्येक टेबलाला एक प्रकारची प्रायव्हसी. आम्ही दोघं एका पार्टिशनमध्ये समोरासमोर बसलेलो. पिण्याला जोडीदार असेल तर अधिक मजा. एकापेक्षा अधिक असतील तर अधिक मजा. पण यालाही प्रमाण हवं. अति झालं नि हसू आलं असं प्रत्येक बाबतीतच शेवटी अनुभवाला येतं. आमच्यासमोर लालसर काळपट व्हिस्कीचे पेग. व्हिस्कीवर माणकासारखा फेस. तरतरीत. पिणाऱ्या शरीराला तरतरीत करणारा. सोडा मिसळलेला. ते जळजळीत पेय घोटाघोटानं मध्येमध्ये थांबून सावकाश संपवत होतो. तोंडी लावायला गाठी शेव आणि सिगरेटचे फवारे. सिगरेटनं आणखी घसे शेकवले जात होते आणखी मजा येत होती. व्हिस्की संपली की आम्ही आणखी पेग मागवत होतो. आम्हाला घाई नव्हती. मदिरेचा आस्वाद घेत असताना घाई-गर्दी काय कामाची? जितका संथपणा तितकी मजा अधिक. म्हणून आम्ही सावकाशपणं एकं एक घुटका घेत होतो. दुकानाच्या मालकानं कॅसेट-टेप रेकॉर्डवर कुठलं तरी इंग्रजी गाणं लावलेलं. त्याचे उडतेउडते सूर उगाचच काळजाला भिडल्या-सारखे डोळ्यांपुढं रंगीत साबणाचे फुगे असतील तसे आकार. सारं शरीर हवेत तरंगल्यासारखं.

दुकानदार गल्यावर बसलेला.. येणाऱ्या गिऱ्हाईकाचं हसून स्वागत करत असलेला. जाणाऱ्या गिऱ्हाईकापासून काळजीपूर्वक बिलाचे पैसे मोजून घेणारा. बाहेर पडणारं प्रत्येक गिऱ्हाईक नशेत असलं तरी त्याचा फायदा घेण्याची कधीही इच्छा न करणारा. चेहऱ्यावर शांतपणा नि समाधान. मूळचा गोऱ्या वर्णाचा. त्यावर बारमधला पिवळट प्रकाश पडल्यानं पाश्चात्य देशातील माणसासारखा दिसणारा. प्रत्येक पार्टिशनआड एखादं दुसरं गिऱ्हाईक बसलेलं असावं. कारण काहींचे पाय पार्टिशनखालून पुढं आलेले दिसत होते. बारमध्ये एकंदरच शांतता होती. कारण इथं प्यायला येणारे बहुतेक खानदानीचे पिणारे असावेत. कारण बार असूनदेखील पिणाऱ्यांचा आरडाओरडा, उंच स्वरात संभाषण किंवा नशेतलं खडबडीत हसू इथं उमटत नव्हतं. वरळणंही नाही. चढल्यावर झुकांड्या खाणारे मात्र बाहेर पडताना दिसत होते. अत्यंत सावकाशपणं शांतपणानं एकएक क्षण पुढं सरकत होता असं वाटत होतं. पण वेळेचं भान तिथं पिणाऱ्यांना कुणालाच नसावं. नि ते ठेवूनही उपयोगी नसतं. हे प्रत्येकाला माहीत असावं. आम्हालाही वेळेचं भान नव्हतं. जणू तो एक नियम होता आणि आम्हीही तो पाळत होतो. आम्ही जवळ जवळ नेणिवेत प्रवेश केलेला पण आम्हाला समोरचा माणूस, दुकानाचा मालक नि मद्य सर्व्ह करणारी गाऊनमधली एक सो-सो दिसणारी ख्रिश्चन पोरगी यांच्या संबंधीची जाणीव मात्र होती. वास्तविक बारमध्ये मद्य ओतणारी एक मुलगी. तिच्याविषयी मी अधिक बोलावं. तिच्याकडं माझं नि त्याचं पुन्हापुन्हा लक्ष जावं हे उचित असायला हवं. पण तसं नव्हतं. एक तर ती मुलगी वर सांगितल्याप्रमाणं सो-सो, आणि 'पोरगी' या विषयावर मला तरी आता अधिकार न राहिलेला. शिवाय मालक जमा गंभीर तशीच तीही मख्ख चेहऱ्यानं वावरत होती. गिऱ्हाइकाचं स्वागत करताना मालक जसा भाड्यानं लावल्यासारखा हसत होता, तशी ती सर्व्ह करताना बळेच तोंडावर हसू ओढीत होती. माकडाला त्याच्या मालकानं दोरीला हिसका देऊन नाचवायला लावावं तसं जणू हसू दोघांवरही जबरदस्तीनं

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लादलेलं. दोघांच्याही हसण्यात नैसर्गिकता नव्हती. नुसतं निर्जिव.

त्या बारमधल्या क्षणांमधूनही आजचं आयुष्य सावकाश पण अखंडपणं सरकतच होतं. नि क्षणाक्षणानं आम्ही सारेच म्हातारे होत होतो.

बारमधली पोरगी आमचं लक्ष वेधून घेणारी नव्हती याचं कारण तिचा चेहरा फारसा आकर्षक नव्हता. पुरुषाची नजर स्त्रीच्या चेहऱ्याकडं प्रथम, नंतर उरोजांकडं नि नंतर नितंबाकडं का जावी याचा उलगडा मला अजून झालेला नाही. पण प्रत्येक तरुण पुरुष हे असं अगदी नेणीवपूर्वक करत असतो. कार्यकारणभाव काय असेल तो असो! चेहरा सोडला तर पोरगी फटाकडी होती. उरोज भरदारपणा दाखवत होते नि नितंबही पोर्षनमध्ये. पण चेहरा—काळावर्ण, वेडकीसारखं नाक, लांबट चेहरा, मिचमिचे डोळे, स्वरूप कुरूपातच जमा. त्यामुळं आम्ही तिच्याकडं ढुंकूणही पहात नव्हतो. मी तर नाहीच. कारण माझी मेदिनी लावण्यवतीत जमा होणारी. त्या पोरीकडं पाहिलं की मेदिनी आठवत होती. आता घरी माझ्या येण्याची आतुरतेनं वाट पाहात असलेली. कठड्यावर कोपरं टेकवून हात हनुवटीला लावून गॅलरीतून दूर रस्त्यावर माझ्या आकृतीला शोधीत.

आम्ही त्या पोरीकडं पाहात नव्हतो असं नाही पण रसिकपणानं पाहात नव्हतो. याचं तिलाही काही फारसं वाटत नसावं. गंभीरपणानं आमचं मद्य संपलं की येऊन अलिप्तपणानं पेग भरून जात होती. सोडा लक्षपूर्वक ओतत होती. कुणीतरी शांतपणानं उठून थोडंसं अडखळत गल्ल्यावरच्या मालकाकडं जात होतं. बिल चुकतं करून लटपटत बाहेर पडत होतं. पिण्याचं कार्य नशा चढल्यावरही इतक्या शांतपणानं चालू शकतं हेच एक आश्चर्य होतं. रस्त्यावरची रहदारीही जवळ जवळ थांबलेली. एखादी ट्रक अथवा कार आवाज करत जाई तेवढीच. ती दूर गेल्यावर तिच्या टायरांचा टरटर आवाज. नुकतीच पावसाची सर येऊन गेलेली. डामरीरस्ता चकचकीत. टच्युबलाईटच्या प्रकाशानं लकाकणारा. फूटपाथवरून तुरळक माणूस घरंगळत चालल्यासारखं. काळपट डामरी रस्त्यावर निळेपांढरे विस्तृत पुंजके. मध्ये साचलेली अंधाराची लावसट सावटं. मी बसलो होतो तिथून खिडकीतून रस्त्याची एक बाजू दूरवर गेलेली दिसत होती. माझा तिसरा पेग संपत आलेला. त्यानं तिसरा संपवून चौथ्याला हात घातलेला. मी प्यायला फारसा सरावलेलो नव्हतो. तो मात्र वस्ताद दिसत होता. हे त्यानं मला कितीतरीवेळा ऐकवलेलं.

रात्रीचे नऊ साडेनऊ. रस्त्यावरचे टच्यूबलाईटस् डोळ्यात झळझळत होते. यानंतर नटराजमध्ये परस्पर जाऊन खाना. मेदिनीला अगोदरच सुचवलेलं उशीर होईल, तू खाऊन घे! मी बाहेरच जेवेन. तिलाही आता याची चांगली संवय झालेली. माझ्या असल्या वागण्यानं राग. पिण्याचा तिरस्कार. कधीकधी कडाडून भांडायची. पण जिभेला लागलेली चटक एवढ्यातेवढ्यावरून सुटायची कशी? साडेदहा अकरापर्यंत घरी कसंही पोचता येईल. पिणं संपल्यावर खाना. खाना कसा चमचमीत असायला हवा. मुर्गीवर तुटून पडायचं. सालं, यावर ते तसलं हवंच. नि नंतर मेदिनीच्या मिठीत. स्वर्गातली रात्र. नंदनवनातला वसंत.

माझ्या डोळ्यांसमोरचे आकार आता एकमेकात विरघळू लागलेले पण मी चांगला शुद्धीवर आहे हे चांगलं जाणवत होतं. तो चांगलाच होता. चित्रपटांत एखाद्या रंगीत जाहिरातीतील रंग जसे एकमेकात मिसळलेले असतात नि तरीही जाणवायचं ते जाणवतच असतं तसं मला आता परिसरातलं भासत होतं. परिसर म्हणजे एक प्रचंड रंगीबेरंगी लोलक. सारे आकार स्वतःचं अस्तित्व सांभाळीत एकमेकांतून मिसळलेले. एरवी समोर दिसणारं वास्तव दृश्य आता इतकं हळवं नि झिळमीळ, हलकं-फुलकं नि झुळझुळीत की जीवच बेभान व्हावा. मला अत्यंत संवेदनशील नि तरल झाल्यासारखं वाटत होतं. प्याल्यावर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माणूस अधिक हळवं नि संवेदनशील होतं की मद्दड होतं यावर मतभेद होण्याची शक्यता. पण माझं मनच एखाद्या रंगीबेरंगी लोलकासारखं तरल झालेलं. पिवळ्या दिव्यांभोवतीचे प्रकाशपुंजके आकुंचित होत होते विस्तारत होते सर्वच वस्तूंना रंगीत वर्तुळाचे आकार आलेले. काचेच्या त्रिकोणी लोलकातून बघितल्यासारखं. ती पोरगीदेखील एक सबंध रंगीत लंबवर्तुळ.

माझ्यासमोर बसलेला तो कसल्यातरी गाढ तंद्रीत बोलत नव्हता. प्याल्यावर माणसाच्या जिभेला ढिलाई येते म्हणतात. पण आम्ही दोघं मुकाटपणं पीत होतो. त्याची दृष्टी कुठंतरी अधांतरी हरवलेली. ग्लासातला घोट घेऊन तो ग्लासाच्या काठाशी गोलसर बोट फिरवीत होता. मधनच ग्लासाच्या कडेवर टिचक्यांनी ताल धरत होता. मनात गाणं होतं की नुसतीच लय होती कळत नव्हतं. मधूनच व्हिस्कीच्या रंगात डोकावत होता. डाव्या हातात सिगरेट. टिचकी मारून सिगरेटची राख झटकत होता. ॲशट्रेमध्ये. ॲशट्रेमधून जळक्या थोटकांचा धूर निघत होता. यज्ञकुंडातून निघावा तसा. वर्तुळ धरून गरगरत आढ्याकडं जात होता. पण आमच्या साऱ्या कृती जाणीवपूर्वक न होता नेणीवपूर्वक होत असाव्यात. तो ग्लासाभोवती बोट फिरवत असताना धक्का बसून ग्लास लवंडेल आणि व्हिस्कीचा ओहोळ घरंगळत टेबलावरून जाईल असं मला आपलं उगा वाटत होतं. पण तसं काही घडतही नव्हतं.

कितीतरी वेळ तो असा बुडालेला. शेवटी तो मला हळूच पण मिस्किल आवाजात म्हणाला,

"यार, पोरगी आहे खरी पण अगदीच थर्डक्लास"

"फटाकडी परवडत नसेल मालकाला. पगार जास्त मागेल".

"अरे, लाखोंनी पडल्यात. अगदी स्वस्तात. मी आणून देतो म्हणावं."

"कुठं वाटेवर पडल्यात ?"

"अरे, डझनावारी !"

"असतील बुवा. मला काही इंटरेस्ट नाही."

"म्हणजे लग्न झालंय !"

"होय, सुंदर नि सोज्वळ बायको आहे. घरी वाट पाहात असेल यावेळी."

"लकी आहात !" तो सुस्कारा टाकून म्हणाला.

"म्हणजे लग्न झालेलं नाही ?"

"झालं होतं यार. पण आता एकटाच ! एकला चलोरे !"

"मला कळलं नाही".

"यार, ती एक मोठी कहाणी आहे. कुणी ऐकली तर हमखास परिणाम होण्यासारखी. ऐकणाऱ्यांच्या मनात हळहळ निर्माण करणारी माझ्याविषयी कणव निर्माण करणारी. पण मला कुणाकडून दया नको आहे. कुणी माझ्याविषयी हळहळू लागलं तर मला चीड येते. कारण मी जे केलं ते जाणीवपूर्वक केलं. शहाण्यासारखं वागलो. बायकोला सुखी केलं. तिचं सुख पाहिलं, माझं पाहिलं नाही. लोकांनी मला वेडा ठरवलं. लोकच ते ! शहाण्याला वेडा ठरवतात. सरळ रस्त्यानं चालणाऱ्याला खड्ड्यात घालतात. खड्ड्यात पडलेल्याला वर काढतही असतील पण तीही एक सूडबुद्धी असते. खड्ड्यातून वर काढल्यावर त्याची कीव करून, त्याला दया दाखवून ते त्याला अधिक लाजवतात. त्यांना समाधान हवं असतं. काहीतरी चांगली गोष्ट केल्याचं समाधान त्यांना मिळतं. शेवटी लोक स्वार्थच पाहातात. मी ती कहाणी तुला सांगणार आहे. का म्हणून विचारशील. सांगावी वाटते म्हणून सांगतो. तू हळहळू नकोस. माझ्याकडं कनवेनं पाहू नकोस. मला आवडणार नाही. कारण मी जे केलं ते बरोबर केलं. ते केल्याचं मला दुःख होत नाही. पण बायकोवर माझं जे अपार प्रेम होतं त्याला मात्र मी मुकलो नि स्वतः दुःखीच राहिलो. एक अनुभव म्हणून कुणालाही माझ्या या कहाणीचा उपयोग होईल. शिवाय मी जे केलं त्याचा प्रत्येकजण आपापल्या परीनं जो अर्थ लावत असेल ती खरी मजा. कदाचित् तू वृत्तपत्रातली ती बातमी वाचलीही असेल."

"कोणती ?"

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"ती वेळगावच्या मेजरची. बायकोचं लग्न तिच्या प्रियकराशी लावून देणारा तो मेजर."

"वाचल्यासारखी आठवते. दोनतीन वर्षांमागं. पण त्याचा काय संबंध? ती एक वर्तमानपत्रातली बातमी. तीवर कोण विश्वास ठेवील? वर्तमाणपत्रं सत्याचा विपर्यास करतात. वर्तमानपत्रवाले मूळ वातम्यांना तिखटमीठ लावतात. माझा विश्वास नाही."

"आणि समजा तो मेजरच जर आता तुझ्यासमोर वसलेला असेल तर—"

"म्हणजे?" आश्चर्य करत मी लटपटत उठत म्हणालो.

"होय तोच मी! आता खाली बस". तो शांतपणानं म्हणाला आणि त्यानं घुटका घेतला. मी डोळे विस्फारून त्याच्याकडे पाहात राहिलो.

त्याची माझी मैत्री गेल्या आठदहा महिन्यांतली. अगदी घरोबाही नव्हे, जास्ती घसटही नव्हे. बांधकाम खात्यात मी अधिकारी तो कंत्राटदार. त्यामुळं परिचय एकमेकांची दिलजमाई. अधिकारी आणि कंत्राटदार यांच्यात जसे संबंध असतील तसे संबंध मी त्याला एखादं कंत्राट मिळवून देण्याचाही प्रयत्न करत होतो. त्याचा कामाचा झपाटाही तसाच होता. शिवाय काम चोख. चहापाणी, एखादी पार्टी यानिमित्त आम्ही एकत्र बसू बोलू लागलो होतो. आजवर तो त्याच्या कुटुंबसंसाराविषयी चकार शब्दानं बोलला नव्हता. आज त्याला लहर आली होती. लहर म्हणण्यापेक्षा त्याची जीभ पिण्यानं थोडी ढिलावली होती. जरा जास्त झाली की जीभही ढिली होते. हा सर्वांचाच अनुभव असावा. त्याच्या खाजगी जीवनाबद्दल मला फारशी जिज्ञासा नव्हती. त्यामुळं आम्ही जिवाभावाचे म्हणण्यापेक्षा जरा अलिप्त मित्र होतो. तो आजवर आपल्या खाजगी आयुष्याबद्दल कधी बोलला नव्हता. तशी गरजही पडली नाही. मलाही त्यानं कधी तसं विचारलं नाही.

वेळगावी घडलेल्या सगळयांना आश्चर्यात टाकणाऱ्या त्या घटनेचा तो नायक होता. आणि हे सांगूनही माझा विश्वास बसत नव्हता. पण ते खरं होतं. तो सांगू लागला.

"मी लष्करातली नोकरी सोडली आणि इकडं दूर येऊन खाजगी व्यवसाय करू लागलो. माझं मन त्या नोकरीत रमेनासं झालं होतं. शिवाय लष्करातली नोकरी म्हणजे अगदी बांधील. मला थोडं स्वातंत्र्य हवं होतं. शिवाय एकाकी वाटू लागलं. घरचं खायला उठू लागलं. माझं संभोवतालचं मला नकोसं झालं. कुठंतरी परागंदा व्हावंसं वाटू लागलं. शिवाय लोकं बोटं दाखवत होतेच हाच तो मेजर म्हणून. अगदी वोअर झालो. मग ठोकला नोकरीला रामराम."

"तुमचं बायकोवर जिवापाड प्रेम होतं?"

"यार, काय सांगू. नोकरीवर असतो मला दमच निघत नसं. केव्हा घरी जाईन नि तिला पाहीन असं व्हायचं. पण एकूण मी शिपाई गडी. आमचं आयुष्यच रांगडं. कॅम्प पडेल तिथं राहावं लागायचं. आठआठ-पंधरापंधरा दिवस बायकोची नि माझी भेट व्हायची नाही. तीही माझी वाट पाहून पाहून थकायची. सुखात ठेवलं होतं मी तिला. पण अतीव सुखदेखील माणसाला नकोसं होत असावं."

"असं म्हणता येईल का, की तिचं तुमच्यावर प्रेम नव्हतं?"

"तसंही कितपत म्हणता येईल हा प्रश्न आहे. तीन वर्षं आम्ही संसार केला. कारण मी कधी येतो याची ती वाट पाहायची. स्वखुशीनं आपलं शरीर माझ्या स्वाधीन करायची."

"तीन वर्षात तुम्हांला मूलबाळ?"

"तसं म्हणता येणार नाही आणि म्हणता येईलही. तिचं तीन महिन्याचं एक नैसर्गिक ॲबॉर्शन झालं."

"अरेरे".

"मी तुला म्हटलंच की माझ्याविषयी कुणी हळहळ व्यक्त केलेली मला चालत नाही".

"सॉरी. बरं तुम्हा नवराबायकोची भांडणं होत?"

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तसंही नाही. पण कुरबूर मात्र होई. नवराबायकोच्या कुरबुरी कुठल्या घरात नसतात? घरोघर चुली त्याच, पण आम्ही दोघं असे कायमचे विभक्त होऊ, घटस्फोट घेऊ अशी शंका घ्यायला-देखील त्या भांडणात जागा नव्हती. ती प्रेमाचीच भांडणं असायची."

"मग ते घडलं तरी कसं?"

"वर्तमानपत्रात जशी बातमी होती तसं घडलं."

"त्या दोघांचं प्रेम आहे याची कल्पना तुम्हांला तुमच्या कुणा मित्राचं पत्र आल्यावरच आली असं तर नाही?"

"तसं पत्र मला आलं होतं हे खरंच. पण तिचा प्रियकर म्हणजे माझाच मित्र. तो यायचा घरी. नेहमी यायचा. माझ्याशी गप्पा करायचा तसाच तिच्याशीही मनमोकळेपणानं बोलायचा."

"पण तिच्या त्या प्रेमाचा संशय अगोदर कधी आला नाही तुम्हांला?"

"मुळीच नाही. अहो मी लष्करातला गडी. सरळधोट वागणं नि बघणं चार भिंतींच्या आत कोंडून घेऊन तिचा जीव गुदमरत असेल असं मला वाटायचं. थोडं स्वातंत्र्य दिलं तिला. चित्रपट, नाटकं यात मन रमवायचं सांगितलं तिला. नंतर नंतर माझं तीन तीन चार-चार महिने घरी जाणं होत नसे. त्यांच्या प्रेमाची सुरुवात कुठून झाली हे समजू शकलं नाही मला. समजून घेऊन तरी काय करायचं होतं? त्यांची दिलजमाई झालेली आहे. माझ्यावरची तिची आसक्तीच उडाली आहे असं पाहिल्यावर एखाद्याला आपल्या आयुष्याशी जखडण्यात काय अर्थ आहे?" त्याच्या चेहऱ्यावर वेगवेगळे भाव उमटत होते. पेग संपत आला होता. त्याला चढल्यासारखी दिसत नव्हती. पिण्याची सवय असणाऱ्याला चारपाच पेगांनीही चढत नाही. तो तर एके-काळचा लष्करातला गडी. तिथं व्हिस्की-ब्रँडीला काय कमी? तो थोडा अडखळत अस्पष्टपणे बोलत होता हे खरं पण प्रत्येक शब्द ठामपणे शुद्धीवर असल्यासारखाच बोलत होता. माझ्या डोळ्यांसमोरून रंगीत लोलक घरंगळत होते. मला हीच जास्ती होतेय् की काय असं वाटत होतं.

"तुमची बायको तीन वर्षांत शरीरानं तुमच्यापासून अलिप्त होती काय?" तो यावर खदखदून हसला. इतर पार्टिशनआड असलेल्या गिऱ्हाइकांनी डोकी बाहेर काढून आमच्याकडं बघून घेतलं. ती पोरगीही पेगमध्ये दारू ओतताना दचकून बघू लागली. हसणं थांबवून त्यानं एक घुटका घेतला."

"तिचं माझ्यावर प्रेम नव्हतं असं कसं म्हणू मी? आम्हांला एक मूल झालं यावरून काय ते ठरवा. पण एखाद्याच्या मनाचा तळ कुणाला शोधता येईल का?"

"तसं कसं म्हणता येईल? शरीरांनी इतक्या जवळ येणारी माणसं एकमेकांची मनं ओळखू शकणार नाहीत?"

"काही सांगता येत नाही. त्यातल्या त्यात स्त्री हे एक अत्यंत गूढ आहे. ती आपलं मन संपूर्णपणे कधीच खुलं करत नाही."

"हेही मला पटत नाही."

"समजा तुम्ही नि तुमची पत्नी. तुमच्या पत्नीनं तिच्या आयुष्यातील सगळं काही विश्वासानं तुमच्याजवळ सांगितलेलं आहे हे तुम्ही ठासून सांगू शकाल का?"

"अलबत्".

"विवाहपूर्व प्रेमाबद्दलही असेल तर?"

"समजा तसं काही नसलंच तर?"

"आणि मी म्हणतो असलं तर?"

"मनकवडी नसेल तर भडभड सांगेलही."

"दॅटस् राईट. मग तशी माझी बायको मनकवडी असेल. नव्हे होती. कारण विवाहोत्तर प्रेमाविषयी ती माझ्याजवळ बोलली नाही."

"तुमच्या पत्नीचं तुमच्या मित्रावर प्रेम आहे हे ऐकून तुम्हांला धक्का बसला असेल नाही?"

"काय विचारता! मी चक्रावून गेलो. पण मनावर संयम केला. असं का घडावं याचा विचार केला. जे घडलेलं आहे ते पुन्हा दुरुस्त करून पूर्वस्थितीवर आणता येईल का याचा विचार

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केला. अर्थात सारं अशक्य होतं. हाताबाहेरचं होतं."

"का घडलं ते तसं?"

"ती एक स्त्री होती. स्त्रीच्या असमाधानाला तशी काही कारणं लागतातच असं नाही. क्षुल्लक गोष्टीदेखील त्यांना अस्वस्थ करतात. त्या फारशा विचारी नसतात. दूरदृष्टी त्यांना नसते. माझी बायको असमाधानी असावी. शिवाय स्त्रियश्चरितम्. ते मनुष्य जाणूच शकत नाही." थोडावेळ तो गप्प झाला. पिवळ्या प्रकाशात त्याच्या चेहऱ्यावरची खळबळ अधिक उदासवाणी दिसत होती. काळ जणू काही एका ठिकाणी थांबून राहिलाय असा भास होत होता."

"तुमच्या पत्नीनं दुसरा विवाह केला हे तुम्हाला पटलं?"

"न पटून कसं चालेल? ती स्त्री आपल्या घरात स्वतंत्र असूनदेखील जिला मनःस्वास्थ्य नाही, समाधान नाही त्या स्त्रीला बंधनात ठेवून मी काय मिळवणार होतो? काहीच नाही. ती जीवनभर असमाधानी राहिली असती. तिनं मला कसली साथ दिली असती? दोघांची आयुष्यं एखाद्याच्या का होईना मनाविरुद्ध एकत्र जखडून ठेवण्यात मी काय मिळवलं असतं?"

"त्या तुमच्या पत्नीविषयी आज तुमच्या कोणत्या भावना आहेत?"

"तिच्यावर अजूनही माझं तेच नि तितकंच प्रेम आहे. मी ते व्यक्त करू शकत नाही एवढंच. पण ती आहे त्या ठिकाणी सुखात राहो ही माझी मनःपूर्वक इच्छा आहे. त्यांच्या डोळ्यात अश्रू दाटले आहेत असा मला भास झाला. मी गप्प झालो. आपल्या स्वतःच्या पत्नीचं तिच्या प्रियकराशी लग्न लावून देणारा तो एक बहादूर गडी होता. मर्द होता. परपुरुषावर प्रेम असलेल्या स्त्रीला विरोध करून जो पती बंधनात ठेवतो तो मर्द की त्यांच्याबरोबर स्वतःच्या पत्नीचा विवाह लावून देणारा तो मर्द? डोकं चक्रावून खोकं झालं.

घुटका घशात रिचवला. तो संथपणे पीतच होता. एक एक घोट सावकाश. माझ्या डोळ्यात सारं अधांतरी तरंगणारं. शरीरदेखील तरंगणारं. गल्ल्यावरचा मालक उगाच गिऱ्हाइक न्याहाळत असलेला गल्ल्यात हात घालून चिल्लर चाळवत होता. त्यानं शेवटला पेग रिकामा केला.

"चलू या आता!" डळमळत उठत तो म्हणाला. मी त्याच्या मागून. जमीन डोळ्यांजवळ उचलून आल्यासारखी. हवेत तरंगणं. त्यांच्या कहाणीनं डोकं हल्लक. बील अर्थात त्यानंच भरलं.

नटराजमध्ये भरपूर मुर्गी चापत राहिलो. तो गप्प होता. बोलत नव्हता. खान्यावर लांडग्यासारखा तुटून पडला होता. चवीनं खात होता. मनात कोणते विचार चालले होते हे समजणं अशक्य होतं. माझ्या मानगुटीवर त्याची कहाणी बसली होती. जेवण संपत आल्यावर तो म्हणाला,

"यार, जेवण तर असं बनवायची ती! नेहमी आठवण येते."

"तुमच्या मनाला त्रास होतोय. तुम्ही त्या विषयावर आता यापुढं बोलू नये."

"यार हे सारं मनात साठलेलं. कुणाला तरी सांगावं वाटायचं. मन मोकळं करावं वाटायचं. तुम्हाला माझ्याबद्दल काहीतरी वाटतं म्हणून सांगितलं. माझ्या दुःखात मला कुणीतरी भागीदार हवा होता."

"पण आता ते सारे विचार सोडून देणं तुमच्या हिताचं नाही का? मन शांत करा. कुठंतरी बुडवा. वाटल्यास पुन्हा लग्न करा. झाल्यागेल्याचा विचार करण्याऐवजी पुढं काय? याचा विचार करायचा. भविष्याकडं आशेनं पहाण्यात आता खरा स्वार्थ आहे."

"आता कुठली आशा नि शांती? दोघीही गेल्या. आशा–माझ्या पत्नीचं नाव नि शांती माझी आई. दोघीही मला सोडून गेल्या. आता असंच जळत राहायचं आयुष्यभर." त्यानं माझा हात हातात घेऊन प्रेमभरानं दाबला. माझा निरोप घेतला.

लटपटत मी घराकडं वळलो. मेदिनी आता गाढ झोपेत असेल. उठावं लागेल बिचारीला माझ्यासाठी. मी हा असा वेळीअवेळी घरी येणारा, पिणारा. भांडते कधीकधी. आवडत नाही. पण प्रेम आहे माझ्यावर. माझ्या पिण्याचा तिरस्कार करते

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तरीही जीव लावते. हे कुत्रं विव्हळतंय असं वित्तूक ? दार घराचं बंद दार. हाक मारतोय. उत्तर नाही. हालचाल नाही. चाचपून पहातोय् दार. दाराला कुलप. कुठं गेली मेदिनी ? डुप्लिकेटनं दार उघडतोय्. आत शुकशकाट. स्विच् ऑन. लाईट. प्रकाश. घर अस्ताव्यस्त. कपाटाचं दार उघडं. कपडे अस्ताव्यस्त. इकडं तिकडं जडावलेली नजर. टेबलावर स्थिर. काय आहे ? मेदिनीनं लिहिलेली चिठ्ठी. मोठ्या अक्षरात. भराभर वाचतोय्. मेदिनीचं अक्षर. सजीव. मी निर्जीव होत जाणारा.

श्री. आकाश,

मी आपला शेवटला निरोप घेतेय. तुमच्या स्वभावाचा मला किती दिवसांपासून तिटकारा येत होता. तुमचं पिणं सुटलं नाही. सांगूनही सुटलं नाही. लग्नाला पांच वर्षं झाली. मला मूल नाही. तुम्ही पुरुष नाहीत. मी सूरजशी उद्या विवाहबद्ध होतेय. सूरज हा तुमचाही मित्र. आमच्या विवाहात नि सुखाच्या संसारात माती कालवू नये. परिणाम काहीही होणार नाही.

माझा निर्णय ठाम आहे. माझं मनपरिवर्तन करण्याच्या फंदात पडू नका. सूरजशी मी वचन-बद्ध आहे.

घरातल्या माझ्या आवश्यक वस्तू घेऊन चाललेय्. दागदागिने कपाटात उतरवून ठेवलेत.

अखेरचा प्रणाम !

मेदिनी . . . .

अरे देवा ! हा त्या मेजरच्या कहाणी-चाच परिणाम ! डोक्याची गरगर झाली, त्या मेजरची कहाणी ऐकली नसती तर असं झालं नसतं. डोकं भन्नाट, मन भन्नाट. मेदिनीची साडी छातीशी कवटाळून मी भन्नाट रस्त्यारस्त्यातून !

⊕ ⊕ ⊕

विदर्भ साहित्य संघ

तीन भाषणे

गणेश व्याख्यानमाला–१९७७

व्याख्याते—डॉ. र. शं. केळकर

- **१. साहित्य आणि अध्यात्म**
- **२. आशियात रामायण–परंपरा**
- **३. कृष्ण, विष्णु व मराठी आणि हिन्दीचे कृष्ण–काव्य**

卐

कि. रु. ४/–, सभासदांकरिता सध्या रु. ३/–

पुस्तक विक्रेत्यांना भरपूर सवलत दिली जाईल.

चौकशी–वि. सा. संघ प्रकाशन, झाशी राणी चौक, नागपूर–१२.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

स्मृतिदंश / धर्मराज निमसरकर

संध्याकाळचे साडे-सहा वाजले असतील. वातावरणातला उष्मा अजून कायम होता. नागपुरातले मे महिन्याचे दिवस म्हणजे तोबा उकाडा. दिवसभऱ्याच्या कडक उन्हाने आणि त्वचा भाजून टाकणाऱ्या वाऱ्याने जिवाची लाही लाही होऊन जाते. उकाडा सहन न होऊन तो धनवटे रंगमंदिराच्या बाहेर निघाला. बाहेर आल्यानंतर त्याला हायसे वाटले. काही थंड पेय घ्यावं आणि एखादी सिगारेट उडवावी या विचाराने तो पुढे सरकला. नागपुरातल्या वर्डी सारख्या गजबजलेल्या भागातली संध्याकाळ म्हणजे एक अफलातून अपूर्वाई. पाच वर्षांनंतर तो आज या यात्रेत सामील होत होता. फारसा काही बदल झाला नव्हता तरी आताचे वातावरण त्याला अनोळखीच वाटत होते. येथल्या समस्त वास्तूंवर त्याचे अपार प्रेम होते. एक प्रकारचा जिव्हाळा लपलेला होता त्यात. मोरभवन, बसस्टँडवर लोकांची चिक्कार गर्दी. गर्दी नुस्तीच गर्दी. त्या गर्दीला शिस्त नव्हती. आकार नव्हता. उकिरड्यावर पडलेल्या कचऱ्यासारखी माणसं इथे तिथे उभी होती. हे दृश्य पाहून त्याला किळस आली. आता तो शिस्तबद्ध गर्दीचा अभ्यस्त झाला होता. गर्दीलासुद्धा एक स्वयंशासित शिस्त असते हे तो शिकला होता. मुंबईत राहिल्यामुळे काळचक्राच्या कठोर शिक्षकाने हे वळण त्याचे अंगात ओतले होते. एक बस आली आणि त्या बसवर सर्वांनीच एक मोर्चा नेल्यासारखे दृश्य त्याच्या समोर उभे राहिले. त्या बसच्या गेट जवळ मग काय काय घडलं असेल याचं वर्णनच करायला नको. मनातल्या मनात त्याने सर्वांसाठी एक शिवी हासडली "किती असभ्य लोक आहेत" त्या गर्दीवरून त्याने आपली नजर झाशीच्या पुतळ्याकडे वळविण्याच्या ओघात थोड्या वेळासाठी त्याची नजर बसस्टँडच्या एका कोपऱ्यात स्थिरावली...

कदाचित असेल बहाणा माझ्या शोधण्याचा.
ओथंबलेल्या आठवणींचे आषाढ घन घेऊन
असेल कदाचित योग तुझ्या नजरेत नजर गुंतविण्याचा.
मनात नसता तुझे उमलणे या स्मृतिचित्रा पाहून.

तीसुद्धा बसस्टॉपवरून काही तरी शोधत होती. दोघांचीही नजरानजर झाली. तीही अवाक् झाली. तिचे डोळे आक्रंदून बोलले. ओठ ओथंबून थरथरले. पण, सगळं मनातल्या मनात. तिचं एक दोन क्षणांसाठी सारं शरीर निर्जीव झाल्यासारखं झालं. तोही मती गुग झाल्यासारखा तिकडे पाहत राहिला. पण हे असं किती काळ चालणार! दोन क्षणांनंतर ती कमालीची अस्वस्थ झाली. डोळे भरून आले तिचे. डोळे भरून आले म्हणजे पाहणाऱ्याला कळतात ते. जवळच्या पाहणाऱ्याला त्यातले उत्पात कळतात. तिची भयंकर धांदल उडाली. दोघांतलं अंतर आतल्या हाकेच्या अंतराएवढंच परंतु कोणाच्याही-कडून शब्द फुटले नाहीत. तो स्तब्ध डोळ्यांनी बोलत होता. ती स्तब्ध डोळ्यांनी ऐकत होती. मुक्या स्पर्शाने स्पर्शित होती.

नको रे, तुझे आता माझ्यात उतरणे
असे जीवाला कुरतडून टाकणे
मी जळते आहे यज्ञकुंडात येथल्या
प्रारब्ध म्हणून शिकविणाऱ्या परंपरेच्या..

तिला आता कमालीचे अस्वस्थ झाले होते. तिचं इत्यंभूत अस्तित्व आक्रंदून ओरडत होतं. आक्रोशत होतं आणि तो खोल खोल नजरेने हरविल्यासारखा तिचेकडे पाहत होता. थंड पाण्याचे तुषार अंगावर पडावे आणि अंग शहारून जावं असे त्याला त्या आठवणींच्या शिडकाव्यानं झालं होतं. महाराज बागेतल्या गुलमोहराच्या झाडाखाली बसून तो एकदा कविता लिहीत होता.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सकाळची नवाची .वेळ असावी. वातावरण आल्हादकारक होते. हिरव्यागार लॉनवर एवढ्या रम्यवेळी तो एकटाच बसला होता आपल्याच तंद्रीत बेहोश. ती त्याला शोधत शोधत त्याच्या जवळ आली. लॉनवर पुस्तक टाकून त्याच्या समोर बसली.

"काय करतो आहेस ?"

"कविता प्रसूत होत आहे. शू ऽ ऽडिस्टर्ब करू नकोस . . ."

"फार वेदना होत असतील नाही काय ?"

"वेदनेच्याच कविता त्या . . . वेदनाग्रस्त"

"तुझ्या कविता मला फार आवडतात रे. मन हाहाःकार करून उठते". त्याने मनात तेवढंच जोपासून ठेवलं होतं. "तुझ्या कविता मला फार आवडतात रे" त्या गजबजलेल्या रस्त्यावरसुद्धा त्या आठवणीने कमालीचा शहारला. ती काकुळतीला येऊन रिक्षावाल्याला बोलावीत होती. रिक्षा तिच्या जवळ येऊन थांबला. तिने त्याला एकदाचे डोळे भरून पाहिले. खूप खूप साठवून घेतले आत, आणि रिक्षा सुसाट निघाला.

विजेचा धक्का बसावा त्यागत थरारून तो भानावर आला. ती नजरेआड झाली होती. गजबजलेला झांशी चौक तसाच होता. रहदारी तेवढ्याच वेगाने वाहत होती. धनवटे रंगमंदिराची वास्तू तशीच उभी होती. हिन्दी मोरभवन तसेच होते. पण त्याला सगळं काही क्षणात एकदम बदलल्यासारखं वाटू लागलं आणि आपण आतून बाहेरून नुस्ते एकटे आलो असं जाणवू लागलं. विद्यापीठ ग्रंथालयाकडे जाणारा रस्ता त्याला अनोळखी वाटू लागला. तिचा रिक्षा त्याच रस्त्याने निघून गेला होता. पुढे तर विद्यापीठ ग्रंथालयाचा चौक ! त्या चौकावर ते निंबाचं झाड !

"ए. . किती ऊन आहे. आता काय बाहेर जाण्याची वेळ आहे. चल थोडा वेळ बसू या वाचनालयात."

"नाही ग . . . आता नको त्या पुस्तकांच्या गर्दीत. आणि हे ग्रीष्माचं ऊन याला भितेस तू . . हे ग्रीष्माचं ऊन. ग्रीष्माचं ऊन पचवून तर मी लहानाचा मोठा झालो. बघ, माझी कानडी गोरी वाटते ना ! पण किती निबर आहे. या त्वचेच्या आत असंख्य जखमा आहेत या ग्रीष्माने दान दिलेल्या. सोलू मी माझ्या अंगावरची त्वचा ? सगळ्या जखमांचं दर्शन होईल. बरं असू दे माझं. चल थोडा वेळ या निंबाच्या झाडाच्या सावलीत थांबून गप्पा मारू. . .निंबाचं झाडं चवीनं कडू असलं तरी त्याची सावली शीतल आहे."

"झाडच ते ! त्याचे गुणधर्म माणसासारखे नसतात."

"हे बघ मी अर्ध्यातासाशिवाय जास्त वेळ थांबणार नाही".

"कबूल. . . बंदे को सब मंजूर है।"

आणि तो तब्बल दोन तास तिच्याशी त्या सावलीत बोलत राहिला. तिलाही उन्हाळी वाऱ्याची आणि उन्हाची पर्वा नव्हती. डोक्यावरून पदर घेऊन उन्हाळी वाऱ्यापासून तिनं आपला बचाव करुन घेतला पण किती वेळ असे ? ऊन सहन न होऊन जेव्हा तिला गरगरायला आले तरी ती काही बोलली नाही आणि थोड्याच वेळात ती खाली कोसळली. त्याने तिला आधार दिला. जवळच्या चहावाल्याच्या दुकानातून पाणी आणून तिच्या तोंडावर थंड पाण्याचा शिडकाव केल्यावर जेव्हा ती भानावर आली तेव्हा तो बोलला.

"तुला काही झालं असतं तर. . ."

"मला तुझे शब्द नी शब्द एकूण घ्यायचे होते रे. . .मध्येच मी माझी अडचण सांगितली असती तर. . .तुझे लाख मोलाचे शब्द ऐकायला मिळाले नसते. तुझ्या शब्दांत जादू आहे रे. . . तू कुठलारे जादुगार !"

"मी वस्तीबाहेरचा जादुगार. वस्तीत नसतोच मुळी म्हणून माझी ओळख कोणाला नाही".

"असं काय बोलतोस . . . !"

"खरं तेच सांगतो".

"उद्या तू वस्तीतला होशील. नाव मिळवशील आणि मला . . ."

"तुला जसं वाटते तसं माझ्याकडून होणे नाही. उलट मलाच दाट शंका येतात. मी माझा आहे पण माझंपण तुला कळेल तेव्हा . . ."

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"हे बघ असा गूढ बोलू नकोस आपल्या कवितेसारखा".

"माझं असं काही गूढ नाही ग. एक गोष्ट मात्र खरी, मी जे काही मिळविलं ते मला प्रिय आहे. ते माझ्या हातून जाऊ नये म्हणून मी मला जपत असतो. या बाबतीत मी माझी प्रतारणा करतो आहे. प्रत्येक माणूस स्वतःच्या स्वत्वाला जपत असतो, मग मी का म्हणून जपू नये ?"

दुपार टळून गेली होती. उन्हाची अख्खी वेळ त्यांनी निंबाच्या झाडाखाली काढली होती. तिचा अनोखा संयम पाहून त्याला मनातून भरून आले होते. धारदार टपोऱ्या डोळ्यांची, नितळ शामल कांतीची ही छोकरी त्याने पहिल्यांदा फणसाळकर सरांच्या गणिताच्या तासामध्ये पाहिली होती. प्रथम सत्र सुरू होऊन एक महिना उलटून गेला होता तेव्हा ती वर्गात आली होती. फार मौन, वर्गात सहसा कोणाशी बोलत नसे. फक्त तिचे डोळे बोलायचे. ओठ थरथरायचे. तिच्या डोळ्यांतलं खोलपण आणि ओठांवर थरथरणारं वादळ तोच फक्त ओळखू शकला. आणि तो तिच्याकडे पाहत राहिला. कितीतरी वेळ. फणसाळकर सरांनी दोनदा ताकीद देऊन-सुद्धा तो मागे वळून पाहत होता तेव्हा त्यांनी-सुद्धा त्याचा नाद सोडून दिला. वर्ग सुटला तेव्हा तिच्या ओठांच्या कोपऱ्यांत कंप पावल्यासारखे झाले. तिचे डोळे हसले. एक अफलातून स्मित, कधी न पाहिलेलं. आणि तो तिच्यावर कोसळून पडला.

तो तिच्याकडे पाहायचा, ती त्याच्याकडे पाहायची. ती डोळ्यांतून हसायची. तो त्वचेवर स्मित लेवून घ्यायचा. असंच चाललं बरेच दिवस. वर्ष संपलं आणि नूतन वर्षाने पदार्पण केलं. पण एवढ्या दिवसांत दोघंही एक चकार शब्द बोलले नाहीत. सगळी भाषा डोळ्यांची.

डोळ्यांनी बोलायची...

डोळ्यांनी ऐकायची...

कृषी महाविद्यालयाच्या बसस्टॉपवर ती उभी होती. नूतन वर्षाचा प्रथम दिवस. मागचे दोन दिवस घालवून त्याने एक भेटकार्ड तिच्यासाठी तयार केले होते. स्वतःच्या हाताने रंगविलेले. एक सुरेख गुलाबाचं फूल त्यावर त्याने चितारले होते. तास संपले होते. दुपारची वेळ. बसस्टॉपवर शुकशुकाट. मनाला काबूत घेऊन तो तिच्याजवळ गेला. पुस्तकातून भेटकार्ड काढून त्याने तिच्यासमोर केले.

"नूतन वर्षाचे हार्दिक अभिनंदन".

तिने लगेच कार्ड हातात घेतले. त्याचं एक दीर्घ चुंबन घेतल. आणि आपल्या समुद्रा-सारख्या खोल डोळ्यांतनं त्याच्याकडे पाहत ती बोलली.

"दुभंगण्याच्या परिसीमेवरसुद्धा मी जपून ठेवीन".

एव्हाना बस आली होती. लगेच ती बसमध्ये चढली. बस चालू लागली. बसमधून हलणारा तिचा हात फक्त दिसत होता.

आणि याच दिवसापासून सुरू झाली एका यात्रेची सुरुवात. यात्रात अनेक प्रकारच्या विविध-तेचा संगम असतो, विरोधाभास असतो. वैचित्र्य असते.

नको विचारा कोणी मला मी जगलो कसा या जगी
उभा राहिलो सारून सारा वगळोत्र माझ्यावर लादला
वर्ज्य माझे जगणे सांगती त्वचेखालच्या ओल्या जखमा
नाकारता वाटा येथल्या अश्मप्रहार होई सारखा
वेटावेटात वाटलेल्या प्रदेशात मी भारी उदास
महावृक्षांच्या भव्य सावल्या देत नाहीत थोडा दिलासा
तहानलेला कंठ मागतो मायेचे थेंब पाणी
समुद्र घेऊन निघाले रित्या घागरींचे धनी
आक्रोश भिनला सर्व अंगी
आक्रोश थैमान घालतो
सुरुंग पेरण्या हात माझे सरसावतात जागोजागी
नको विचारा कोणी मला मी जगलो कसा या जगी

मराठी वाङमय मंडळाच्या कविसंमेलनात तो कविता म्हणतो आणि टाळ्यांचा कडकडाट गळ्यात घालून घेतो. ती समोरच्या बाकावर बसून त्याचा शब्दनी शब्द स्वतात पेरून घेत असते. तिचे डोळे कमालीचे काकुळतीला आलेले असतात. ती डोळ्यांच्या आरतीनेच त्याला मनोमन ओवाळते. बाहेर निघाल्यावरती त्याला हळूच म्हणते,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"शब्दांनी जिंकणारा जुवारी. या जगाचा बदला घेऊ इच्छितो काय ?"

"या व्यवस्थेचाच बदला घ्यावासा वाटतो. माझे श्वास गुदमरतात येथे. फार कोंडी होते माझ्या मनाची. हे जग, ही व्यवस्था, हा समाज, माझं जगणं, असह्य करते. पण त्याच्यामुळेच तर मी जगतो आहे. या विसंगतीत आयुष्य जगणं म्हणजे तारेवरची जीवघेणी कसरत. आणि ही कसरत करताना जर माझ्या हृदयातून अशा शब्द-ठिणग्या बाहेर पडत असतील तर काय हरकत आहे !

"अभिनंदन कविराज".

"कविराज ?"

"होय-कविराज... जो सिंहासनावर बसतो तो राजाच, येथल्या सिंहासनावर बसला तोही राजाच."

"हे बघ, हे सारं काही एवढं सोपं नाही. या जगाची, या समाजाची तुला कल्पना नाही. कोणाला जगू द्यायचं, कोणाला मरू द्यायचं हे आपण ठरवायचं नसते. ते ठरविणारा हा समाज आहे, हे जग आहे. आपल्या हातात काही नाही. आणि हे सारं तुला मान्य नसेल तर आक्रोश करून सांगण्याचं सामर्थ्य अंगात पाहिजे आहे. ते सामर्थ्य असेल तर पुढे काय ते बोला. मनात काय आहे ते ठरवा."

"ठरविण्याचा अधिकार येथे कोणाला आहे ? ते आपोआपच ठरत असते. ठरल्या-प्रमाणे होत असते."

"हे साफ झूट आहे. हे सारं तत्त्वज्ञान फसवं तत्त्वज्ञान आहे. जो या कल्पनेत फसतो तो संपूर्ण फसतो. हे जग तू बघते आहेस ना अशाच कैकात फसलेले आहे. हे सारं घडते ते कोणीतरी ठरवून दिलेलं आहे म्हणून घडतं असं त्यांचं म्हणणं. पण ते मला पटत नाहीये. याच्या मागची कारण-मीमांसा फार वेगळी आहे. आपण विज्ञानाचे विद्यार्थी अशा दृष्टीने विचार करायला नको. आपल्या विचारांना काही शास्त्रीय बैठक हवी. येथे विनाकारण किंवा आपोआप काहीच घडत नाही. येथे विधिलिखितमुद्रा काही नाही. येथे घडणारी प्रत्येक गोष्ट कोणत्या ना कोणत्या हेतूने घडत असते. घटना घडण्याच्या पाठीमागे काही कारणं असतात. मी तुझ्या डोळ्यात काही तरी अपूर्व पाहिलं. तुझ्या ओठाच्या कोपऱ्यात उमलणारं हसू अलौकिक आहे. तुझे डोळेच तुझ्यापेक्षा जास्त बोलतात".

"मी त्यांच्याशी संवाद करू शकलो. म्हणून आपण दोघे जवळ आलो. ही आतुरता कदाचित अशीच अपरंपार टिकून राहील."

कॉलेजचं दुसरं सत्र संपत आलेलं असते. परीक्षा काही दिवसच पुढे असते. दोघेही अभ्या-सात गर्क असतात. विज्ञान संस्थेच्या परिसरात आता तुरळक विद्यार्थी दिसत असतात. प्रिपरेशन लिव्ह लागलेली असते. तो अकौंटंटकडून स्कॉलरशीपचे पैसे घेऊन ऑफिसबाहेर पडत असतो एवढ्यात ती त्याला वऱ्हांड्यात दिसते. आधी तिचे डोळे हसतात मग ती हसते मोकळेपणाने. तो भेटलेल्याचा तिला अपार आनंद झालेला असतो.

"अभ्यास कसा आहे ?"

"मी कसा दिसतो..."

"फार अभ्यास करतो आहेस असं दिसते तुझ्या तब्येतीवरून."

"अभ्यास करून पास व्हायलाच हवं नाहीतर येथून परत या कॉलेजची पायरी चढायला मिळणार नाही. कायमचा निरोप घ्यावा लागेल."

"असं काय म्हणतोस, तुझ्यासारख्या विद्यार्थ्याने खूप शिकायला पाहिजे."

"ते कोणीही म्हणेल. पण शक्य व्हायला पाहिजे."

"का शक्य होणार नाही ?"

"हे बघ काय विचार आहे तुझा. मी माझ्याच जखमांच्या खपल्या काढाव्या असं तुला वाटते काय ?"

"नको नको असं काही बोलू नकोस. आपण दुसऱ्या कुठल्याही विषयावर बोलू."

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"तर मग चल, आज मी तुला चहा देणार आहे! आज माझ्जवळ पैसे आहेत. आज स्कॉलरशीपचे पैसे मिळाले. आज पैसे खिशात आहेत. उद्या कदाचित राहणार नाहीत. आणि मी तुला चहा देऊ शकणार नाही."

"कसली स्कॉलरशीप. तू स्कॉलरशीप-होल्डर आहेस, आधीच का सांगितलं नाहीस... अभिनंदन."

"अभिनंदन वगैरे नंतर. आधी चहा घेऊ. आणि मग बोलत बसू. आवडेल ना तुला?"

"न आवडायला काय झालं?"

विद्यापीठ कॅन्टीनमध्ये चहा घेऊन झाल्यावर दोघेही महाराज बागेमधल्या एका झाडाच्या सावलीत जाऊन बसतात.

तो तिच्या डोहासारख्या खोल वाटणाऱ्या डोळ्यात उतरत असतो. ती लज्जेने चिंब चिंब झालेली असते. अखंड मौनाच्या गर्भात दोघांचे मनोगत हुंकारत असते. तो मौनभंग करतो.

"या कॉलेजमधलं कदाचित माझं हे शेवटचं वर्ष. पास तर नक्कीच होईन. पण पुढे शिकण्याचा कधी योग येणार नाही. कारण शिकण्यासारखी ऐपत नाही. माझे वडिल यापुढे शिकवू शकत नाहीत. या स्कॉलरशीपचं थोडे फार पैसे मिळतात तेवढ्यात येथपर्यंतच शिक्षण झालं. पुढचं पोस्ट ग्रॅज्युएशन शक्य होणार नाही. स्कॉलरशिपचे सध्या माझ्या जवळ दोनशे रुपये आहेत ते वहिणीच्या लग्नाला खर्च करावे लागणार आहेत. माझ्या शिक्षणापेक्षा वहिणीचं लग्न महत्त्वाचं आहे. तिच्या आयुष्याचा प्रश्न आहे. बहिणीचं लग्न झालं म्हणजे माझे वडिलही कफल्लक आणि मीही कफल्लक. पुढच्या वर्षी एडमिनशनसाठी पैसा नाही. माझी धडपड बंद".

"मी काही मदत करू शकेन."

"तू मला जवळ केलंस हीच तुझी एक मोठी मदत आता तुझ्याकडून कोणतीच अपेक्षा नाही."

तिच्या मनात काही तरी खळबळ उठलेली असते. या खळबळीला उत्सुकता म्हणावी की शंका म्हणावी याचा अंदाज घेता येऊ शकत नव्हता. आपण एक गोष्ट विचारली नाही हे मात्र राहून राहून तिच्या मनात येत होते.

"बरं ही तुला मिळणारी स्कॉलरशीप कोणती?"

"अरे हो. सांगायचं विसरूनच गेलो. मुद्दाम म्हणून विसरलो नाही अनवधानात विसरून गेलो. मला मिळणारी स्कॉलरशीप ही भारत सरकारची स्कॉलरशीप आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती, जेमतेम पुरणारी. तरीपण त्यावरसुद्धा अनेक लोक अनेक प्रकारचं बोलतात.

"तू मागासवर्गीय आहेस?"

"होय, मी मागासवर्गीय आहे."

ती क्षणभर स्तब्ध राहते. तिच्या डोळ्यात प्रचंड उलथापालथ होते. तिच्या ओठांचे कोपरे थरथरतात. आता निर्विकारपणे ती त्याच्याकडे पाहत असते. कोणत्याच प्रकारचे भाव तिच्या चर्येवर उमटत नाहीत. मनात काही तरी प्रचंड घडत असते. पण डोळ्यात काहीच नाही. तिचं संपूर्ण अस्तित्व थरथरत असते पण शब्द मुके असतात. ओठ थरथरत असतात. पण आतले उत्पात ओठांवर येत नाहीत. तो तिच्याकडे आश्चर्याने पहात असतो. आता ती काहीतरी त्वेषाने बोलणार. आपल्यावर गलिच्छ आरोप करणार... वगैरे वगैरे. दोन क्षण भयाण शांततेत जातात. तीसुद्धा स्वतःला सावरून घेते आणि काठोकाठ भरून आल्यासारखी ती कोसळते.

"तू मला हवा आहेस असाच हवा आहेस. मला तुझं ऐहिक काही नको. मला तू फक्त हवा आहेस. तुझी जात, तुझा धर्म, तुझी गरिबी, श्रीमंती मला काही नको. मला फक्त तू हवा आहेस. तुझे शब्द हवे आहेत. .तू हे सांगण्या-पूर्वीचा तू मला हवा आहेस. कशाला सांगितलंस मला तू मागासवर्गीय आहेस म्हणून? काय बिघडलं असतं नसतं सांगितलं तर? मी ज्या समाजात वाढली आहे, ज्या संस्कृतीत मी जगते आहे, तिने मला आपल्या पाशात गुंतवून ठेवले आहे. माझ्यावरील पारंपारिक संस्काराने

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माझे स्वत्व नष्ट केले आहे. मी आता निःसत्व आहे. किती युगं असे मी राहणार आहे माहीत नाही. म्हणून माझ्याने हे सत्य पेलवत नाही रे. माझी परंपरा, माझा रूढिवाद ह्यांनी मला पुरेपूर ग्रासले आहे. माझ्यावर या सगळ्या महाराक्षसांनी बलात्कार करून मला अपवित्र केले आहे. तू धारण करणारे विचार यावेळी तरी मी पेलू शकत नाही. अजूनही या विषारी घाणीत मी मला जगवून घेण्यात धन्यता मानीत आहे. मी स्वतःला बदलवू शकत नाही रे! हे उभे असणारे परंपरेचे पहारे मला बदलू देत नाही रे.. हे सत्य माझ्यापासून लपविलं असतं तर किती छान झालं असतं. मी येथल्या यंत्रणेशी युद्ध करू शकत नाही. मी विद्रोह करू शकत नाही. तेवढे सामर्थ्य माझ्यात नाही रे.

या रूढीपरंपरेचा अर्क माझ्या रक्तात एवढा भिनला आहे, की त्याची नुस्ती झिंग मला लागून आहे. ती झिंग उतरेल अशी व्यवस्था येथे नाही, ती झिंग आणखी चढेल असेच येथले वारे वाहतात. आणि त्यात सापडून मी भरकटते आहे. तुला मला जात नसती तर किती छान झाले असते रे! हे अविवेकी बंधन राहिले नसते जिवाची ही तगमग झाली नसती".

"म्हणजे तू असल्या मूर्ख विचारांपासून मुक्त नाही म्हणायची! किती भयंकर आत्मवंचना! या ढोंगी विचारांपासून. अरेरे..."

"ते कसं शक्य आहे! परिवर्तनाची सुरुवात घरातून व्हायला हवी पण त्याचीच तर खरी कमतरता आहे. आमच्या समाजामधल्या थोरामोठ्यांच्या तोंडात वाटेल त्या पुरोगामी विचारांचे ढीगच्या ढीग असतील. पण ते नुस्ते इतर लोकांना सांगण्यासाठी आणि दाखविण्यासाठी पण घरात मात्र त्याचे थोडेसुद्धा अनुकरण नाही, अशी परिस्थिती आहे."

"असेल! आपण आपल्यापासून सुरू करू या! एक नवा पायंडा टाकू या..." ती भांबावल्यागत्त्वी त्याच्याकडे नुस्ती पाहात राहिली. तो आतुर होऊन तिच्या डोळ्यात पाहत राहिला. कारण तिचे डोळेच बोलायचे. त्यात स्वत्व असायचं पण तिचे डोळेच निर्विकार होते. त्यांच्यात एक प्रदीर्घ मौन पसरलं होतं. अशा प्रदीर्घ मौनात त्यांचा कितीतरी वेळ निघून गेला. कोणीच काही बोललं नाही. त्याला अपेक्षा होती ती काहीतरी बोलेल म्हणून पण...

आभाळात काळेशार ढग जमा होत असलेल्याचे त्याने पाहिले आणि तो उठला. काही न बोलता तो चालत राहिला. थोड्या दूर जाऊन तो थांबला. त्याला वाटलं ती उठेल आणि धावत येईल, पण.

त्याने मागे फिरून तिच्याकडे पाहिले, ती तशीच ओथंबलेल्या डोळ्यांनी पाहत होती—निर्विकार—

तिथेही त्याने तिची वाट पाहिली.

आठवणींच्या गदारोळात तो स्वतःला विसरून गेला होता. विद्यापीठ ग्रंथालयाकडे गेलेल्या रस्त्याकडे तो कितीतरी वेळ पाहत थांबला होता. मागून येणाऱ्या आटोरिक्षा चालकाने त्याची अवस्था पाहून त्याला हटकले.

"क्यूं बाबू मरना चाहते हो क्या?"

तो भानावर आला. आपण रस्त्यावर भर रहदारीच्या उभे आहोत याची त्याला जाणीव झाली. आणि तो रिक्षावाल्यास बोलला.

"नही भाई, मरी हुआी यादें जिन्दा होकर मुझे मारना चाहती है। उसीसे नीपटा रहा हूँ।"

रिक्षावाला गालातल्या गालात हसत पुढे निघून गेला. आणि अख्खा झाशी चौक गदगदून हसतो आहे असे त्याला वाटू लागलं.

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अमृतानुभव : एक रसास्वाद / डॉ. अुषा मा. देशमुख

ज्ञानेश्वरांच्या साहित्यनिर्मितीमध्ये प्रत्येकच कलाकृतीचे एक निश्चित स्वतंत्रपण आहे. ज्ञानेश्वरीपेक्षा अमृतानुभ वेगळा आहे. हरिपाठा-पेक्षा चांगदेवपासष्टी आणि अभंगगाथाही स्वतंत्र आहे परंतु असे असूनही या साहित्यकृतींचे परस्परांशी एक सूक्ष्म नाते आहे. एका गर्भलयीचे अन्तःसूत्र ज्ञानेश्वरांच्या सर्व साहित्यकृतींमध्ये समान असलेले जाणवते. कारण एकाच कवि-मनाच्या मुशीतून ही निर्मिती झालेली आहे. ज्ञानेश्वरांच्या सर्व साहित्यनिर्मितीत दृष्टान्तांचे, उपमांचे, प्रतीकांचे, प्रतिमांचेही साधर्म्य असणे स्वाभाविक ठरते. अनुभवाची अभिव्यक्ती आशयाद्वारा घडवीत असता एका विशिष्ट पद्धतीनेच ज्ञानेश्वर प्रतिमांची व्यामिश्र वलये निर्माण करतात. त्यातून ज्ञानेश्वरांची डोळस प्रज्ञा आणि कल्पक प्रतिभा जाणवते. दृष्टान्त, रूपक आणि उपमांच्या समूहांतून ते जीवनकक्षा धुंडाळीत असतात. जीवनव्यवहाराचे मार्मिक, सूक्ष्म व रसिकतेने केलेले अवलोकन ज्ञानेश्वरांच्या साहित्यनिर्मितीतून प्रतीत होत असते. निसर्ग-वेड्या मनाची भावांदोलने, कंपने आणि संवेदनांची थरथर व्यक्त होत असते. विश्वव्यवहार आणि ईश्वर यांचे अनंतपद्धतीने नाते शोधण्याचा तो प्रयत्न असतो आणि या प्रयत्नात विश्वाच्या उग्रसुंदर आणि गंभीर पसाऱ्याचा अन्वयार्थ चैतन्यतत्त्वाशी लावण्याचा प्रयत्न ज्ञानेश्वर करीत असतात. मग ज्ञानेश्वरीत उपदेशप्राधान्य येते चांगदेवपासष्टीत उपदेशसंवाद येतो. हरिपाठाच्या आणि अभंगगाथेच्या अभंगात अध्यात्मानुभवच उत्कट भावानुभवाचा विषय होतो. अमृतानुभवाची निर्मिती ज्ञाने-श्वरांच्या इतर साहित्यनिर्मितीप्रमाणेच झाली असूनही तीत आलेली सूक्ष्मता, तात्त्विकतेची गहनता आणि चिंतनाचा गारवा काही अपूर्व आणि वेगळाच झाला आहे.

ज्ञानेश्वरांनी 'अमृतानुभवा'त एक स्वतंत्र 'ज्ञानानुभवोपनिषद्' अुभे केले आहे. त्यांची ही स्वतंत्र तत्त्वक्रीडा आहे. आत्मानुभवाला साक्षी ठेवून गोचर झालेला 'प्रमाण ग्रंथ' म्हणजे अमतानुभव.

अमृतानुभवाची निर्मिती स्वान्तःसुखाय झाली असे वरवर दिसत असते. परंतु ज्ञानेश्वर हे कविमन केवळ स्वान्ताशी कधी बांधलेच गेले नसल्यामुळे सतत लोकान्ताचाच विचार स्वान्त-विचारात अनस्यूत होत राहतो. अमृतानुभवाचे स्वान्तत्व हे त्याने मांडलेल्या तत्त्वविचारात आहे. प्राचीन काळापासून भारतीय तत्त्वविचार हा प्रस्थानत्रयींवर आधारित व्यक्त झाला. उपनिषदे, ब्रह्मसूत्र आणि गीता या त्रयींतील तत्त्वज्ञानाचे आचारधर्माचे आणि उपदेशाचे मूलानुसरण आणि अवलंबन भारतीय तत्त्व-वेत्त्यांनी केलेले होते. ज्ञानेश्वरांनी अमृतानुभवात कोणत्याही एकमेव तत्त्वग्रंथाला न स्वीकारता मनःपूत आणि स्वबुद्धिप्रामाण्याने एका नव्या पण जीवनस्पर्शी नवविचाराची भर भारतीय तत्त्व-विचारात घातली. पैकी भगवद्गीता ही ज्ञाने-श्वरीत अनुभवविषय झालेली होतीच. ब्रह्म-सूत्रातील सूत्रमयता व उपनिषदातील निखळ स्वतंत्र विचारप्रामाण्यासारखे अनुभवप्रामाण्याने मुसमुसलेले एक स्वतंत्र उपनिषद अमृतानुभवात आकारास आले. प्रचंड जलाशयात एखाद्या पट्टीच्या पोहणाऱ्याने जलक्रीडा करावी व संथपणे जलाशयाच्या मध्यात येऊन तळाशी सूर मारावा तसे ज्ञानेश्वर अमृतानुभवात तत्त्वक्रीडा करीत आहेत. व ही तत्त्वक्रीडा अरूपाला रूपवंत साजिरंत करीत असता निवेदनापेक्षा संवादात्मकता

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शाश्वत असते. ज्ञानेश्वरांच्या सर्वच साहित्य-निर्मितीला संवादाचे एक देखणे भावलेणे लाभलेले आहे. पण अमृतानुभवातील संवाद हा श्रोतावक्ता किंवा ईश्वरभक्त यांचा संवाद नसतो तर तो ज्ञानेश्वर या कविमनाचा मनःसंवाद असतो. ती 'एकोक्ती' असते. हृदय आणि आत्मा यांचा तो संवाद असतो. याअर्थी अमृतानुभवाच्या निर्मितीत स्वान्तसुखायत्व येत असले तरी अंतिमतः गुरूने म्हणजे निवृत्तिनाथांनी शिष्याला म्हणजे ज्ञानेश्वरांना दिलेले ते 'खाजे' असते. 'खाऊ असतो' व तो 'प्रसादरूप खाऊ' ज्ञानेश्वर सर्वांना वाटण्यास निघाले असतात. म्हणजे लोकानुवर्ती अशी अनुभवामृताची निर्मिती झालेली नसूनही ज्ञानेश्वर त्यांच्या प्रकृतिधर्मानुसार समष्टीमध्ये येऊन पोहोचतात. ज्ञानेश्वर आत्मसाक्षात्कारी, आत्मानुभवी संत होते. हा आत्मानुभव आत्मरत पद्धतीने दंग होऊन समानधर्मा लोकांसाठी उपलब्ध करून त्यांनी ठेवला. अमृतानुभव स्वतंत्रही आहे आणि भक्तांमुळे त्याला परतंत्रताही आलेली आहे.

अनुभवाचे अमृत ज्ञानेश्वरांनी अमृतानुभवात कथित केले आहे. संपूर्ण जीवन जाणिवांची घुसळण होऊन जणू आलेला तात्पर्यबोध म्हणजे अमृतानुभव ! 'अमृत' हा कविसंकेत ज्ञानेश्वरांना अतिशय जिव्हाळ्याचा आहे. माधुर्य, अमरत्व, देवदानवांशी असलेले नाते, माणसाला असलेली दुष्प्राप्यता व मानवी जीवनाची अंतिमता या संदर्भात 'अमृत' हे मार्मिक प्रतीक अनुभवाच्या अस्सलतेसाठी ज्ञानेश्वरांनी उपयोजिले असावे. अमृतसिद्धीसाठी अपेक्षित असलेली मानवी चांगुलपणाची सद्‌गृहस्थपणाची व पुण्यवंताची अपेक्षाही येथे गृहीत आहे. ज्ञानेश्वरांनी आपल्या स्वानुभवालाच अमृताची प्रत दिलेली आहे. या पदामागील ज्ञानेश्वरांचा स्वकर्तृत्वाविषयीचा उचित असा अभिमानही स्पष्ट होतो. अमृतानुभवाला ज्ञानेश्वर 'सिद्धानुवाद' म्हणतात. सिद्धपुरुषाने केलेला जीवनानुवाद असेच अमृतानुभवाचे स्वरूप आहे. खुद्द ज्ञानेश्वर अमृतानुभव म्हणत नसून 'अनुभवामृत' असे या निर्मितीला म्हणतात. अनुभवाचे अमृत अमृताचे अनुभव बनले आणि गेली सातशे वर्षे होऊनही ते तितकेच प्राणसंजीवक ठरले आहे.

ज्ञानेश्वरीत परमामृतम् २ ६७ व विवेकसिंधू–६ ११ अशी मुकुंदराजाच्या काव्यनिर्मितीची ओळख ज्ञानेश्वरांनी दाखविली आहे. परंतु त्यावरून ज्ञानेश्वरांनी 'अनुभवामृत' असे ग्रंथनाम घेतले असावे असे वाटत नाही तर योगवाशिष्ठाचाच हा प्रसाद असावा असे मान्य होण्यास हरकत नसावी. तसेच ज्ञानेश्वरीची रचना आधीची की अमृतानुभवाची रचना आधीची हाही वादविषय ज्ञानेश्वरांच्या आल्पायुष्याच्या संदर्भात नगण्य म्हणून समजता येऊ शकेल. सांप्रदायिक आख्यायिका लक्षात घेता व नामदेव जनाबाई आणि महीपती यांची साक्ष काढता ज्ञानेश्वरीनंतर अमृतानुभव रचला गेला असे मानले जाते. त्यातही प्रो. वा. ब. पटवर्धन किंवा पांडुरंग शास्त्री शर्मा सुचवितात त्याप्रमाणे वदल करण्याची आवश्यकता नाही कारण केवळ वयाच्या ऐन तारुण्यात व उण्यापुऱ्या चार पाच वर्षात ज्ञानेश्वरांसारख्या एका प्रकाण्ड प्रतिभेच्या कवीने केलेली ही वाङ्‌मयनिर्मिती असल्यामुळे कविमनाची स्पंदने आणि श्वासोश्वासाचे प्रबंधपण ज्ञानेश्वरांच्या निर्मितीतून जाणवत असते. केवळ अमृतानुभवात नमनाचे पाच श्लोक आले म्हणून ते एकीकडे पारंपारिक प्रकरण आहे असे सिद्ध करावयाचे व दुसरीकडे ज्ञानेश्वरीपूर्वपण त्याला द्यावयाचे अशी तादृश आवश्यकता नाही.

अमृतानुभवावर अनेक टीका त्या त्या काळात लिहिल्या गेल्या तरी शिवकल्याणाच्या शके १५५७ मधील टीकेचा बराच बोलबाला झाला. 'यावरी भाषा ओवीबद्ध। अष्टदश मूलग्रंथ तो दहा प्रकर्णी विविध। विवरिला ग्रंथ्।।' असे शिवकल्याण म्हणतो. यावरून मूळ अखंड व एकसंध असलेले अमृतानुभवाचे प्रकरणशः बांधणीरूप साक्षात झाले. आज उपलब्ध झालेल्या प्रकरण ग्रंथामुळे मूळ आशयाला काही मर्यादा पडते असे नाही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केवळ परमात्म वस्तूचा ज्ञानी मुक्त चिंतकाला आलेला आत्मानुभव अद्वैतानुसारी पद्धतीने ज्ञानेश्वर 'अमृतानुभवा'त मांडतात. स्वतःचे अनुभूतिप्रामाण्य व ब्रह्मचैतन्याच्या संदर्भातील प्रतीती द्वैतातील अद्वैत आणि अद्वैतातील द्वैताच्या साह्याने ज्ञानेश्वर अतिशय अलवारपणे स्वीकारू बघतात. 'दशदिशा आत्माराम' किंवा 'भरला घनदाट हरिदिरो' ही अनुभूती अनंत परिमाणांच्या साह्याने मनःपूत रीतीने ज्ञानेश्वर पारखून घेतात. एकीकडे Nature of the Ultimate Experience च्या संदर्भात Nature of the Ultimate Reality चा शोध घेतात. तर दुसरीकडे द्वैताच्या अन्वयातून आणि अद्वैताच्या व्यतिरेकातून The Supreme Identity चा संदर्भ लावू बघतात.

निर्विशेष असे परमात्म्याचे स्वरूप ज्ञानाज्ञानातीत आणि शब्दांच्याही पलीकडचे आहे आणि ते फक्त स्वानुभवांचाच विषय होते. परिणतप्रज्ञ अशा सिद्धाचा स्वानुभवांकित अशा आपल्या आन्तर मनाशी चाललेला सुखसंवाद जाणिवेनेणिवेच्या पलीकडचा आणि विश्वचैतन्याच्या गूढ अस्तित्वाचा संदर्भशोध घेणारा असा अमृतानुभवात साक्षात होतो. अमृतानुभवाच्या आशयाचा मूलकंद द्वंद्वातीत आत्मस्वरूपावर गुरुब्रह्माच्या साह्याने केंद्रिभूत झाला आहे. ज्ञानेश्वरांनी स्वानुभवच ब्रह्मरूपात आणि ब्रह्मालाच स्वानुभवात सामावून घेतले आहे. जीव आणि जगत् दोन्ही ब्रह्मरूप असल्यामुळे ब्रह्माच्या ठिकाणी कोणताही प्रतिकर्मव्यवस्था नाही.

'अमृतालाही उठी लाळ। अमृते येणे ।।'
१० २० अशी अमृतानुभवाची अवस्था आहे.

ज्ञानेश्वरीचा अठरावा अध्याय ज्याप्रमाणे एकाध्यायी गीता आहे त्याप्रमाणे अमृतानुभवाच्या प्रारंभी आलेले जे श्लोक आहेत ते संपूर्ण अमृतानुभवाचे सारसर्वस्व अभिव्यक्त करतात. एका अर्थाने अनुभवामृताची ती मंत्राक्षरे होत. महायोगी निवृत्तिनाथ हे माझे दैवत असून मी त्यांचे आश्रयाला जातो. हे दैवत कसे तर अक्षर, अनाख्येय, आनंदरूप, अज आणि केवळ ! माझे गुरू म्हणजे साक्षात शांकरीविद्याच आहे. या श्लोकात निवृत्तिनाथ हे केवळ गुरू म्हणून नाथपंथीयांप्रमाणे केलेले नमन नाही. तर गुरू म्हणजे साक्षात शांकरीविद्याच ज्ञानेश्वर मानतात. गुरू हाच परमात्मा ज्ञानेश्वर मानतात. ज्ञानेश्वरांच्या सर्वच वाङमयनिर्मितीचे सूत्ररूप मुळात गुरुनिष्ठा हेच आहे. येथे शांकरी विद्याच गुरुरूप घेऊन अवतरली आहे. तिसऱ्या श्लोकात शिवशक्तीच्या द्वैताचा आभास निर्माण करून पाचव्या श्लोकात निरूपाधिक शंभूला म्हणजे ब्रह्म्याला नमन केले आहे. पहिल्या श्लोकातील निवृत्तिनाथांचे जे अनाख्येय, आनंदमय, अज, अक्षर आणि केवलरूप आहे तेच पाचव्या श्लोकात निरुपाधिक ब्रह्मरूपात ज्ञानेश्वर न्याहाळतात. आणि द्वैताकडून अद्वैताकडे व अद्वैताकडून द्वैताकडे आपला प्रवास आरंभितात. या श्लोकात अनुभवामृताचे आशयबीजकेन्द्र आहे. किंबहुना या श्लोकांचे अन्वयव्यतिरेकात्मक पद्धतीने केलेल्या स्पष्टीकरणाचे आणि विवरणाचे काव्यात्मरूप म्हणजे अमृतानुभव होय. निवृत्तिनाथ, शिवशक्ती, आणि निरुपाधिक शंभू हे अमतानुभवाचे स्वानुभूतिविषय आहेत. आणि त्यांचा ज्ञानेश्वरांनी घेतलेला अनुभव व त्या अनुभवाच्या अभिव्यक्तीत ज्ञानेश्वरांना जाणवलेले 'नेतिनेती' असे अंतिम सत्य ! स्वानुभवाच्या बीजातून स्फुरलेला आणि फुललेला हा महावृक्ष !

संपूर्ण विश्वाचे उत्पत्तिबीज असलेले शिवशक्ती यांना मी वंदितो असे म्हणून ज्ञानेश्वरांनी शिवशक्तीच्या द्वैतातील अंतिम अद्वैतावस्था न्याहाळली आहे. शिवशक्ती हे जगाचे मातापिता आहेत. म्हणजे जगाचे आदिकरण प्रकृतिपुरुष असून त्यांच्यापासून जगोत्पत्ती झाली. असली तरी हे विश्व म्हणजे तरी अंतिमतः शिवपणानेच आर्धार्धे होऊन नांदत आहे.

दो दांडी एक श्रुति। दोही फुली एक द्दति
दोहो–दीवी दीप्ती। एकीची जेवी
दो ओठी एकी गोष्टी। दो डोळा एकी सृष्टी
तेवी जिही सृष्टी। एकीची जे ।। अमृ. १ :१८–१९

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वरील ओव्यांतून ज्ञानेश्वरांनी दोन भिन्न सजातीय वस्तूंतून एकच सजातीय वस्तूला स्पष्ट केले आहे. पण ज्या शिवशक्तींच्या किंवा पुरुष-प्रकृतीच्या संसाराचे उत्कट रम्याद्भुत आणि रसपूर्ण गृहचित्र ज्ञानेश्वर रेखाटतात त्या चित्रणात मार्मिकता आणि नवीनता स्पष्ट होते. वास्तविक वेदान्ताच्या अद्वैती भूमिकेवरून सर्वच ज्ञानेश्वर-पूर्व तत्त्ववेत्त्यांनी जीवनाचा अन्वयार्थ लाववेला होता पण ज्ञानदेवांनी पुरुषप्रकृतीच्या संसारात खेळणाऱ्या विश्वबाळाचे आणि प्रकृतिपुरुषांचे जे जन्म–जनकत्व दाखविलेले तो ज्ञानेश्वरांच्या स्वतंत्र प्रतिमेचा स्वतंत्र आविष्कार आहे. देवो-देवी, प्रीयुचिप्राणेश्वरी, मेहुण, जोडपे, दंपत्य, पतिव्रता, भ्रतार, कांतुप्रिया, प्रियप्रिया, शिववोहर या मिथुनांतून ज्ञानेश्वरांनी प्रकृतिपुरुषांचे उत्कट गाढ, अपूर्व असे परस्परानुप्रवेशी प्रेमचित्र रंगविले तर दुसरीकडे—

जया एके सत्तेचे वैसणे । दोघां एका प्रकाशाचे लेणे
जे अनादि एकपणे । नांदती दोघे
जेणे देवे संपूर्ण देवी । जिचेवीण काहीना तो गोसावी
किंबहुना एकोपजीवी । एक एकाची
कैसा मेळु आला गोडिये । दोघे न माती जगी इये
की परमाणूही माजी उपाये । मांडिली आहाती
जिही एक एका वीण । न कीजे तृणाचेही निर्माण
जिचे दोघे जीवप्राण । जिया दोघा ।। अमृ. १ : ८-१२.

ज्ञानेश्वरीत ज्ञानेश्वरांनी पतिव्रतेचे वार्धक्य कसे निष्काम असते यावर भर दिला तर अमृतानुभवाच्या संसारचित्रात मात्र तारुण्याची मुरामुसती आणि लवलवती अभिलापा प्रियूच्या आणि प्राणेश्वरीच्या ठिकाणी किती उत्कट आहे याचे मोठे रसपूर्ण शृंगारचित्र रेखाटले.

आणि प्रकृति पतिव्रते । पडिला येक पत्नीव्रते
येणेही कारणे जेयाते । पुरुषु म्हणोये ।। ज्ञा. ८ : १८७
अर्धनारी नटेश्वरी। जो पुरुष तोचि नारी ।।ज्ञा.९ : २६९

असे ज्ञानेश्वरीत प्रकृतिपुरुषाच्या एकात्मतेचे वर्णन आले आहे.

ज्या दोघांच्या आलिंगनी । विरोनी गेली दोनी
अवघीयाची रजनी ।'दिठीच जे ।।अमृ. १–४७

अशी प्रकृतिपुरुषाची शृंगारिक एकता आणि दोहोंची एकता आणि एकतेचे दुहेरीपण अनंत कल्पनाचित्रांच्या साह्याने ज्ञानेश्वर उभे करतात. शिव आणि शक्ती हे द्वैत भासत असले तरी ते निरुपाधिक अद्वैतच होय हा नवा सिद्धान्त ज्ञानेश्वर मांडतात. भूतेशु आणि भवानी, प्रियकर आणि प्रेयसी, प्रकृती आणि पुरुष ही द्वंद्वे अंतिमत: निर्द्वंद्वेच होत. त्यासाठी गूळ आणि गुळाची गोडी, सुवर्ण आणि अलंकार, कापुर आणि त्याचा परिमळ, दर्पण आणि त्याचे प्रतिबिंब, रंभागर्भ आणि आकाश, मीठ आणि सागर या विविध उपमानांच्या साह्याने प्रतिमासमूह निर्माण केले आहेत. शिव-शक्तींच्या द्वैताद्वैततेचे स्वरूप ज्ञानेश्वरांना मूल बीजाच्या दोन शकलांसारखे जाणवलेले आहे. बीजाची दोन्ही शकले भिन्न दिसत असली तरी अंतिमत: मातीमध्ये रुजण्यातूनच सृजनक्रिया घडणार असते व बीजसृजनातून वृक्षनिर्मिती होते. पण विश्वनिर्मितीनंतर प्रकृतिपुरुष रहात नाही तर अंतिम **शिव**तत्त्वच निरूपाधिक स्वरूपात चिरंतन राहते. अशा शिवतत्त्वाशी 'मी' एकरूप होतो. हा एक नवा जीवनान्वय ज्ञानेश्वरांनी लावला. सांख्यतत्वनिरूपणात किंवा वेदान्त्यांच्या तत्त्वनिरूपणात प्रकृतीला पुरुषापेक्षा वेगळे आणि जड मानले गेले किंवा वेदांत्यांनी तिला अज्ञान-स्वरूपी आणि मायाक्रम म्हणून मिथ्या मानले. ज्ञानेश्वरांनी पतिपत्नीच्या उत्कट प्रणयाचे भावचित्र रेखाटून शिवशक्ती, परमात्मा आणि जीव या सर्वां-चेच ऐक्य प्रतिपादन केले. व तेही एका रम्याद्भुत उत्कट रसपूर्ण अशा गृहस्थाश्रमी संसारचित्रणातून की ज्यात प्रकृती ही 'गृहितागमा' आहे तर पुरुष हा 'गृहस्थ' आहे. मोठ्या सुखाचा आणि पर-स्परांवर प्रचंड प्रेम करणाऱ्या युगुलाचा हा उत्कट प्रणयाने सांद्र झालेला रम्य संसार! गृहस्था-श्रमातील रम्य संसाराचे कल्पनाचित्र ज्ञानेश्वरांनी निर्माण केले. पण हा लौकिक संसार नाही तर लोकविलक्षण असे त्याचे स्वरूप आहे. अति आवडीने प्रियकर प्रेयसी एकमेकांना मिळून टाकतात. तर जगबाळ निर्मितीतही

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्वतःच्या द्वंद्वात त्याचा प्रवेश होऊ देत नाहीत. गोसावी निद्रिस्त झाला की भार्या संपूर्ण संसाराची जबाबदारी सांभाळते. भार्या दिसेनाशी झाली तर भ्रतार अंग टाकतो. परस्परांवरील प्रगाढ प्रेमामुळे परस्परांच्या आलिंगनसौख्यात ती मिटून जातात. आणि दोघेही अर्ध्याअर्ध्या प्रमाणात जगनिर्मिती करतात. शिवाचे जगकर्तृत्व शक्तीमुळे तर शक्तीचे सत्तास्फुरण शिवामुळे होते. व अंतिमतः एक चैतन्यशिवच आत्मरूपात उरते की जे सर्व विश्वात व्यापून आहे. अशावेळी मीच शांभवी झालो असे ज्ञानेश्वर म्हणतात. प्रकृतिपुरुषाच्या विश्वात्मक संसाराचेही मूळ स्वरूप अंतिमतः चैतन्याच्याच ठिकाणी असते व त्याच्याशीच प्रकृतिपुरुष एकरूप होतात व ते चैतन्य मुंगीपासून तृणापर्यंत आणि ब्रह्माण्डापासून परमाणूपर्यंत एकच आहे.

ज्ञानेश्वरांच्या मनःकोषात सद्गुरूला एक अनन्य स्थान आहे. ज्ञानेश्वरीतील 'आचार्योपासनम्' या मूळ गीतेवरील श्लोकात ज्ञानेश्वरांनी गुरुविषयीचा नितांत आदर आणि आत्यंतिक श्रद्धा व्यक्त केलेली होतीच. पण अमृतानुभवातील गुरुवंदनात गुरू आणि शिष्य हे द्वैत भेद न करणारा सद्गुरू म्हणजेच आत्मरूपदर्शक आरसाच होय. शिष्याला गुरुशिवाय ज्ञान नाही. गुरुशिष्यात वास्तव द्वैत नसून गुरूच शिष्याच्या निमित्ताने विकसित झालेला असतो. शिष्याला गुरुमुळेच मुक्ती मिळते. कारण परमात्मा गुरू हा ज्ञानरूप चिदाकार होय. गुरू म्हणजे प्रकृतीरूपी गंगेचा समुद्र होय. तो अविद्यारूपी काळोख नाहीसा करून बोधरूपी प्रकाश सर्वदूर फैलावतो. बोधामृताची प्राप्ती गुरूकडून होताच शिष्य 'अहमब्रह्मास्मि' च्याही पलीकडे पोहोचतो. गुरूच आपले रूप शिष्यात न्याहाळतो. पंचमहाभूतांनी व्याप्त असे जड आकाश गुरूच्या ज्ञानरूप चित्राकाशाची बरोबरी करू शकत नाही. चंद्रसूर्यांचे प्रकाशणे हेही गुरूच्या भेदातीत दृष्टीने घडते. गुरूला पाहिल्याबरोबर वंदकत्व आणि वंद्यत्व हे द्वैत नष्ट होते. परमात्मस्वरूप सद्गुरू जरी रूपातीत भासला तरी तो सत्शिष्याच्या प्रतीकाने जगत्‌विलास करतो.

निवृत्ति जया नाव । निवृत्ति जया बरव
जया निवृत्तीची राणीव । निवृत्तीची । अमृ. २ ७०
ओपसरयाचे वळ । घेऊनि मिरवे कीळ
तैसे रत्न नव्हे निखिळ । चक्रवर्ती हा
तैसे निवृत्तिपणासी कारण । हाचि आपणया आपण
घेयावया फुलचि झाले घ्राण । आपुली दृति ।।
अमृ. २ः ७४–७५

अशा अकृत्रिम स्वयंसिद्ध निवृत्तिरूपी चैतन्यतत्वाला मी वंदन करून वाचाऋणातून मुक्त झालो. असे म्हणून ज्ञानेश्वर आपल्यातील व गुरूतील अभेद स्पष्ट करतात. शिवशक्तीचे द्वैतपण आणि अंतिमतः असलेले अद्वैत त्याचप्रमाणे सद्गुरू आणि ब्रह्मरूपाचे जीवाशी असलेले द्वैतपण आणि अंतिमतः निर्माण झालेले अद्वैत स्पष्ट करून ज्ञानेश्वरांनी गुरुपदाला आत्मरूपपदावर नेऊन बसविले आहे. ज्ञानेश्वरीच्या पंधराव्या अध्यायाच्या सुरवातीलाच—

आता हृदय हे आपुले । चौफाळूनि भले
वरी बैसऊ पाऊले । श्रीगुरूची
ऐक्यभावाची आंजुळि । सर्वेंद्रिय कुड्मळि
वरी भरूनि पुष्पांजळी । अर्घ्यु देऊ ।। ज्ञा. १५ :१, २

अशी गुरूची मानसपूजा बांधली आहे.

तिसऱ्या प्रकरणात ज्ञानेश्वरांनी परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी या वाणींचे ऋण गुरुवंदनाने फेडलेले आहे. देहाच्या नाशाबरोबर हातपाय नाहीसे होतात. पण इन्द्रिये नाश पावतात ती मनाच्या लयाबरोबर! गुरूच्या उपदेशाने अविद्या नष्ट होते. परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी यांनी आत्म्याची झोप म्हणजे अज्ञाननिवृत्ती होते पण पूर्णतः निरास होत नाही. लाकूड जाळले तरी निखारा उरतो. लोखंड तापविले तरी लोहरस निर्माण होतो. मीठ विरघळले तरी आपला मीठपणा सोडत नाही. त्याप्रमाणे चारही वाणी अविद्येबरोबर नाहीशा झाल्या तरी तत्त्वज्ञानाच्या रूपाने पुनः जिवंत होतात. 'अहम् ब्रह्म' हा अहंकारही बंधच! आणि 'देहोऽहम्' ही वृत्तीही बंधच. फरक पडतो तो केवळ स्थूल आणि

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सूक्ष्माचा. देहापासून ब्रह्मापर्यंत होणारा चार वाणींचा व्यवहार हेच वाचाऋण गुरुवंदनाने मूळ ज्ञानात्मक आत्मरूपाला वंदन करून फेडतो. विविध प्रतीकांच्या साह्याने गुरू आणि शिष्य यांच्यातील द्वैत नष्ट करून गुरू म्हणजेच ज्ञानरूप आत्मस्वरूप अशा अद्वैतापर्यंत ज्ञानेश्वर येऊन पोहोचतात. ज्ञानेश्वरीत जशी गुरुशिष्यांची संवादात्मक चर्चा अनुभवण्यास मिळते तसे अमृतानुभवात घडत नाही. कारण येथे ज्ञानेश्वरच आत्मसुखसंवाद आत्मसुखार्थ करीत आहेत. त्यात लौकिक अनुभवविषयच काव्यपातळीवर जाऊन पोहोचतात. माध्यान्हीची छाया, ओहोळीचा ओलसरपणा कर्पुरमिश्रित पाण्याचा गंध या संयुक्त प्रतीकांतून ज्ञानेश्वर आपला मूलानुभवाचा मूलाकार शोधू बघतात. गोचर करू बघतात.

परमात्मातत्त्व हे ज्ञानाचा विषय होत नसून ते ज्ञानरूप असते. वस्तुनिरपेक्ष आणि अज्ञान-निरपेक्ष असे स्वयंभू आणि स्वतंत्र परमात्मतत्त्व अनुभूतीच्या साह्याने प्रतीतीग्राह्य होते. हा विचार अमृतानुभवाच्या चौथ्या प्रकरणात येतो.

वात दशाही ते निमालिया । येणे जै ये उपाचा
ते केवळ नाशावया । दीपाचे परि ।।
उठणे की पडणे । कुचभाराचे कोण जाणे
कां फाकणे की सुकणे । जाऊळाचे
तरंगाचे रूपा येणे । तयाची नाम निमाणे
का विजूचे अुदैजणे । तोचि अस्तु ।। अमृ. ४ : ७ ते ९

अज्ञाननाशाप्रमाणेच ज्ञाननाशही कसा होतो ते ज्ञानेश्वर निरनिराळ्या दृष्टान्तांतून दाखवून देतात. अज्ञानाचा नाश करून ज्ञान उत्कर्षाला पोहोचत असले तरी त्याचाही शेवटी नाशच होतो. परमात्मस्वरूप असे ज्ञानाज्ञानातीत आहे. ते शुद्ध असून द्वैतातीत आहे.

जो निरंजनी निदेला । तो आणिकी नाही देखिला
आपुलाही निमाला । आठवु तया
परी जीवे नाही नोहे । तैसे शुद्ध असणे आहे
हे बोलणे न साहे । असे नाहीचे ।। अमृ. ४ : ३३, ३४

अमावास्येच्या अंधारात उभा असलेला काळा माणूस, मळीन आकाशाचे आकाशपण, आटलेल्या झऱ्याचा ओलसरपणा या प्रतीकांतून मूळ परमात्म स्वरूपाचे शुद्धत्व, स्वयंभूपण आणि सर्वधर्मरहितत्व प्रतिपादिली गेली.

पाचव्या प्रकरणात सत्, चित्, आणि आनंद या तीन संकल्पनांतून एकच अनुभव व्यक्त होतो असे ज्ञानेश्वर सांगतात. कांतिमानता, कठिणता आणि कनकत्व म्हणजे जसे सुवर्ण किंवा द्रविभूत अवस्था, माधुर्य आणि अमृतत्व म्हणजे जसे अमृत त्याप्रमाणे सत् चित् आनंद म्हणजे सच्चिदानंदी परमात्मस्वरूप होय. सत्ता, प्रकाश व सुख म्हणजे असत्, जड आणि दुःख यांची व्यावृत्ती होय असे श्रुतींनी मानले. असत्च्या निरसनासाठी सत् व अचेतनाच्या निरसनासाठी चित् तत्त्व योजून जडनिवृत्ती केली. सूर्य जड पदार्थांना प्रकाशित करतो ते पदार्थ सूर्याला प्रकाशमान करीत नाहीत. त्याप्रमाणे सच्चिदानंद आत्मा हा मूळ - परमात्मस्वरूपी लय पावतो. स्वतः सिद्ध परमात्म वस्तू ही प्रमाणकक्षे पलीकडची असून सच्चित्सुख हे बोल वस्तुवाचक आहेत. नदीचा ओघ सागराला मिळतो आणि संपतो. फूल सुकते आणि फळ निर्माण होते. पुढे फळ नष्ट होते व तृप्ती देऊन रसही लुप्त होतो. चेहऱ्याला चेहरा दाखविला की आरशाचे काम संपते. तसे सच्चिदानंद ही पदे द्रष्ट्याला दृश्य दाखवून (परमात्मस्वरूप) मौन स्वीकारतात. कारण परमात्मवस्तू ही सुखरूप आहे दुःखशून्य आहे.

रूप नाही तै लावण्य । अंग नुठी तै तारुण्य
क्रिया न फुटे तै पुण्य । कैसे असे ?

असा प्रश्न उपस्थित करून ज्ञानेश्वर म्हणतात,

आता ययावरी जे बोलणे । ते येणेचि बोले शहाणे
जै मौनाचेही निपटणे । गिळूनि गेले ।। अमृ. ५ : ५३

अनुभव्य, अनुभविक आणि अनुभव ही त्रिपुटीच गळून पडते तेथे शब्दांची मातब्बरी कशी राहणार ! शब्द हे भिगुळवाणे ठरतात ! स्मारकरूपच होतात.

ज्ञानेश्वरांनी अमृतानुभवाच्या दुसऱ्या प्रकरणात वाचाऋण फेडण्याचा प्रयत्न केला तर सहाव्या प्रकरणात परमात्मस्वरूपाचे विस्मरण हेही भ्रामक कसे हे शब्द प्रमाणखंडनातून दाखविले. परमात्मस्वरूपाचे स्मरण करून देणारा स्मारक-रूपी शब्द असल्यामुळे स्मरण तरी कुणाचे

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

करावयाचे ! कारण परमात्मस्वरूप एकटे अंतिम असे आहे. स्वसंवेद्य परमात्म्याला स्मरणासाठी कुणाची मदत लागेल !

अविद्या तव स्वरूपे । वांझेचे कीर जाइपे
मा तर्कचि खुरपे । खांडणे कोणा ।। अमृ. ६ २४

अभावरूपाने असलेल्या अविद्येचा नाश करणे म्हणजे—

तेणे शेळी गळा दोहावी । गुडगा डोळा वास पहावी
वाळवूनी काचरी करावी । सांजवेळेची ।।
जांभई वाटुनि रसु । तेणे काढावा वडु वसु
कालवूनि अळसु । मोदळा पाजावा ।।
तळहातीचे विचरू । केस सुखे
घटाचे नाहीपण फोडू । गगनाची फुले तोडू
ससियाची मोडू । शिंग सुखे
वांझेचे लेकरू । परणु सुखे ।। अमृ. ६ ४८ ते ५३.

आपण आपल्याशीच लग्न करणे किंवा सूर्याने सूर्याने आपले आपल्यालाच ग्रहण लावलेले माहीत आहे का ? अशा अतिशयोक्त व चमत्कृतिपूर्ण उपमानांनी ज्ञानेश्वरांनी शब्दखंडन घडविले आहे. मौनाचेही मौन व्हावे या भूमिकेचा हा मूलारंभ होय. मूलानुभवाच्या अभिव्यक्तीसाठी शब्दांची जाणवलेली मर्यादित अवस्था ज्ञानेश्वर मांगू जातात. सच्चिदानंद आत्मारामाचे स्वरूप जसे शब्दातीत आहे त्याचप्रमाणे अतींद्रिय अनुभवाची अभिव्यक्तीही शब्दांच्या माध्यमामधून एका मर्यादेपलीकडे गोचर होऊ शकत नाही.

एवं शब्दैक जीवने । बापुडी ज्ञाने अज्ञाने
साचपणे वने । चित्रिची जैंमी ।। अमृ. ६ १०२

सहाव्या प्रकरणात ज्ञानेश्वरांनी शब्द या मूल द्रव्याचीच मर्यादा स्पष्ट केली तर सातव्या आणि आठव्या प्रकरणात परतत्त्वस्वरूपाची अंतिम निकारात्मकता स्पष्ट झाली आहे. अज्ञान आणि ज्ञान या दोन्ही संज्ञा कशा आत्मस्वरूप-दर्शनात सापेक्ष थाहेत हे विविध दृष्टान्तांतून दाखवून दिले. संपूर्ण अमृतानुभवातील जवळ जवळ अर्धा भाग या दोन प्रकरणांत विभागला गेला आहे. ही दोन्ही प्रकरणे म्हणजे आत्मतत्त्वाचे ज्ञानाज्ञाना-तीत जे निखळ स्वरूप आहे त्या स्वरूपप्रमेयाचे उद्‌घाटन येथे ज्ञानेश्वरांनी केलेले आहे. सृष्टीतील नामरूपकात्मकताच अविद्यामूळ आहेत. परमात्मा नामरूपातीत असल्यामुळे अनुभव, अनुभवी आणि अनुभव्य किंवा द्रष्टा, दृष्य आणि द्रष्टव्य यांना अस्तित्वच उरत नाही. अज्ञान हे ज्ञानसापेक्ष आहे. अज्ञान आणि आत्मस्वरूप एकत्र नांदत नाहीत. तसे ते आहेत असे म्हणणे म्हणजे रात्र आणि दिवस, जगणे आणि मरणे, शीत आणि उष्ण एकत्र नांदतात असे म्हणण्यासारखे आहे. ज्ञानस्वरूप आत्मा असल्यामुळे मिठाची मासोळी जशी पाण्यात आणि पाण्याबाहेरही राहू शकत नाही त्याप्रमाणे अज्ञानाला अस्तित्वच उरत नाही. विश्व-व्यव-हाराच्या मुळाशी चैतन्यतत्त्व फक्त असते. द्रष्टा आणि दृश्य दोन्ही चैतन्यस्वरूपीच आहेत. द्रष्टा आणि दृश्य या अज्ञानसापेक्ष कल्पना असून स्फुरणशील चैतन्यस्वरूपच एकमेवाद्वितीय स्वरूपात चिरस्थायी आहे. आणि त्याचीच प्रभा म्हणजे चैतन्याने रसरसलेले जग होय. जग आणि चैतन्यस्वरूप भिन्न नाहीत. जगाच्या ठिकाणी चैतन्यस्वरूपी परमात्मरूप सामावलेले आहे. ज्ञानखंडनातून आणि अज्ञानखंडनातून ज्ञानेश्वरांनी वरील सिद्धान्त मांडला.

नवव्या प्रकरणात अनीर्वचनीय असे ज्ञानस्वरूप आकलन झालेल्या प्रबुद्धाची जीवकथा ज्ञानेश्वरांनी सांगितली. देव हाच भक्त होतो व भक्तालाच देवपण येते इतका मुक्तावस्थेतील हा आत्मानुभव. बंधमोक्षातीत सहजावस्थेतील मुक्ताला विश्व हाच एकांत आणि सर्व शिवरूपच होते. वाच्य वाचकभेद हरिहरांची लीनता, नामरूपांचा शेवट घडवून आणलेल्या या आनंद-भूमीचाच हे गुरू तू आम्हाला वारसा दिलास व 'मीतूपणाची बोळवण' करून तूच आमचा सोयरा झालास ! दहाव्या प्रकरणात या अननुभूत आनंदाची 'खिरापत' ज्ञानेश्वर सर्वांना देण्यास निघाले आहेत.

आम्ही बोललो जे काही । ते प्रगटची असे ठायी
मा स्वयंप्रकाशा काई । प्रकाशावे बोले ।।
या कारणे मिया । गौप्य दाविले बोलोनिया
ऐसे नाही आपसया । प्रकाशुचि ।।
म्हणोनि माझी वैखरी । मौनाचेही मौन करी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ज्ञानदेवो म्हणे श्रीमंत । हे अनुभवामृत
सेवोनि जीवन्मुक्त । हेचि होतु
स्वानुभूतिपर गुणे । वोगरले ।।
परि अमृताहि उठी लाळ । अमृते येणे
आणि मुक्त मुमुक्षुवद्ध । हे तववरी योग्यता भेद
अनुभवामृतस्वाद । विरुद्ध जंव ।। अमृ. १० : ९ ते २५.

अमृतानुभवाच्या पहिल्या अध्यायात संसारशिल्पातून सुरवात करून अमृतानुभवाच्या उपसंहारात ज्ञानेश्वरांनी या लौकिक संसारातील मी माझे तू तुझे या उपाधींपासून तू मला मुक्त केलेस व हे सद्गुरू तू माझा 'सोयरा' झालास. वऱ्हाडात 'सोयरा' या शब्दाचा अर्थ दोन घराण्यांच्या नातेसंबंधातून निर्माण झालेला ऋणानुबंध ! संसारापासून मुक्त झालेले ज्ञानेश्वर निवृत्तिनाथांचे 'सोयरेपण' स्वीकारून अमृतानुभवाचा शेवट करीत आहेत.

शिवशक्ती, गुरुशिष्य या द्वंद्वातून ज्ञानदेवांनी स्वतःला जाणवलेले आत्मतत्त्वाचे अनिर्वचनीय स्वरूप व्यक्त केले आहे. विश्वाचा पसारा प्रकृतिपुरुषामुळे होत असला तरी त्याच्यापाठी असलेले चैतन्यतत्त्वच स्फुरणशील असून ते शब्दातीत आहे. शब्दांच्या साह्याने त्याला समजावून घेणे म्हणजे सूर्याने कुणाच्या तरी मदतीने उगविण्यासारखे आहे, असे ज्ञानेश्वर म्हणतात. परमात्मस्वरूप गुरुरूपात ज्ञानेश्वर न्याहाळत असल्यामुळे गुरू आणि शिष्यातील निर्द्वंद्व अवस्थाही पूर्णतः केवलानुभवाच्या प्रतीतीची ठरते.

शब्दमाध्यमातून मूळ केवलानुभवापर्यंत पोहचत असता ज्ञानेश्वरांनी 'प्रकाशाचे लेणे' (१ ८), 'प्रकाशाची कवाडे' (७ १२३), 'प्रकाशाची कथा' (७ २५८), 'स्वप्रकाशाचा घास' (७ : २६७), 'जाणिवेची लेणी' (७ १२८), 'प्रकाशाचा दिवो' (७ २७३), 'चित्‌गगन (८ ९९), 'चिदादित्य' (८ १९), 'स्वयंप्रकाश' (१० ८), 'सूर्यदिठी (१० २१) अशा प्रकाशदीप्तीस्वरूपात चैतन्यानुभवाचे स्फुरण अनुभवले आहे. व ही आत्मप्रभा, वस्तुप्रभेची तदाकार स्वरूपात न्याहाळली आहे. ज्ञानेश्वरी आणि अभंगगाथेतही चिद्‌घनचिदाकार ब्रह्मतेजाची अपेक्षा ज्ञानेश्वरांनी व्यक्त केली आहे. 'ब्रह्मतेज पुंजाळले' असे ज्ञानेश्वर म्हणतात. शब्द या माध्यमाची मर्यादा व अपुरेपणाविषयी ज्ञानेश्वरांचे मन खंतावते. व शब्दखंडनात ही आपली प्रामाणिक खंत ते प्रगट करतात. तर शेवटच्या अध्यायात विश्वात्मक आनंदोत्सव अमृतानुभवाच्या सणाने उपभोगण्याची इच्छा व्यक्त करतात. शब्दसृष्टीचे कुबेर असलेल्या ज्ञानेश्वरांनाही आपला स्वात्मानुभव अभिव्यक्त करीत असता 'मौनाची मिठी' पडलेली आहे.

म्हणौनि माझी वैखरी । मौनाचेही मौन करी
हे पाणियावरी मकरी । रेखिलिया ।। अमृ. १० : ६

परा, पश्यंती यांमधील वैखरी ह्या अंतिमवाणीने आतापर्यंत स्वानुभूतीचे पक्वान्न तुमचेसमोर मांडले पण शेवटी त्याची रुची शब्दसंभारापेक्षा अनुभूतीनेच येणार आहे. म्हणून मी मौनाचेही मौन स्वीकारतो. आतापर्यंत मी जे निरूपण केले ते म्हणजे पाण्यावर मासुळीची चित्राकृती चित्रित करण्यासारखे आहे. मासुळी असल्यामुळे ती पाण्याबाहेर राहू शकत नाही कारण तिचा तो जीवन प्रकृति धर्म आहे. आणि पाण्यावर ती चित्राकृती स्पष्ट रूपवंत होऊ शकत नाही कारण ती स्फुरणशील, चंचल तरंगान्वित असल्यामुळे पाण्यात रेखांकित होऊ शकत नाही. त्याचप्रमाणे आत्मानुभवातील विश्वात्मक चैतन्याचा अनुभव ज्ञानेश्वरांना जाणवतो. व तो शब्दांच्या गाभाऱ्यातून भोगण्याचा प्रयत्न त्यांनी केला असला तरी शब्द हे स्मरणरूप स्मारके होत असे ज्ञानेश्वर पुनः पुनः स्पष्ट करतात. शब्दसंहिता गोमटी आहे. पण तरीही ती अनुभवाच्या जाणिवेच्या प्रांतात थिटी आहे. शब्द हे फक्त डोळसांसाठी असतात. तर अध्यात्मशास्त्राची प्रतीती अंधही घेऊ शकतात. चर्मचक्षूंपेक्षा ज्ञानचक्षू सर्वश्रेष्ठ असून लिखित शब्द हा स्मरणदानी प्रसिद्ध (६ : १२) आहे. ती केवळ स्मारके होत (६ १८) असे ज्ञानेश्वर शब्दखंडनातून पुनः पुनः दाखवून देतात. आणि त्याही पलीकडे आत्मानुभूतीच्या प्रत्ययात्मक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रतीतीचा प्रांत आहे असे ठासून सांगतात. त्यासाठी त्यांनी शब्दांना अक्षरशः धारेवर धरले आहे. उदा. 'शब्द नासणे' (६ ५५), 'निरर्थक थिटा शब्द' (६ : ७१), 'निरर्थके जल्पे (६ : १०१), 'बापुडी शब्दैक जीवने' (६ १०२) 'विखुरली वाचेचिये आते' (७ २७७), म्हणजे वाणीला शब्दांनी फाटे फोडले आहेत. 'शास्त्राची 'भाट-गिरी' (९ : ६९) शब्द करतात असे अमृतानुभवात सर्वदूर ज्ञानेश्वर म्हणत असतात. ज्ञानेश्वरीमध्ये 'अमृतातेहि पैजा जिंके' अशी तरफदारी ज्ञानेश्वरांनी शब्दांची केलेली होती परंतु अमृतानुभवातील अनुभवच अतिशय अलवार आणि सोलीव असल्या-मुळे तो पाऱ्यासारखा चंचल आणि जाऊळाच्या फुलाप्रमाणे नाजुक, चंद्रासारखा शीतल आणि सूर्यासारखा तेजस्वी रूपात ज्ञानेश्वरांना भावला आहे. त्याच्या अभिव्यक्तीसाठी ज्ञानेश्वर बुद्धी आणि मन यांच्याशी 'झोंबी' करतात. अमृतालाही लाळ निर्माण करणाऱ्या अलौकिक स्वात्मानु-भवाला मौनाच्या निपटण्यातून मौनाची वाट दाखवितात. शब्दांच्या माध्यमातून सोलीव अनुभवापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न मी केला पण हा प्रयत्न म्हणजे आकाशाला कवेत घेणे, सूर्याला हात लावणे आणि समुद्राला गिळून टाकण्यासारखा करतो म्हणून शेवटी मौनाच्या महाद्वारातूनच मी जाणिवेतून आणि त्याही पलीकडच्या नेणिवेतून जाण्याचा प्रत्यय ज्ञानदेवांना येतो.

ना तरी निंदास्तुती। दोन्ही मौनासाठी जाती
मौनी मौन आथी। बोलता बोली॥ ९ : ५१.

एखादा भोवरा फिरता फिरता स्थिररूप होऊन स्वकेन्द्राशी फिरत रहावा आणि बघणाऱ्याला मात्र तो फिरतो आहे की स्थिर आहे याबद्दल अचंबा वाटावा त्याप्रमाणे ज्ञानेश्वरांनी चैतन्य हेच ज्याचे स्फुरणरूप आहे त्या आत्मानुभवाचे अत्यंत मार्मिकपणे आणि सूक्ष्मपणे विवरण केले आहे. ज्ञानेश्वरांना आत्मवस्तूचे बुद्धी आणि मनापलीकडचे चैतन्यरूप जाणवलेले आहे.

देह हाडाची मोळी। मी म्हणोनी पोटाळी
तो अहंकारू गाळी। पदार्थू हा॥
बुद्धि बोध्या सोळके। ते यऱ्हवी वस्तु चुके
मना संकल्प निके। याहीहूनी
नाडिले जे वादी कोडे। आतुचि बाहेरी सवडे
तैसा निर्णो सुनाथा पडे। केला येथ॥ ७ ११७

अशा रीतीने ज्ञानेश्वर प्रकाशाची कवाडे उघडतात आणि स्वान्तावरोबर परान्तालाही आपल्यावरोबर महाप्रकाशाच्या सूर्यदीठीचा अनुभवप्रत्यय देतात.

विविध संवेदनासंपृक्त प्रतिमावर्तुळे निर्माण करणे ही तर या शब्दसृष्टीच्या ईश्वराची सहजलीला आहे. पण त्यातही विरोधमूलक संवेदनासंपृक्त प्रतिमा परस्परांच्या जवळ ठेवून एक अलौकिक प्रत्यय ज्ञानेश्वर देत असतात. उदा. ज्वाळांच्या माळा (७ : १३६) आणि रश्मीचा परिवार चांदण्यांचा चंद्रावरील प्रकाश! दोन विरोधी संवेदना एकत्र आणून ज्ञानेश्वर प्रतिपाद्या-तील टोकदार अनुभव अभिव्यक्त करीत असतात.

ज्ञानेश्वरीत निवृत्तिनाथांविषयी गौरवपर उद्गार काढीत असता ज्ञानेश्वरांनी निवृत्तिनाथांना 'व्यवहारा' असे विशेषण लावले आहे. 'व्यवहारा' म्हणजे व्यापारी असा अर्थ अभिप्रेत आहे. अमृतानुभवात लघुत्वाचे मुद्दल (२ २०) आणि ऐक्याचे मुद्दल (१ ५९) आहे त्यातही हातचा राखून ठेवला आहे. (५ ३९) आणि त्यावरील व्याजही बंधमोक्षाचे व्याज (५ ६६), साउलियेचे व्याज (७ २११) वाढते भरते आहे. असेही एक कल्पनाचित्र 'व्यवहारा' ज्ञानेश्वर काढतात.


अमृतानुभव असे प्रतीतीकाव्य आहे. बद्धमुमुक्षूंच्या पलीकडे पोचलेल्या जीवन्मुक्ताला विश्वसंविद्रहस्याच्या उद्घाटनात आलेला केवल, निःसंग, निष्कलंक आणि प्रकाशदीप्तिगर्भी अनिर्वचनीय आणि अलौकिक आत्मानुभव!

निसर्गाच्या, पंचमहाभूतांच्या आणि लौकिक मानवी जीवनाच्या संगतीने आणि सोबतीने निवृत्तिनाथांना सांगाती घेऊन केलेला हा आत्मप्रवास! द्वैतातून अद्वैताकडे, द्वंद्वातून निर्द्वंद्वाकडे, स्वान्ताकडून अनंताकडे, लौकिकातून

(पृष्ठ २२५ वर पहा)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विनायक मसोजी : एक सर्मपित कलाजीवन / डॉ. विमल भालेराव



मसोजींनी आपलं जीवन कलेच्या ओटीत घातलं. जन्मभर या कला-तपस्व्याने कलेशिवाय दुसऱ्या कशाचाच ध्यास घेतला नाही. पण या कलायोग्याला समाजानं आपल्यापासून चार हात दूर ठेवलं. त्याच्यासाठी काहीच केलं नाही. मसोजींचं ऋण अंशत: तरी फेडता यावं म्हणून भांजीभाई पाटणकरांनी मसोजींचे चरित्र लिहिले. अलीकडे या ग्रंथाचा महाराष्ट्र राज्य पारितोपिकामुळे उचित गौरव झाला आहे. चरित्र लिहिण्याचं काम अतिशय अवघड आहे. बहुतेक चरित्र-नायक जसा आहे तसा चितारण्यापेक्षा त्याला अलौकिकत्व चिकटविण्याचाच प्रयत्न केला जातो. किंबहुना चरित्रनायक म्हणजे अलौकिक-असामान्य असं समीकरणच ठरून जातं. त्यामुळे वास्तवापासून त्याची आपोआप फारकत केली जाते. परंतु पाटणकरांनी आपल्या लेखणीचा तोल कुठेही जाऊ दिला नाही. आजच्यासारखा उद्याचा दिवस हा रटाळपणाही चरित्राला येऊ दिला नाही. तर मसोजींची एका सच्च्या कलाकाराची चटका लावणारी घडण वाचकांसमोर ठेवली. पुस्तकाचं वाङ्मयंगही अतिशय देखणं केलं आहे.

सुस्वरूप, उत्तुंग माणूस, आदरणीय शिक्षक, सुहृद, सच्छील. समाजसेवक, निष्ठावंत भक्त, सव्यसाची खेळाडू, मनोहारी वादनकार, कुशल व निष्णात कर्मयोगी, पट्टीचा पोहणारा, उत्तम अश्वारोहक, कर्णासारखा उदार अशी बहुविध विशेषणे मिळविणारे गुणवैभव मसोजींच्या वाट्याला आलेलं आहे. पण मसोजींच्या या लाखमोलाच्या गुणांची समाजाने कधी पारख केली नाही. राज-वैभव आणि मसोजी यांची सदाचीच चुकामूक झाली. लांब उडी, उंच उडी, धावण्याची शर्यत– खेळातील विविध स्पर्धांमध्ये मिळविलेल्या प्रथम क्रमांकाबद्दल राजाकडून बक्षीस घेणं हा योग विलक्षण दुर्मिळ आहे. आयुष्यात असे सुवर्णक्षण क्वचितच येतात. मसोजींना हे भाग्य अतिशय लहान वयात लाभलं. पण वडिलांची आज्ञा आणि चर्चमधील रविवारची प्रार्थना यांना महत्त्व देऊन हा सुवर्णक्षण टाळणारे मसोजी वेगळाच धडा शिकवून जातात. क्षणभर विचार करायला लावतात. मसोजींचं आयुष्य

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वेगळचं वळण घेऊन धावायला लागतं. मसोजी आपलं सर्वस्व कलेच्या स्वाधीन करतात. शांतिनिकेतनमध्ये रवींद्रनाथांच्या सान्निध्यात त्यांच्या गुणांचा गुणाकार होतो. मसोजींना स्वत:मधील 'माणूस' गवसतो. त्यांच्या जीवनाला नवी कांती लाभते. ते कलेची अनन्य भावाने सेवा करतात. येशू ख्रिस्त, माता मेरी, महात्मा गांधी आणि निसर्ग हेच त्यांचे बहुतेक चित्रांचे विषय. कुठल्याही राजाचे चित्र त्यांच्या कुंचल्याने रेखले नाही. तरवारीने पृथ्वीवर थोडावेळ साम्राज्य करणाऱ्यांपेक्षा नि:शस्त्र, संयमी व्यक्तींवर त्यांचा अधिक विश्वास आहे. गाढ निष्ठा आहे. त्यांच्या-करिताच त्यांनी आपला कुंचला झिजविला. १९२९ साली मध्यरात्री गांधींना अटक झाली आणि हा आत्मा आतून दुखावला. हे दु:ख कुंचल्यातून फुटलं. पंडित नेहरूंनी या चित्रावद्दल कौतुकाने त्यांची पाठ थोपटली. पण हा स्थिरमती चित्रकार कधी कौतुकानं हुरळला नाही की दु:खाने कोल-मडला नाही. मसोजींना सरकारी आमंत्रणं मिळतात. शांतिनिकेतनच्या विद्यापीठाचे प्राचार्य-पद भूषविण्याच्या संधीने राजवैभव त्यांना चुच-कारून जातं. पण मसोजी कोणत्याच मोहाला बळी पडत नाहीत. कला हाच त्यांचा एकमात्र ध्यास, जीवनभर टिकतो. लागोपाठ पंधरा दिवस घरात चूल पेटत नाही असं अठरा विश्वे दारिद्र्य त्यांच्या वाट्याला येतं. पण तेही त्यांना कला-ध्यासापासून विलग करू शकत नाही. 'मागणे काहीच नाही' हेच व्रत ते स्वीकारतात. कला ही पोट भरण्याचे किंवा चैन करण्याचे साधन आहे ही कल्पनाच या चित्रतपस्व्याला मान्य होत नाही. चित्र रेखताना— विशेषत: निसर्गचित्र रेखताना त्यांच्याकडून घेतली जाणारी मेहनत तोंडात बोट घालायला लावणारी आहे. मसोजी वाचनावर किंवा कुणाच्या सांगण्यावर काम भागवीत नसत. ते प्रत्यक्ष त्या स्थळाला भेट देत. त्याचा अनुभव घेत. मनानं ते चित्र नीट समजून घेत. नंतर हाती कुंचला धरीत. ही जीवापाड मेहनत ते चार पैश्यांनी मोजत नाहीत. या आगळ्या चित्र-काराला कलेचा बटवटीत व्यवहार कधीच मान्य झाला नाही.

पैसा नसला तरी मसोजी मनाने मात्र नेहमीच तृप्त दिसतात. ही तृप्ती, हा जीवनातील सर्वोच्च आनंद त्यांनी कोणत्याही बाह्य उपाया-शिवाय मिळविला. पैसा म्हणजे सुख. पैसा पैसा म्हणजे सर्वस्व हे त्यांना कधी उमगलंच नाही. जवळचा मित्र— 'राव' याचा अचानक घडलेला मृत्यू, प्रेत उचलण्यासाठी वॉर्डबॉय्जनी पैश्यासाठी पसरलेले हात, प्रेत खरोखरचं 'राव'चे आहे की आणखी कुणाचे ? याची तपासणी करण्यासाठी बॅरिस्टरसाहेबांनी घेतलेली भली मोठी फी— या बाबी मसोजींच्या मनात पैशासंबंधी कायमची घृणा निर्माण करून जातात. कामिनी, कांचन यांचा मोह आयुष्यात त्यांना कधी पडलाच नाही. कुणाचे आजोबा, कुणाचे वडील, कुणाचे गुरू ही पदे त्यांनी भूषविली केवळ आयुष्यातील सर्वोच्च आनंदाच्या जोरावर.

मसोजींची ही घडण अंतर्मुख करणारी आहे. पैशापेक्षा माणसाला-माणसातील माणुसकीला दिलेली त्यांनी किंमत, आयुष्यभर सांभाळलेला फक्त कलेचाच ध्यास— ही दुर्मिळता हृदयाचा ठाव घेते. असे हे अत्यंत समृद्ध आणि समर्पित जीवन अनेक दुर्मिळ कलाकृतींच्या छायाचित्रांसह समर्थपणे साकार केल्याबद्दल डॉ. भांजीभाई पाटणकरांना मन:पूर्वक धन्यवाद.

⊕ ⊕ ⊕

विनायक मसोजी : एक समर्पित कलाजीवन—डॉ. भांजीभाई पाटणकर,
प्रकाशक : प्रा. वा. मो. काळमेघ, व्ही. एस्. मसोजी फेलिसिटेशन कमिटी, १३५, बजाजनगर, नागपूर—४४००१०,
पृष्ठे—१०+११४+४६ (आर्ट प्लेट्स), मूल्य—चाळीस रुपये.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मेघ, मोर आणि मैथिली / सौ. विजया फडणीस

पुस्तकाचे नाव ठरविण्यापासून तर अर्पण-पत्रिकेपर्यंत प्रत्येक लेखकाची विशिष्ट पद्धत असते. "मेघ, मोर आणि मैथिली" हे नाव वाचून मला असंच वाटलं. 'म' चा अनुप्रास साधण्याचे काय कारण? हे नाव हेतुपुरःस्सर दिलेले की अचानक साधलेले? आपणहून मला उत्तर सापडले. डॉ. द. भि. कुळकर्णी यांच्या इतर पुस्तकांचीदेखील नावे अशीच वैशिष्ट्यपूर्ण आहेत. उदा. 'तिसऱ्यांदा रणांगण'.

२६ ललित लेखांचे हे पुस्तक. यातील काही लेख 'तरुण भारता'त 'अधोरेखिते' या स्तंभात वाचलेले. उत्सुकतेपोटी एका सपाटचात पुस्तक वाचून संपविले. प्रत्येक वेळी 'आपलेच हरवलेले अनुभव परत मिळाल्याचा आनंद' झाला; प्रत्येक अनुभव पिंजलेल्या कापसासारखा मोकळा अन् सलग मांडलेला.

कित्येकदा आपल्याच अनुभवांचा आपल्याला थांगपत्ताही नसतो. बारीक-सारीक गोष्टींची जाणीवच होत नाही. कित्येकदा आपले अवलोकन आणि आपल्याच सूक्ष्म जाणिवांचे आकलन जागृतीच्या उंबरठ्याबाहेरच उभे असते. सुप्तस्थितीतील हे अवलोकन, आकलन जागृतीचा गजर होण्याचीच वाट बघत असतं. असे असताना द. भि. चे हे ललित-दर्शन वाचल्यानंतर आपल्याच निद्रिस्त असलेल्या अनुभूतींची जाणीव आपोआप आपल्याला होते अन् आपल्याही जगण्याला एक अनाम अर्थ प्राप्त झालाय असं वाटतं.

तात्त्विक चिंतनापासून तर अलीकडचे चित्रपट आणि हिंदी संगीत यापर्यंतचे विविध विषय द. भि. नी या लेखांमधून हाताळले आहेत. चित्रपटसृष्टीतील 'रजनीगंधा' हा चित्रपट, संगीत क्षेत्रातील लता मंगेशकर, मदन मोहन, सैगल तसेच कलाकार गुरुदत्त इ. विषयक लेख या पुस्तकात समाविष्ट केले आहेत. द. भि. ची अभिरुची केवळ वाङ्मयीन नसून विविध क्षेत्रांत अशी सहज विहार करणारी आहे.

येथील काही शब्दचित्रे तर विलक्षण बोलकी अन् जिवंत आहेत पहाट सगळेचजण अनुभवतात पण कितीदा आपल्याला त्या नितळ अनुभूतींची जाणीव असते? 'कालिंदीचे हृदय-शल्य फेडिले' या लेखात सकाळच्या वातावरणाचे द. भि. नी केलेले वर्णन जितके जिवंत तितकेच प्रतीकात्म आहे. या विविध लेखांमधील शब्द-चित्रे केवळ आत्मनिष्ठ नसून आत्मनिष्ठ असतानाच वस्तुनिष्ठ झालेली दिसतात अन् म्हणूनच अधिक बोलकी वाटतात.

आपलेपणाची भावना अगदी उत्कटपणे, अधिक तीव्रतेने प्रदर्शित करण्याची या लेखकाची विशिष्ट शैली आहे. उदा. पहिल्याच ललित-लेखातील ही वाक्ये "ढगांनी तोंड काळं केलेलं असतं. टेहळणी संपलेली असते. सर्वत्र धवल साम्राज्य पसरतं. या उन्हात कुठलाच आगाऊपणा नसतो. ते स्थितप्रज्ञासारखं ध्यानस्त असतं. "ये माझा" असंही ते आता म्हणत नाही. इतका ये त्याचा असतो."

'एका हातात बाहुली एका हातात आसवे' मधील ही वाक्ये पाहा: "आपलेच हरवलेले अनुभव कलावंत आपल्याला परत करतो; पण त्यातील स्थलकालाचे आणि मीपणाचे हीण काढून घेऊन. लखलखीत आणि अस्सल करून. हे नाणं आपलंच आहे असं वाटू नये इतकं ते आता नवं आणि सर्वांचं झालेलं असतं."

वरपांगी सहजपणे, खेळकरपणे मांडलेल्या अनुभवांमधूनच द. भि. कित्येकदा अंतर्मुख झालेले दिसतात. "पण आपलं हक्काचंही आपणास सहजासहजी कुठं मिळतं? किती विषाद भरून आहे मनात. कशाचीही सल? हट्टाने

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्वीकारलेल्या दुराव्याची? की जवळचे जीव नित्यासाठी दूर निघून गेले त्याची? की ज्यांनी डोंगराएवढे उपकार केलेत त्यांना आपण ओंजळभरही काही देऊ शकलो नाही त्याची? . . ."

'मृत्यो' या लेखात मृत्यूशी लेखकाने केलेला संवाद विलक्षण बोलका आहे. मृत्यू हा लेखकाला बालमित्राप्रमाणे वाटतो. मृत्यूची त्याला भीती वाटत नाही. मृत्यू हा जीवनाचा स्वाभाविक टप्पाच आहे असं ते म्हणतात. "म्हणूनच मी तुझी वाट पाहणार नाही. आणि तूही पूर्वसूचना देऊ नकोस. म्हातारपणाने माझी दृष्टी अधू झाली असेल तर एका शब्दाने ओळख दे. उमेदीने धुंद झालो असेन तर दारावर नुसती टिचकी वाजव. विरंगुळ्याची सारी कामे टाकून मी येईन. पण तू येत नाहीस तोवर ही भातुकली मी मन लावून खेळणार आहे-- चालेल ना?"

हा संवाद वाचून मृत्यूला घाबरणाऱ्यालादेखील मृत्यू हा (क्षणभरका होईना) आपला बालमित्रच आहे असं वाटावं इतकी द. भि. ची अभिव्यक्ती संक्रमणशील आहे. प्रास्ताविकात प्रा. श्री. के. क्षीरसागर म्हणतात ते अगदी खरे आहे: "लेखात चितारलेली वृत्ती क्षणभर आपल्याला पटणारी, सत्य भासणारी वाटते हा लेखाचा गाभा आहे."

'आंधळ्याचे डोळे' हा ललितलेख वरवर इसापनीतीप्रमाणे बोधप्रद वाटतो पण वाचून संपविल्यावर त्यातील बोध नव्हे तर विदग्ध चिंतन आपले मन भारून टाकते. "कोकणचा राजा झिम्मा खेळतो", हे गाणे आपण कितीदातरी ऐकलेले अन् तितक्याच वेळा ऐकून दुर्लक्ष केलेले. पण 'कोकणचा राजा' हा लेख वाचल्यानंतर लहानसहान गोष्टींमागे काय कारणे, हेतू असतील हे जाणून घेण्याची जिज्ञासा आपल्याही मनात जागी होते, अन् आपणही विचार करायला लागतो; ही लेखकाची किमया!

या लेखकाचे आणखी एक वैशिष्ट्य 'स्पर्श'सारख्या लेखात दिसते. इथे 'किम्'यांचे बद्दल जे उल्लेख आहेत, किम् बरोबर जे संवाद आहेत ती किम् कोण असा प्रश्न वाचकाला पडतो. किम् ही लेखकाची मैत्रीण? प्रेयसी? की प्रतिभा? पण इथे संदिग्ध असणेच लेखकाला आवडत असावं असंही कधीकधी त्यांच्या लिखाणावरून वाटतं.

द. भि. ची समीक्षा-निर्मिती ही उच्च बौद्धिक पातळीची असते. तसेच पारिभाषिक संज्ञांतच ती गुंतलेली असल्यामुळे केवळ वाङ्मयपारंगताला समजणारी ठरते. (व्यंग्यार्थ, साधारणीकरण, आपपरतटस्थभाव वगैरे) पारिभाषिक संज्ञांनी सजलेली त्यांची समीक्षा साहित्याचा अभ्यासक नसलेल्या पण वाचक असणाऱ्यांच्या अक्षरशः डोक्यावरून जाते. अशा वेळी द. भि.-चे (पारिभाषिक संज्ञांमुळे अवघडलेले) लिखाण वघून सामान्य वाचक चिडून जातो स्वतःवरही अन् द. भि. च्या त्या लिखाणावरही. कारण वाचकाचा आनंद त्याक्षणी हिरावलेला असतो.

'मेघ, मोर आणि मैथिली' प्रमाणे वृत्तपत्रीय स्तंभांच्या निमित्ताने द. भि. नी असेच सहज, मधुर, हलके फुलके लिखाण करून वाचकाचा "आनंद त्याला परत करावा." हीच अपेक्षा.

मेघ, मोर आणि मैथिली
डॉ. द. भि. कुळकर्णी,
विजय प्रकाशन, सीतावर्डी, नागपूर;
पृष्ठे–१२८, मूल्य १२ रुपये.

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गोमंतक : प्रकृती आणि संस्कृती / श्रीनिवास रामचंद्र सिरास

गोमंतक हा भारताचाच एक अविभाज्य घटक असला तरी या गोमंतभूमीची स्वतःचीच अशी काही खास वैशिष्टये प्रत्ययाला येतात. तिथले रमणीय निसर्गसौंदर्य, विभिन्न संस्कृती आणि वैचित्र्याने नटलेली भाषा, कला, संगीत या सर्वांमध्ये पर्यटकाला मोहविण्याची विलक्षण क्षमता आहे. आणि म्हणूनच वारंवार गोव्याला पर्यटनासाठी जाणारेही आहेत तसेच गोवा बघण्याची आकांक्षा मनात फार काळ जोपासून अखेर ती पूर्ण झाल्यावर समाधान मानणारेही आहेत. मात्र जेव्हा पुष्कळसे पर्यटक गोव्याला जातात तेव्हा त्यांना फक्त गोव्याचे भौगोलिक आणि भौतिक दर्शनच घडते; खऱ्या गोव्याची ओळखच होऊ शकली नाही अशी खंत मनामध्ये बाळगून ते परत येतात. या पर्यटकांमध्ये मराठी माणसांचीही संख्या भरपूर आहे. अशांना गोव्याचे इतर आयाम कोणकोणते आहेत, कोणत्या सौंदर्यखुणा गोव्याने शतकानुशतके जपून राखल्या व कशा प्रकारच्या परिवर्तनांमधून ही विदग्ध कलाभूमी विघटित व पुन्हा संघटित होत गेली इत्यादी गोष्टींचा परिचय करून देणे हे प्रस्तुत ग्रंथमालेचे प्रयोजन आहे.

ही ग्रंथमाला जशी परिचयात्मक आहे तशीच ती संशोधनपर राहील याची काळजी लेखकाने घेतलेली आहे हे एक महत्त्वाचे वैशिष्टय. सर्वसामान्य वाचक साधारणपणे संशोधनपर व विद्वज्जड ग्रंथ हाती घ्यायचे टाळतोच. पण प्रस्तुत संशोधनाचा विषय हाच मुळी मानववंशशास्त्र उत्खनन, कला, समाजशास्त्र या साऱ्यांचा कमीअधिक संयोग होऊन बनलेला असल्यामुळे विवेचनात कुठेही रुक्षपणा आलेला नाही. या संशोधन–प्रकल्पाचे सिद्धत्व व साधकत्व या दोन्ही भूमिका जबाबदारीने पार पाडणाऱ्या श्री. वा. द. सातोस्कर यांनी सुरवातीलाच आपल्या प्रस्तावनेत ग्रंथांचे स्वरूप हे शोधन आहे संशोधन नाही, हे मार्मिकपणे स्पष्ट केले आहे.

'गोमंतक : प्रकृती आणि संस्कृती' या ग्रंथमालेतील **'समाजरचना व समाजजीवन'** हा पहिला भाग आहे. आर्यपूर्वकालीन गोमंतक व गोमंतकाचे आर्यीकरण या आरंभीच्या दोन प्रकरणांत लेखकाने गोमंतकाच्या इतिहासावर नवा प्रकाश टाकलेला आढळतो. आदिमानवाची उत्पत्ती भारताबाहेर झालेली नाही, इतकेच नव्हे तर त्याचे वस्तिस्थान महाराष्ट्रातच होते आणि तो पाषाणपूर्वकालीन मानव गोव्यात अस्तित्वात असावा असा लेखकाने अंदाज केला आहे. याकरिता सातोस्करांनी मांडलेले पुरावे त्यांची शोधनक्षमता प्रगट करणारे असेच आहेत. महाराष्ट्रात नवपाषाणयुगीन मानवाची वसाहत सुमारे आठ हजार वर्षांपूर्वीच झाली असे अनेक संशोधकांचे मत आहे. गोव्यातील वसाहत ही त्याहीपूर्वीच्या दोन हजार वर्षांआधी झाली असावी असे लेखकाने अनुमान केले आहे. भारतात सर्वप्रथम जी नेग्रीटो जमात आली ती समुद्र किनाऱ्यावरून येऊन खाली केरळपर्यंत गेली. तसेच आजचा समाज या तथाकथित आदिमानवापासून बनलेला नसून तो भारताबाहेरून आलेल्या विविध मानवकुलांचा बनला आहे या बहुमताशी लेखक इतरांप्रमाणेच सहमत होतात. भारतीयांचे मानववंशशास्त्रदृष्टया वर्गीकरण प्रोटो–ऑस्ट्रालॉईड लोकांचे आगमन, कोल व गोंड हेच गोव्याचे वसाहतकार, यासारख्या अनेक घटनांतून शेवटी लेखकाने मुंडारी व नाग जमाती गोव्यात आल्या होत्या काय, अशा महत्त्वाच्या प्रश्नांचीही चर्चा केलेली आढळते. गोव्याचे आर्यीकरण कसे झाले हे सांगताना लेखकाने परशुरामाच्या कथेचा आधार घेतला. गोव्याचे आर्यीकरण परशु-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रामाने केले हे लेखकाला मान्य असले तरी त्याला परशुराम म्हणजे एक कोडेच वाटत आहे. परशुरामाने इ. पूर्वी अडीच हजार वर्षे वसाहती केल्या व त्यामुळे ब्राह्मणांबरोबरच क्षत्रिय व वैश्यही गोव्यात आले असे मत लेखकाने मांडले आहे. ब्रह्मावर्त या ब्राम्हणांच्या मूलस्थानाची तसेच ब्राम्हणांच्या दुसऱ्या वसाहतीची सलग चर्चाही या प्रकरणात केली आहे.

'हिंदुसमाज-जाती व पोटजाती' व 'हिंदु समाज-जीवन' अशा दोन प्रदीर्घ प्रकरणांतील चर्चा ही हिंदूंच्या जातिव्यवस्था व गोव्यातील जाती, पोटजाती यांची छाननी करणारी आहे. याद्वारे लेखकाने गोव्यात वास्तव्य करणाऱ्या व काही कायम तेथल्याच असणाऱ्या अशा चित्पावन, कऱ्हाडे, पद्ये, भट्टप्रभु, क्रमवंत जोशी, सारस्वत, बारदेसकर सारस्वत व चित्रापूर सारस्वत तसेच गौड ब्राम्हण, पंचाल ब्राम्हण या ब्राम्हणांच्या पोटजातींचा सविस्तरपणे विचार केला आहे. त्याशिवाय हिंदूंमधील मराठा, सुतार, लोहार, सोनार, दैवज्ञ ब्राम्हण, शिंपी, धोबी, तेली, कुंभार, धनगर, खारवी, चांभार, महार, हरिजन व अनुसूचित जाती अशा गोव्यातल्या आजच्या घटकेला अस्तित्वात असणाऱ्या हिंदूंच्या पोटजातींचीही माहिती याच प्रकरणात आलेली आहे. हिंदूंचे समाजजीवन हे संस्कार, बाळंतपण, षष्ठी–पूजन, नामकरण यांसारख्या प्रारंभापासून तर त्यांच्या विवाहरीती, त्यांचे कुलधर्म, देवालये, राहती घरे, कुटुंबपद्धती, आहार, वेशभूषा, अलंकार, वारसा हक्क, मद्यपान, जुगार, देवदासीपद्धती अशा प्रकारच्या विस्तृत आयामांतून चित्रित केलेले आढळते. या समाजजीवनाच्या शोधनचित्रणाला समाजशास्त्रीय दृष्टिकोनातील निरीक्षणाची आवश्यकता असून तिला लेखकाने येथे जास्तीत जास्त न्याय दिल्ला आहे हे प्रकर्षाने जाणवते.

ख्रिश्चन समाज व मुस्लीम समाज यांची राहाणी व विचार, समाज व जीवन यांच्याबद्दलची दोन आणखी विस्तृत प्रकरणे समाविष्ट केलेली आहेत. या प्रकरणांपैकी पहिल्यात ख्रिश्चन कोण? त्यांची जातिव्यवस्था कुठून आली व त्यांचे सामुदायिक धर्मांतर, ब्राम्हणांचे धर्मांतर तसेच ख्रिश्चनातील शूद्र किंवा सुदीर यांच्याबद्दलची बरीच आजपावेतो प्रसिद्धीस न आलेली माहिती लेखकाने याच प्रकरणात दिलेली आहे. गावडे व कुणबी, महार व चांभार, अशा तऱ्हेच्या ज्या जाती गोव्यात अस्तित्वात आहेत त्यांचेही वर्णन लेखकाने पुरेशा जबाबदारीनेच केले आहे. ख्रिश्चनांच्यातील सात संस्कार, बाप्तिस्मा, दृढीकरण, प्रभुप्रवेश, विवाह इत्यादींचेही बारकाईने वर्णन केलेले आढळते. त्याचसोबत ख्रिश्चनांचे समाजजीवन त्यांचे सण, व्रते, गृहजीवन, अलंकार आहार, वेषभूषा इत्यादींचे समग्र वर्णन आहे. 'मुस्लीम समाज-जाती व जीवन' या प्रकरणात गोव्यातले मुसलमान कोठले व त्यांच्या जाती कोणत्या हे सांगून नंतर त्यांच्या जीवनाबद्दल पहिल्या पाच संस्कारांचे तसेच कर्मकांड, सण, उत्सव व व्रते, गृहजीवन व समाजजीवन इत्यादींची अत्यंत बारकाईने शोधलेली माहिती दिलेली आढळते.

शेवटल्या प्रकरणात गोमंतकाबाहेरून गोव्यात येणाऱ्या, तिथलाच रहिवासी होणाऱ्या अशा अस्थिर घटकाच्याबद्दल काही माहिती येते. यामध्ये सर्वात महत्त्वाचे पोर्तुगीज. पोर्तुगीजांच्याव्यतिरिक्तही कच्छ व सौराष्ट्र येथून बरेच लोक व्यापारी म्हणून गोव्यात आले. उर्दू व द्रविड भाषिकांचा यानंतर फार मोठा असा लोंढाच गोव्यात आला. बंगाली, शिख व जैन हेसुद्धा गोव्याचेच कायम रहिवासी झालेले सापडतात. या अखेरच्या प्रकरणात लेखकाने सध्याच्या परिस्थितीत गोव्याचे जे सामायीकरण झाले आहे त्याविषयी मोठे अर्थपूर्ण उद्गार काढलेले आढळतात. आशय असा की, जे आज स्वतः गोमंतकीयेतर म्हणूनच गोव्यात वास्तव्य करून आहेत तेच पुन्हा उद्याचे गोमंतकीय होणार आहेत. लेखकाने केलेले हे अनुमान सत्य आहेच पण त्यामध्ये समाजमानस शास्त्राची खरीखुरी जाणीव लेखकाला असल्याची दखल मिळते हे निश्चित. मनुष्याला जमिनीवर उभे राहायला पाय जितके आवश्यक तितकीच त्या पायांची हालचाल करून

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पोटापाण्यासाठी, जगण्यासाठी जमीनही आवश्यक असते. मनुष्य जसा समाजाचा घटक तसाच समाजही मनुष्याच्या बाबत सर्वसमावेशकता बाळगूनच असतो. त्यामुळे गोव्यात गेलेल्या परप्रांतीयांच्या गरजा जो गोमांतकीय समाज आपल्यात त्यांना सामावून पूर्ण करतो त्या परप्रांतीयांना गोव्याची माती ही 'माझी माती' असल्याची भावना निर्माण व्हायला कसलाही अडथळा उरत नाही. मातीसाठीच शेवटी माणूस असतो. तिथपावतो त्याला तग धरून राहाणे शक्य असते.

प्रास्ताविक निवेदनात सातोस्करांनी हे स्पष्टपणे प्रगट केलेच आहे की, लेखक हा सध्या विद्यार्थीच असला तरीपण आता तो एक वृद्ध विद्यार्थी आहे. म्हणजेच गोव्याविषयी त्याच्या विविध आयामांचे जे संशोधन व्हावयाला हवे आहे त्यांची जबाबदारी यापुढे तरुण पिढीची आहे. मात्र या एखाद्या अहोरात्र खपणाच्या लेण्यांच्या कारागिरासारख्या परिश्रमांचे मूर्तिमंत रूप शोभणाऱ्या महान कार्याला लेखकाने स्वतः 'संशोधन' न म्हणता 'शोधन' हे नाव द्यावे हे त्यांच्या विनयाचे निदर्शक आहे. हा एक अत्यंत महत्त्वपूर्ण असा संदर्भग्रंथ आहे. त्यामुळे या ग्रंथमालिकेतला पुढील प्रत्येक खंड वाचण्याची जिज्ञासू वाचकाला उत्सुकता व ओढ लागून राहिल्याशिवाय राहणार नाही. मराठीतील गोव्याविषयीच्या संदर्भ-ग्रंथांत मोलाची भर घातल्याबद्दल लेखक श्री. सातोस्कर व प्रकाशक श्री. शरद गोगटे यांचे अभ्यासक सदैव ऋणी राहतील.

गोमंतक : प्रकृती आणि संस्कृती
खंड–१, समाज रचना व समाजजीवन
ले. बा. द. सातोस्कर
प्रकाशक– शरद गोगटे
शुभदा सारस्वत, ६७ पाटील इस्टेट,
पुणे–४११००५
पृष्ठे– ३२—१६ सचित्र — ६१४
प्रथम आवृत्ती–१९७९; मूल्य ७५ रुपये.

⊕ ⊕ ⊕

(पृष्ठ २१८ वरुन)

अलौकिकाकडे, जडशीलाकडून स्फुरणचैतन्याकडे, स्थिरचराकडून अनंताकडे, अंधाराकडून प्रकाशाकडे आणि समकालिकतेकडून सार्वत्रिकतेकडे जाण्यासाठी आरंभिलेला हा महाप्रवास ! रूपसामावलें दर्शन ढाकले। अंग हारपले तेचि भावी पाहोजाय तव पाहण्या वेगळे। ते सुख सोहळे कोण बोले जेथें जाय तेथें मौनचि पडिले। बोलवेना पुढे काय करू आदिअंती तोचि सवरायरितु। रूपनामरहितु नीत नवा

अशा ज्ञानदेवांनी एका अभंगातही परतत्त्वाच्या निःशब्दावस्थेतील अनुभूतीचे दर्शन घडविले आहे. 'तूते अवघे गुज म्या सांगावे। वाचेविण बोलावे निःशब्दाकारे' हीच मनोऽवस्था अमृतानुभवातूनही गोचर होते.

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ललित साहित्य आणि भावनाविष्कार

शशिकान्त लोखंडे

ललित साहित्य ही एका प्रतिभावान व्यक्तिमनाची नवनिर्मिती आहे. तिचा निर्मात्याच्या भावनांशी अपरिहार्य संबंध आहे. भावनेच्या आविष्काराचे रूप म्हणजे निर्मिती. साहित्याचे माध्यम भाषा आहे म्हणूनच भावनेच्या आविष्काराचे माध्यमही भाषा आहे. भाषेद्वारे भावनाविष्कार जेवढा समर्थपणे करता येतो तेवढा भाषाबाह्य माध्यमांद्वारे करता येत नाही. भावना आणि भाषा या संबंधात भावनेला अधिक महत्त्व आहे. भावनाविष्काराखेरीज कलाकृती होऊ शकत नाही, हे खरे असले तरी सर्वत्र भावनांना कलेद्वारे आविष्कृत करता येतेच असे नाही. भावना विविध प्रकारच्या आहेत, त्यांचे स्वरूपाकारही वैविष्टयपूर्ण आहेत. खाजगी भावनांना कल्पनाशक्तीचा स्पर्श झाल्याखेरीज त्यातील खाजगीपण नष्ट होत नाही. हे खाजगीपण नष्ट झाले म्हणजे मग ती विशिष्ट भावना कलेच्या विवक्षित रूपाने (Form) अवतीर्ण होते. हे विवक्षित रूपच मग भावनात्मक होते. भावना आणि संयम याही गोष्टी महत्त्वाच्या आहेत. योग्य प्रमाणात भावनांचे आविष्करण झाल्यास रस उत्पन्न होतो आणि कलाकृती परिणामक्षम होते. फाजील–असंयमी भावनाविष्कार हा कलाविघातक ठरतो. भावनाविष्काराचे संयमी वा फाजील रूपाचे परिमाण भाषाच आहे. निर्मात्याच्या भाषेवरून, शैलीवरून हे रूप ओळखता येते. भाषेचे अलंकारप्राचुर्य, पाल्हाळ, चमत्कृतीचा हव्यास, अद्भुतता, गूढता, अतिकाव्यमयता या दोषांमुळे भावनेचा आविष्कार असंयमित असल्याचे ओखता येते. भावना वेडीवाकडी व्यक्त होऊन चालत नाही. ती आविष्कृत ठरण्यासाठी निर्मात्याला कलेच्या रूपाचे आणि रूपवर्धक भाषेचे भान विसरून चालत नाही.

भावना सहजोद्गारी असते, हे मान्य. परंतु ती overflow असायलाच पाहिजे असे नाही, ती मननात्मक recollected पाहिजे असे नाही; परंतु ती in tranquility समधावस्थेतील असली पाहिजे. सहजोद्गारी भावनेत संयमन नसेल तर ती भावना अविकृतपणे व्यक्त होणार नाही, ती अनाकलनीय होईल. लेखकाच्या-निर्मात्याच्या भावविवशतेतून त्याची निर्मिती 'खाजगी' म्हणजे 'व्याजात्म' (Mock) बनते. दुःखाचे, कारुण्याचे वा हास्यादी मानवी विकारांचे अतिदर्शन वा भडक दर्शन हे व्याजात्म-भावनेचे Mock sentiment चे फलित आहे. खऱ्या भावनेला कधी शब्द सापडतोच असे नाही; परंतु शब्द सापडलेल्या भावना ह्या खऱ्याच असतात असेही नाही. तुलनेने पाहू जाता बॉल्झॅकच्या कादंबऱ्यांपेक्षा आपणास आशय सदृश्य परिणामदृष्ट्या हरिभाऊंच्या कादंबऱ्या जवळच्या वाटतात. जेन ऑस्टिन्, डिकिन्स्, थॅकरे, हार्डी वा कॉरेली यांच्या लेखनात सार्वत्रिक अर्थाने फाजील भावनांचा आविष्कार स्पष्ट दिसल्यामुळे त्यांचे लेखन वाचनीय आहे असे फारसे वाटत नाही. भावनाविष्काराची प्रमाणबद्धता गाल्सवर्दीही मान्य करतो:

"The longer I live, the more I live, the more I became convinced that People only use that favourite reaproch-sentimental-to stigmati sympathy with sufferings that they themselves have been unwilling or unable do realise. The moment they do realise, they become JUST as sentimental, Just as moved by Pity & anger far that is what sentimental means-as those at whom they sneer. "

साहित्य-निर्मितीचा केन्द्रभाग भावना आहे, या भावनेच्या स्वरूपावरूनच निर्मितीचा परिघ

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

ठरतो. हे केन्द्र स्थिर असते, आणि परिघाचे बिन्दू त्या केन्द्राकडे आकर्षिले जातात. मात्र एवढी ताकद वा संयम त्या केन्द्रभागातच हवा. केन्द्रानुगामी भावना आणि केन्द्र यात सलोखा असतोच असे नाही पण तो असावा. म्हणजे मग केंद्रभाग हा परिणामाचा एक महत्त्वपूर्ण घटक ठरू शकतो. हे केन्द्र जर खाजगी भावनांचे असेल तर परिघ-बिन्दू त्याच दिशेने जातील आणि कलाकृतीचा संपूर्ण परिघ अनाकलनीय ठरेल. केन्द्र गतिमान झाले की परिघ गतिमान होतो आणि त्यातून एकच एक परिणाम साधला जातो.

भाषेच्या अतिरिक्त हव्यासामुळे निर्मितीचा केन्द्रभाग म्हणजे भावना व्याजात्म–फाजील बनते. असा लेखक शैलीकार म्हणून उठून दिसतो. परंतु त्याची शैली ही त्याच्या निर्मितीच्या आशयाशी फटकून वागताना दिसते.

हरिभाऊ आपट्यांच्या कादंबऱ्यांतील पाल्हाळ, ना. सी. फडक्यांच्या कादंबऱ्यांत अतिकाव्यमयता, केतकरांच्या कादंबऱ्यांतील स्वैरता आणि वा. म. जोशांच्या कादंबऱ्यांतील तत्त्वप्रधानता, यांमुळेच या साऱ्यांचे लेखन अतिशय भावनाविष्कारी झालेले दिसून येते. रा. ग. गडकऱ्यांच्या 'पुण्यप्रभाव' वा 'भावबंधन' नाटकांतील शब्दचमत्कृती भावनेचा व्याजात्माविष्कारच म्हणावयास हवा. उदाहरणेच द्यायची झाली तर सावरकरांची राष्ट्रीय कविता, बाळ कोल्हटकर वा वसंत कानेटकरांची नाटके, अत्रे–लिखित अग्रलेख वा मृत्युलेख, आजच्या काळात गुरुनाथ धुरींची कविता, बाबूराव बागुलांची 'सूड', प्र. श्री. नेरूरकरांची 'नाळ' ही कथा, दया, पवार, अर्जुन डांगळे, चेंदवणकर यांची दलित कविता शिवाय सत्यजीत रे-दिग्दर्शित चित्रपट इ. Mock sentiment ने भारलेल्या आहेत.

साहित्यान्तर्गत त्या त्या पात्राच्या स्वभावानुसार त्या पात्राची भावविवशता ही काही दोषास्पद नाही. उदा. शेक्सपीअरचा हॅम्लेट. हॅम्लेटचा स्वभावच मुळी भावविवशतेचा आहे. त्यामुळेच त्याच्यापुढे To be or not to be ही जीवघेणी समस्या उभी राहिली. या संदर्भात महत्त्वाचा मुद्दा एवढाच आहे की निर्मात्याने भावविवश पद्धतीने निर्मिती करू नये. आजची दलित कविता याच दोषाने व्यापलेली आहे. अशा भावविवशतेमधूनच पात्रांना उदात्ततेच्या sublimation च्या पायरीवर आणून सोडतो. कै. वि. स. खांडेकरांच्या सर्वच कादंबऱ्या या तऱ्हेच्या आहेत. खांडेकरांना त्यांच्या कादंबऱ्यांना दीर्घ प्रदीर्घ प्रस्तावना लिहाव्या लागल्या. त्या याच भावविवशतेच्या वृत्तीमधून.

प्रखर ध्येयवाद, अतिराग-चीड किंवा विशिष्ट तत्त्वप्रणालीच्या बुद्धीवरील व मनावरील अम्मल यातून लेखकाची लेखनवृत्ती भावविवशतेने व्यापून जाऊ शकते. काही वेळा मानसिक विकृतीही या भावविवशतेला जागृत करू शकते.

प्रखर ध्येयवादातून खांडेकरांच्या लेखनात, अतिराग-चीडेमधून दलित व बौद्ध लेखकाच्या लेखनात तर विशिष्ट तत्त्वप्रणालीच्या अंमलामधून मार्क्सवादी, गांधीवादी लेखकांच्या लेखनात मुख्यत्वेकरून जाणवतो तो फाजील भावनाविष्कार. आजकालच्या अश्लील (देहिक वर्णनांना प्राधान्य देणारे) लेखनात तर फाजील भावनाविष्काराचा अतिरेक जाणवतो.

संयमित भावनाविष्काराची उदाहरणे द्यायची झाल्यास काही कलाकृतींचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. काळोखाचे अंग (ए. वि. जोशी), रणांगण (विश्राम बेडेकर), कोसला (भालचन्द्र नेमाडे), सात सक्के त्रेचाळीस (किरण नगरकर), सं. सौभद्र (अण्णासाहेब किर्लोस्कर), इ. इ.

साहित्याचे माध्यम भाषा आहे म्हणूनच भावनेच्या आविष्काराचे माध्यमही भाषा आहे. हे माध्यम निर्माता कशातऱ्हेने योजतो यावरूनच त्याच्या भावनाविष्काराची प्रत ठरविता येते. लेखक भावविवश वृत्तीचा असेल तर तो साहित्याची भाषा अधिक भान ठेवून योजतो आणि त्यामधून त्याच्या भावनाविष्काराला खोटेपणा येतो. भाषेचे अतिरिक्त भान हे लेखकाच्या मनोदौर्बल्या-

(पृष्ठ २२९ वर पहा)

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुभव आणि आकार / श्रीनिवास रामचंद्र सिरास

प्रा. डॉ. प्रल्हाद वडेर यांच्या 'अनुभव आणि आकार' या शीर्षकाच्या प्रस्तुत ग्रंथामध्ये काही निवडक टीकालेखांचा समावेश आहे. हे लेख मागील काही वर्षात मान्यवर नियतकालिकांनी वेळोवेळी प्रसिद्ध केल्यानंतर आता त्या लेखांचा सलग असा अनुभव या पुस्तकाच्या रूपात उपलब्ध झालेला आहे. सर्वप्रथम लक्ष वेधून घेते ते या पुस्तकाचे नाव व त्याला असणारे संवेदनसामर्थ्य. आकार ही एक दृक्संवेदना तर अनुभव हा एका संपूर्ण व्यक्तिमत्वाला उपलब्ध झालेल्या, होत असणाऱ्या संवेदनांचा संघात. साहित्याची निर्मिती प्रतिभावंत आपल्या संवेदनांच्या आधारातून करतो ही या टीकालेखनापाठीमागली वर्चस्वाची भावना आहे. ती भावना जेव्हा जाणीव बनेल तेव्हा यासारख्या टीकालेखनाला अधिकच वरच्या पातळीचे मूल्य प्राप्त होईल हे निश्चित. कोणत्याही भाषेतील साहित्य असो, त्या साहित्याचा 'अनुभव' ही एक प्रमुख संवेदना ठरते. या पुस्तकात मात्र फक्त अशाच संवेदनांना ग्रथित केले आहे की ज्यांना एक विशिष्ट उच्चतेची पातळी गाठता येणे शक्य आहे. म्हणजेच 'अनुभव आणि आकारमधल्या' समीक्षाविषय झालेल्या लेखनकृतींना एक स्वतःचा असा विशिष्ट संदर्भ आहे. हा संदर्भ दोन प्रकारांचा ठरतो. या सर्वच लेखनकृती सहाव्या दशकाच्या उत्तरार्धापासून सातव्या दशकाच्या उत्तरार्धापर्यंतच्या काळातील गाजलेल्या आणि एक महत्त्वाचे स्थान लाभलेल्या साहित्यकृती आहेत. दुसरी गोष्ट म्हणजे या सर्वच लेखनकृतींच्यामुळे काहींना काही प्रमाणात चर्चेचे, वादंगाचे पुरेसे खाद्य मराठी टीकाकारांना पुरविले गेले आहे. त्यामुळेच या अनुभवांना उच्च श्रेणीच्या अनुभवांचे आकार म्हणणे योग्य ठरेल. कालसापेक्ष आणि अवधान-सापेक्ष अशा या दोन संदर्भांच्या दृष्टिकोनांतून या ग्रंथाकडे पाहिले पाहिजे असे वाचकाला जाणवते. त्यात जसा अ–नियतकालिकांचा अनुभव आला आहे तसाच त्याच काळात सहनशीलतेने गद्य-पद्य रचना करणाऱ्या बा. भ. बोरकर, शंकर रामाणी व्यंकटेश माडगूळकर, आनंद यादव, कमल देसाई, श्री. ज. जोशी अशांच्या अनुभवांचा तपास घेण्याचा स्तुत्य प्रयत्न आढळतो.

मुळामध्ये ही सर्व ग्रंथ-परीक्षणे असूनही त्यांच्या सर्वंकषतेमुळे एकत्र वाचनातून काही गोष्टी सहजपणे जाणवण्यासारख्या आहेत. पहिल्या प्रथम जे जाणवते ते म्हणजे मराठीसाठी 'नवे' लिहिताना लेखक आपल्या प्रतिभेवर पूर्णपणे कधी विसंबून राहात नाही तर तो फक्त स्वतःच्याच एकटचाच्या व्यक्तिमत्वावर अवलंबून असतो. हे त्याचे 'अवलंबून राहाणे' वाचकाला मात्र जाचक ठरल्यामुळे या तथाकथित 'नवे' मानल्या गेलेल्या लेखनाला फक्त लगेच दहाच वर्षांत 'जुने' म्हणायची पाळी यायला लागली. याचे कारण त्या साहित्याचा आविष्कार हा जरी 'अनुभवा'तून होत असला तरीही हे अनुभव प्रतिभेचे किती आणि व्यक्तीचे किती हा प्रश्न शिल्लक उरतोच. इथे उदाहरण देणे इष्ट ठरेल, कारण जर या म्हणण्याला पुरावा नसला तर हे म्हणणे फोल राहील. स्वतः कमल देसाई आपल्या ज्या कथाविश्वामधून ठराविक स्त्रीचे चित्रण करीत राहातात त्यांच्यापासून स्वतः लेखिकेचे चित्र अलग होऊ शकते काय असा प्रश्न निर्माण होतो. त्याचप्रमाणे एखाद्या प्रतिभावान लेखकाचे स्वतःचेच चित्र त्याच्या साहित्यामधून जर प्रगट झाले तर ते प्रतिभाशाली पंगुत्व ठरते काय अशासारखा प्रश्नही मनांत येतोच. परंतु प्रा. प्रल्हाद वडेर यांनी या लेखांमध्ये अशा प्रश्नांचा निर्देश करायचे टाळलेले आहे हे मात्र प्रकर्षाने जाणवते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रत्येक दुसरी पिढी ही नेहमी तिच्या आधीच्या पिढीचा काही प्रमाणात तरी अस्वीकार करते. या स्वीकार न करण्यामागले कारणही तसेच बलशाली असावे लागते. 'अनुभव आणि आकार'मध्ये ज्यांनी प्रतिनिधित्व केले ते अगोदरच्या पिढीचा स्वीकार करायचे टाळतातच. मग अशांच्यावर गाडगीळ व मर्ढेकर यांच्या परिणामाचा शोध त्या 'नव्यांच्या' साहित्यात घेऊन काय फायदा? यापेक्षा नव्यांच्या जाणीवांचे हे मानसशास्त्रीय विघटन कसे कसे आणि का होते याचा शोध जास्ती समर्पक ठरेल. कमल देसाई, दिलीप चित्रे, इहाके यांसारख्या केवळ इंग्लीश पेपरबॅक जगताने स्मित आलेल्या व्यक्तिमत्वांच्याकडून अंधारयात्रेशिवाय निराळी अपेक्षा करणे निरर्थक ठरेल---मात्र त्याही साहित्यिकांच्या या विशिष्ट लेखनाची कारणमीमांसा करणे आवश्यकच ठरेल.

थोडक्यात 'अनुभव' हा जसा साहित्याचा असतो तसाच आणि तितकाच तो जीवनाचाही असतो. साहित्याचा अनुभव हा माणसाला फक्त खाद्य पुरवितो, स्वप्ने दाखवितो---त्याला तो कायमची संगत देतच नाही. उलट जीवनाचा अनुभव हा माणसामाणसांच्या विभिन्न प्रकृतींना जन्म देतो. तो अनुभव प्रत्यक्ष आणि चिरंतन सोबत करणारा असल्याने विशेष उल्लेखनीय ठरतो.

आठव्या दशकातल्या मराठी साहित्याचा प्रेरक अनुभव हा जास्तीत जास्त जीवननिष्ठ असावा अशीच इच्छा, गेल्या दशकामधल्या अनुभवांचे हे विभक्त आणि नैराश्यामुळे दुर्बल झालेल्या मनांचे दर्शन व आकार बघून मनाला जाणवते. प्रा. वडेर यांनी जर या सर्व टीकालेखांना संगृहीत केले नसते तर गेल्या दशकातील साहित्यासमोर असे समीक्षेचे दर्पण उभे करणे-त्यातही 'सत्यकथा'-निष्ठांच्या, शक्य झालेही नसते. हे सगळेच टीकालेख स्वतः समीक्षक असणाऱ्या प्रा. प्रल्हाद वडेर यांच्या मौलिक शब्द कळेची आणि प्रगल्भ टीकादृष्टीची जागोजाग प्रचीती आणून देतात.

अनुभव आणि आकार
लेखक प्रा. पल्हाद वडेर
प्रकाशक : मेहता पब्लिशिंग हाऊस
२०६, चित्रशाळा बिल्डिंग, सदाशिव पेठ, पुणे-४११०३०
प्रथमावृत्ती- जुलै, १९७९;
पृष्ठे - १४७; मूल्य- २० रुपये.

⊕ ⊕ ⊕

(पृष्ठ २२७ वरुन)

चेच निदर्शक आहे. अलिकडील नव्या पिढीतील लेखकात सामाजिक जाणिवेच्या प्रतिज्ञेमधून असा भापाभिनिवेशही जाणवल्यास आश्चर्य ते काय! सुधाकर गायकवाड, दया पवार, रजनी परुळेकर, वसंत पाटणकर, अशोक बागवे, सुधाकर गायधनी, त्र्यंबक सपकाळे याही अनेक कवींच्या लेखनकृती या भावविवशतेमधून बाहेर पडण्याच्या मार्गात आहेत ही बाब स्वागताई आहे.

साहित्यनिर्मिती ही काही भावविवश व्यक्तिमनाची नवकृती नव्हे. कलाविलासाच्या विशिष्ट नियमांमुळे मूळ व्यक्तिमत्त्वाहून ती निराळी होणे साहजिक आहे. फक्त साहित्याची सांस्कृतिक वा कलात्मक प्रेरणा त्या व्यक्तिमनाशी निगडित राहाते हे मात्र नाकारता येणार नाही.

⊗ ⊗ ⊗

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कालापुढती चार पाऊले / अक्षयकुमार काळे

अलीकडे चरित्र-आत्मचरित्राच्या दालनात उद्योगपतींच्या चरित्रांची व आत्मचरित्रांची हळू हळू भर पडत आहे. प्रस्तुत चरित्रांचे मराठी वाङ्मयातील स्थान निश्चित करणे अत्यावश्यक झाले आहे. वस्तुतः चरित्र किंवा आत्मचरित्र ह्या कादंबरीप्रमाणेच समर्थ ललितकृती होत. आतापर्यंत लिहिल्या गेलेल्या चरित्रवाङ्मयाचा स्थूलमानाने आढावा घेतल्यास विशिष्ट अपरिहार्य परिस्थितीतून चरित्रांची निर्मिती झाल्याचे दृष्टोत्पत्तीस येते. अशा चरित्रांमध्ये चरित्रनायकाशी लेखकाची जुळलेली मनोवृत्ती निदर्शनास येते. चरित्रनायकाशी झालेल्या मनोमीलनातून लेखक ते चरित्र साकार करीत असतो. म्हणूनच अशा चरित्रांमध्ये एक प्रकारची वाङ्मयीन अपरिहार्यता जाणवते. एखाद्या कवितेच्या निर्मितीपूर्वी किंवा एखाद्या कथेच्या निर्मितीपूर्वी ज्या व्याकुळ प्रसववेदना होतात, त्याच चरित्र लिहिण्यापूर्वीदेखील चरित्रकाराला होतात, नव्हे व्हाव्यात. "कालापुढती चार पाऊले" हे श्रीयुत सविता भावे यांनी लिहिलेले श्री. शंतनुराव किर्लोस्कर यांचे चरित्र अशा प्रसववेदनातून निर्माण झालेले दिसत नाही. डाव्या विचारसरणीच्या सविता भाव्यांना याची जाणीव असल्यामुळे प्रस्तावनेत पुढे येणाऱ्या आक्षेपाला त्यांनी आधीच उत्तर देऊन ठेवले आहे. अर्थातच त्यातील लंगडी असमर्थनीयता चाणाक्ष वाचकांच्या सहजच लक्षात येईल.

प्रस्तुत चरित्रात शंतनुराव किर्लोस्करांच्या निमित्ताने किर्लोस्करांच्या उद्योगी घराण्यातील तीन पिढ्यांचे साद्यंत वर्णन सविता भावे ह्यांनी केलेले आहे. त्यातल्यात्यातही शंतनुराव आणि त्यांचे वडिल ह्यांचे चरित्र भाव्यांनी विस्ताराने रंगविले आहे.

शंतनुरावांचे व्यक्तिमत्व हे त्यांच्या प्रचंड मोठ्या उद्योगाचे प्रतीक आहे व हे सविता भावे ह्यांच्या मनात कायमचे ठसले असल्यामुळे या चरित्रात एखाद्या ऑईल एंजीनकडे किंवा त्यांच्या घडणीकडे जितक्या निश्चलपणे पाहावे तितक्याच निश्चलपणे श्री. भावे ह्यांनी शंतनुरावांच्या जीवनाकडे पाहिले आहे. शंतनुरावांच्याबद्दल निरनिराळ्या लोकांनी सांगितलेल्या कितीतरी आठवणींचा खजीना भाव्यांनी वाचकांसमोर मुक्तहस्ताने उघळला असला तरी शंतनुरावांचे खरेखुरे व्यक्तिमत्व त्यातून उभे होत नाही. त्या सगळ्या आठवणी त्यांच्या व्यक्तिमत्वाला चिकटविण्यासारख्या उपऱ्या वाटतात. वास्तविक पाहता शंतनुरावांच्या बाह्य जीवनाविषयी म्हणजेच त्यांच्या यशस्वी कर्तबगार कारखानदारीविषयी जितकी वाचकांना उत्सुकता असते, त्यापेक्षा कितीतरी अधिक उत्सुकता त्यांच्या आंतरिक जीवनाविषयी त्यांच्या मनाविषयी असते. पण संपूर्ण चरित्र वाचून ह्या आंतरिक घडणीविषयी अंतरंगातील सूक्ष्म पापुद्र्यांविषयी काडीमात्र कल्पना वाचकांना येत नाही. या दृष्टीने प्रस्तुत चरित्रकार संपूर्णपणे अयशस्वी झाला आहे, हे मोठ्या खेदाने कबूल करावे लागते. ही ह्या चरित्रातील मोठी उणीव वगळताही चरित्र या दृष्टीने **प्रस्तुत** चरित्र बेतास बातच उतरले आहे. भाव्यांची शैलीदेखील अत्यंत ढिसाळ आहे. ओघवत्या शैलीचा अभाव प्रस्तुत चरित्र वाचताना प्रकर्षाने जाणवतो. एका मागोमाग एक जोडलेल्या आठवणींचा संच असेच या चरित्राचे वर्णन करावे लागेल. प्रस्तुत चरित्र वाचल्यावर हे स्पष्टपणे जाणवते की हे शंतनुराव किर्लोस्करांचे चरित्र नसून किर्लोस्कर कारखानदारीच्या इतिहासाचा तो लघुपटच आहे. इतका या चरित्र-

(पृष्ठ २३५ वर पहा)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सह्याद्रीच्या डोंगरदऱ्यात / सौ. मालती साठे

श्री. वसंत चिंचाळकर एक वैदर्भीय कथालेखक– कथालेखना इतके ललित लेखनातही मान्यता प्राप्त झालेले. वैदर्भीय मातीचा निर्भीडपणा लेखणीत पुरेपूर सामावलेला. सामाजिक जाणीव आणि अन्तस्पर्शीलेखन हे त्यांचे वैशिष्ट्य! म्हणूनच अलिकडे महाराष्ट्र शासनाच्या कामगार कल्याण मंडळाने 'गुणवंत कामगार' हा पुरस्कार देऊन त्यांचा यथोचित गौरव केला आहे.

'सह्याद्रीच्या डोंगरदऱ्यात' या पुस्तकात चिंचाळकरांनी ऐतिहासिक स्थळांच्या यात्रेचे काव्यमय वर्णन रसिकांसाठी प्रस्तुत केले आहे. या पुस्तकाला, शिवरायांबद्दल नितांत आदर असणाऱ्या व शिवकालीन स्थळांना भेटी देणाऱ्या महाराष्ट्रातील ख्यातनाम कादंबरीकार गो. नी. दांडेकर यांची सुरस प्रस्तावना लाभली आहे. या पुस्तकात अकरा ललितरम्य लेखांचा समावेश आहे. एक एक लेख म्हणजे जणू एका रसिक यात्रिकानं, त्या त्या स्थळांना गायिलेली निसर्गसूक्तेच आहेत.

या प्रवासात फाजील चिकित्सक, तांत्रिक वादात शिरून इतिहासाची चिरफाड करणारी मंडळी लेखकासोबत नव्हती, तर शिवरायांबद्दल नितांत आदर आणि श्रद्धाभाव मनात बाळगणारी कलंदर वृत्तीची मंडळी सोबत होती. अशा वातावरणात लेखकाचे कविमन या यात्रेतील भावमधुर आणि उदात्त क्षण जपण्यात यशस्वी झाले. गडबुरुजांशी, सागखाऱ्याशी, मावळ-माणसाशी अन्वर्थक शब्दसंवाद घडला. आजू-बाजूच्या निसर्गात, भग्न अवशेषात व भोळ्या-भावड्या पण उदार मनाच्या सामान्य माणसात महाराजांचे अशरीरी दर्शन घडले.

शिवदुर्गांची यात्रा करताना रखरखते उन्ह, कोसळणारा पाऊस यांच्याशी सामना देत उत्तुंग डोंगर आणि भयावह काळदऱ्या पायाखाली तुडविल्या. त्या साऱ्या अद्‌भूतरम्य आणि गूढ क्षणांची सोबत अशी की वाचक त्यात स्वतःला हरवून बसतो. तर लेखकाचे कलंदरपण कसे जागत असावे? मुरुड-जंजिऱ्याच्या तटावर माडलेल्या प्रचंड तोफांतून त्यांना भयचकित करणारे प्रचंड स्फोटक आवाजाचे स्मरण होत नाही तर या तोफांच्या साक्षीनं त्यानं खोल तळातून आलेले रुदन आणि अंगअंग काटा करणाऱ्या करुण किंकाळ्या ऐकायला येतात. रायगडा-वरील पौर्णिमेच्या रात्री साजरा झालेला होळीचा सण, कुठेतरी डफावर पडलेली थाप, तुणतुणे झंकारले असल्यास सुखदभास थेट त्या वातावरणात नेऊन पोहचवितात.

श्री. चिंचाळकर यांची भाषाशैली उत्कट आहे. ती थेट आणि अर्थवाही आहे. 'चन्द्ररसात ओलावत इतस्ततः विखुरलेले खेडे.' 'पौर्णिमेचा चंद्र म्हणजे जणू ताजी थोपली भाकरी...' हे सारे एकदम लाजवाब वाटते. एव्हढेच नव्हे तर त्यांच्या लेखणीला वक्रोक्तीचे कसबही आहे. राजधानी रायगड या लेखात आणि अन्य लेखांतूनही त्याचा सुखद परिचय होतो. हेच केवळ असते तर 'सह्याद्रीच्या डोंगरदऱ्यात' हे पुस्तक छान वाचनीय झाले असते. पण त्यांच्या लेखनाला जीवनविषयक निष्ठांची बैठक आहे. काही निश्चित विचारधारा आहे. त्यामुळे त्यांच्या लेख-नाला, रसिकतेसोबत तत्वज्ञाच्या वृत्तीचा परि-स्पर्श झाला आहे. त्यामुळेच भूतकाळात भावडे पणानं न हरविता, वर्तमानाचे योग्य मूल्यमापन प्रत्येक ठिकाणी होत असते. आणि कोकणच्या माणसांची भंगलेली स्वप्ने, उपेक्षेने विदीर्ण झालेली मने, शिवकालीन वैभावाचा विपर्यास, मावळ माणसाचे भयावह दारिद्र्य यांमुळे ते हृदयतळात

(पृष्ठ २३५ वर पहा)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीच्या लेखनातील शुद्धाशुद्धविवेक / डॉ. वि. बा. प्रभुदेसाई

सतत बदलत राहणे हा मौखिक व्यवहारामध्ये प्रचलित असणाऱ्या जगातील सर्वच भाषांचा एक स्वभावधर्म आहे. मराठी ही या अर्थाने अशीच एक 'जिवंत' भाषा असल्यामुळे तिच्यातील मूलभूत ध्वनींमध्येही एकसारखे परिवर्तन होत राहणे हे अपरिहार्यच ठरते. या ध्वनिपरिवर्तनाची योग्य ती दखल घेऊन भाषेच्या वर्णमालेचा जसा अधूनमधून पुनर्विचार करावा लागतो तसाच तो लेखनविषयक नियमांच्या बाबतीतही करावा लागतो. जुन्या काळी महाराष्ट्र साहित्य परिषद, विदर्भ साहित्य संघ, यासारख्या साहित्य-संस्थांनी आणि मुंबई विद्यापीठासारख्या मॅट्रिकपासून अनेक उच्च पदव्यांपर्यंतच्या अभ्यासक्रमांची सोय असलेल्या विश्वविद्यालयाने मराठीच्या 'शुद्धलेखनाचा' वेळोवेळी विचार करून त्यासंबंधीचे नियम तयार केले होते. अलीकडे हा ऐतिहासिक वारसा परंपरेने 'मराठी साहित्य महामंडळा'कडे आलेला आहे.

'मराठी भाषेचे शुद्धलेखन' या विषयावर विवेचन करताना प्रा. गणेश हरी केळकर यांनी 'मराठी व्याकरणाची मूलतत्त्वे' या आपल्या ग्रंथात काही महत्त्वाचे विचार मांडले आहेत, ते असे आहेत :—

(१) मराठी लेखनावर भाषेच्या परंपरेचा हक्क किती रहावा व संस्कृत भाषेच्या नियमांचा पगडा किती रहावा; तसेच शुद्धाशुद्ध ठरविताना उच्चारावरूनच मुख्यतः ठरवावे काय; असे दोन मुख्य प्रश्न या बाबतीत उपस्थित झालेले आहेत.

(२) प्रत्येक भाषेचे कोणत्याही काळात एकच स्वरूप सर्वत्र दिसत नाही; तर प्रांतभेदाप्रमाणे तिची वेगवेगळी रूपे एकाच काळी चालू असतात. तसेच, कालगतीनुसार भाषेत फरक होत जातो. हे दोन सिद्धांत सर्व भाषाकोविदांना मान्य झालेले आहेत.

(३) भाषेविषयी लिहिता-बोलताना आपण 'शुद्ध' किंवा 'अशुद्ध' असे जे प्रयोग करितो तेथे शुद्ध म्हणजे कालदेशपरत्वाने चार शिष्ट लोकांना समजण्याजोगे व मान्य व अशुद्ध म्हणजे तसे नसेल ते, असाच त्या शब्दांचा अर्थ केला पाहिजे.

(४) जी भाषा शाळांतून व विद्यालयांतून शिकविण्यांत येते; त्या भाषेत ती बोलणारांपैकी विचारवंत व पुढारलेल्या लोकांच्या बोलण्या-लिहिण्याची भाषा एकच असते. ती एकच असावीही लागते व त्या भाषेत, किंवा भाषेच्या त्या प्रकारातच, त्या लोकांचा बौद्धिक संसार होत असतो. त्या प्रकाराबरोबरच त्याच्याहून थोडेसे भिन्न प्रकार, भिन्न रूढी, भिन्न संप्रदाय, भिन्न प्रयोग, कमी विचारवंत किंवा मागासलेल्या लोकांत रूढ असतात, व या इतर प्रकारांचा उपयोग बहुत करून बोलण्यात तेवढा होतो, लिहिण्यापर्यंत त्यांची मजल पोचत नाही. या इतर प्रकारांना **बोली** असे म्हणतात व प्रौढ आणि पुढारलेल्या लोकांच्या लिहिण्याबोलण्यात विशेषतः लिहिण्यात येणाऱ्या प्रकाराला **भाषा** असे म्हणतात. भाषेचा हा शिष्टसंमत प्रकार म्हणजेच शुद्ध भाषा किंवा रूढ भाषा.

तेव्हा, भाषेत शुद्ध काय ? तर, जे लोकांना अर्थातच विचारवंत, शिकलेल्या, पुढारलेल्या माणसांना-शिष्टांना-संमत असेल, व जे त्यांच्या लिहिण्या–बोलण्यात असेल ते शुद्ध. बाकीचे अशुद्ध.

(५) आजच्या मराठीतील शुद्धलेखनासंबंधाने वादाचा प्रश्न तत्त्वतः एकच आहे व तो म्हणजे उच्चाराप्रमाणे लेखन करावे की नाही ? या प्रश्नाचे तात्त्विक उत्तर अगदी सोपे आहे; पण प्रत्यक्ष व्यावहारिक उत्तर तितकेच कठीण आहे. प्रत्यक्ष व्यवहाराकडे पाहिले तर लिपी व ध्वनी यांची

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अशी सांगड घातलेली कोठल्याच भाषेत दिसत नाही; व ती तशी घालणेंही शक्य दिसत नाही.

(६) आपण बोलताना जितके विविध प्रकारचे ध्वनी उच्चारितो तितके सर्व नीटपणे दाखवायला पुरेसे वर्ण कोणत्याही लिपीत नाहीत. तेव्हा, उच्चाराप्रमाणे लिहावे हा नियम व्यवहारात कोणत्याही भाषेला लाविता येणार नाही.

(७) एकंदरीत पाहाता, उच्चाराप्रमाणे लिहावे हा नियम दिसावयाला कितीही साळसूद दिसला तरी तो आचरणात आणताना फार अडचणी येतील, व आणला तर भाषेत येथून तेथून बेबंदशाही माजेल.

मुंबई विश्वविद्यालयाने शिक्षक व विद्यार्थी यांच्या मार्गदर्शनार्थ १९४७ साली जे मराठी शुद्धलेखनाचे नियम प्रसिद्ध केले त्यांतील काही लक्षणीय बाबींकडे लक्ष वेधणे आवश्यक वाटते. हे नियम तत्कालीन मराठीतील लेखनपद्धतीप्रमाणे जसेच्या तसे दिले आहेत :—

(१) "लेखनाकरितां मराठी भाषेचें शुद्धस्वरूप ठरविण्यासाठीं सुसंस्कृत शिष्टांचें सभोचित (Non-colloquial) भाषण हेंच मुख्यत: प्रमाणभूत समजावें, व त्याचीं साधनें म्हणून (अ) व्युत्पत्तिशुद्धता, (आ) मराठी भाषेचा स्वभाव, (इ) चालू मान्य ग्रांथिक प्रयोग, वगैरे कसोटचा वापराव्या."

(२) "मराठी भाषेचें लेखन हें शक्यतोंवर उच्चारानुसार राहावें. ('उच्चारानुसारी' म्हणजे 'शुद्धोच्चारानुसारी' हें स्पष्टच आहे)."

(३) "मूळ संस्कृतांतून घेतलेले, परंतु मराठींत आत्मसात् न झालेले, म्हणजेच 'तत्सम' समजले गेलेले, (ऱ्हस्व) इ–कारान्त व (ऱ्हस्व) उ–कारान्त शब्द मराठींत सुटे वापरले जात असतांना विकल्पानें ऱ्हस्वान्त किंवा दीर्घान्त उच्चारले जातात; म्हणून ते तसेच म्हणजे विकल्पाने ऱ्हस्वान्त किंवा दीर्घान्त लिहावे. मात्र, समासान्तर्गत पूर्वावयव असतांना ते संस्कृत मुळाप्रमाणें ऱ्हस्वान्तच उच्चारले जातात; म्हणून ते तसेच म्हणजे ऱ्हस्वान्तच लिहावे."

(४) "हि, आणि, तथापि, परंतु, अद्यापि, यथामति, इत्यादी अव्ययांचे अन्त्य स्वर ऱ्हस्व उच्चारले जातात; म्हणून ते तसेच म्हणजे ऱ्हस्वच लिहावेत."

(५) "अनुस्वारांबद्दलहि मुख्य नियम हा कीं शब्दांतील अक्षर स्पष्ट अथवा अस्पष्ट (कोमल) पण निश्चित नासोच्चारित असल्यासच तें सानुस्वार लिहावें, तसें तें नसल्यास मराठीच्या उच्चारानुसारित्वाच्या तत्त्वाप्रमाणें तें निरनुस्वारच लिहावें."

(६) "व्युत्पत्तिसिद्ध परंतु अनुच्चारित अनुनासिकें लेखनांत, अनुस्वारानें काय किंवा परसवर्णानें काय, दर्शवूंच नयेत, गाळावीं; परंतु अर्थभेदासाठी (सामान्यत: अर्थ संदर्भानें ध्यानांत येतो, व त्यासाठीं अनुस्वाराची किंवा परसवर्णाची गरज नाहीं, तरी) तीं ठेवण्यास हरकत नाहीं."

प्रा. ग. ह. केळकर आणि मुंबई विश्वविद्यालयाने नेमलेल्या समितीतील प्रा. वाडेकर, प्रा. रा. श्री. जोग, डॉ. के. ना. वाटवे, प्रा. कृ. पां. कुलकर्णी, श्री. वि. द. घाटे, प्रा. चापेकर इत्यादी विद्वानांनी मराठीच्या शुद्धलेखनविषयक प्रश्नांचा साकल्याने कसा विचार केला होता हे आतापर्यंतच्या विवेचनांवरून व उद्धृतांवरून पुरेसे स्पष्ट झालेच आहे. हे नियम आता इतिहासजमा झालेले असले तरी त्यांतील काही मूलभूत तत्त्वे आजही सर्वमान्य आहेत.

महाराष्ट्र–साहित्य–परिषदेने स्वतंत्रपणे तयार केलेली नियमावली बराच काळपर्यंत प्रचारात होती. त्यानंतर महाराष्ट्र राज्यातील म. सा. परिषद, पुणे; मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई; विदर्भ साहित्य संघ, नागपूर; आणि मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद; या चारही घटकसंस्था असलेल्या 'मराठी साहित्य महामंडळ' या मध्यवर्ती साहित्यसंस्थेची स्थापना झाल्यावर या मंडळाने सर्व घटक संस्थांच्या सहकार्याने १९६१ साली 'लेखनविषय नियम' तयार केले. जुन्या शुद्धलेखनविषयक सर्वच नियमांचा त्यात पुर्नविचार केलेला आढळतो. 'मुंबई येथे दि. २ ऑक्टोबर १९६१ रोजी महामंडळात सर्वसंमत झालेले' अशी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तळटीप देऊन महाराष्ट्र-साहित्य-परिषद, पुणे या संस्थेने प्रसिद्ध केलेल्या पुस्तिकेत एकंदर १४ नियम दिले आहेत.

मराठी साहित्य महामंडळाचे तत्कालीन कार्यवाह श्री. बापूराव नाईक यांनी १९७२ साली प्रकाशित केलेल्या 'लेखनविषयक नियमां'ना जोडलेल्या महामंडळाचे अध्यक्ष प्रा. वा. ल. कुळकर्णी यांच्या 'प्रास्ताविक निवेदना'नुसार अध्यक्षांसह डॉ. मा. गो. देशमुख आणि श्री. मो. रा. वाळंबे यांची एक त्रिसदस्य समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने तयार केलेल्या स्पष्टीकरणासह प्रस्तुत नियमावली महामंडळाचे प्रकाशन म्हणून पहिल्यांदाच १९७२ साली प्रसिद्ध झाली आहे. स्पष्टीकरणाच्या उद्देशाने यात आणखी चार नियमांची भर घालून एकूण नियमांची संख्या अठरा करण्यात आली आहे. तरीपण अनेक ठिकाणी संदिग्धता कायम राहिली आहे. उदाहरणार्थ " नियम १४ क्वचित्, कदाचित्, अर्थात्, अकस्मात्, विद्वान्, इ. मराठीत रूढ झालेले तत्सम शब्द अकारान्त लिहावे", असे सांगितले आहे. तर, लगेच "नियम-१७ 'अन्' हा शब्द व्यंजनात लिहावा." असा अपवाद केल्यामुळे जाणकारांच्या दृष्टीने विसंगती निर्माण झाली आहे त्याचे काय ? "नियम ५ मराठीतील तत्सम इ-कारान्त आणि उ-कारान्त शब्द दीर्घान्त लिहावे" असे एकदा निश्चित झाल्यावर "परंतु, यथामति, तथापि इत्यादी तत्सम अव्यये ऱ्हस्वान्त लिहावी" असा अपवाद करणे तात्त्विक दृष्ट्या असमर्थनीय ठरत नाही काय ? अशा अनेक त्रुटी दाखविता येतील. अलीकडे या सर्व नियमांचा नव्याने पुर्नविचार करण्यासाठी महामंडळाने नेमलेल्या समितीने अभ्यासकांकडून जाहीर आवाहनाच्या द्वारा सूचना मागविल्या आहेत. पण वृत्तपत्रांतून केलेल्या सार्वजनिक विनंतीला फारच थोडा प्रतिसाद मिळतो असा नेहमीचा अनुभव आहे. मराठी भाषा व वाङमय यांच्या अध्यापनाशी संबंधित असलेल्या विविध पातळ्यांवरील अध्यापकांची चर्चासत्रे आयोजित करून जाणकारांच्या निबंधवाचनाच्या द्वारा विचार-मंथन झाले तरच त्यातून लेखनविषयक नियमांच्या पुर्नविचाराचे उत्कृष्ट नवनीत निघण्याची शक्यता वाटते.

⊕ ⊕ ⊕

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(पृष्ठ २३० वरुन)

ग्रंथातील काही भाग कृत्रिम आणि रंगविहीन आहे. जमेचा मुद्दा इतकाच की शंतनुराव किर्लोस्कर या व्यक्तीच्या बाह्यजीवनाविषयी स्थूल माहिती आणि प्रेमातील माणसांची शंतनुरावांच्या संबंधाने असलेली गौरवपर माहिती एकत्रितपणे संगृहीत झाली.

चरित्रकार चरित्रनायकाशी समरस झाला असता तर या लोखंडी नटबोल्टांतूनही समर्थ ललितकृती निर्माण करता. पण हुकमे हुकूम चरित्र लिहून देणे हा प्रकार श्री. भाव्यांनी स्वीकारल्यामुळे प्रस्तुत चरित्र हे अत्यंत सदोष अवतरले आहे.

लेखकाला स्वतःलादेखील या दुष्टचक्राची जाणीव असल्यामुळे, "श्री. शंतनुरावांबरोबर चर्चासत्र करण्याचे प्रयोजन नव्हते." "सौ. यमूताई, मुले, सुना यांना व्यक्तिगत हकीकती सांगणे बिकट होईल म्हणून त्यांनाही भूमिकेत अडचणीत टाकले नाही." असे लंगडे स्पष्टीकरण भाव्यांनी देऊन स्वतःची सोडवणूक करून घेतली आहे. वास्तविक पाहता चरित्राची महत्वाची आणि मूलभूत साधने अगदी हाताशी असताना देखील लेखकाने ती टाळावीत ह्यातच ह्या चरित्राच्या असफलतेचे खरे रहस्य दडले आहे.

प्रस्तुत ३०४ पृष्ठांच्या चरित्रामध्ये केवळ सुरेख मुद्रण आणि छपाईच्या दृष्टीने आलेले दृश्यमूल्य वगळता फारसे काही आढळावयाचे नाही. या चरित्राचे मूल्यमापन चरित्र या दृष्टीने न करता किर्लोस्कर कारखानदारीचा इतिहास या दृष्टीने केल्यासच त्याचे महत्त्व वाचकांच्या नजरेस येऊ शकेल.

कालापुढती चार पाउले
सविता भावे;
शंतनुराव किर्लोस्कर समिती;
के. एस. ए. बिल्डिंग, भवानी शंकर रोड,
दादर, मुंबई
पृष्ठे– ३०४, मूल्य ४० रुपये.

⊕ ⊕ ⊕

(पृष्ठ २३१ वरुन)

ढवळले जातात. डोक्यावर ओझे वाहून नेणारा रायगडवाडीचा बाल्या, गरीबीतही मनाची श्रीमंती बाळगणारी वाघोलीची ताई, श्री. परशुरामक्षेत्री झांजा वाजवायला येणारा, जातीयवादाचे भूत अजूनही ज्यांच्या मानगुटी बसले आहे असा कोवळा मधुकर यशवंत कदम यांच्या सुखदुःखाशी लेखक समरस झाला आहे.

एकूण लेखनातून सामाजिक जाणीव अतिशय तीव्रपणे व्यक्त झाली आहे. मनोहर निसर्गवर्णने, डोंगरकडा चढतानाचे अंगावर काटा उभा करणारे अनुभव, भग्न निर्जन वास्तूतून फिरताना आलेला हळुवारपणा, आणि अद्भूत जाणिवा यांचे प्रत्ययकारी दर्शन 'सह्याद्रीच्या डोंगरदऱ्यात' जागोजागी आहे. चिंचाळकरांचे हे पुस्तक ललितरम्य, निसर्गवर्णनांनी जसे अलंकृत आहे, तशीच वक्रोक्तीची चुणूकही अनेक ठिकाणी प्रत्ययास येते. त्यामुळेच मला 'सह्याद्रीच्या डोंगरदऱ्यात' हे चिंचाळकरांचे पुस्तक म्हणजे गडकुरुजांना गायिलेली निर्भय निसर्ग–सूक्ते वाटतात. या पुस्तकात काही रेखाटने आणि चित्रे असती तर त्याची खुमारी निश्चितच वाढली असती.

सह्याद्रीच्या डोंगरदऱ्यात
लेखक– वसंत चिंचाळकर
विजय प्रकाशन
सीतावर्डी, नागपूर
मूल्य रु. १५, पृष्ठसंख्या १०४

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

फार्म–४

"युगवाणी" मासिकासंबंधी माहिती

१. प्रकाशन स्थळ	विदर्भ साहित्य संघ, झांशी राणी चौक, नागपूर–१२.
२. प्रसिद्धीचा नियतकाल	मासिक परंतु जोड अंक निघतात.
३. मुद्रकाचे नांव, राष्ट्रीयत्व व पत्ता	: क. मा. सावंत, भारतीय, व्यवस्थापक, नागपूर विद्यापीठ मुद्रणालय, नागपूर.
४. प्रकाशकाचे नांव, राष्ट्रीयत्व व पत्ता	गो. स. देहाडराय, भारतीय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झांशी राणी चौक, नागपूर–१२.
५. संपादकाचे नांव, राष्ट्रीयत्व व पत्ता	डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, भारतीय, विदर्भ साहित्य संघ, झांशी राणी चौक, नागपूर–१२.
६. वृत्तपत्राची मालकी	विदर्भ साहित्य संघ, नागपूर–१२.

मी, गोपाल सदाशिव देहाडराय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, जाहिर करतो की वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे संपूर्णतः खरी आहे.

गो. स. देहाडराय,
प्रकाशक
सरचिटणीस,
विदर्भ साहित्य संघ,
नागपूर.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'ओडिपस:' दलित जीवनाचा एक विद्रोही आविष्कार / प्रकाश जोशी

'ओडिपस' हा कवि वी. रंगराव यांचा नुकताच प्रसिद्ध झालेला दलित कविता-संग्रह. कुण्या प्रथितयश कवि कवि-लेखकांच्या प्रस्तावनेचा मोह टाकून वी. रंगराव यांनी स्वतःच त्यांच्या कवितांविषयीची लांबलचक भूमिका जोडली आहे. त्यात आजच्या दलित साहित्यापासून कवीच्या स्वतःच्या वाङमयीन व सामाजिक जाणिवांपर्यंतचा विस्तृत ऊहापोह केला आहे. काही गैर साहित्यिक विचार वगळण्यास ही भूमिका संग्रहातील कवितांना पूरकच ठरली आहे.

आजच्या दलित कवितेने भारतीय समाजाच्या फार मोठ्या दुखण्याला हात घातला आहे. त्यामुळे एकंदरीत मराठी कवितेला वाङमयीन वैभव तर लाभलेच, त्याशिवाय साहित्य व समाज या दोहोंचे परस्परावलंबित्व नव्याने स्थापित झाले आहे. दलित कवितेने मराठी साहित्यातील एकसूरीपणा, किंवा एकाच विशिष्ट मनोवृत्तीचे सतत होत असलेले प्रदर्शन यांना आळा घालून साहित्यक्षेत्रात नव्या जाणिवेचा पुरस्कार केला आहे. ही बाब वाङमयीन मूल्यवृद्धीच्या दृष्टि-कोणातून अत्यंत महत्त्वाची ठरते. नारायण सुर्वे, दया पवार, नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, त्र्यंबक सपकाळे, वामन निंबाळकर, यशवंत मनोहर या दलित कवींच्या नाममालिकेत वी. रंगराव हे आणखी एक महत्त्वाचे नांव गुंफल्या गेले आहे.

'ओडिपस' हा कविता-संग्रह 'महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळा'च्या अनुदानाने प्रकाशित झाला आहे. हे अनुदान नवोदितांपैकी ज्यांच्या साहित्यात वाङमयीन 'जाण' आहे अशांनाच दिल्या जाते. वी. रंगराव यांच्या 'ओडिपस' या कविता-संग्रहाच्या प्रकाशाला अनुदान देऊन शासनाने एक प्रकारे त्यांचा गौरवच केला आहे.

कविता-संग्रहात एकूण तीस कविता आहेत व सर्वच कविता दलित जीवनाशी संबंधित आहेत. या कवितांचे साधारणपणे तीन प्रकारांत विभाजन करता येईल. सुरुवातीच्या कविता कवीने अनुभवलेल्या दलित जीवनाचे वर्णन करणाऱ्या, त्यानंतरच्या कविता व्यक्तींविषयी–यात कवीशी संबंधित माणसे–, उदा. आई, वहीण, मुलगा, प्रेयसी वगैरे,–तर काही कविता एकंदरीत दलित चळवळीशी संबंधित असलेल्या न दलितांना प्रेरणा-स्थानी असलेल्या व्यक्तींविषयी आहेत. उदा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बुद्ध, अशोक इत्यादी. शेवटच्या कविता या (संग्रहाचा तिसरा भाग) कवीची व संपूर्ण दलितांची ज्वलंत विद्रोही भूमिका विशद करणाऱ्या आहेत. 'शब्द', 'इतिहास !', 'असाही एक ओडिपस' इत्यादी कवितां–मधून इथल्या विषमतावादी–रूढी व परंपराविरुध्द प्रखर विद्रोह कवीने व्यक्त केला आहे. हा विद्रोह म्हणजे केवळ आक्रस्ताळेपणा नाही. सुरुवातीच्या कवितांमधून कवीचे काही जिवंत अनुभव प्रगट झाले आहेत. हे सर्वच अनुभव अमानुष, भयंकर व चीड आणणारे आहेत. या अनुभवांच्या पार्श्वभूमीवर उभा राहिलेला विद्रोह म्हणूनच प्रामाणिक वाटतो. इथल्या विषमतेविरुध्द साम्य-साम्यवाद्यांनी घेतलेल्या भूमिकेसारखा तो तिऱ्हाइत नाही. त्याला स्वानुभवाची पार्श्वभूमी लाभली आहे, म्हणूनच तो अत्यंत प्रखर व तेजस्वी झाला आहे. 'असाही एक ओडिपस' या कवितेत कवीने घेतलेल्या टोकाच्या भूमिकेचे समर्थन पटण्या-सारखे आहे. ज्या आईने जन्मभर 'दुःख दैन्य, दारिद्र्यच' दिले असेल तिला उदार अंतःकरणाने क्षमा करणारा एकच कर्ण पुरेसा आहे. हजारो, लाखो कर्ण इथे निर्माण झाल्यास ते अन्यायाला प्रोत्साहन दिल्यासारखे होईल. याला आळा घालण्यासाठी अनेक 'ओडिपस' निर्माण होणे आवश्यक आहे. अर्थात् कवीची ही भूमिका इथल्या परंपरावाद्यांना, न पटण्यासारखी आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परंतु दलितांचा इतिहास, या इतिहासाची सतत होत असलेली पुनरावृत्ती, व त्यामुळे निर्माण झालेली दलितांची क्रुध्द मानसिक वृत्ती या गोष्टी लक्षात घेतल्यास कवीची भूमिका समजणे सोपे होते.

'ओडिपस' च्या माध्यमातून वी. रंगराव यांनी दलितांच्या विद्रोहाला वेगळे स्वरूप दिले आहे. याआधी त्र्यंबक सपकाळे यांनी 'ओडिपस'-विषयीचा विचार व्यक्त केला आहे, पण त्याला पुस्तकरूपात मांडणारे वी. रंगराव हे पहिलेच कवी होत. अशा जहाल भूमिकेमुळे अनेकांची नाराजी होईल याची कवीला जाण आहे, पण त्याचवेळी आपली भूमिका सत्याची आहे म्हणून लोक कधीतरी सन्मानच करतील असा विश्वासही कवीला वाटतो. म्हणून कवीने पुस्तकाच्या सुरुवातीला रशियन कवी पुश्कीन यांच्या ओळी उध्दृत केल्या आहेत :–

And long the people yet will honour me Because my lyre was tuned to loving kindness, And, in cruel age, I sang of liberty, And mercy begged of Justice in her blindness.

'ओडिपस' मधील अनेक कविता अस्वस्थ करणाऱ्या आहेत. खरं म्हणजे दलित साहित्याने मानवी आयुष्याचे जे दालन उघडे केले तेच मुळी माझ्या सारख्या पांढरपेशा माणसाला प्रचंड धक्के देणारे आहे. जे आयुष्य आमच्या धर्माने, संस्कृतीने, रूढींनी आणि परंपरेने पूर्णपणे दुर्लक्षित केले, ज्या आयुष्याला मानव्यहीनतेच्या कक्षेत हजारो वर्षे-पर्यंत राहावे लागले त्या आयुष्यात पांढरपेशा वाचकांना धक्के देणारे अनेक प्रसंग आढळल्यास नवल नाही. असे प्रसंग दया पवारांच्या 'बलुतं'-मध्ये, केशव मेश्राम यांच्या 'हकीकत' मध्ये, त्र्यंबक सपकाळे, वामन निंबाळकर यांच्या कवितांमध्ये या-पूर्वीच, व आता वी. रंगराव या तरुण कवीच्या कवितांमधून कलात्मकतेने प्रगट झाले आहेत. मानवी आयुष्यातील असे प्रसंग कला-साहित्यातून प्रगट होणे याला फार महत्त्व आहे, कारण या प्रसंगांच्या माध्यमातून त्या कलावंताची संवेदनशीलता तीव्र होऊन व्यक्त झालेली असते. म्हणूनच वाचकाच्या थेट हृदयाला हात घालण्याची क्षमता अशा कलाकृतींना प्राप्त होते. आयुष्याविषयीची आस्था, एक जीवनवादी दृष्टिकोण या कृतींमधून व्यक्त झालेला असतो, म्हणूनच जगणाऱ्यांकरिता या कलाकृतींची गरज वारंवार असते. मानवी जीवनातील अशा अनेक प्रसंगांचे विस्तृत चित्रन करणारा रशियन लेखक टॉलस्टॉय या संदर्भात लिहितो :— "आयुष्याचे वास्तववादी दर्शन माणसाला या कलाकृतींशिवाय इतरत्र कुठे होईल? आयुष्याचे प्रभावी चित्रण करणाऱ्या कृतींची संख्या जितकी जास्त तितका जास्त अर्थ माणसाच्या आयुष्याला नकळत मिळत असतो"

'ओडिपस' मधील अनेक कवितांमधून कवीने आयुष्यातील उत्कट क्षण चित्रित केले आहेत. संग्रहातील अगदी पहिलीच कविता दलितांचे उपेक्षित जग वाचकांसमोर हुबेहुब उभी करते. दुःख, दारिद्र्याच्या जगाचे वर्णन करून या जगाशी स्वतःचा संबंध दर्शविताना कवी लिहितो—

चार कुडांच्या भिंतीमध्ये इथे जन्मलो आम्ही
वरुण-वृष्टीच्या हजार रात्री इथे जागलो आम्ही,
इथे दिव्याच्या मंद प्रकाशी उघडूनी पहिले पान
खेळ खेळलो शब्दांशी अन् इथे मिळविले ज्ञान.

दलितांच्या या जगाशी स्वतःचा अतूट संबंध दर्शवून त्याच्याशी आयुष्यभर प्रामाणिक राहण्याचा संकल्प कवी करतो. दलित-पीडितांमध्ये राहून पारंपारिक कला-साहित्याचा पुरस्कार तो कसा करील? दलित-पीडितांचा मुख्य प्रश्न भूक असतो; आयुष्याशी कशीतरी तडजोड ते करीत असतात हे महत्त्वाचे प्रश्न टाळून कवी पळवाट शोधीत नाही. तो लिहितो :—

माझे सगे सोयरे, माझे भाऊबंद सारेच विव्हळत
असतात.
निर्मनुष्य वस्तीतील उदास कुत्र्यांसारखे—
आणि त्यांच्या उशाशी बसून मी माझे कान
कुण्या तृप्त संगीताकडे गहाण ठेवीत नाही.

दलितांविषयी एवढी प्रामाणिक आणि खंबीर भूमिका घेऊन लिहिणारा कवी विरळाच.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपूर्ण पुस्तकच कवीने त्याच्या 'दलित बांधवांना' अर्पण केले आहे, कारण दलितांचे अनुभव त्याचे स्वत:चे अनुभव आहेत. हे अनुभव 'एक आठवण', 'ॲटिट्यूड', 'शाळकरी मुलांमध्ये' इत्यादी कवितांमधून अत्यंत प्रभावीपणे प्रगट झाले आहे. 'शाळकरी मुलांमध्ये ही कविता अनेक दृष्टींनी उत्कृष्ट ठरली आहे. कोणत्यातरी शाळेतील नीटनेटक्या गणवेषातील मुलांमध्ये कवी उभा आहे. त्या मुलांशी बोलता-बोलता कवीचे संवेदनशील मन भूतकाळात शिरते व तो स्वत: शाळकरी मुलगा असतानाचे दिवस त्याला आठवतात. हे दिवस अर्थातच अत्यंत दारिद्र्याचे, मानहानीचे दिवस असतात. या दिवसांची आठवण म्हणूनच अत्यंत दु:खद, रड-विणारी असते कवी प्रत्यक्षात रडू लागतो—

आणि त्या मुलांच्या चेहऱ्यावरून ओसंडणारा
तो आनंद थेंब-थेंब गळू लागतो डोळ्यांतून माझ्या—
पावसाच्या झडीत गळणाऱ्या आमच्या कौलारू
घरासारखा.

कवीच्या आठवणीत वसलेले, पावसाच्या झडीत थेंब-थेंब गळणारे त्यांचे कौलारू घर, व अश्रू ढाळणारे त्याचे डोळे यांची तुलना पुढे 'मनाला काठी लावणे' हा दलित वाक्प्रचार हे सर्व कवितेला कलात्मक पातळीवर नेऊन पोहचवितात.

संग्रहातील सुरुवातीच्या अनेक कविता करुणरसपूर्ण आहेत. 'मुक्ती', 'वहिणीच्या समजुतीसाठी' इत्यादी कवितांमधन दलितांची व्यथा कवीने अत्यंत हळुवारपणे व्यक्त केली आहे. अशा व्यथित आयुष्यातून वाटचाल करीत कवी वर आला आहे. मागील आयुष्यातील आठवणी कवीला आज दु:खी करीत आहेत. या दु:खाचे कारण कवी शोधीत आहे. या शोधकार्यात स्वत:च्या व संपूर्ण दलित समाजाच्या दु:खाचे कारण त्याला सापडले आहे—इथला धर्म, संस्कृती आणि परंपरा या सर्वांच्या विरोधात तो विद्रोह नोंदवितो आहे. पूर्वीचा मिळमिळीतपणा, दु:ख सहन करीत चुपचाप रडण्याची वृत्ती आता संपली आहे. तो आता जहाल झाला आहे. बेडर होऊन तो बोलतो आहे—

जाती-रूढी प्रथेचे ते जीर्ण झाले गाणे
गाऊ नव्या दमाने आता नवे तराणे.

या नव्या जाणिवेबरोबर नवे विचारही तो व्यक्त करीत आहे. आपल्या मुलाशी संवाद साधताना तो म्हणतो—

तू मला आशीर्वाद मागू नकोस—
वारसा-हक्काची प्रतिबंधक लस टोचून जगणारे
मला आवडत नाहीत.

शेवटच्या काही कविता कवीचा निर्णायक विद्रोह व्यक्त करितात. या विद्रोहाला एक पार्श्वभूमी लाभलेली, म्हणूनच त्यात भावनेचा प्रामाणिकपणा आहे. या विद्रोहाला एक तात्त्विक अधिष्ठान आहे, म्हणूनच त्याला एक विशिष्ट दिशाही प्राप्त झाली आहे. एकदा विद्रोह पुकारल्या-नंतर कवी आता तडजोड करण्याच्या मनस्थितीत नाही. तो इथला धर्म, संस्कृती, रूढी, परंपरा यांवर घणाघाती प्रहार करतो आहे. इथली समाजरचना, या समाजरचनेतून उद्भवलेली आर्थिक विषमता या गोष्टी नष्ट करण्याची भाषा कवी बोलतो आहे—

असल्या बेइमानी वृत्तीच्या घातकी चौकटीत
माणसांची नशिबे यापुढे कोरली जाऊ नयेत म्हणून
या विशाल इमारतीच्या पायात पुरलेली आमची हाडं
यापुढे सुरुंग होऊन विध्वंस करणार.

शब्दांना आजपर्यंतची मिळमिळीत भूमिका त्यागून विद्रोहाची शिकवण देतांना कवी म्हणतो—

शब्दांनो, तुम्ही छत व्हा
अन्न व्हा,
पाणी व्हा,
वस्त्र व्हा—

माणुसकीच्या हक्कासाठी शब्दांनो, तुम्हीच शस्त्र व्हा. इथला धर्म, संस्कृती, रूढी, परंपरा, समाज-व्यवस्था इत्यादींच्या विरोधात कवीची विद्रोही भूमिका 'असाही एक औडिपस' या कवितेत कुठलाही आडपडदा न ठेवता निर्भीडपणे व्यक्त झाली आहे. या कवितेविषयी बरेचसे स्पष्टीकरण कवीने त्याच्या भूमिकेत दिले आहे. त्याचा उल्लेख या लेखातही याआधी आला आहे. या कवितेच्या रचनेविषयी थोडेसे सांगणे आवश्यक वाटते—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ही कविता दलितांच्या संपूर्ण इतिहासाची आठवण देऊन त्यावर आजच्या सुशिक्षित दलित तरुणांची प्रतिक्रिया व्यक्त करते. भावना आणि विचार यांचा उत्कृष्ट समन्वय या कवितेत आढळतो. प्रसंगी काही प्रसिद्ध वाङ्मयीन उतारे उद्धृत करून करून आपल्या भूमिकेची पुष्टी कवीने कौशल्याने केली आहे. कवितेची ही अशी रचना टी. एस. इलिएट या इंग्रजी कवीच्या (The Waste Land) या कवितेची आठवण करून देते. दलित साहित्यातील विद्रोह केवळ आशयापुरताच मर्यादित न राहतां तो कथा-कवितांच्या रचनेतूनही व्यक्त व्हावा ही अपेक्षा कवी त्याच्या भूमिकेत व्यक्त करतो. पण हा रचनात्मक विद्रोह 'ओडिपस' मध्ये आढळत नाही. तथापि, ही संग्रहाची त्रुटी असू शकत नाही, कारण रचनात्मक बदल घडवून आणण्यासाठी आयुष्यभर परिश्रम घ्यावे लागतात. हे परिश्रम वी. रंगराव यांच्या सारख्या नवोदिताकडून अपेक्षित नाहीत.

वरीचशी दलित कविता नारायण सुर्वे यांच्या कवितेशी जुळते असा एक समज आहे. काही कवींच्या बाबतीत हे खरेही आहे. कारण सामाजिक दुःखाला कवितेच्या माध्यमातून वाचा फोडणाऱ्या सुरुवातीच्या थोड्या कवींपैकी सुर्वे एक आहेत. काही तरुण कवींनी सुर्व्यांच्या कवितेचे अनुकरणही केले असेल, पण त्याचवेळी अनेक तरुण दलित कवी पूर्णपणे मौलिक आहेत. वी. रंगराव यांचा 'ओडिपस' हा कवितासंग्रह वाचून या मौलिकतेचा वारंवार प्रत्यय येतो. 'आणि पुढे. ' यासारख्या संवादात्मक कविता एकंदरीत मराठीत फारच थोड्या आहेत. एखादी घटना कुठल्याही अतिशयोक्तीशिवाय जशीच्या तशी मांडून तिच्यातील कारुण्य वाचकांपर्यंत पोहचविण्याची शैलीही कवी आत्मविश्वासाने हाताळतो. 'एक आठव', 'अॅटिट्यूड' इत्यादी कवितांमधील घटना वाचकाच्या हृदयाचा ठाव घेतात. संग्रहातील अनेक कविता वाचून रचनात्मक परिपूर्णतेचा परिचय होतो. अर्थात ही पूर्णता आशयाला गौण ठरवून केवळ रचनात्मकतेला महत्त्व देणाऱ्यांना अपूर्ण वाटेल, पण आशयावरोबर रचनात्मक जाण ठेवून लिहिणाऱ्या मराठीतील थोड्या कवींपैकी वी. रंगराव एक आहेत हे निश्चित.

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दरे मरे पुरे उरे / डॉ. व्ही. पी. दामले

"सर, ओळखलंत का मला ? . मॅट्रिकच्या परीक्षेला उशिरा आलेलो. "

त्याला पाहून अन् ऐकून खरोखरच मी आश्चर्यमुग्ध झालो.

योगायोग तरी काय असतात पाहा. केव्हा केव्हा ते आपल्या जीवनात नाही, केवळ कल्पनारम्य कादंबरीत शोभणारे वाटतात. येवढेच नव्हे तर ती, इतक्या पूर्वीच्या संदर्भातील, इतक्या वर्षांनी होत असलेली, कमालीची अनपेक्षित गाठ भेट मला (Stranger than fiction)च वाटली.

म्हणजे असे की, मी अमळनेरचे प्रताप कॉलेज सोडून सतरा वर्षे लोटली होती ! परवा १९७७ मध्ये त्या कॉलेजच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या प्रमुख पाहुणा म्हणून गेलो असताना, पूर्वाश्रमीच्या शिक्षकबंधूने चहापानास घरी बोलाविल्यावरून सहज त्याचेकडे गेलो होतो आणि तेवढ्यात अचानक हा तरुण तिथे येऊन, मला नमस्कार करून संभावना करीत होता– "सर, ओळखलंत का मला ? मॅट्रिकच्या परिक्षेस उशिरा आलेलो. " अन माझ्या मनःपटलावरून तो म्हणत असलेला, प्रसंग एखाद्या लक्षवेधी चित्रपटासारखा सरसरला.

१९५४–५५ साल असावे. एस.एस.सी। उच्च एस. एस. सी. परीक्षा केन्द्र आमचे कॉलेज होते. एक दिवस सकाळी १०––१५ वाजता वर्गांतून परीक्षेच्छूंची बसावणी होऊन, १०–३० ला प्रश्नपत्रिका वाटल्या गेल्या होत्या. केन्द्र-प्रमुख म्हणून त्या कक्षातून मी फिरत होतो. अर्धातास पर्यन्त उशिरा येणाऱ्याना नियमाप्रमाणे, वर्गात घेणे चालले होते. या वेळात आत येऊन बसलेल्या विद्यार्थ्यांना बाहेर जायला मनाई असे. अर्ध्या तासांनंतर बाहेरच्यांना नव्याने आत येण्याला मनाई झाली की हलके हलके आतील विद्यार्थी कोणी पेपर पूर्ण लिहून झाला म्हणून तर कोणी 'लघु-दीर्घ शंकानिरसनाला' वर्गातून बाहेर पडू शकत असत. अयुक्त मार्गांच्या (unfair means) वापरात, कॉपी घडण्यात बाह्य संपर्कावर निर्बंध व उत्तर पत्रिका ठराविक वेळात (तीन तासांत) लिहिण्याच्या नियमांसाठी ही एकतर्फी वहीवाटीची कारवाई असे सारे नियमित व नेमस्त चाललेले पाहून ११–४५ चे सुमारास निःशंकपणे मी कॉलेज-आवारातील माझ्या निवासस्थानी मध्यान्हीच्या न्याहारीसाठी गेलो.

१२–१५ ला दरवाज्याशी, "सर" अशी चपराश्याची हाक ऐकली अन् ताटावरून उठून समोर येतो तर, चपराश्याच्या बरोबर एक १६–१७ वर्षांचा काळासावळा मुलगा सायकल धरून उभा– डोळे लाल, घामाने चिंबलेला सदरा, छाती–पाठीला चिवकलेली, सारे मस्तक शॉवरखाली धरावे तसे घामाने निथळणारे. .

"सर, इतक्या उशिरा येऊन 'परीक्षेला बसू द्या' म्हणतोय हा, सर वर्गातले निरीक्षक त्याला घ्यायला तयार नाहीत. त्यांनीच याला घेऊन मला तुमच्याकडे. "

तितक्यात, सायकल चपराश्याच्या अंगावर रेलून तो मुलगा झटकन माझ्या पायांनाच भिडला.

त्याला धरून उठवितो आहे तर गयावया करीत तो म्हणे, "उशीर झाला कबूल सर. तरी मला बसू द्या सर परीक्षेला. नाही तर माझे आयुष्य बरबाद होईल, सर.

"अरे पण ते कसं शक्य आहे आता ? इतक्या उशिरा आलेल्याला परिक्षेला बसू देता येत नाही, बाबा. नियमांपुढे करणार काय ? पण तू एक–दीड तासाहूनही उशिरा कसा आलास ?"

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"सर, माझी आगगाडीच धरण गावला आडली. ते कळल्यावर तिथून सायकलवरून येथवर परीक्षेसाठी मी आलो आहे सर. "

"काय म्हणतोऽऽऽस ?"

"होय सर. . मला बसू द्या सर परीक्षेला. माझ्यावर सर दया करा. सर. "

त्याच्या डोळ्यांतील भाबडा भाव, अनिवार आगतिकता पाहून माझे मन द्रवले. 'त्याचे म्हणणे खरे असेल तर ? त्याचा काय दोष उशीर लागण्यात ? त्याच्या कारणात खोटे-पणा असेल तर. पाहू पुढे. लगेच काही निश्चय करून, दस्तुरखुद्द चिठ्ठी निरीक्षकासाठी लिहिली— 'या विद्यार्थ्याला परीक्षेला बसू द्यावे. मी १०–१५ मिनीटात कॉलेजात येतोच आहे'. ती चिठ्ठी चपराश्याजवळ देऊन, विद्यार्थ्याला वर्गाकडे घेऊन जायला सांगितले. शिवाय, इतके लांब एप्रिलच्या उन्हात येण्यात दमलेल्याला त्याने मागितले तरी, एकदम थंडगार पाणी पिण्याला न देण्याचा आदेश देऊन; हवा तर त्याला वर्गाबाहेर आणून ऊन चहा द्यावा असाही चपराश्याला कान-मंत्र दिला.

जेवण संपविताना मनात विचार चालले होते— मी पहातो आहे, ज्या कामात, व्यवसायात नोकरीत जे लागलेले असतात त्यांच्यात त्या कार्याच्या अनुषंगाने येणारी जबाबदारी अंगावर घेऊन स्वयंप्रेरणेने (initiative) स्वयंस्फूर्तीने, हिरीरीने ती पार पाडण्याची निष्ठा, उमेद सहसा आढळत नाही. ती कामे करण्यासंबंधीच्या कायदे-कानूनची जोखड खांद्यावर भूषवीत, त्यांचे पालन घडविण्यात (एका दृष्टीने निष्क्रियतेत) काळाचा—कामाचा–वेगाचा व्यय करीत असतात. केवळ तेवढेच करण्यात मनुष्याच्या कर्तृत्वाचा, धडाडीचा क्रियाशीलतेचा कोंडमारा होत असतो याकडे त्याचे लक्ष (काजाणही ?) नसते. आपल्याकडे दिलेल्या कामाला तेवत, जागृत, ठेवण्याऐवजी ते, आपली जागाच कशीवशी टिकविण्याच्या मागे आणि म्हणून वरिष्ठांची मर्जी संपादीत, नवीन आवि-ष्काराचा, आकाराचा, विचारही न करीत, नोकरीत सुखेनैव (त्यांच्या भाषेत बेहद्द अडचणीतही !) टिकून राहिल्याच्या बढाईत मशगुल दिसतात. 'आपण बरे आणि आपले बरे हा त्यांचा सात्विक अभिमान ! नियमांचे पालन करावयाचे; पण ते नियम कशासाठी करावे लागले आहेत, कोणत्या साध्याकरिता केवळ साधन म्हणून आहेत या-कडे लक्ष असावयास हवे. म्हणजे (not merely words, but we should, and we ought to, fathom them and follow the spirit behind the rules laid down). माझ्यातर मनात येते, एका दृष्टीने पाहाता, केवळ आखीव नियमाप्रमाणेच कार्य निपटायची तर ते सरळसोट काम आपल्या हाताखालचे चपराशीही नाही का करू शकणार ? त्यासाठी येवढ्या अधिक पगाराच्या (आपल्यासारख्या !) अधिकाऱ्याला नेमण्याची गरजच काय होती ? विद्यार्थ्यांनी वर्षभर केलेल्या अभ्यासाचे तौलनिक प्रमाण ठरविण्याच्या परीक्षेत वेळेचे बंधन हवेच; आपणही नियम करणारे असतो तरी हा नियम केलाच असता. हा विद्यार्थी स्वार्थापायी खोटेच सांगून आपल्याला बनवीत आहे असे उघडकीस आले तर त्याने लिहिलेली उत्तरपत्रिका परीक्षकाकडे न पाठविण्याचे आपल्याच हातात आहे की. पण यदाकदाचित उशिरा येण्याचे त्याचे कारण खरे असेल तर. तर त्याचा दोष नसून, तुमच्या नियमापायी, त्याला एका वर्षाला मुकावे लागेल त्याचे काय ? दुसऱ्याच्या चुकीसाठी का म्हणून त्याला हा भुर्दंड ? 'सत्यमेव जयते' याच्या सिद्धी-साठी कुणीतरी कष्ट हे करायलाच हवेत, क्रिया-शील असावेच लागणार की यावेळी परीक्षा त्या मुलाची नाही. परीक्षा आपलीच आहे. !

मी वर्गात जाऊन निरीक्षकाला भेटलो. त्यांनी परीक्षा-नियमांचा पाठ सांगून, मला उपदेशिले, 'इतक्या उशीरा आलेल्या विद्यार्थ्याला परीक्षेला बसू देण्यात बोर्ड-नियमांचे जाणून बुजून उल्लंघन तर केले जात आहेच; पण त्यात कुणाकरिता तरी पार्शालिटी केलेलीही दिसायची. मीही त्यांना माझ्या मनाचा विचार

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ऐकविला व त्या कृत्याची आणि त्याच्या परिणामांची सारी जबाबदारी एकट्या माझ्यावर घेत आहे याचीही समज दिली. विद्यार्थ्यांजवळ थांबून त्यांच्या पाठीवरून हात फिरवीत, त्याने शान्तपणे उत्तरे लिहावीत, असे त्याचे सान्त्वन केले.

लागलीच ऑफीसमध्ये येऊन, विद्यार्थ्याने सांगितलेल्या उशिरा येण्याच्या कारणांचा, खरेपणा पारखू लागलो—स्टेशन मास्तरला फोन करून विचारले, "भुसावळहून अमळनेरला सकाळी ९–३० चे वेताला येणारी गाडी येऊन गेलीना वेळेवर ?"

"नाही हो. ती अजुन आलेलीच नाही. धरणगावहून कळले आहे. एंजिन नादुरुस्त झाल्याने ती तिथेच पडून आहे."

"असं होय ? स्टेशनमास्तर साहेब, एका उशिरा आलेल्या परीक्षेच्छू विद्यार्थ्याला परीक्षेला बसू द्यावा किंवा नाही हे मला ठरवायला तुमच्या या (Statement) ची जरुरी आहे की नेहमी सकाळी ९–३० ला येणारी ही गाडी आज धरणगावलाच नादुरुस्त होऊन यावेळेपर्यन्त अमळनेरला येऊ शकलेली नाही. तसे लिहून द्याल का मला ? त्या विद्यार्थ्याच्या भल्यासाठी या तपशीलाची गरज आहे. ते तुमचे पत्र पत्र आणायला अर्ध्यातासानं एक गडी पाठवू का ? "स्टेशनमास्तरने (भूतदयेने असावे) ते मान्य केले. निदान उशिरा यावे लागण्याच्या कारणाबद्दल तरी मुलगा खरे बोलत होता. मग धरणगाव स्टेशनमास्तरला फोन करून सगळी परिस्थिती निवेदिली. त्यानेही गाडीचा उशीर मान्य केला व आणखीन अर्ध्यातासात ती तेथून निघण्याची शक्यता दर्शविली. तेव्हा त्यांनाही विनंती केली की ते लिहून कळवावे. त्यासाठी (S. T.) ने चपराशी पाठवितो. शिवाय स्टेशन बाहेर असलेल्या सायकल दुकानातून चवकशी करून, याप्रमाणे १०–३० वाजेपर्यन्त कोणी अमळनेरसाठी सायकल भाड्याने नेली का ते विचारून, नेली असल्यास तिचा बिल्ला नंबर व दुकानाचे नावही कळवावे असे सुचविले.

एव्हानी एक वाजत होता. विद्यार्थ्याचे उशीरा परीक्षेला येण्याचे कारण पूर्णपणे विश्वासार्ह वाटू लागल्यामुळे त्याचे वर्गात जाऊन त्याला दिलासिले की त्याने निःशंक व शान्त मनाने उत्तर-पत्रिका लिहावी. पेपर लिहिण्याला सुरवात केल्यापासून पूर्ण तीन तास त्याला दिले जातील असेही आश्वासिले. त्याला दुकानदाराने दिलेला सायकल बिल्ला त्याचेकडून घेतला व परततांना निरीक्षकाला सुचविले की आणखीन दहा मिनिटांनी त्या विद्यार्थ्याला त्याच्या उत्तर-पत्रिकेसकट गड्याबरोबर ऑफीसमध्ये पाठवावे, म्हणजे १०–३० वाजता परीक्षा संपल्यावर पेपर्स गोळा करण्याच्या व विद्यार्थी उठून वर्गाबाहेर पडण्याच्या धामधुमीत त्याच्या भोवताली होणाऱ्या गलका-गोंधळाने, पेपर लिहायला लागणारी त्याची मनःशान्ती बिघडायला नको.

ऑफीसात त्याच्यासाठी व एका क्लार्क-साठी अशा टेबल-खुर्च्या मांडून घेतल्या व ३–३० पर्यन्त क्लार्कने तेथून न हालता ऑफीसचे काम करीत बसून त्या विद्यार्थ्याकडे लक्ष देण्याबद्दल फर्मावले. तेवढ्यात विद्यार्थीही आला व ते दोघे आपापल्या जागी बसून कामास लागले. आणखीन दोन तास मिळून, इतर परिक्षेच्छूंच्या प्रमाणेच आपल्याही पुरे तीन तास प्रश्नोत्तरे लिहायला मिळणार—मागायला गेलो एक डोळा, मिळाले दोन्हीही—याचे समाधान त्याच्या मुखावर सुस्पष्ट झाले होते.

मग परीक्षेच्या वाळंतपणाला लागलो. वेगवेगळ्या वर्गातून येणाऱ्या उत्तर-पत्रिकांची क्रमवार मांडणी; ऑफीसमधून प्रत्येक खोलीसाठी नेलेल्या पुरवणी–उत्तर पत्रिकांमधून कोणत्या विद्यार्थ्याने किती घेऊन आपल्या उत्तर-पत्रिकांना जोडल्या आहेत, उरायला पाहिजेत तेवढ्या पुरवणी-पत्रिका परत आल्या आहेत ना ते तपासले; बोर्डाने कळविल्या प्रमाणे त्या त्या परीक्षकाच्या नावे उत्तर-पत्रिका बांधणे, त्यांच्या संख्येनुरूप पेपर गठ्ठे पोष्टासाठी साध्या कापडात रजिस्टर पोस्ट पार्सल व गोणपाटात बांधून रेल्वे पार्सलसाठी शिवून घेणे—त्यावर नाव, पत्ते लिहिणे; कॉपी वाल्यांच्या वेगळ्या काढलेल्या उत्तर-पत्रिका,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांच्या बद्दलचा अहवाल तयार करून, साध्या कापडात पोस्ट पार्सल बनवून त्यावर बोर्ड ऑफीसरचा पत्ता लिहिणे. ते सारे गठ्ठे सील्ड केल्यावर स्टेशन पोस्टाकडे रवाना करून त्यातून मोकळा झालो.

तोवर दोन्ही स्टेशन मास्तरांच्याकडून पत्रे आली होती. मुलाच्या सायकलचा बिल्ला नंबर जुळता आढळल्यावर, आचरण केलेल्या 'नियम बाह्य' कारवाईला परिस्थितीने कौल दिलेला जाणून, आरंभिलेल्या धडपडीचे चीज होत असल्यासारखे वाटले.

३–३० वाजता विद्यार्थी पेपर देऊन जाऊ लागताना सद्गदीत होऊन आभार मानू लागला. तेव्हा त्याच्या उशीरा येण्याच्या कारणाची सत्यता पटल्याचे त्याला सांगून, त्याचा सायकल बिल्ला परत करताना, खोटेपणापेक्षा खरेपणाचाच सदा अवलंब करीत असावे असा हितोपदेश केला. सत्यकथनाबद्दल शाबासकी देताना, परीक्षेकरता जिद्दीने त्याने केलेल्या जिवापाड परिश्रमाची वाखाणणी केली. त्याने व मी केलेल्या प्रयत्नांना यश येवो असे सदिच्छिले. त्यावेळचा मुलाच्या चेहऱ्यावरचा कृतकृत्येचा भाव व डोळ्यांतील अश्रूंची कृतज्ञतेची फुले मी विसरू कसा ?

नंतर एक मुद्देसूद पत्र बोर्ड परीक्षाधिकारी पुणे (त्यावेळी डॉ. ए. जी. पवार होते– जे नंतर शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू झाले), यांचेसाठी तयार केले. त्यात, दोन्ही स्टेशन-मास्तरांचे दाखले व त्या परिस्थितीत इतक्या उशीराही (तब्बल दोन तास !) आलेल्या विद्यार्थ्याला परिक्षेला बसू देण्याचा (एका दृष्टीने नियमबाह्य) मी आचरलेला निर्णायक मार्ग कळविला. सोबत धाडलेली विद्यार्थ्याची उत्तर पत्रिका, माझी कारवाई युक्त वाटली तर अमूक परीक्षकाच्या पत्त्यावर पाठवावी; माझा मार्ग चुकीचा वाटला तर ती उत्तर पत्रिका, नियम बाह्य लिहिली गेली म्हणून, नष्ट करून मला त्याप्रमाणे कळवावे अशी विनंती केली. शेवटी त्यात लिहिले की सध्या घडली होती तशी परिस्थिती पुढे केव्हाही घडली तरी त्यात माझी सद्सद्विवेक बुद्धी मला हाच मार्ग आचरावयास लावेल; तेव्हा माझ्या कारवाईस आपल्याला (निरर्थक केलेले) नियमांचे उल्लंघन वाटले तर पुढच्या वेळी कृपया मला परीक्षाकेन्द्रप्रमुख म्हणून नेमू नये अशीही विनंती केली होती.

६–७ दिवसांनी माझ्या पत्राला उत्तर आले. डॉ. आप्पासाहेब पवारांनी इतके छान लिहिले होते– 'तुमचा मार्ग हाच त्या प्रसंगी रास्त व युक्त होता; येवढेच नव्हे तर नेमलेला परीक्षा-केन्द्र-प्रमुख हा त्या स्थळी त्या वेळात, परीक्षा बोर्ड अध्यक्षाच्या मान्यतेचा असल्याने त्याला प्रत्यक्ष प्रसंगानुरूप संयुक्त निर्णय घेण्याचाही अधिकार असतो.' येवढे कळवून त्यांनी मी या प्रकारची जबाबदारी अंगावर घेऊन कार्यवाही केली याबद्दल समाधान व्यक्त करून आभारही मानले होते.

. . इकडे तो तरुण गृहस्थ काहीसे गहिवरून बोलतच होता. . "तेव्हा तर मी पास झालोच. पण नंतरही पुढे शिकून सध्या . कॉलेजमध्ये मी प्राध्यापक आहे. सर, तुमची मला सदैव आठवण येते. त्या आणिबाणीप्रसंगी तुम्हीच मला तारलेत म्हणून मी इतका शिकू तरी शकलो. तुमचा मी ऋणी आहे सर. आपल्या कॉलेजच्या स्नेहसंमेलनाला तुम्ही येताहात हे कळल्यावरून मी तुम्हाला भेटायला आलो आहे. "

खरंच सध्याच्या शिक्षक–विद्यार्थी-पालकांच्या 'संबंधांच्या' पार्श्वभूमीवर त्या विद्यार्थ्यांचा इतक्या कालावधीनंतरही टिकून राहिलेला शिक्षकांबद्दलचा सादर भक्तिपूर्ण भाव आणि त्यावेळी त्याने दाखविलेली शिक्षणाची जिद्द शेवटपर्यंत टिकवून धरण्याची निष्ठा याचा मलाच अभिमान वाटला.

त्या दिवशी संध्याकाळी परतीच्या प्रवासासाठी अमळनेर स्टेशनवर येतो तर कळले गाडी २०–२५ मिनिटे लेट आहे. मग तिथेच फलाटावरच्या बाकावर बसून, त्या शिक्षक बंधूबरोबर बोलत राहिलो— मी समोर उभ्या असलेल्या मालगाडीकडे बघत होतो.

"सर, किती भावपूर्ण तो विद्यार्थी बोलत होता, नाही ? सहसा अशा धडाडीने कार्ये होत नाहीत. ते तुम्ही केलेत म्हणून तुमच्या पदरी हे सुफळ. निष्ठेने कार्ये करावीत म्हणतात. . ."

"तुम्ही ही संत-वाणी म्हणताहात की रेल्वे–वाणी ?"

"मी नाही समजलो. ?"

"समोर पहाना. त्या मालगाडीच्या एकानंतरच्या एका डब्यावर काय लिहिलेले आहे– दरे मरे पुरे उरे--- डरतो तो निष्प्रभ होतो, मरतो; नाही तो पुरून उरतो. हीच नाही का रेल्वेवाणी ?"

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शेष-समीक्षा / रेखा चिंचवडकर

ॲड. खं. त्र्यं. मुळे यांनी शेष हे उपनाम धारण करून वेळोवेळी लिहिलेल्या परीक्षणात्मक व समीक्षात्मक लेखांचा हा संग्रह १९५९ ते ७५ या कालावधीत मुख्यतः 'वीणा' आणि 'नवनीत' या मासिकांतून प्रसिद्ध झालेले हे संकीर्ण लेख येथे पुस्तकरूपाने एकत्र आणलेले आहेत. पुस्तकाचे संपादन वसंत शिरवाडकर यांनी केलेले असून त्यांची प्रदीर्घ प्रस्तावना पुस्तकाला लाभलेली आहे. मुळयांच्या नावाशी व कार्याशी अपरिचित वाचकां-समोर त्यांची प्रतिमा उभी करण्याची जबाबदारी प्रस्तावना–लेखकाने समर्थपणाने पार पाडलेली दिसते.

ॲड. खं. त्र्यं. मुळे हे कामगार चळवळीतले नेते व प्रसिद्ध मार्क्सवादी विचारवंत. मार्क्सवादी समीक्षक म्हणून मराठी अभ्यासकाला श. मा. मुक्तिबोध व दि. के. बेडेकर ही दोन नावे सुपरिचित आहेत. 'शेष' हे त्यामानाने काहीसे अप्रकाशितच म्हणावे लागतील. मार्क्सवादी जीवनदृष्टी स्वीकारलेली असल्यामुळे साहजिकच कला व मानवी समाज यांकडे ते त्याच चष्म्यातून पाहतात व विश्लेषण करतात. लेखकाने 'माझी साहित्य-विषयक दृष्टी' असा प्रदीर्घ लेख लिहून स्वतःचा साहित्यविषयक दृष्टिकोण स्पष्ट केलेला असल्यामुळे त्यांच्या परीक्षणपर लेखातून तो शोधावा लागत नाही. तेव्हा वाचकाची जबाबदारी ते स्वतः सांगितलेल्या दृष्टिकोणाशी, निकषांशी प्रामाणिक राहून परीक्षण करतात अथवा नाही हे पाहण्या-चीच आहे.

त्यांच्या जीवनदृष्टीमुळे समीक्षेतही साहित्य आणि जीवन यांची फारकत घडत नाही. मानवी जीवनाच्या उन्नयनासाठी साहित्याने मार्गदर्शक व्हावे अशी त्यांची अपेक्षा आहे. 'माझी साहित्यविषयक दृष्टी' या लेखात ते हा विचार आवेशाने मांडतात "कथा काय, काव्य काय, नाट्य काय आणि समीक्षा काय समाजजीवनाच्या उत्कर्षाला ती उपयुक्त नसेल तर कलेच्या क्षेत्राच्या हिरवळीवर पसरलेले ते खाजकुईलीचे काटे आहेत असे मला वाटते" समाजहितदक्ष तेच साहित्य अशी त्यांची दृष्टी असल्यामुळे आपोआपच कलेतील सामाजिक आशयाला व तद्संभाव्य परिणामांना सर्वश्रेष्ठ महत्त्व प्राप्त होते. जीवनापासून सामाजिक समस्यांपासून दूर जाऊन हस्तीदंती मनोऱ्यातून लेखन करणाऱ्या साहित्यिकांना ते Alienation चे बळी समजतात. समाजा-शिवाय व्यक्तीचे अस्तित्व कल्पून हे विचारवंत एका महत्त्वाच्या मूलभूत सत्याकडे दुर्लक्ष करतात असे त्यांना वाटते. साम्यवादी विचारसरणीत समाजाविना व्यक्तीची कल्पना अशक्य मानलेली असली तरी त्यामुळे कलावंताचे स्वातंत्र्य मर्यादित होत नाही असे ते स्पष्ट करतात.

पुस्तकपरीक्षणासाठी निवडलेली पुस्तके व त्या पुस्तकांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोण त्यांच्या साम्यवादी निष्ठेची साक्ष पटवितात. 'ख्रिस्तोफर कॉडवेलची सौन्दर्यमीमांसा' हा परिचयात्मक लेख ते लिहितात तो 'कॉडवेल हा शुध्द मार्क्सवादी दृष्टीतून सौंदर्याची मीमांसा करणारा विचारवंत आहे म्हणूनच. मराठी साहित्यात समाजनिष्ठ भौतिकवादावर आधारित सौंदर्यविचार सुरू व्हावा असाही एक हेतू त्यात अन्तर्भूत असावा.

लेखक ज्या समाजामध्ये राहतो, स्वतःचे अस्तित्व घडविण्यासाठी धडपडतो त्या समाजाचे आणि त्याचे नाते काय? लेखकाच्या संदर्भात सामाजिक जाणिवेचा, त्याच्या स्वातंत्र्याचा नेमका अर्थ काय इ. मूलभूत व वादविषय ठरलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्याची भरीव दिशा ते 'बोरिस पास्तरनॅक आणि त्याची झिवॅगो' मध्ये दाखवितात.

सामंतशाहीवर कोरडे ओढणाऱ्या व कामगार-वर्गाची गीते गाणाऱ्या नायकोव्हस्कीच्या काव्य-संग्रहाचा परिचय त्यांनी एका लेखात करून दिला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहे व त्याच्या काव्यसंग्रहाचे मराठी रूपांतर करणाऱ्या सदानंद रेग्यांचे अभिनंदनही केले आहे. कुसुमाग्रजही त्यांना श्रेष्ठ वाटतात. ते निव्वळ त्यांच्या सामाजिकतेमुळेच ! वास्तविक पाहता कुसुमाग्रज प्रसिद्ध आहेत ते त्यांच्या भव्य, उत्तुंग कल्पनाशक्तीसाठी, प्रत्यक्षदर्शी वर्णनांसाठी व भावोत्कट प्रेमकवितांसाठी ! परंतु सामाजिकतेचा चष्मा लावून काव्य वाचल्याने त्यांना महत्वाच्या व प्रधान वाटतात त्या कुसुमाग्रजांच्या सामाजिक कविता ! त्यांची साम्यवादनिष्ठा ही त्यांच्या परीक्षणाची मर्यादा ठरते ती अशावेळीच ! अशीच परिस्थिती वि. द. घाटयांच्या आत्मचरित्रावरील परीक्षणाच्या वेळी उपस्थित होते. त्या पुस्तकावरून तत्कालीन महाराष्ट्रातील सामाजिक, धार्मिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळींचा पुरेसा बोध होत नाही म्हणून हळहळतात. मार्क्सवादी विचारात कलावंताच्या व्यक्तिस्वातंत्र्याला ग्रहण लागत असल्याची टीकाकारांची ओरड अशा ठिकाणी न्याय्य वाटू लागते.

'विश्रब्ध शारदा' हा अपूर्व पत्रसंग्रह त्यांना मोह घालतो तो त्याच्या सामाजिक उपयुक्ततेमुळेच ! इंग्रजी राजवटीतील ही सगळी पत्रे तत्कालीन सामाजिक व राजकीय गुंतागुंतीवर प्रकाश टाकतात म्हणूनच सुळयांना त्यांची किंमत वाटते. मराठी भाषाशास्त्रावर ते लेख लिहितात तो मराठी भाषा समाजधारणेचे एक मूलतत्त्व वाटते म्हणूनच' !

त्यांच्या या सामाजिक उपयुक्ततेच्या सिद्धान्तापलीकडे जाऊन त्यांच्या रसिकतेचे दर्शन घडविणारा लेख म्हणजे 'कुसुमानिल'चे परीक्षण होय. सुळयांच्या चिकित्सक, विवेचक बुद्धीची साक्ष पटविणारे लेख 'महाभारतावर पाच प्रकाशझोत', 'साहित्यातील सौंदर्य आणि वास्तवता, 'विदूषकाचे मूळ' इ. होत. महाभारतावरील प्रकाशझोतात इरावतीबाईंच्या 'मयसभे'बद्दलच्या विधानातील अशास्त्रीयता ते दाखवितात. तर दुर्गाबाईंचा कृष्ण म्हणजे उत्कट काव्यप्रीतीचे व सौंदर्यप्रीतीचे फळ आहे असा निस्संदिग्ध शेरा मारतात. तर साहित्यातील सौंदर्यावरील लेखात गाडगीळांनी 'रस' संकल्पनेवर घेतलेले आक्षेप त्यांच्या अपूर्ण अभ्यासाचे निदर्शक समजतात.

स्वतंत्रपणे साहित्यविचार करणे त्यांच्या जीवनाच्या संघर्षात व अस्थिर जीवनक्रमामुळे त्यांना शक्य झाले नसावे. परंतु ह्या परीक्षणपर लेखातूनही त्यांच्या स्वतंत्र व मूलगामी प्रज्ञेचा आवाका जाणवल्याशिवाय राहात नाही. या पुस्तकाने उपलब्ध मार्क्सवादी समीक्षेत नक्कीच मोलाची भर पडेल.

शेष-समीक्षा; खं. त्र्यं. सुळे,
अभिनव प्रकाशन, मुंबई;
एप्रिल, १९७९. पृष्ठसंख्या १८०
मूल्य वीस रुपये.

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कविता

शोध / रमेश वाबगांवकर

मला ओढ होती
तुझ्या पावलांची
तुझी पाऊले येथ
वळलीच नाही
मला आस होती
तुझ्या सावलींची
उन्हे डोइवरली
सरलीच नाही
तुझा ध्यास होता
मना लागलेला
कधी नीज डोळचांस
शिवलीच नाही
तुझा शोध घेता
शिणलो किती मी
दिठीला तुझ्या खूण
पटलीच नाही
तुझ्या जाणिवेच्या
प्रकाशात न्हालो
तुझ्या अंतरी रंग
खुललेच नाही
तुझ्या आठवाने
कसा चिंब झालो
मनाचे तुझ्या पंख
भिजलेच नाही

लाटा / रंजना विगम

पाऊस तर कुठेही नव्हता मग हे ओलेपण कुठून
किती लवकर विसरुन जातेस आपण रागावलो
होतो म्हणून.
सर्वदूर पांखरं एखादा तुझाही असेल त्यात
'जवळ ये ना एकदा बघ कासावीस झालेत हात'.
कुणाकुणाच्या आठवणी अशा ठेवशील जपून जपून
पिकातून येतात लाटा अन् जातात वाऱ्यावर उडून.

साद / सुलभा हेर्लेकर

मावळता सूर्य
तांबडे आकाश
कसे पेटले आहे रानोमाळ
दिशा कशा स्तब्ध (मोहरायला)
विसरतात
काळचा मातीचे कोंभ
हिरव्या रानाचा साज
ही वेळ अशीच
वंदिस्त कां करीत नाही
हळूहळू मिटत चाललेली
माझी सावली
तुला साद देत आहे

सल / उषा लिमये

पिकल्या पानांनी अंकुराचा मोह धरावा
हे गैरच.
पण, उमलल्या डहाकीला, प्रालाण घालण्यासाठी
तिला आपल्या शेवात, झाकावंच लागतं ।।
झिजल्या वस्त्राला, जीर्ण झालं तरी
उद्याच्या नव्यासाठी, जगावंच लागतं ।।
उसळत्या लहरीला, वाट देण्यासाठी
आधीच्या लाटेला, मागे फिरताफिरता, हसावचं
लागतं ।।
मृण्मय घटाला सूर्यबिंब झेलायला
कधीतरी काठोकाठ भरावंच लागतं ।।
पुढे जाणाऱ्या धुंद नदीला पाहून
उपेक्षित उलघाल लपवीत
हिमालयाला
स्थितप्रज्ञ होऊन गोठावंच लागतं ।।
पंख फुटल्या पिलाला, कासवीच्या कृतार्थतेने
वात्सल्याचा विळखा सोडवून
मुक्त करावंच लागतं
मुक्त करावंच लागतं ।।

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केवळ पाऊस म्हटला तरी / नीलकांत ढोले

केवळ पाऊस म्हटला तरी त्याला किती संदर्भ असतात
ऋतू बदलत्या पक्षांच्या रंगीत पंखासारखे
म्हणजे रंग आणि पाऊस असेच एकजीव होतात
ओलेत्या डोळ्यांना काजळकडा रेखल्यासारखे
ढगांचा जास्वंदी रंग मी पाहिलाय्
तू उभी असतांना मावळतीच्या उंबरठ्यावर
वाऱ्याच्या मंद झुळुकीसरशी भूरभूरणाऱ्या
तुझ्या केसांना बिलगलेला सोनेरी वर्ख
कितीतरी दिवस सलत होता आतल्या डोळ्यातून
वैऱ्यासारखा खुपत होता निंबोणीवर झुकलेला संध्यचंद्र
सोन्याच्या झारीतून थिरकत येणारा
श्रावणशिरवाही आता काळाशार होवून बरसतोय्
केवळ पाऊस म्हटला तरी.
स्थलपरत्वे पावसाला गंधही असतात जीवघेणे
मी अजून विसरलो नाही तुझ्यासोबत वळणावरून–
वळतांना आलेल्या शिरव्याचा उन्मादक गंध !
पण साऱ्या स्वप्नांचे अर्थच आता बदलत आहेत
सूर्य मावळताच झरझर पालटणाऱ्या आकाशरंगासारखे
ते सारेच पाऊस गंध रक्तात मिसळून गेले आहेत.
झाले आहे प्रचंड ओझे या रक्ताचे सुद्धा !
आताशा हलकेच बरसणाऱ्या सरीतून
येणारा ओला सुगंध घुमसत जातो श्वासाश्वासातून
गॅसचेंबरमध्ये घुसणाऱ्या विषारी धुरासारखा
केवळ पाऊस म्हटला तरी त्याला किती संदर्भ असतात.

झपाटलेली / जयश्री कुळकर्णी

मैलोन् मैलावरूनही
ओळखलं–
हे सृजन माझ्यासाठीच.
नाही तर
या लाल-पिवळ्या रंगाची,
ज्वालांच्या या आकाशझेपेची,
चराचराला वेढून टाकणाऱ्या–
सामावून टाकणाऱ्या लगटीची
भुरळ मला पडलीच नसती.
आणि खुळ्यासारखी––
याचीच चित्रं रंगवीत बसले
झपाटलेली.
किती जवळ आले त्या विळख्यात
कोणास ठाऊक ?
पण स्पर्शासाठी आसुसलेले
हात भाजून. रक्षा साचली
आता मात्र––
मीच मैलोन् मैलांवरून
त्या ज्वालांकडं,
कोळपलेल्या माझ्याच हातांकडं
नजर लावून बसते––
झपाटलेली ! !

फकीर / नंदकुमार शेंडगे

मी जन्म दिलाय प्रार्थनेची कत्तल करणाऱ्या फकिराला
आणि त्याची मैत्री करुन दिलीय संध्याकाळशी
त्याच्या डोळ्यात मी पेरून टाकली उदासीची पाखरें–
तेव्हापासून तो फकीर गाणं गातोय माझे
त्याच्या झग्यात भरून आहेत माझे शब्द
आणि त्याच्या मनांत माझी वेदना–
तो जातोय मीच आखून दिलेल्या रस्त्यावरून
ज्याच्या दुतर्फा एकही दिवा नाही
प्रकाश बाहेर फेकणारा
मिट्ट काळोखाची गोष्ट मी त्याला सांगितलीय
आणि समजावून सांगितले घराचे अर्थ–
तेव्हापासून तो शोधत फिरतोय एक शहर
जिथून माझा प्रारंभ झालाय,
आणि या संबंधी त्याने काळोखाशी,
खलबतंही केलीत कित्येक–
अजून त्याच्या झांजेत उतरून आलाच नाही सूर्य.

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त १-१२-१९७९ ते ३१-३-१९८०

गो. स. देहाडराय, सरचिटणीस

१. **कार्यालय व्यवस्थापन :**

१.१ दिनांक १३-१-८०, कार्यकारी मंडळाची सभा केंद्रिय कार्यालयात झाली. सभेच्या सुरवातीला प्रा. न. र. फाटक यांना श्रद्धांजली अर्पण करण्यांत आली. महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळावर श्री. दादासाहेब खेळकर यांची नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदन करण्यांत आले. श्री. शांतारामजी पोटदुखे व श्री. वसंतराव साठे यांची लोकसभेचे खासदार म्हणून निवड झाल्याबद्दल अभिनंदन करण्यांत आले. प्रा. मुक्तिबोध यांना साहित्य अकादमीच्या पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल व प्रा. श्रीधर शनवारे यांना केन्द्रिय शासनाची शिष्यवृत्ती मिळाल्याबद्दल अभिनंदन करण्यांत आले. श्री. वैतुले यांनी परीक्षा समितीचा अहवाल वाचून दाखविला. परीक्षार्थींची संख्या सहापटीने वाढल्याचे सांगण्यांत आल्यावर त्यांचे अभिनंदन करण्यांत आले.

श्री. काटकर यांनी जो वि. सा. संघाचा इतिहास लिहला आहे तो त्यांचेकडून मागवून शक्य असल्यास संपादित करून मुद्रीत करावा ह्या संबंधी श्री. मदन धनकर कार्यवाही करतील.

१.२ निवडणूक १९८०-८३ लवाद-अॅड. व्ही. डी. देशमुख यांची मुंबईच्या कोर्टात सेशन जज म्हणून नियुक्ति झाली असल्यामुळे, त्यांनी लवादाच्या पदाचा राजीनामा दिला. त्यांचे जागेवर लवाद म्हणून काम करण्यांसाठी अॅड. चांडक, रतनलाल सुंदरलाल, रामदास पेठ, नागपूर यांची नियुक्ती करण्यांत आली.

१.३ निवडणूकीचा निकाल— दि. १६-१-८० ला लावण्यांत आला. पुढील तीन वर्षाकरता डॉ. मधुकर आष्टीकर अध्यक्ष यांची फेरनिवड झाली. कार्यकारीणीच्या १६ जागासाठी सर्वश्री— (१) श्रीपाद मुंजे, (२) प्रकाश देशपांडे, (३) बजरंग सरोदे, (४) मनोहर म्हैसाळकर, (५) गो. स. देहाडराय, (६) मदन गडकरी, (७) चंद्रकांत कुळकर्णी, (८) माणिक वैतुले, (९) अ. ल. लिमये, (१०) पु. ह. धनकर, (११) के. मा. मुन्शी, (१२) तु. वि. गेडाम, (१३) पंढरीनाथ मांडवगणे, (१४) शंकर बालेकर (१५) योगेश वऱ्हाणपुरे, (१६) माधव दलाल, यांची निवड झाली.

निवडणूकीचे काम निर्वाचन अधिकारी अॅड. पां. वा. गडकरी व उपनिर्वाचन अधिकारी श्री. प्र. रा. लिमसे यांनी केले. त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानण्यांत आले.

२. **आजीव सभासद :**

२.१ (१) श्री. वाटवे दत्तात्रय वामन, नागपूर, (२) श्री. कुळकर्णी प्रभाकर बळवंतराव, नागपूर, (३) श्री. मुंजे प्रमोद वामनराव, नागपूर, (४) श्री. मुन्शी मिलींद नारायण, नागपूर, (५) श्री. पटोरीया राजेंद्र, नागपूर, (६) सौ. हेर्लेकर सुलभा विजय, नागपूर, (७) सौ. चांदुरकर शोभना जयंत, नागपूर, (८) सौ. पिंपळापुरे कल्याणी मनोहर, नागपूर.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

३. **मराठी साहित्य महामंडळ :**

३.१ महामंडळाची सभा दि. ३१ मार्च रोजी बार्शी येथे झाली. वि. सा. संघातर्फे डॉ. मधुकर आष्टीकर, श्री. आ. रा. देशपांडे, व श्री. गो. स. देहाडराय हे प्रतिनिधी म्हणून गेले होते.

३.२ फेब्रुवारी, दिनांक १, २, ३, १९८० ला ५४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन बार्शी येथे प्रा. गं. बा. सरदार यांचे अध्यक्षतेखाली यशस्वी पणे पार पडले.

४. **स्मृति दिन / जयंती**

४.१ दि. ६–१२–७९ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या २३ साव्या पुण्यतिथी निमित्ताने श्री. वादे लायब्ररी इन्स्पेक्टर यांचे हस्ते त्यांचे छायाचित्राला हार अर्पण करण्यांत आला.

४.२ दि. २३–१–८०–नाटककार राम गणेश गडकरी यांचे स्मृतिदिना बद्दल त्यांचे फोटोला न्या. मू. पी.जी. पळशीकर यांचे हस्ते फोटोला हार घालण्यांत आला.

४.३ दि. ३०–१–८०–गांधी जयंती निमित्त युगवाणीचे संपादक डॉ. प्रभुदेसाई यांचे हस्ते फोटोला हार घालण्यांत आला.

४.४ दि. २०–३–८० बा. सी. मर्ढेकर यांचे स्मृति दिना निमित्त त्यांचे छाया चित्राला श्री. बापुसाहेब बारपुरे यांचे हस्ते पुष्पहार घालण्यांत आला.

५. **सन्माननीयांच्या भेटी :**

५.१ ११–१२–७९–डॉ. वि. रा. करंदीकर, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, यांची भेट.

५.२ १२–१२–७९–श्री. कृ. द. कुळकर्णी डायरेक्टर ऑफ लायब्ररीज् यांची शिवाजी संदर्भ ग्रंथालयाला व कार्यालयाला भेट.

५.३ १०–२–८०–मा. ना. वसंतराव साठे, केंद्रिय माहिती व नभोवाणी मंत्री भारत सरकार, वि. सा. संघाचे आजीव सभासद, यांचा सत्कार समारोह धनवटे रंगमंदिरात करण्यांत आला. ह्या प्रसंगी श्री. मा. गो. वैद्य संपादक, तरूण भारत, श्री. टी. जी. देशमुख, श्री. ॲड. चान्सरकर, ॲड. चांदूरकर यांची भाषणे झाली. त्यांचा वि. सा. संघातर्फे शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यांत आला.

३१–१–८०–श्री. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३०० व्या पुण्यतीथी निमित्ताने वि. सा. संघाच्या शलाका शिल्पावर विद्युत रोषणाई करण्यांत आली.

५.४ ६–३–८०–डॉ. रा. म. भुमारी मराठी विषयाचे प्रमुख. उस्मानिया विद्यापीठ, हैद्राबाद यांची भेट.

६. **सांस्कृतिक कार्यक्रम :**

६.१ १७–१२–७९ ला शासकीय विभागीय ग्रंथालय, नागपूर, अभिव्यक्ति आणि वि. सा. संघ, नागपूर यांचे या संस्थेतर्फे "वाचक व्यासपीठ" ह्या कार्यक्रमांतर्गत कुमारी नर्मदा देशमुख लेखक रघुनाथ लोणकर या पुस्तकावर परिसंवाद. या परिसंवादात श्रीमती कुमुद मंडलेकर, मालती दामले, सुलभा हेर्लेकर, आणि मृणाल चिचाळकर यांनी भाग घेतला होता.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

६.२ १९–१२–७९–मराठी विज्ञान परिषद, नागपूर या संस्थेने वि.सा. संघाच्या सहकार्याने प्रा. ज. ग. फणसाळकर यांचे विज्ञानाची वाटचाल "गणित" या विषयावर भाषण झाले.

६.३ ३०–१२–७९–कवी सुधाकर गायधनी यांच्या "देवदूत" या प्रदिर्घ काव्याचे वाचन झाले. अध्यक्षस्थानी डॉ. मधुकर आष्टीकर होते.

६.४ १४–१–८०–विदर्भ साहित्य संघाच्या वर्धापन दिन समारोह सोमवार दि. १४–१–८० ला ख्यातनाम साहित्यिक व साहित्य अकादमीचे अध्यक्ष माननीय श्री. उमाशंकर जोशी यांचे हस्ते झाला. याच प्रसंगी डॉ. नरेंद्र गोफळी, डॉ. म. पा. कुळकर्णी यांना नागपूर विद्यापीठाची पीएच. डी. मिळाल्याबद्दल, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यांत आला. कु. रत्ना महाजन यांना साहित्याचार्य पदवीपत्र, कै. मामा वरेरकर पुरस्कार रोख रु. १०१/-, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यांत आला. तिळगूळ वाटप समारंभ होऊन कार्यक्रम समाप्त झाला.

रात्री ९ वाजता कु. शामला काकडे यांचे "सोलो" तबला वादनाचा कार्यक्रम झाला व त्यानंतर प्रा. राजाभाऊ कोकजे यांचा शास्त्रीय गायनाचा बहादर कार्यक्रम झाला.

६.५ जाने. दि. १९, २०, २१, १९८० ला यंदाची कै. वेहेरे व्याख्यानमाला पुण्याचे डॉ. अनंतराव आठवले ह्यांनी गुंफली. "संस्कृतिच्या दृष्टीतून महाभारत". महाभारताचा काळ, स्वरूप, महत्त्व आणि व्यतिरेखा ह्या विषयावर तीन दिवस अत्यंत श्रवणीय अशी व्याख्याने झाली. अध्यक्षस्थानी डॉ. मधुकर आष्टीकर हे होते.

६.६ २६–१–८० ला गणराज्य दिना निमित्त झेंडावंदनाचा कार्यक्रम डॉ. मधुकर आष्टीकर यांचे हस्ते झाला.

६.७ २२–३–८०–सुप्रसिद्ध दलित्तोद्धारक स्व. किसन फागोजी बनसोड यांचे छाया चित्राचे अनावरण समारंभ डॉ. बाबा आढाव यांचे हस्ते झाला. हे छाया चित्र वि. सा. संघाला भेट म्हणून देण्यात आले आहे.

६.८ २६–३–८०–लाड व्याख्यान मालेत झालेले श्री. पु. भागवत यांचे मर्ढेकरांच्या काव्यावरील ध्वनीमुद्रित भाषण शिवाजी ग्रंथालयातील विद्यार्थ्यांना ऐकविण्यांत आली.

६.९ २८–२९–२–८०–नारदिय किर्तने श्री. प्र. वा. मोकाशी व त्यांच्या कुटुंबियांनी श्री. रेणका विश्वस्त निधीतून महाराष्ट्र बँकेकडून, मिळालेल्या देणगीतून ह्या वर्षीची किर्तने दादाबुवा देवरस यांनी केली.

७. संगीत समिती

७.१ संगीत अलंकार स्व. पंडित शंकरराव सप्रे यांचे स्मृति प्रीत्यर्थ शास्त्रीय संगीत स्पर्धा दि. २–१२–७९ ला घेण्यांत आल्या. या स्पर्धेचे परिक्षक श्री. शरद सुतवणे व सौ. पवनसकर हे होते. प्रथम पारितोषिक रोख रु. ७५/- कु. चित्रा देशपांडे. द्वितीय पारितोषिक रोख रु. ५०/-. सौ. वीणा वझलवार, आणि तृतीय पारितोषिक कु. गीता तवनंदी ह्याना मिळाले. ह्याचवेळी संगीत विशारद परीक्षेत १९७८ मध्ये नागपूर केन्द्रातून सर्व प्रथम आल्याबद्दल कु. मृदुला कोल्हटकर यांना रोख रु. २५/- व नागपूर विद्यापीठाच्या एम.ए. (संगीत) १९७९ परीक्षेत सर्व प्रथम आल्याबद्दल कु. विद्या हस्तक यांना रोख रुपये २५/- बक्षिसे देण्यांत आली. कार्यक्रमाचे संचालन श्री. राम सप्रे यांनी केले.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

७.२ २४–३–८० कै. ग. दि. माडगूळकर यांच्या गीतरामायण रौप्य महोत्सवानिमित्ताने नागपूरचे सुविख्यात तरूण गायक सुरमणी श्री. शरद सुतवणे यांचा गीतरामायणातील नीवडक गीतांचा कार्यक्रम झाला. त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यांत आला.

८. नाट्य समिती

८.१ १५–१२–८० घर आंगण कार्यक्रमान्तर्गत सुभाप मंडळातर्फे "राजाराणी" एकांकिका सादर करण्यांत आली.

८.२ डावरे एकांकिका स्पर्धा–१९८०–ह्या स्पर्धा धनवटे रंगमंदिरात १५ जाने., ८० ते २२ जाने.,८० पर्यंत घेण्यांत आल्या. या स्पर्धे मध्ये एकूण ३० संस्थानी भाग घेतला होता त्यातील १० संस्था बाहेर गावच्या होत्या हे विशेष. परिक्षक म्हणून सर्वश्री शाम सरवटे, वामन तेलंग, व विश्राम अर्नसिंगकर यांनी काम केले. दि. २३–१–८० ला नाटककार कै. राम गणेश गडकरी स्मृति दिनाच्या दिवशी न्यायमुर्ति पद्माकर पळशीकर यांच्या शुभ हस्ते पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. संपूर्ण स्पर्धेचे संयोजन सौ. कमल आंबेकर यांनी केले. स्पर्धेची पारितोषिके खालील प्रमाणे देण्यात आली.

कै. पद्माकर डावरे एकांकिका स्पर्धा, १९८०.

—: पारितोषिक पत्रक :—

प्रथम पारीतोषिक कै. पद्माकर डावरे फिरती ढाल व १५१/- रु. चे रोख		"नाटयधर्मी, अमरावती"	"उपाशी खलाशी"
द्वितीय क्र. १०१/- रु. रोख		"किलबील"	"थोकडा"
तृतीय क्र. ५१/- रु. रोख		"मॅकॅवीज यंग मेन ग्रुप"	"पाचर"
चौथा क्रमांक प्रशस्ती पत्र		"नवरंग नाट्य संस्था"	"हाईक"
वैयक्तिक अभिनय : (पुरुप)			
प्रथम पारीतोषिक रु. २५/- रोख		संस्था	एकांकिका
कलाकार :—	रविन्द्र जोशी	"नाटयधर्मी, अमरावती"	"उपाशी खलाशी"
भुमिका :—	रड्या		
द्वितीय पारीतोपिक :—१५/- रु. रोख		"किलबील"	"थोकडा"
कलाकार :—	दिवाकर आचार्य		
भुमिका :—	राजा		
प्रशस्ती पत्र		"नाटयसाधना, गोंदिया	"शल्य"
कलाकार :—	अरूण सरूरकर		
भुमिका :—	म्हातारा		

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रशस्ती पत्र		"मॅकॅन्वीज यंग मेन ग्रुप"	"[illegible]ाचर"
कलाकार :—	आशित आंबेकर		
भुमिका :—	सुत्रधार		

वैयक्तिक अभिनय (स्त्री)

प्रथम पारितोषिक २५/- रु. रोख		"अमर नाटच संस्था"	"गोष्ट"
कलाकार :—	स्मिता लातुरकर		
भुमिका :—	उत्तरा		
द्वितीय पारितोषिक रु. १५/- रोख		"किलवील"	"थोकडा"
कलाकार :—	चंदा गोटे		
भुमिका :—	वसुंधरा		
प्रशस्ती पत्र		"रामनगर नागरीक मंडळ"	"कुटुंब निरुद्ध" ?
कलाकार :—	कमल पांडे		
भुमिका :—	कुटुंब		
प्रशस्ती पत्र		"प्रयोग–अकोला"	"दृष्ट"
कलाकार :—	अरुणा घैसास		
भुमिका :—	म्हातारी		

दिग्दर्शन

प्रथम पारितोषिक रु. ५१/- रोख		"नाटयधर्मी, अमरावती"	"उपाशी खलाशी"
दिग्दर्शक :—	संजय कुळकर्णी		
द्वितीय पारितोषिक रु. २५/- रोख		"किलवील"	"थोकडा"
दिग्दर्शक :—	डॉ. नीलकांत फुलसंगे		
प्रशस्ती पत्र		"नवरंग नाटच संस्था"	"हाईक"
दिग्दर्शक :—	सुनील जोशी		

लेखन

प्रथम पारीतोपिक रु. ५१/- रोख		"प्रयोग–अकोला"	"दृष्ट"
लेखक :—	अरविंद विश्वनाथ		
प्रशस्ती पत्र		"कलासंपदा"	"भिकारी आणि भिकारी"
लेखक :—	नाना ढाकुलकर		

९. उर्दू शिक्षणाचे वर्ग

९.१ दि. २४–१–८० उर्दू शिक्षणाच्या दुसऱ्या वर्गाचे उद्घाटन डॉ. इसाक जमखानवाला यांचे हस्ते, विभागीय आयुक्त श्री. द्वारकानाथ कपूर यांचे अध्यक्षतेखाली झाले. ह्या दुसऱ्या वर्गाला पण मोठया संख्येने चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१०. परीक्षा समिती

द्वितीय सत्र जानेवारी, १९८०.

परीक्षा फल

शासकीय परीक्षा :—मराठी प्राज्ञ :—

प्रथम श्रेणी :—श्री. लखबीरसिंह ढिल्लों (सर्वप्रथम), श्री. राजीव नारायण गुप्ता, श्री. महंमद कासमानी, श्री. एच्. व्ही. रंगस्वामी, श्री. भगवानदास वेलानी, गुरवानी किशन मनीराम.

मराठी प्रवीण

प्रथम श्रेणी :— श्रीमती कृष्णा बॅनर्जी (सर्वप्रथम),

द्वितीय श्रेणी :—श्रीमती एलीकुट्टी ऐरिक अब्राहम.

महाविद्यालयीन :—सा. पारंगत–२ (एम. ए. समकक्ष)

द्वितीय श्रेणी :— विजयकुमार इंगळे, (डॉ. सिंगणापूरकर स्वर्णपदक प्राप्त)

सा. पारंगत–१

प्रथम श्रेणी :—डॉ. कुसुमलता पटोरिया जैन

द्वितीय श्रेणी :—वसंत सूर्यवंशी

सा. स्नातक (बी. ए. समकक्ष)

द्वितीय श्रेणी :—सौ. जयश्री घारपूरे, नानाजी म्हशाखेत्री, दिवाकर कुळकर्णी, विनायक गोवरे, ह. स. देऊळकर, रा. ना. लोंढे, वा. वनकर, स. कु. ढोले, शा. ना. मस्के, कु. वीणा वैद्य, शशिकला हटेवार, पुष्पा रहाटे, आशा धाईत, अशोक देशपांडे, रा. के. जांभूळकर, या. कं. जांभूळकर, रा. ना. उभाले, सविता मेहता, सुषमा मेरखेडे, चंद्रकला उगेमुगे, सुरेखा व्यास, अशोक चरडे, घ. गो. राऊत, रा. अ. तेलंग, सुनीता शिरखेडकर, भीमलता चारखे, नी. धा. भुते, चं. श. रहंगडाले, शं. ना. फूलझेले, सौ. सुधा देवघरे, हे. व. मुळे, सुरेखा कानेटकर सं. वि. वाठोडकर, विजया पांडे, फ. ता. घागरे, शां. शा. काळबांडे.

प्रथम श्रेणी :—श्रीनिवास गेडाम, कु. सुरेखा उमाळकर, कु. प्रमिला खलोकार (सर्वप्रथम).

तृतीय श्रेणी :— अ. अ. मस्के, वेवी सोनकुसळे, शि. य. गोवरे, रा. न. बेले, योजना अंजनकर, सौ. प्रेमा अंजनकर, आ. स. जिचकार, कु. छाया चौधरी, जया उमाले, मीना जोशी, संध्या फडणवीस (श्रीमती इंदिरा पिंपळे प्रथमसत्र १९७९).

भाषा स्नातक (बी. ए. समकक्ष) (आवश्यक मराठी)

प्रथम श्रेणी :— कु. अल्का लाभशेटवार (सर्वप्रथम), कु. साधना बेलखेडे, न. कृ. पोयाम, कु. प्रमिला खलोकार, कु. सुवर्णा पटवर्धन, माणिक देसाई, लता उंबरकर, दि. न. सुरकार, कु. अल्का करताळकर, अ. ना. व्यवहारे, प्रतिभा आठवले.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

द्वितीय श्रेणी :—रोहिणी चव्हाण, हेमलता वच्युवार, इंदिरा गुनानी, प्रमिला भकने, शैला दंडाने, ज्योती नक्षणे, शैलजा पत्रीवार, सुषमा केळापूरे, शशीकला मिसाळ, सुभाष तोंडेवार, अ. य. कोकोडे, सु. कृ. ठाकरे, सुशीला गणेश, नंदा बाकडे, सुरेखा उमाळकर, मंजरी पांढरे, विजया धानोरकर, मंदाकिनी पाटणकर, सुनंदा पाटणे, अ. पं. कायरकर, शोभा पाठक, माधुरी काळे, शकुंतला झोरे, शकुंतला मंजरीकर, ज. वु. निनावे, न. रा. अग्रवाल, ध. गो. कान्हे, नि. म. वारापात्रे, दि. स. कराडे, भा. प्रा. तलमले, वि. च. त्रिवेदी, विमल चिंचामुलातपुरे, प्र. गो. देशपांडे, दि. ए. चावले, वि. अ. जोशी, मो. म. मावनेरकर, ग. स. लांजे, शोभा उके, ना. घ. चाफले, र. वि. वाघमारे, र. ज. चोरघडे, वि. न. मोनटक्के, अ. या. वोडखे, माणिक देव, मनिषा चेपुरवार, आशा ढवळे, नंदीनी म्हैसेकर, प्रभा येवले, अ. श. रामटेके, सु. च. टेंभुर्णे, वि. मा. दळवी, ध. ल. तिजारे, ह. च. कारंजेकर, ना. दा. दंडे, सं. अ. काटकर, मो. न. राऊत, हे. वा. कोल्हे, ना. ग. चांदपूरकर, ना. ना. उके, अ. व. दांडेकर, सं. वा. देशमुख, वि. गो. वावणकुळे, सु. वा. वैतुले, सु. दे. कडू, ज्योती पिदडी, मंगला काटकर, स्मीता तापस, हेमलता चांडोळकर, पुष्पा सांगोडे, उमुताई ढोके, माधुरी पाठक, दिलीप सावरकर, रा. के. यावलकर, आ. रा. वारसागडे, सौ. कपिला उपाध्ये, वा. तु. ठाकरे, अब्राहम टि. ओ., मुमताज अ. खान.

तृतीय श्रेणी :—कि. ने. कहाते, अ. वा. अहीरकर, चं. प्र. देशमुख, अ. मृ. मुसळे, दि. रा. हुडे, कु. शगुफ्ता अ. कहार खान.

परीक्षा वृत्त

१. १९७९–८० या वर्षी एकूण ५५०० परीक्षार्थी ७५ केन्द्रात सम्मीलित झालेत. गतवर्षी ही संख्या ४२०० होती. ह्यापैकी १००० च्या वर 'अमराठी' भाषिक विद्यार्थी होते.

२. १९८०–८१ वर्षासाठी अभ्यास क्रमात व परीक्षा शुल्कात बरेच परिवर्तन झाले असून नवी आवेदने पत्रे व माहिती पत्रे १ जुलै, १९८० नंतर मिळतील.

११. धनवटे रंग मंदिर :

वि. सा. संघाच्या धनवटे रंग मंदिराचे वातानुकूल करण्याचे काम पूर्ण करण्यांत आले आहे. रंग मंचासमोरील जीर्ण पडदा बदलून नवीन लावण्यांत आला. संपूर्ण रंग रंगोटीचे काम पूर्ण झाले. पाठीमागे कॅन्टीनच्या बाजूनी सुरक्षितेच्या दृष्टीने खाली समोर लोखंडी सरकते दरवाजे लावण्यांत आले आणि वरच्या बाजूला बालकनी च्या मागे ग्रील लाऊन मजबूती करण्यांत आली. जुने इलेक्ट्रीक वायरींग केसींग आदी पूर्ण काढून टाकून त्या ऐवजी नवीन वायर फीटींग करण्यांत आले व कंट्रोल स्वीच बोर्ड स्टेजच्या शेजारी आणण्यांत आला. मेकअप रूम मध्ये पंखे बसविण्यांत आले. ध्वनी व्यवस्था अद्यावत पणे सुधारण्यांचे प्रयत्न चालू आहेत.

धनवटे रंगमंदीराच्या बुकींग ऑफीसमध्ये २२५२९ टेलीफोनचे एक्सटेन्शन देण्यात आले असून पहिल्या गेट जवळ पब्लीक टेलीफोन पण बसविण्यात आला आहे. त्याचा नं. ३४०३० असा आहे.

१२. शाखावृत्त

१२.१. नरखेड–दिनांक २०–११–७९ ला पवनार आश्रमातील प्रचारीका कु. करूणा देसाई यांचे गीता व गीतेची शिकवण यावर भावपूर्ण भाषण झाले. समारंभाचे अध्यक्ष नगर परिषद उपाध्यक्ष श्री. टेकाडे हे होते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१२.२. दिनांक १४–१–८० या शाखेने ५७ व्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम घेऊन दिन साजरा केला. 'दुधात माशी पडली' नाटीका स्थानिक कलाकारानी सादर केली.

१२.३ लाखनी––दि. २६–१–८० ला गणराज्य दिनाच्या दिवशी राष्ट्रीय गीत गायन स्पर्धा आयोजित करण्यांत आली. कु. नंदा जांभूळकर प्रथम, कु. वसुंधरा निनावे द्वितीय आणि शिला भैसारे, तृतीय, अशी बक्षीसे मिळाली. दि. १७–३–८० ला गुडी पाडव्या निमित्त कवी संमेलन घेण्यात आले.

१२.४. करजगाव––दिनांक २७–११–७९ ला महात्मा ज्योतीबा फुले पुण्यतिथी साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी श्री. सुखदेवराव बन्सोड हे होते.

शाखेचे पदाधिकारी–– अध्यक्ष, सुधीर मा. वानखडे, उपाध्यक्ष– अशोक के. साडरकर, प्रदिप दा. सोनार, सचिव– संजय रा. खोडस्कर. सहसचिव– विनायक द. वाळखडे, म. अव्वास म. हसन, कोषाध्यक्ष–अनिल वा. सोनार, स्वागताध्यक्ष– विठ्ठल ठ. कांडलकर, महिला प्रतिनिधी–कु. उर्मीला पवार.

१२.५. गोंदिया— १, २, ३, जाने., ८० ला ले. कर्नल भा. त्र्यं. परांजपे यांची अनुक्रमे भारताची संरक्षण व्यवस्था, स्वतंत्र भारताचा लष्करी इतिहास, व दासबोधातील युद्ध शास्त्र या विषयावर व्याख्याने झाली. महाराष्ट्र शासनाने ले. कर्नल परांजपे यांना पुरस्कार दिल्या बद्दल शाल व श्रीफळ देऊन गौरव केला.

१२.६ ७–१–८०––"गुड वाय स्वामी" या विनोदी हिन्दी नाटकाचा प्रयोग सादर करण्यांत आला.

१२.७ १५–१६–१७ जाने., ८०––पुण्याचे विचारवंत डॉ. अनंत आठवले यांची कै. भाऊसाहेब कुळकर्णी व्याख्यान मालेत अनुनिकांचा दृष्टीकोन व महाभारतातील वास्तव या विषयावर व्याख्याने झाली.

१२.८ २३ जाने. ८०––नागपूरचे श्री. सहस्त्रबुद्धे यांचे "प्रभावंतांची प्रतिभा" या विषयावर गडकऱ्यांचे वाङमयावर व्याख्यान झाले. गडकरी स्मृति दिना निमित्त स्थानिक कविंचे एक कवि संमेलन घेण्यात आले.

१२.९ ५–२–८० रंग साधनेचा "वेडा वृंदावन" हा नाट्य प्रयोग शाखेतर्फे घेण्यांत आला.

१२.१० १५–२–८० वि. सा संघाचे अध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर व कोषाध्यक्ष श्री. अ. ल. लिमये यांच्या स्नेहभेटीप्रीत्यर्थ कार्यक्रम घेण्यांत आला.

१२.११ २४–२–८० गोंदियाचे प्रसिद्ध उद्योगपति व गोंदिया शाखेचे माजी अध्यक्ष व आजीव सदस्य महादेवरावजी धोटे यांचे निधनाबद्दल शोक सभा घेण्यांत आली.

कारंजा (घाडगे)

१२.१२ ७–१२–७९ ला प्रा. पांडुरंग वऱ्हाडे ह्यांचे "जीवनात आध्यात्माचे महत्व" ह्या विषयावर प्रवचन झाले.

दर्यापूर

१२.१३ १४–१–८०––कथा कथन व कविसंमेलनाचा कार्यक्रम घेण्यांत आला. श्री. सतीश तराळ यांनी "जन्मठेप" व केशव बोवडे यांनी "एक दिवशी काऊ आला" ही कथा कथन केली.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कविसंमेलनाच्या कार्यक्रमात, श्री. सतीश रोहणकर, श्री. सतीश तराळ, श्री. शेखर ढवळे व सौ. शांताबाई गणोरकर यांनी भाग घेतला.

१२.१४ ३–२–८०––"गीता–सौरभ" मधील पद गायन श्रीराम प्रभुणे यांनी केले. तबल्यावर श्री. जगन्नाथ गावंडे हे होते.

१२.१५ २३–२–८० श्री. रामचंद्र हंबर्डे अकोला यांचे राष्ट्र व धर्म या विषयावर व्याख्यान झाले.

खामगाव :

१२.१६ २ मार्च ते ८ मार्च, खामगाव येथे कोल्हटकर स्मारक व्याख्यानमाला व स्व. वा. ना. देशपांडे स्मृतिदिन साजरा करण्यांत आला.

मुर्तिजापूर :

१२.१७ १७ जाने. ते २१ जाने. ८० "कै. प्रतिभा तिडके स्मृति व्याख्यान माला" घेण्यांत आली. सर्वश्री डॉ. अनिल अवचट, ग. वा. बेहेरे, दाजी पणशीकर व रू. पा. पाजणकर यांची व्याख्याने झाली.

इतर शाखांचे कार्यवृत्त हाती आलेले नाही.

दप्तरी संदर्भ ग्रंथालय
30382
दाखल नोंद क्रमांक
दिनांक 25.2.98
38.
विदर्भ साहित्य संघ, नागपूर
R.Z

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

—विक्रीस तयार असलेली प्रकाशने—

पुस्तके	रु. पैसे
१. कै. हरिभाऊ नेने यांचा संशोधन लेखसंग्रह, भाग २	६-००
२. The Vedasthan or the Ancient Home of the Indo Aryans : ले. कै. डॉ. तु. ज. केदार	६-००
३. प्रयोगक्षम मराठी नाटके : डॉ. मु. श्री. कानडे	३०-००
४. मराठी वर्णोच्चारविकास : डॉ. द. ह. अग्निहोत्री	३२-००
५. लोकसाहित्यसंपदा : ना. रा. शेंडे	१२-००
६. केशवसुत वाङ्मय-सूची : सौ. उज्वला अयाचित	२-००
७. कै. डॉ. य. खु. देशपांडे : "वाङ्मय-सूची"	२-००
कै. गडकरी वाङ्मयावरील प्रबंध	
१. गोविंदाग्रज यांचा कवी या नात्याने विचार : कविभूषण प्रा. अण्णासाहेब खापर्डे	१-००
२. गडकऱ्यांच्या नाटकांतील स्वगतः : प्रा. श्री. मा. कुळकर्णी	१-००
३. सुतारीचे नव्हे, एकतारीचे बोल : द. वि. तेंडूलकर	१-००
४. गडकऱ्यांची खरी भूमिका : प्रा. म. श्री. पंडित	१-००
५. गडकऱ्यांची नाटयशैली : प्रा. रू. पां. पांजणकर	१-२०
६. गडकऱ्यांची नाटयप्रकृति व नाटयसृष्टी : वसंत वरखेडकर	१-२०
अमराठी भाषिकांना मराठी व्याकरणाचा अभ्यास करण्याकरिता सहज-सोपे पुस्तक	
७. हिन्दी मराठी भाषा प्रवेशिका, द्वितीयावृत्ती : श्रीमती मालतीबाई श्रीखंडे	४-००
८. तीन भाषणे : गणेश व्याख्यानमाला १९७७ (प्रथम आवृत्ती) : डॉ. र. शं. केळकर	४-००

मागणीकरिता संपर्क साधा :

सरचिटणीस,

विदर्भ साहित्य संघ, झांशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर-१२.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आभार पोच

क्रमांक	पुस्तकाचे नाव	लेखक	प्रकाशक	पृष्ठे	किंमत
१.	प्राचीन भारतीय साहित्य-मीमांसा एक आकलन	अशोक रा. केळकर	परामर्श प्रकाशनमाला, तत्वज्ञान विभाग, पुणे विद्यापीठ-१	७८	१०-००
२.	समृद्धीच्या वाटा	मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांच्या निवडक भाषणांचा संग्रह	माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई	२११	४-२०
३.	संगीत दुष्टचक्र नाटक	वृंदावन दंडवते	प्रास प्रकाशन, ३९ नाथ माधव, कांदिवाली पूर्व, मुंबई–६७	४८	६-००
४.	समुद्र	वसंत दत्तात्रय गुर्जर	–,,–	५२	६-००
५.	इसम	गौर किशोर घोष	–,,–	९५	१२-००
६.	लार्ड केन्स, व्यक्ति आणि विचार	द. पां. कुळकर्णी वा. रं. रायरीकर	सोमैय्या पब्लिकेशन्स प्रा. लि. मुंबई	७८	८-००
७.	विस्तारलेले क्षितिज	डॉ. हे. वि. इनामदार डॉ. सौ. अंजली सोमण	संजय प्रकाशन, ९१७।२२, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे–४	१९९	२५-००
८.	तीन महान सारस्वत	धनंजय कीर	स्वस्तिक पब्लिशिंग हाऊस, डोंबिवली	१२४	१६-००
९.	दिनार	निरंजन उजगरे	मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, गिरगाव, मुंबई-४	६४	७-००
१०.	पवन-धारा	पा. या. कावडे	संत मंडळी सेवा मारोती देवस्थान, आंजी (मोठी) जि. वर्धा	५२	२-००

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

क्रमांक	पुस्तकाचे न.	लेखक	प्रकाशक	पृष्ठे	किंमत
११.	निधर्मी	पु. म. शहाजिंदे	आंतर भारती प्रकाशन, औराद शहाजानी, जि. उस्मानाबाद	४०	११-००
१२.	[illegible]	प्रदीप गुजर	प्रदीप गुजर, १, सुयोग, रामवाडी नौपाडा, ठाणे—२		५-००
१३	प्राचीन जैन प्र[illegible]कथा	पंढरीनाथ रेगे	श्री. विद्या प्रकाशन, २५० क/१६, शनवारपेठ, अष्टभुजा देवी रस्ता, पुणे-३०	९०	१२-००
१४.	आहिताग्नि राजवाडे	श्रीकृष्ण के. क्षीरसागर	—,,—	४००	४०-००
१५.	मुद्दे	सौ. पुष्पा अ. कदम	शारदा प्रकाशन, वजिराबाद, नांदेड	६८	६-००
१६.	गुलमोहोर	लीला धनपलवार	—,,—	५२	५-००
१७.	अवलाद	अरुणकुमार इंगळे	प्रज्ञा प्रकाशन, चतुरबाग, सिव्हिल लाईन, सोलापूर	५६	८-००
१८.	श्री गोविंद प्रभुचरित्र	व. दि. कुळकर्णी	व्हीनस प्रकाशन, पुणे-३०	१००	१०-००
१९.	त्रिवेणी	वि. शा. काळे	काळे ब्रदर्स पब्लिकेशन, श्यामसदन, ६० सोमवार पेठ, पुणे-११	४४	५-००
२०.	पाखरे भिरभिरती अंबरी	भानु शिरधनकर	वामन विष्णु भट, अभिनव प्रकाशन, ५३ गुरुनानक मार्केट, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-१४	१५३	२०-००
२१.	गर्भश्रीमंतीचं झाड	पद्मजा फाटक	—,,—	१०४	१२-००
२२.	लोकधाटी	दत्तात्रय गणेश गोडसे	पॉप्युलर प्रकाशन, ३५ सी, ताडदेव रोड, मुंबई-३४	१००	१६-००

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

क्रमांक	पुस्तकाचे नाव	लेखक	प्रकाशक	पृष्ठे	किंमत
२३.	श्री गुलाबराव महाराजांची विचारसंपदा	डॉ. कृष्ण माधव घटाटे	विश्व साहित्य प्रतिष्ठान प्रकाशन, नागपूर	४५१	२५-००
२४.	समर्पण	सौ. पद्मा वापट	श्री. ना. गो. वापट, वालाघाट रस्ता, गोंदिया-४४१६०१	११२	८-००
२५.	अस्मिता	श्रीपाद गंगाधर कावळे	वसुधा प्रकाशन, नागजीभाई टाऊन, सीतावर्डी, नागपूर	४०	५-००
२६.	वृंदावन	फ. मुं. शिंदे	प्रोग्रेसिव्ह को. पब्लिकेशन सो. लि., औरंगाबाद	४८	८-००
२७.	उठाव	वा. ह. कल्याणकर	युगकर्ता प्रकाशन, २८ स्वातंत्र्य सैनिक कॉलनी, औरंगाबाद	५५	१३-००
२८.	चक्रपाणि-चिंतन	ब्रम्हानंद देशपांडे	राऊळ प्रकाशन, श्रीकृष्ण नगर, पैठण रोड, औरंगाबाद	१६०	१५-००

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी (Yugwani) Regd. No. 1174 M. H.

विदर्भ साहित्य संघ, नागपूर.

वार्षिक वर्गणीदारांना सूचना

टेलिफोन नं. २२५२९

विशेष साधारण सभेत संमत झाल्याप्रमाणे वि. सा. संघाच्या सर्वसाधारण सभासदांची वार्षिक वर्गणी रु. १०/- व आजीव सभासदांची वर्गणी रु. १५१/- करण्यात आली आहे. हा बदल ९ सप्टेंबर, १९७९ पासून अमलात आलेला आहे. संस्थेचे आर्थिक वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च आहे. साधारण सभासदांनी चालू वर्षाची वर्गणी एप्रिल, १९८० मध्ये भरावी.
धनवटे रंगमंदिर पब्लीक टेलीफोन नंबर– ३४०३०.

प्रकाशक : गो. स. देहाडराय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झांशी राणी चौक, नागपूर–१२.

मुद्रक : क. मां. सावंत, व्यवस्थापक, नागपूर विद्यापीठ मुद्रणालय, नागपूर–१०.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ